

# रंग एकेकाचे

निर्मलकुमार फडकुले

# रंग एकेकाचे

ललित लेख

प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले

कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ३०

प्रकाशक : अनिरुद्ध अनंत कुलकर्णी
कॉन्टिनेन्टल प्रकाशन
विजयानगर, पुणे ३०

मुद्रक : निगुडकर अॅण्ड अॅसोसिएटस्
१५५२, सदाशिव पेठ, पुणे ३०

टाईपसेटिंग : रेखा कुलकर्णी
आर्. एम्. टाईपसेटर्स
१२०४/२५ पुरंदरे रस्ता
शिवाजीनगर, पुणे ३०.

मुखपृष्ठ : संदीप सोनवणी

प्रकाशन क्रमांक : ११३७

प्रथमावृत्ती : १९९३

किंमत चाळीस रुपये

रसिकहो व मराठी साहित्य प्रेमी स्नेहजनहो ,

माझे वडील प्रा.डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे साहित्य मी ई-साहित्य प्रतिष्ठान तर्फे आपणासाठी प्रकाशित करीत आहे. २८ जुलै २०२० या त्यांच्या चौदाव्या पुण्यतिथी निमित्त त्यांच्या साहित्याचे प्रकाशन व्हावे व ते जगाच्या कानाकोपऱ्यापर्यंत पोहोचवावे हा उद्देश आहे.

पेशाने मराठीचे प्राध्यापक,अत्यंत हळवे व जीवनावर मनापासून प्रेम करणारे असे माझे वडील. केवळ साहित्यिकच नव्हे तर ते प्रख्यात वक्ते देखील होते. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातील गावांमध्ये त्यांनी प्रबोधनाचे कार्य केले .संत साहित्याचा त्यांचा गाढा अभ्यास होता. त्यांनी आकाशवाणी पुणे, सांगली, सोलापूर यावरून संतांच्या विविध अभंगांचे निरूपण केले आहे आजही ते आकाशवाणी वरून प्रसारित होत आहे. ते सर्व प्रसारित कार्यक्रम आपल्या भेटीस इ-साहित्य प्रतिष्ठान मार्फत आणणार आहोत. विविध शासकीय व विद्यापीठीय समित्या, अभ्यास मंडळे , बालभारती यांच्या माध्यमातून त्यांनी खूप मोलाचे कार्य केले आहे. अग्रगण्य वृत्तपत्रातून व नियतकालिकांमधून ४०-४५ वर्षांहून अधिक काळ त्यांनी लेखन केले तेही पुस्तक रूपात प्रसिद्ध झाले . त्यांची काही व्याख्याने देखील रसिकांच्या भेटीस आणणार आहोत. त्यांच्या स्वभावाचे विविध पैलू त्यांच्या साहित्यातून उलगडत जातील व खास करून जीवनाविषयक दृष्टिकोन त्यांच्या ललित लेखनातून आपणास समजेल. देश-परदेशातील असंख्य रसिकांनी त्यांच्या सर्व साहित्याची पुनर्प्रकाशनाची मागणी केली व ती आता पूर्ण होत आहे याचा मला आनंद आहे. या प्रकाशनाला ई साहित्यने केलेल्या सहकार्यासाठी त्यांचा मी आभारी आहे.

अजित नि. फडकुले, सोलापूर
ajitphadkule@hotmail.com
९४२२४६३६४२

' रंग एकेकाचे ' हे प्रा. डॉ. निर्मलकुमार फडकुले लिखित पुस्तक 'कॉंटिनेंटल प्रकाशन' यांनी १९९३ साली प्रकाशित केले. त्या पुस्तकाचे सर्वाधिकार लेखकाचे चिरंजीव व वारस श्री अजित फडकुले यांच्याकडे आहेत.

त्यांनी ई साहित्य प्रतिष्ठानला याचे ई पुस्तक बनवून विनामूल्य वितरित करण्याचे कायदेशीर अधिकार दिले आहेत. त्यानुसार आम्ही आमच्या वाचकांना ते पुस्तक विनामूल्य देत असून त्यांनी ते आपल्या ओळखीच्या वाचकांत विनामूल्य वितरित करावे ही विनंती करत आहोत.

या परवानगीसाठी आम्ही

श्री अजित फडकुले :-9422463642

ajitphadkule@hotmail.com

यांचे आभारी आहोत.

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com
www.esahity.com
www.esahity.in

# रंग एकेकाचे

## हे पुस्तक विनामूल्य आहे

## पण फ़ुकट नाही

या मागे अनेकांचे कष्ट व पैसे आहेत .

## हे वाचल्यावर खर्च करा ३ मिनिट

१ मिनिट : श्री. अजित फडकुले यांना फ़ोन किंवा मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा

१ मिनिट : ई साहित्य प्रतिष्ठानला मेल करून हे पुस्तक कसे वाटले ते कळवा.

१ मिनिट : आपले मित्र व ओळखीच्या सर्व मराठी लोकांना या पुस्तकाबद्दल अणि ई साहित्यबद्दल सांगा.

असे न केल्यास यापुढे आपल्याला पुस्तके मिळणे बंद होऊ शकते.

दाम नाही मागत. मागत आहे दाद.

साद आहे आमची. हवा प्रतिसाद.

दाद म्हणजे स्तुतीच असावी असे नाही. प्रांजळ मत, सूचना, टीका, विरोधी मत यांचे स्वागत आहे. प्रामाणिक मत असावे. ज्यामुळे लेखकाला प्रगती करण्यासाठी दिशा ठरवण्यात मदत होते. मराठीत अधिक कसदार लेखन व्हावे आणि त्यातून वाचक अधिकाधिक प्रगल्भ व्हावा, आणि अखेर संपूर्ण समाज एका नव्या प्रबुद्ध उंचीवर जात रहावा.

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क लेखकाचे चिरंजीव व वारस श्री. अजित फडकुले यांचेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण व नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी त्यांची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई (तुरुंगवास व दंड) होऊ शकते.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

ई प्रकाशक :ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.in

www.esahity.com

esahity@gmail.com

eSahity Pratishthan

eleventh floor

eternity

eastern express highway

Thane.

प्रकाशन : २८ जुलै २०२०

(स्व. श्री. निर्मलकुमार फडकुले स्मृतीदिन)

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध.
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता.
- हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापुर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापुर्वी ई साहित्य प्रतिष्ठानची परवानगी-घेणे आवश्यकआहे.

# पुस्तकं वाचून कोणाला शहाणपण येतं का?

हो! आम्ही म्हणतो हो. वाचन करणारी माणसं त्यांच्याबरोबरच्या वाचन न करणाऱ्या माणसांहून अधिक प्रगल्भ आणि विचारी असतात.

अनुभवाहून मोठा गुरू नाही. कोणत्याही प्राण्याला, सजीवाला, अनुभवाने शहाणपण येतं. काही प्राण्यांना त्यांचे जन्मदाते थोडं शिक्षण देतात. बाकीचे प्राणी अनुभव घेत घेत शिकतात. फक्त मानवच असा प्राणी आहे ज्याला पुर्वीच्या पिढीतल्या माणसांचे अनुभवही शिकवतात. ते पुस्तकांद्वारे. माणसाला आपल्या सभोवताली नसलेल्या, दूर देशातल्या माणसांचे अनुभव समजून घेऊन शिकता येतं. तेही पुस्तकांद्वारे. प्रत्यक्ष अनुभवांहून चांगला शिक्षक नाहीच. पण इतरांना आलेले अनुभव, त्यांनी खाल्लेल्या ठेचा याही माणसाला शिकवतात आणि शहाणे करून सोडतात.

**अनुभव पुस्तक असतात आणि पुस्तक अनुभवच असते.**

**वाचाल तर वाचाल हे शंभर टक्के सत्य आहे**.


www.esahity.in आणि www.esahity.com

मंडळी!

वाचायला तर हवंच!

पण वाचून झाल्यावर प्रतिसादायलाही हवं...

...आणि स्वतःही लिहायला हवं.

माझे जिवाभावाचे मित्र

**डॉ. यू. म. पठाण**

आणि

**डॉ. सौ. नजमावहिनी** यांना

स्नेहपूर्वक.

# मनातलं . . . .

*अलीकडच्या काही वर्षांत जे लेखन मी विशेषत्वानं केलं ते 'ललित गद्य' या सदरात समाविष्ट होण्यासारखं आहे. 'रंग एकेकाचे' हा माझा चौथा ललितसंग्रह आज प्रकाशित होत आहे. या पूर्वीच्या माझ्या तीन ललितसंग्रहांचं रसिकांनी मन:पूर्वक स्वागत केलं. वाचकांना काहीसं अंतर्मुख आणि अस्वस्थ करून एक प्रकारचा वैचारिक आनंद देण्याच्या दृष्टीनं ललित गद्य हा वाङ्मयप्रकार समर्थ आहे असं मला आढळलं. अनुभव आणि चिंतन यांच्या विविधरंगी छटा ललित गद्यातून जेव्हा प्रकट होतात तेव्हा त्या गद्याला काव्यात्मकतेचा स्पर्श होतो आणि हा वाङ्मयप्रकार लेखकाला व वाचकाला वेगळाच आनंद देऊ शकतो.*

*जीवनाचे आणि माणसांचे वेगवेगळे रंग या लेखसंग्रहातून व्यक्त झाले आहेत असं मला वाटतं. जीवनासंबंधीची माझी जाणीव काही अंशी यातून प्रकट होईल. स्वैरपणानं काही ठिकाणी हसतखेळत तर कित्येक स्थळी गंभीरपणानं, मनात आलेल्या विचारांना मी वाट करून दिली आहे. ललित गद्य हा एक सांकेतिक आणि बंदिस्त असा वाङ्मयप्रकार राहिलेला नाही. सहजता आणि स्वैरता, उत्कटता आणि संयम यांच्या मिश्रणातून विकास पावत चाललेला हा एक प्रसन्न वाङ्मयप्रकार आहे. आपल्या आयुष्याची वाट चढउतारांनी काट्याकुट्यांनी भरलेली असते. सुखदु:खाचे जे चित्रविचित्र अनुभव पदरात पडतात ते न्याहाळून पाहाणं हा या लेखनाचा महत्त्वपूर्ण हेतू आहे. माझे अनुभव फार व्यापक आहेत असा माझा दावा नाही. पण या अनुभवानांना चिंतनाची आधारभूमी मिळाली म्हणजे कडवट अनुभवांनाही एक प्रकाराची रुची येते. चिंतनात मला रस आहे. जीवनाच्या भिन्न भिन्न रूपांवर मी लुब्ध आहे. अनेक रंगांनी रंगलेला माणूस आणि त्याचं मन माझ्या कुवतीप्रमाणं समजून घेण्याचा मी प्रयत्न केला आहे. हे आकलन कितपत वास्तविक आणि परिणामकारक आहे हे वाचकांनीच ठरवायचं आहे. माणूस आणि त्याचं आयुष्य हा साहित्याचा एक चिरंतन आणि*

सनातन विषय आहे. ललितनिबंधाच्या मर्यादित वर्तुळात जेवढं मला जाणवलं तेवढं रंगवण्याचा मी प्रयत्न केला आहे.

कुणी काही म्हटलं तरी दु:खं आणि विसंगती व वैगुण्यं यांनी वेढलेलं असूनही या जीवनाचे काही रंग विलक्षण आकर्षक आहेत. आणि त्या रंगात आपणही स्वत:ला बुडवून टाकावं असं वाटत राहातं. मी काही माणसं टिपली.

त्यांचे मानसिक आणि भावनिक रंग काही अंशी पाहिले. लालित्यपूर्ण चिंतनाच्या वाटेनं जात ते रंग इथं साकार करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

'संचार', 'तरुण भारत' या नियतकालिकांतून प्रकाशित झालेलं हे ललितलेखन एकत्र गुंफून रसिकांच्या पुढ्यात ठेवलं आहे. माझे मित्र व मराठीतील साहित्यसमीक्षक श्री. अनिरुद्ध कुलकर्णी यांनी स्नेहभावाने 'रंग एकेकाचे' प्रकाशित करण्याची जबाबदारी स्वीकारली. त्यांचे आभार मानणं औपचारिक ठरेल.

हे रंग रसिकांना आवडतील अशी आशा करतो.

— निर्मलकुमार फडकुले

'विवेक'
१०, विद्यानगर,
सोलापूर

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | आता कशाला उद्याची बात ? | १ |
| २. | आवा चालली पंढरपुरा | ९ |
| ३. | अस्सल आणि नक्कल | १४. |
| ४. | रामायणातील उर्मिला | २१ |
| ५. | वनवासी फूल | २६ |
| ६. | साहेब | ३२ |
| ७. | आधुनिक रामायण | ३९ |
| ८. | सावळाच रंग तुझा | ४६ |
| ९. | बुद्धी आणि श्रद्धा | ५२ |
| १०. | एक तुरुंग, दोन कैदी | ५९ |
| ११. | पुतळे | ६५ |
| १२. | राशीला लागलेले भविष्य | ७१ |
| १३. | भाषा : ओठातली आणि पोटातली | ७९ |
| १४. | माणसानं किती वर्षं जगावं ? | ८५ |
| १५. | पैसा आणि माणूस | ९१ |
| १६. | एखाद्याचे नशीब | ९७ |
| १७. | हे पुत्र अमृताचे | १०४ |
| १८. | स्मशानाचे गाणे | ११० |
| १९. | माणसाचे रंग | ११६ |
| २०. | तेथे चल राणी | १२४ |
| २१. | सूत्र तुटलेला पतंग | १३० |
| २२. | जे जे होईल ते ते पाहावे | १३६ |
| २३. | कांचनमृगाचा पाठलाग | १४३ |

□ □ १

# कशाला उद्याची बात ?

'माणूस' चित्रपटातलं एक लोकप्रिय गीत अजून रसिकांच्या मनात रेंगाळत असेल, 'आता कशाला उद्याची बात ? बघ उडून चालली रात.' त्या चित्रपटाची नायिका एक गणिका आहे. आपल्या चाहत्यांच्या समोर नृत्य करताना तिनं हे गीत धुंदपणानं गायिलं आहे. हे गीत आठवलं की अनेक विचार मनात पिंगा घालू लागतात. गाण्याचे सूर तर सुंदर आहेतच. पण गीतातल्या शब्दांचा भावार्थही मला अधिक आकृष्ट करून घेतो. कोणे एके काळी चित्रपटातल्या गीतांना अर्थ असायचा. कानांबरोबरच आपल्या मनालाही एक सुंगधी अर्थ घेऊन स्पर्श करण्याची शक्ती त्या गीतात असायची. आता आजची अर्थशून्य चित्रपटगीतं ऐकवत नाहीत. भाव आणि अर्थ नसेल तर केवळ सूर अपुरे वाटतात. स्वर आणि अर्थ हातमिळवणी करून नृत्य करू लागले तर त्या गीताला रसिक कसे डोक्यावर घेतात हे सांगायलाच नको. 'माणूस' मधल्या त्या गाण्याचा अभिप्राय खरोखरच आकर्षक आहे. 'जीवन आनंदाच्या क्षणांनी काठोकाठ भरलेलं आहे. आयुष्याची ही रात्र फुलत चालली आहे. रसरंगात दंग होण्यातला आनंद भरभरून घेण्याऐवजी उद्याच्या विचारानं आज दुःखी होण्याचं काय कारण आहे ? ही उडून चाललेली तरणीताठी रोमॅन्टिक रात्र कवेत पकडून ठेवली पाहिजे. भविष्याची विवंचना या वेळी करून वर्तमानातला उन्माद हरवून बसण्यात कसलं स्वारस्य आहे ?'

खरं तर जीवनासंबंधीचा हा विचार एका अर्थानं मला सयुक्तिक वाटतो. वर्तमानकाळातल्या चांदण्याकडं पाठ फिरवायची आणि उद्या पडणाऱ्या अंधाराची काळी सावली आजच मनावर पाडून उदासीनतेनं चालत राहण्याची चमत्कारिक सवय आम्हाला जडली आहे. आम्ही भारतीय माणसं नको तितके निवृत्तिवादी आहोत. जीवनातले आनंदाचे, सैरभैर होण्याचे, धुंद क्षण नाकारण्याची ही खोड केव्हा जाईल कुणास ठाऊक ?

आपण जीवनाच्या वाहत्या प्रवाहाबरोबर समरस होऊन चालत आहोत ही जाणीवच मनुष्याला आनंददायक वाटते. जगण्याच्या मार्गात अनेक दुःखं आणि आपत्ती उभ्याच असतात. पण माणूस दुर्दम्य जीवनासक्तीमुळं त्या दुःखाची कदर न करता चालतच राहतो. कारण दुःखवेदनांचा स्वीकार करून चालण्यातही एक आगळा आनंद निश्चित असतो.

आमच्या भारतीय तत्त्वज्ञानात दुःखवादी विचार अनेक ठिकाणी आला आहे. या जगात मनुष्य केवळ एकाकी आहे. त्याला कोणीही नातेवाईक नसतात. सर्व प्रकारची नाती मृगजळासारखी आभासात्मक आहेत. जगातले सारे मोह आणि लोभ, आनंदस्थळे आणि सुखकल्पना हा केवळ अज्ञानाचा आविष्कार आहे. असा निराशेचा व निवृत्तीचा सूर भारतीय तत्त्वदर्शनात आढळतो. इहलोकातले आयुष्य परलोकातल्या तरतुदीसाठी केवळ मनुष्याने वापरावे. इथल्या मोहाच्या चक्रव्यूहात त्याने सापडू नये अशा आशयाचा उपदेश मी कितीतरी वेळा ग्रंथांतून वाचला आहे, व्याख्यान प्रवचनांतून ऐकला आहे. रस चाखण्यापेक्षा रसरंगाकडे पाठ फिरवणाऱ्या माणसाला अधिक सन्माननीय मानण्यात येत असते याचं मला मोठं आश्चर्य वाटतं. एकदा माझ्याकडे आलेल्या एका धार्मिक गृहस्थाच्या पुढ्यात त्याच्या अल्पोपाहारासाठी मी वेगवेगळी रसमय फळं ठेवली. ती सारी फळं ताजी होती. त्यांचा रंग आकर्षक होता. केवळ त्या फळांच्या दर्शनानं कुणाही रसिकाला त्यांचा मोह पडला असता. पण हा गृहस्थ फळांनी भरलेल्या त्या पात्राकडे नापसंतीनं पाहात होता. तो म्हणाला,

'जिभेचे चोचले पुरवण्यासाठी ही फळं असतात. मला सर्वप्रकारच्या मोहापासून अलिप्त राहायचं आहे. सामान्य प्रतीचं खाद्य केवळ शरीरधारणेसाठी दिवसातून एकदाच मी घेतो. खाण्यापिण्याची लालसा मी प्रयत्नपूर्वक मारून टाकली आहे. कोणतेच इंद्रियजन्य सुख मला आनंद देऊ शकत नाही. सारी इंद्रिये मी माझ्या पूर्ण कह्यात ठेवली आहेत. परमात्म्याची उपासना करण्यासाठी शरीर धारण करून राहावं इतकाच माझा हेतू आहे. त्यामुळं तुमची ही मिष्ट फळं मी स्वीकारू शकत नाही.'

त्या माणसाची मला दया आली. जीवनातले कित्येक सुंदर आणि प्रसन्न असे विषय या विरक्त माणसानं कायमचे बाजूला सारावेत यात मला तरी विवेकहीनतेची परमावधी वाटली. गायनाचे मधुर आलाप हा मनुष्य ऐकणार

नाही. उमललेल्या टवटवीत फुलांचा सुगंध हा हुंगणार नाही. एखाद्या सुंदर स्त्रीच्या लावण्याकडे हा कधीच आकृष्ट होणार नाही. गोड फळांचा रस चाखणेही त्याला निषिद्ध आहे. याचा अर्थ जीवनाच्या विविधरूपी सुंदरतेला यानं अरसिकपणानं अव्हेरलं आहे. मग याच्या जगण्याचे तरी प्रयोजन काय ? जगणं म्हणजे केवळ शरीराचं धारण करणं नव्हे.

जीवनातल्या नानाविधतेचा, सुखदु:खांचा जाणीवपूर्वक स्वीकार करून अनुभवांचा आस्वाद घेणे म्हणजेच जीवन जगणं आहे. परमेश्वराची उपासना करताना जे जे सुंदर असेल, मिष्टमधुर असेल ते ते नाकारावं लागत असेल तर तो परमेश्वर मिळवून तरी काय साधणार आहे ? खरं तर त्या परमेश्वरानं या सृष्टीत अनेकानेक चित्रविचित्र सौंदर्याची विलक्षण चित्रे रेखाटली आहेत. प्रचंड लाटांनी उचंबळणाऱ्या या समुद्र किनाऱ्यावर एखाद्या धूसर संध्याकाळी किंवा चांदण्यारात्री काही वेळ थांबण्यात केवढा आनंद साठवलेला आहे !

क्षितिजापर्यंत पसरलेला तो अथांग सागर म्हणजे एका भव्य सौंदर्याचा अवीट आविष्कार आहे. त्याच्याकडे कितीही वेळ पाहिलं तरी डोळ्यांची तृप्ती होत नाही. एखादी गायिका स्वरांच्या माध्यमातून आपल्या मनातलं प्रणयभावनेचं हळुवार दर्शन घडवते. तेव्हा तिच्या सुरांतली व्याकुळ करणारी उत्कटता एक प्रकारचा उदास आनंद देत असते. सूर तरी किती प्रकारचे असतात म्हणून सांगावं ? अरुणोदयाची चाहूल लागताच झाडाझुडपांत राहिलेले असंख्य पक्षी आपापल्या विशिष्ट सुरांतून आपला आनंद व्यक्त करतात आणि त्यांच्या शब्दांनी सारं आसमंत कोंदून जातं. हा अनुभवही मी अनेक वेळा घेतला आहे. असं वाटतं की प्रत्येक अनुभवाला वेगवेगळ्या आनंदाचं अधिष्ठान आहे. दु:खाच्या वेदनेलाही ते असू शकतं. साऱ्या सृष्टीत आनंदाचा कधीच न ओसरणारा महान उत्सव चालू आहे. सृष्टीचं रूप जर सौंदर्यमय आहे तर तो परमेश्वर म्हणजे मूर्तिमंत सौंदर्यरूपच असेल.

सौंदर्य हा शब्द मी अनेक अर्थांनी योजलेला आहे. केवळ बाह्यसुंदरतेची कल्पना माझ्या मनात नाही. सौंदर्य एखाद्या भावनेत, विचारात, वृत्तीत दिसू शकतं. एखाद्या दु:खिताच्या डोळ्यांतले अश्रू वत्सलतेनं टिपणाऱ्या हळुवार हातातलं भावसौंदर्य विसरता येईल काय ? ओबडधोबड पत्थरातून प्रतिमा घडवणाऱ्या शिल्पकाराच्या मुद्रेवरचं तृप्तीचं सौंदर्य खरोखरच प्रेक्षणीय असतं.

एकदा एका दीड वर्षाच्या बालिकेच्या डोळ्यात तरंगणारं खट्याळ खोडकर हास्य मी पाहिलं आणि पुढं कित्येक वर्षं त्या हास्यातला लाडिकपणा मी विसरू शकलो नाही. हास्यच सुंदर असतं असं नव्हे तर अश्रूंनाही अनेक वेळा सुंदरतेचा सुगंध येऊ शकतो. मला येशू ख्रिस्ताच्या डोळ्यातलं अश्रू सुंदर वाटतात. माणसाच्या दुराचरणामुळं व्याकुळ झालेल्या त्या महात्म्याला आपले अश्रू सांडावे लागले हे दु:खाचं दर्शन आहे. खरं, पण या दु:खाला माणुसकीचा जो रुचिर सुवास येतो तो खरोखरच अवर्णनीय आहे. कोणी काही म्हटलं तरी सुखदु:खांनी आणि चित्रविचित्र दृश्यांनी नटलेली ही वसुंधरा असंख्य प्रकारच्या सुंदरतेचं माहेरघर आहे.

प्रत्येक सुंदरता आगळी असते, वेगळी असते. तिचे रंगढंग निरनिराळे असतात. वर्षाकाळात दुथडी भरून मस्तवाल वेगानं रोरावत चाललेला नदीचा प्रवाह पाहिला म्हणजे सौंदर्यातली भीतिदायकता प्रत्ययाला येते आणि आपण स्तिमित होऊन त्या प्रवाहाकडे पाहत राहतो. नायगाराचा महाप्रचंड धबधबा पाहिलेल्या काही रसिकांनी मला सांगितलं, 'हा धबधबा म्हणजे सृष्टीच्या विलक्षण सौंदर्याचं एक अद्‌भुत दर्शन आहे. कोणत्याही प्रतिभावंताला कल्पनेतही न दिसणारं अभिनव दृश्य इथं दिसतं. त्या प्रचंड जलस्रोताचा भव्य उद्‌घोष कानामनात रक्ताच्या प्रत्येक थेंबात भरून जातो. रूद्र आणि तरीही प्रसन्न, भीषण आणि तरीही आनंददायक असं अूपर्व सौंदर्य आम्ही पाहिलं. या जन्मात ते विसरू शकणार नाही. आपण घरकोंबड्या वृत्तीचे लोक आहोत. घराच्या चार भिंतीत स्वत:ला कोंडून घेतो आणि या भिंतीच्या पलीकडे अफाट पसरलेल्या जगातल्या विविध रसरंगाचं सौंदर्य हरवून बसतो. माथ्यावरचं आकाश आम्ही कधी न्याहाळून पाहात नाही. पायाखालच्या जमिनीवर उगवलेल्या चिमुकल्या गवताच्या पात्यांचा हिरवेपणाही आपल्याला कधी मुग्ध करीत नाही. आलेला दिवस निमूटपणानं व्यतीत करायचा आणि काही रुक्ष व्यावहारिक गोष्टीत जन्मभर गुरफटून जायचं या पलीकडे आपल्याला कसली आकांक्षाच असत नाही. घरट्याच्या बाहेर न पडणाऱ्या पाखराला आभाळ कधीच आमंत्रण देत नाही. त्याचे पंख खुरटेच राहतात.

काही वर्षांपूर्वी सहज गमतीनं नेपाळला गेलो होतो. काठमांडूच्या दिशेनं आमची बस चालली होती. हिमालयाची हिमशुभ्र शिखरं एका बाजूला रांगेनं उभी

होती. त्या उत्तुंग पर्वतराजीकडं पाहताना क्षुद्र विचार नाहीसे होतात. सामान्य प्रतीचे स्वार्थ वितळून जातात. भव्यत्वाच्या दर्शनानं मन गगनगामी होऊ लागतं. कुणा एका दांभिक माणसानं मला दोन हजार रुपयांना बुडवलं याचं दुःख नेपाळच्या सहलीला निघालो तेव्हा माझ्या मनात ठसठसत होतं. पण आता त्या अतिभव्य महनीय पर्वताच्या जवळ आल्यावर या लहान - सहान वेदना गळून पडल्या. कालिदासानं म्हटल्याप्रमाणं, उत्तर दिशेला असलेला हिमालय नावाचा हा पर्वतराज जणू देवतात्मा वाटत होता. त्याच्या विलक्षण आकर्षक सौंदर्यानं मी पार वेडावून गेलो. या वातावरणात कोणाही सामान्य माणसाला सुद्धा असामान्य स्वप्नं पडत राहतील. क्षुद्र, स्वार्थी विचारांचा मनावर चढलेला गंज या परिसरात नाहीसा होतो. आत्मा जणू स्वच्छ होतो. तपस्या करण्यासाठी साधक हिमालयाचा आश्रय का करतात ते त्या वेळी मला कळलं.

दुसऱ्या बाजूला अक्राळ - विक्राळ अशा खोल दऱ्या आपले प्रचंड जबडे उघडून उभ्या होत्या. आणि त्या चिंचोळ्या रस्त्यानं आमची बस वेडीवाकडी वळणं घेत चालली होती. ड्रायव्हरच्या हातून एखादी किरकोळ चूक झाली असती तरी त्या भयानक दरीत बस कोसळली असती. त्या कल्पनेनंही अंगावर शहारे आले. एकीकडे अद्‌भुत रसाचा आणि दुसरीकडे भयानक रसाचा एकाच वेळी आम्ही प्रवासी अनुभव घेत होतो. पण हा अनुभव मुख्यतः आनंदाचा, आश्चर्याचा सौंदर्यानुभव होता.

जीवनाच्या प्याल्यात जे पेय निसर्गानं ओतलं आहे त्याला एकच एक रुची नाही. रुचीचं आणि रसाचं, रंगाचं आणि गंधाचं वैचित्र्य त्यात आहे. त्यातल्या कडवटपणात आणि तिखटपणात गोडी मिसळून गेली आहे.

अनेक वेळा मला ' माणूस ' चित्रपटातलं ते धुंद करणारं गीत आठवतं. शांता हुबळीकरनं गायिलेलं हे गीत आशा आणि आनंद यांचाच जणू संदेश देतं. ' आता कशाला उद्याची बात ? बघ उडून चालली रात '. आम्ही उगीचच उद्या - परवाची बात करीत बसतो. चढत चाललेली रात्र तारुण्याचं बेहोष गीत गात असते. शृंगार आणि उन्माद यांच्या तारा छेडीत असते. आव्हान देणारी एक सुरावट धुंदपणानं सामोरी येत असते. अशा वेळी अर्थशून्य, फसव्या वितंडवादात कशाला गुंतून पडायचं ? मी तर म्हणेन, ' अरे वेड्या, अंगावर पांघरलेलं विरक्तीचं हे भगवं वस्त्र टाकून दे. आसक्तीचं सुंदर मोहाचं, अभिलाषेचं हे जरतारी

वस्त्र परिधान कर. चेहऱ्यावरचा तो संन्यस्तवृत्तीचा मुखवटा फेकून दे. ही तरणीताठी रात्र तुझ्या रक्ताच्या प्रत्येक बिंदूला एक मादक आमंत्रण देत आहे. आयुष्याचा उपभोग धुंद मनानं घे. कसलीही ओशाळगत वाटू देऊ नकोस. साऱ्याचंच आयुष्य वितळून जाणार आहे. पण जोपर्यंत आपल्या हातात अनेक सूर निर्मिणारी ही जीवनाची सतार त्या जादूगार परमेश्वरानं दिली आहे तोपर्यंत ती हळूवार हातांनी छेडून एका दिव्य संगीतात आनंदानं बुडून जाऊ.

●

□ □ २

# आवा चालली पंढरपुरा

**तुकाराम हा एक भोळा भावडा कवी होता असं ज्यांचं मत आहे** त्यांच्यासारखे भोळेभाबडे तेच म्हणावे लागतील. आयुष्याचे आणि माणसांचे सारे रंगढंग पाहिलेला तो एक चोखंदळ कवी होता. देहूच्या या वाण्यानं आपल्या बुद्धीच्या तराजूत नाना प्रकारचे अनुभव तोलून पाहिले तसेच इरसाल ढोंगीही पाहिले. माणसाच्या मनाच्या बारीक बारीक रेषा बारकाईनं न्याहाळून त्यावर मिस्किलपणानं भाष्य करून हसणारा दुसरा विनोदप्रिय कवी मी तरी पाहिला नाही. त्यामुळं तुकाराम हा मला नेहमीच ' श्रेष्ठ प्रतिभावंत ' आणि ' भाष्यकार ' म्हणून मोह घालतो. मानवी स्वभावाचं त्याचं ज्ञान खरोखरच विलक्षण आहे. सामान्य माणसांच्या भाषेत बोलणारा हा असामान्य कवी मराठीत झाला नसता तर मराठी भाषा आणि साहित्य यांचं निश्चितच मोल कमी झालं असतं. परवा सहज अभंगाची गाथा चाळत होतो. त्याच्या कित्येक ओळी विद्युल्लतेप्रमाणं लखलखाट करीत मनातला अंधार उजळून काढीत होत्या. सहज एक वचन आढळलं, ' नसावे ओशाळ, मग मानिती सकळ ' अगदी साधे शब्द. पण या शब्दांना सत्याची तीव्र धार आहे. तुकारामांसारखा निःस्वार्थी, निर्भय, निस्पृह, निरंकुश कवीच निर्भ्रांतपणानं हे निखळ सत्य निश्चितपणानं सांगू शकतो. त्याच्या शब्दाला त्याच्या चारित्र्याची बैठक आहे. अनुभवाचा आधार आहे. शिवाजी महाराजांनी धनधान्य, वस्त्रालंकार आणि अनेक उपभोगाच्या वस्तू या संताकडे आदरानं पाठवल्या. त्यातल्या तनसडीलाही त्यानं स्पर्श केला नाही. ती सारी संपत्ती त्यानं जशीच्या तशी परत पाठवली.

एक व्यवहारपंडित मला म्हणाले, ' अहो, याचाच अर्थ तुकारामाला ' पोलिटिकल सेन्स ' नव्हता. प्रत्यक्ष राजा काही बिदागी देतो आणि हा तुमचा तुकोबा पाठ फिरवतो याचा अर्थ त्याला आपलं ' इंटरेस्ट ' कळत नव्हतं. ही वॉज रादर इग्नरंट. घरी चालून आलेली लक्ष्मी कोणत्याही शहाण्यानं नाकारली नसती. आता माझंच पहा ना! जिल्हा परिषदेतलं एक पद मिळवण्यासाठी मी

आमदारापासून ते मुख्यमंत्र्यापर्यंत सर्वांचे उंबरठे झिजवतो आहे. सारेजण मला फक्त आश्वासनं देतात. प्रत्यक्षं पदरात काहीच पडत नाही. पण एक दिवस वरिष्ठांना मी माझ्या बाजूला वळवून घेईन. तुकारामाप्रमाणं सत्ता संपत्तीपासून पळून जाणार नाही. पुअर चॅप !'

त्या व्यवहारपंडिताचं म्हणणं त्याच्या व्यवहारी दृष्टीनं कदाचित सयुक्तिक असेलही. पण राजानं आपल्यावर कृपेचा एखादा तरी कटाक्ष टाकावा म्हणून ओशाळगत पत्करणाऱ्या लोकांच्या पंक्तीत हा देहूकर कधीही उभा राहणं शक्यच नव्हतं. तो तपस्वी होता. मनस्वी होता. त्याच्या वृत्तीत स्वाभिमान होता. म्हणून त्याचा प्रत्येक शब्द म्हणजे सरस्वतीच्या भांडारातला खणखणीत वाजणारा बंदा रुपया आहे. कोणत्याही काळी तो वाजवून पाहावा. आपण भेट म्हणून पाठवलेल्या साऱ्या बहुमोल वस्तू तुकारामानं निरिच्छपणानं परत पाठवल्या हे पाहून शिवाजी महाराजांना काय वाटलं असेल ? या श्रेष्ठ संताला त्यांनी मनातल्या मनात साष्टांग प्रणिपात केला असेल आणि ते म्हणाले असतील, ' असे लोकोत्तर महात्मे आहेत म्हणूनच जगाला काहीतरी शिकता येतं.' वीरत्वाला स्वाभिमानाची आणि निःस्वार्थ वृत्तीची बैठक असावी हाच संदेश आम्हाला तुकाराम महाराजांनी दिला.

तुकारामांचं गुणगान मी केवळ या गोष्टीसाठी करतो असं नव्हे. त्यांचं चारित्र्य महान होतंच, पण मला मुख्यतः मनुष्यमनाचे वेगवेगळे कंगोरे सहजपणानं टिपणाऱ्या त्यांच्या निरीक्षण कौशल्याबद्दल बोलायचं आहे. माणसाचे रंग अनेक असतात. पण त्याची मुख्य प्रवृत्ती सांगायची तर तो कमालीचा संसारासक्त असतो. प्रपंचात तो इतका खोलवर बुडालेला असतो की परमार्थाच्या किनाऱ्यापर्यंत तो येऊच शकत नाही. प्रपंचाचा फाफटपसारा त्याला गोड वाटतो. नाना प्रकारच्या प्रापंचिक दुःखांनी होरपळत असतानाही माणूस लोचटपणानं पुन्हा प्रपंचालाच चिकटतो. तो रानात राहिला तरी त्याच्या मनात संसाराची आसक्ती टवटवीत राहते. यावर तुकारामानं आपल्या अंगभूत मिस्किलपणानं विनोदी भाष्य केलं आहे.

' आवा चालली पंढरपुरा ' या नावाचा त्यांचा एक मार्मिक अभंग आहे. विडंबन कौशल्यानं नटलेलं असलं कवित्व केवळ तुकारामालाच स्फुरणं शक्य आहे. घरदार, प्रपंच सोडून पंढरपूरला निघालेली एक आवा कशीबशी वेशीपर्यंत

जाते आणि पुन्हा परत येते. तिचा जीव दुधादह्याच्या फडताळात, गाईगुरांच्या गोठ्यात गुंतलेला असतो. एकीकडे ती सुनेला निरवानिरवीच्या सूचना करीत असते पण तिच्या नाठाळ मनाचं दावं प्रपंचाला करकचून बांधलेलं असतं, ते सुटत नाही. घराचा उंबरठा ओलांडून बाहेर पडायला तिचं मन घेत नाही. खरं तर ज्या वस्तूंत आणि गोष्टींत तिचं चित्त गुंतलेलं असतं त्यांची किंमत काय असते ? क्षुद्र संसाराचे चिवट पाश तुटता तुटत नाहीत. केव्हातरी एखाद्या दिवशी यमपुरुष आपल्या हातातल्या कुऱ्हाडीचा एकच घाव घालतो. पंढरपूरला जाणाऱ्या या सासूबाईंची गंमत तुकारामानं फार मजेदार शैलीनं सांगितली आहे. पण मला इथं एक प्रश्न उपस्थित करायचा आहे. ' आवा चालली पंढरपुरा ' हा अभंग तुम्हाआम्हा सर्वांनाच उद्देशून कवीनं लिहिला आहे की नाही ? त्या गृहिणीचं मन घरात घोटाळत होतं. आपलं मनही अनेक निरर्थक गोष्टींभोवती असंच आशाळभूतपणानं रात्रंदिवस पिंगा घालीत नसतं काय ?

अर्थात यात एक प्रकारची स्वाभाविकता आहे. साधुसंतांनी संसाराची कितीही हेटाळणी केली तरी संसाराची मिठी आपल्याला सोडवत नाही. आसक्ती हे साऱ्या दुःखाचं उगमस्थान आहे असं सर्वच संत महंतांनी कंठरवानं सांगितलं असलं तरी आमच्या मनातली आसक्तीची वेल कधीही सुकत नाही. तिची पानं सळसळत राहतात. स्त्रीचा लोभ, धनतृष्णा, सत्तेची आकांक्षा, जगत राहण्याची ओढ, कोणत्याही आकर्षक वस्तूचा मोह आपल्या मनातून जात नाही. पण म्हणूनच या जीवनाच्या चित्रात नानाविध रस आणि रंग उतरलेले दिसतात. सत्तरीच्या घरात आलेला एक कीर्तनकार कीर्तन करताना स्त्रियांच्या समूहाकडे ओशटपणाने पाहात राहायचा. एकदा त्याला याबद्दल खडसावून विचारल्यानंतर तो अपराधी स्वरात म्हणाला, ' माफ करा महाराज, शरीर थकलं तरी बाईचं आकर्षण अजून वाटतं. माझी चूक होते हे मला कळतं पण काय करू ? कीर्तनाला आलेल्या बायकांकडे निरखून पाहिल्याशिवाय राहवत नाही. स्त्रीचा मोह वाईट असं मी कीर्तनातून सांगतो खरं पण लागलेली खोड मोडत नाही. ' तो कीर्तनकार प्रामाणिकपणानं बोलला. इतकाही प्रामाणिकपणा माणसात असत नाही. आमचे एक प्राध्यापक वर्गात शिकवताना केवळ मुलींच्या बाकाकडेच पाहून व्याख्यान देत असत. त्यांची ही ' रसिकता ' लक्षात आल्यानंतर आम्ही सर्व विद्यार्थी वर्गात लवकर जाऊन मुली बसत त्या बाकावर जाऊन बसलो. त्यामुळं मुलींना मुलांसाठी

असलेल्या बाजूला येऊन बसावं लागलं. प्राध्यापक वर्गात आले. क्षणभर ते बावरले. पण मग नंतर पुन्हा मुलींच्याकडे एकटक पाहात व्याख्यान देऊ लागले. या प्राध्यापकांना सहा अपत्यं होती. पण त्यांची ही ' खोड ' गेली नव्हती. आता इथं देखील मी तुकारामाच्याच एका अभंगाचा उल्लेख करतो. त्यानं म्हटलं आहे, ' आधी दासी असली व नंतर पट्टराणी झाली तरी तिचं हिंडणं राहात नाही. मूळ स्वभाव जात नाही.' ' त्याचा येळकोट राहीना, मूळ स्वभाव जाईना !' हा प्रसिद्ध अभंग आपल्याला माहीत आहेच. कीर्तनकार आणि प्राध्यापक यांची उदाहरणं प्रतीकात्मक आहेत. आपणही थोडेफार त्यांच्याच वंशातले आहोत. रस्त्यातून जाणाऱ्या एखाद्या बऱ्यापैकी स्त्रीकडं पुन्हापुन्हा मान वळवून पाहणारी माणसं पुष्कळ असतात. काहीजण पाहत नाहीत. कारण अशा स्थितीत आपल्याला कुणीतरी पाहील ही भीती त्यांच्या मनात असते. ज्यांना ही भीती वाटत नाही ते ' निर्भयपणानं ' आपल्या ' रसिकतेचं ' प्रदर्शन करतात.

सौंदर्याचा, संपत्तीचा, सत्तेचा मोह मुळीच पडू नये असं म्हणणं मात्र अस्वाभाविकपणाचं आहे. मोह नसेल तर महत्त्वाकांक्षाही जागृत होणार नाही. आसक्तीतूनच संसाराचा भव्य पसारा मनुष्यानं पसरून ठेवला आहे. माणसं जर निरासक्त, निर्विषयी, निरहंकारी असती तर मानवी जीवनाला विचित्रता आणि रमणीयता आली असती काय ? नाना प्रकारचे ' कांचनमृग ' आयुष्याच्या वाटेवर आपल्याला भेटतात आणि मग आपण उरी फुटेपर्यंत त्यांच्यामागे धावत जातो. अखेर निराश होतो. पण कांचनमृगाच्या पाठलागातदेखील एक प्रकारचा निश्चित आनंद आहे. हा ' अज्ञानातला आनंद ' असतो असं म्हणून कदाचित साधुसंत आमचा उपहास करतील पण तरीही या आनंदाची ओढ विलक्षण असते. घरी आल्यावर बायको रडगाणं गाते आणि आपण ' झक मारली ' आणि या संसारात पडण्याचा गाढवपणा केला ' असं पश्चात्तापानं स्वगत किंवा उघड बोलतो हे खरं आहे, पण थोड्या वेळानं वृत्ती बदलते. तिनं केसात माळलेल्या मोगरीच्या वेणीचा सुगंध आपल्याला प्रफुल्लित करतो. केव्हातरी ऐकलेली किंवा वाचलेली एखादी शृंगारिक कविता आठवायला लागते. थोड्याच वेळापूर्वी संसारातल्या ओढगस्तीनं वैतागलेलं आपलं मन पुन्हा त्यातल्या विचित्र आकर्षणानं झपाटून जातं. विरक्तीच्या वेशीपर्यंत आपण जातच नाही. आसक्तीचे मादक रेशमी पाश पुन्हा आपल्याला मागे खेचतात. मोहाची लाट जबरदस्त

असते. भर्तृहरीनं स्त्रीच्या मुखाचं वर्णन ' श्लेष्मागार ' असं केलं आहे. पण हे कटु विदारक सत्य आपण स्वीकारीत नाही. कवीच नव्हे तर सामान्य मनुष्यही आपल्या प्रेयसीला ' चंद्रमुखी ' म्हणून संबोधतो. संसाराच्या आकर्षणात माणसाला खिळवून टाकण्याची एक अतुट शक्ती आहे यात संशय नाही. राम आणि कृष्ण हे सुद्धा प्रपंचाच्या पाशात राहिले ही घटना खरोखरच अर्थपूर्ण आहे. शेकडो वर्षांची तपश्चर्या बुडवून विश्वामित्र मेनकेच्या गालावरील खळीत पार बुडून गेला. ही घटना त्याच्या अध:पाताची आहे असं कुणी मानीत असेल तर त्याच्याशी माझे मतभेद आहेत. प्रत्येक मोह आत्मघातकी असतो हे खरं नाही. काही मोह आपल्या वाट्याला येत असतील तर प्रसंग विशेषी धोका पत्करूनही त्यांचं स्वागत करायला हरकत नाही. पण याचा अर्थ कोणत्याही भिकार, क्षुद्र आणि पशुतुल्य बाजारी मोहाला माणसानं मान तुकवावी असा मात्र मुळीच नाही. जीवनात रम्य कल्पनांचं, अनुभवांचं चांदणं शिंपणाऱ्या सुंदर काव्यात्म मोहाला नकार देण्याचं काय कारण आहे ? पण लोणच्या - चटण्यांच्या बरणीत आणि दुधादह्याच्या फडताळात मन गुंतवणाऱ्या ' सासूबाईला ' मात्र तुकारामानं दिलेला दोष मला समर्थनीय वाटतो. तुकारामांचा ' आवा चालली पंढरपुरा ' हा अभंग म्हणजे मनुष्याच्या क्षुद्र पण अनावर प्रपंचासक्तीवरचं एक मर्मभेदक भाष्य आहे.

कुठल्या तरी कद्रू माणसाची एक गोष्ट सांगतात. वयाच्या नव्वदाव्या वर्षी हे गृहस्थ मरायला टेकले. नाकाशी सूत धरलं होतं. आपल्या क्षीण आवाजात चिरंजीवाला म्हणाले, ' नाऱ्या, नीट ऐकून घे. त्या शेजारच्या सदूभाऊला मी मागच्या वर्षी बारा रुपये उसने दिले आहेत, ते आठवणीनं त्याच्याकडून व्याजासह परत घे. विसरू नकोस. ' आणि असं म्हणून त्या लक्षाधीश गृहस्थानं मान टाकली. मृत्यूच्या प्रांतात पाऊल टाकतानाही आयुष्यातल्या एखाद्या भिकार गोष्टीचा लोचट मोह सुटू नये यापेक्षा चमत्कारिक आणि हास्यापद दुसरं काय आहे ? मोहाला आणि लोभाला सुद्धा सुंदर आणि उदात्त विषय असावेत. कारण आयुष्याचाही मोह धरू नये अशाही भव्योदात्त गोष्टी असू शकतात. पण माणसे चिकट असतात. त्यांना क्षीण व क्षुद्र मोहाचे तंतूसुद्धा सहज बांधून टाकतात. आणि मग आवा पंढरपूरला निघाली तरी वेशीपलीकडे जात नाही. टीचभर घरादारात ती गुंतून पडते. याला काय करायचे ?

●

□ □ ३

## *अस्सल आणि नक्कल*

**गुणवान व्यक्तींची बहुधा उपेक्षाच होते.** आपल्या ठिकाणी बुद्धिमत्ता आहे, योग्यता आहे आणि त्यांमुळं आपण आपल्या क्षेत्रात निश्चित यशस्वी होऊ, प्रतिष्ठित होऊ असा विश्वास बाळगण्यात काहीही अर्थ नाही. जग नाना प्रकारच्या विसंगतींनी भरलेलं आहे. आणि आश्चर्य असं की आता विसंगती हीच सुसंगती झाली आहे. एक कवी राज्यमान्यता मिळवण्याचा प्रयत्न करीत होता. पण राजदरबारापर्यंत त्याचा प्रवेशच होऊ शकत नव्हता. खरं तर तो एक प्रतिभासंपन्न शीघ्रकवी होता. अनेक वर्षे काव्याच्या क्षेत्रात त्यानं निष्ठेनं तपस्या केली होती. पण तपस्येला या व्यवहारी जगात कवडीइतकीही किंमत नसते हे व्यवहारज्ञान मात्र त्या कवीला नव्हते. त्याच्या काव्यात प्रसाद, माधुर्य, ओज, सौकुमार्य वगैरे अनेक गुण होते. कोणत्याही रसाचा सहज आविष्कार तो करू शकत असे. पण राजाच्या भोवती स्वत:ला कवी म्हणवून घेणाऱ्या क्षुद्र खुषमस्कऱ्यांचं एक अभेद्य वर्तुळ होतं. कुठल्यातरी चार शिळ्या, बुरसटलेल्या कल्पनाशून्य कोट्या करून राजाचं मनोरंजन करीत बसलेलं हे कवि ( पी ) मंडळ दुसऱ्या कोणत्याही गुणवान व्यक्तीला आत येऊ देत नव्हतं. अखेर तो प्रतिभावंत कवी वैतागला आणि रस्त्याच्या कडेला उभ्या असलेल्या एका गाढवाला उद्देशून म्हणाला,

‘ हे गर्दभा, असा विमनस्कपणे का उभा आहेस ? राजदरबारात जा. तुझा तिथे चांगलाच सन्मान होईल. कारण शेपूट असलेल्या कोणत्याही प्राण्याला ‘ उमदा घोडा’ म्हणून दरबारात सन्मानाचं स्थान मिळतं. घोड्याला सध्या कुणी विचारीत नाही. तुझ्या सुदैवानं तू गाढव आहेस. तुला एखादी बहुमानाची पदवी सहज मिळेल. विलंब करू नकोस. गाढव असण्यासारखा दुसरा शहाणपणा नाही.’

त्या कवीच्या बोलण्यातल्या उपरोध कुणालाही पटेल असाच आहे. पण त्या बरोबरच या उपरोधाच्या मुळाशी एक प्रकारचं वैफल्य आणि कारुण्य दडलेलं आहे. ते मला अधिकच लक्षवेधक वाटतं. शंभर नंबरी सोनं दुर्लक्षिलं जावं आणि केवळ सोन्याचा मुलामा दिलेला सामान्य धातू 'सुवर्ण' म्हणून प्रशंसिला जावा यापेक्षा दुसरी शोकांतिका कोणती ? सुगंध हा वस्तुत: फुलांचा आत्मा. नैसर्गिक फुलांचा रंग आणि गंध खऱ्या रसिकतेला मोहिनी घालू शकतो. सुंदर सुवासिक फुलांचा वीट येणं शक्य आहे काय ? पण कागदी फुलं जेव्हा नैसर्गिक फुलांवर मात करतात आणि पुष्पपात्रांत किंवा सुंदरीच्या केशकलापात स्थान मिळवतात तेव्हा खऱ्या फुलांना आपल्या अस्सलपणाबद्दल पश्चात्ताप होत असेल. 'मानापमान' नाटकात 'शूरां मी वंदिले' असे एक गीत आहे. ते ऐकताना बऱ्याच वेळा माझ्या मनात विचार येतो की, आता परिस्थिती बदलली आहे. आता वस्तुत: 'चोरां मी वंदिले' असे म्हणायला हरकत नाही. शूर असणं, धीर - वीर असणं, सज्जन असणं ही आता मोडीत निघालेली गोष्ट आहे. ही गोष्ट अत्यंत जुनाट स्वरूपाची आहे. ज्याला चोर होता येत नाही त्याचा आजच्या जगात निभाव लागणच शक्य नाही. जुने आदर्श समोर ठेवून आणि नीतिमूल्यांचा आदर करीत निघालेली माणसं आता 'बावळट' ठरत आहेत. वारांगना ज्याप्रमाणे एकाकडे पाहून नेत्रपल्लवी करते, दुसऱ्याकडे पाहून लाडिक हसते आणि तिसऱ्याच्या गळ्यात हात टाकते तशी नीतिमत्ता ज्याला आचरता येत नाही त्याने आपल्या घरी 'हरीहरी' करीत स्वस्थ बसावे. गुणवान असणं, कर्तबगार असणं याला कसलाही अर्थ नाही. आजच्या राजनैतिक वातावरणात हे गुण कधीच उपयोगी पडत नाहीत.

एका कवीने लिहिलेली 'अन्योक्ती' मला आठवते. एक कोकिळा आम्रवृक्षावर मुक्तकंठानं गात होती. तिला उद्देशून कवी म्हणाला, 'कोकिळे, तू अगदीच वेडी आहेस, तू कुणासाठी गात आहेस ? येथे तर सारेच बहिरे लोक आहेत. त्यांना तुझ्या गाण्यातलं माधुर्य काय कळणार ? तुझा मात्र कंठशोष होईल. तुझ्या रंगावरून ते तुला कावळा मात्र समजतील.' मी या कविवचनाला अशी पुस्ती जोडतो की, रंगावरून कोकिळेला कावळा समजणं हा अनर्थ आहेच पण सध्या तर रंगावरून कावळ्यांनाच कोकिळा म्हणून सन्मानिलं जातं हा खरा अनर्थ आहे. दुसऱ्या एका अन्योक्तीत एका कवीनं सिंहाच्या आसनावर बसलेल्या

एका ग्रामसिंहाचा उल्लेख केला आहे. हा कुत्रा कृत्रिम आयाळ पांघरून बसला आहे. त्याची आयाळ पाहून तो वनराज आहे हे साऱ्या प्राण्यांनी गृहीत धरलं आहे. आयाळ पांधरलेले अनेक ग्रामसिंह सध्याच्या जगात वेगवेगळ्या स्थानांवर आसनस्थ झालेले दिसतात. त्यामुळेच खऱ्या सिंहांना ' वनवासी ' व्हावं लागतं. कुठेतरी दऱ्याखोऱ्यांत त्यांना आश्रय घ्यावा लागतो. ही अवस्था आजच आहे असं नव्हे. ती पूर्वीही होती. कदाचित आजच्या जगात ती अधिक ' सुप्रतिष्ठित ' झाली असावी. आपण उगीचच सद्‌गुणांचा, उदात्त मूल्यांचा आणि आदर्शाचा जयजयकार करतो. सोन्याला आपल्या सुवर्णत्वाबद्दल विश्वास वाटत असतो. पण त्याचं सुवर्णत्व समजून घेण्याची कुवत नसलेल्या जगात त्याला वावरायचं आहे हे मात्र त्याला कधी कळत नाही. मूर्खांच्या मेळाव्यात शहाणं असणं यासारखा दुसरा मूर्खपणा नाही. मासळीच्या वासात केशराच्या सुगंधाला विचारतो कोण ? आणखी एका कवितेचेच उदाहरण घेतो. एका कवीने म्हटले आहे,

' मी चिंध्या पांघरून सोने विकायला बसलो पण चिटपाखरू माझ्याकडे फिरकले नाही. पण जेव्हा सोने पांघरून चिंध्या विकायला बसलो तेव्हा मात्र गर्दी हटता हटेना. ' याचा अर्थ जगाला केवळ दिखाऊपणा मोह घालतो. ' काय असते ' यापेक्षा ' कसे दिसते ' याचेच महत्त्व त्याला वाटते. कुलवतीचा शृंगार त्याला नको आहे. वेश्येचा नखरा मात्र जगाला हवाहवासा वाटतो. अशा वेळी त्या सुंदर कुलवतीने वेश्येच्या पातळीवर उतरू नये. कुलवती म्हणून तिने वनवास पत्करावा. वेड्या जगाची पर्वा करू नये. अज्ञानी आणि अरसिक जगानं दिलेल्या मानपत्रापेक्षा, उपेक्षा परवडली. चंदनाच्या सुगंधाची कदर नसलेल्या मलय पर्वत प्रदेशात राहणाऱ्या स्त्रिया दररोजच्या जळणासाठी चंदनाची लाकडं वापरतात. यात अडाणी स्त्रियांचा दोष नाही. ' जिथं पिकतं तिथं विकत नाही ' आणि जिथं विकलं जातं तिथं अस्सलाची किंमत ओळखणारे भेटत नाहीत.

आज साडेतीनशे वर्षांनंतर तुकारामांच्या संतत्वाचं आणि कवित्वाचं रसग्रहण केलं जातं. तुकाराम हा महाराष्ट्र संस्कृतीचा एक श्रेष्ठ शिल्पकार होता यात शंका नाही. त्यानं आमची मराठी भाषा सुंदर आणि समृद्ध केली. पण तुकारामाची योग्यता सतराव्या शतकात किती जणांनी ओळखली होती ? कुणब्याने कविता लिहिण्याचा आणि कीर्तन करण्याचा हव्यास धरू नये असे म्हणून त्याचा

पावलोपावली उपहास करण्यात आला. कवी म्हणून आणि संत म्हणून त्याला मान्यता मिळाली नाही. या घटनेचं वैषम्य तुकोबांना निश्चितच वाटत होतं. वस्तुतः त्यांचं वैराग्य, त्यांचं ज्ञान आणि त्यांची प्रतिभा उन्नत स्वरूपाची होती. लोक मात्र आपली पारख करीत नाहीत आणि केवळ भगवी वस्त्रे धारण करणाऱ्या जटा वाढवणाऱ्या भोंदू व्यक्तींना मात्र योगी मानण्यात येतं या अज्ञानाचा तुकोबांनी आपल्या विशिष्ट आक्रमक शैलीत चांगलाच उपहास केला आहे. ते म्हणतात,

*ऐसे संत जाले कळी । तोंडी तमाखूची नळी ।।*
*स्नानसंध्या बुडविली । पुढे भांग वोडवली ।।*
*भांगभुर्का हे साधन । पची पडे मद्यपान ।।*
*तुका म्हणे अवघे सोंग । तेथे कैचा पांडुरंग ।।*

तुकोबांच्या काळात संतत्वाचा केवळ देखावा करणारे धूर्त आणि स्वार्थी लोक धर्मकारणात घुसले होते आणि आपापले एक आसन निर्माण करून स्वतःवर चवऱ्या ढाळून घेत होते. या पालखीपदस्थांच्या पाठीमागे भोळेभाबडे लोक जयघोष करीत चालले होते. कपड्यांचा रंग भगवा असला तरी या साधूंचे अंतरंग वेगळे होते. त्यांचे रंगढंग तुकोबा ओळखून होते. ते आपल्या उत्कट आवाजाने साऱ्यांना साद घालीत होते. पण निःस्पृह तुकारामापेक्षा सोंगढोंगात रमलेला मंबाजी ' लोकप्रिय ' होता. ही परिस्थिती जगात सर्वत्र चालू आहे. खरे तर याबद्दल आता वैषम्य वाटून घ्यायचंही कारण नाही. जिथं किडक्या बोरांना द्राक्षांची प्रतिष्ठा प्राप्त होते तिथं द्राक्षं फेकली गेली तर त्यात काही आश्चर्य नाही.

जे धर्मकारणात घडते तेच समाजकारणात आणि राजकारणातही घडत राहते. आजच्या राजकारणाबद्दल काय बोलावे ? कोळसा उगाळीत राहणाऱ्याचे हात मात्र काळे होतात. ' बेबंदशाही ' नाटकात संभाजीचे एक सुंदर स्वगत भाषण आहे. ' मुंग्यांनी मेरू पर्वत तर गिळला नाही ना ?' पण सध्या खरोखरच मुंग्यांनी हा पर्वत गिळंकृत केला आहे. सत्तेचं आसन बळकावण्याच्या स्पर्धेत कोण मनुष्य केव्हा विजयी होईल हे सांगता येत नाही. टिळक, गांधी, नेहरू यांच्याविषयी अवाक्षरही माहीत नसलेला एखादा थैलीशहा थैलीच्या बळावर पाहिजे ती खुर्ची आणि हवी ती प्रतिष्ठा राजकारणाच्या उघड्या बाजारात खरेदी करू शकतो आणि पाहता पाहता गांधी नेहरूंच्या मालिकेत त्यालाही स्थान दिले जाते. त्याग आणि आदर्शपूजा, सेवा आणि ध्येयवाद हे दुर्गुण राजकारणात तर अगदीच निरुपयोगी

आहेत. प्रथम त्यांच्याकडे पाठ फिरवली पाहिजे. पक्षश्रेष्ठींच्या समोर नित्यनवे सोंग सजवता आले पाहिजे. हे श्रेष्ठी सोंगाला भुलतात कारण तेही एखादा नकली मुखवटा घेऊनच राजकारणाच्या वेशीत उभे असतात. पै - पैशाची चिल्लर चालू शकते बंदा रुपया मात्र या बाजारात कुणीच स्वीकारीत नाही. हा सगळा प्रकार पाहिल्यानंतर मन उद्विग्न होते. गुणवत्ता आणि योग्यता शापासारखी वाटू लागते. परवा एका शासकीय कार्यालयात काही निमित्तानं जावं लागलं. तेथील विभागीय अधिकाऱ्यांशी चर्चा करताना मला जाणवलं की ज्या विशिष्ट विभागाचं नेतृत्व त्याला देण्यात आलं होतं त्या विभागासंबंधीची प्राथमिक स्वरूपाचीही माहिती त्याला नव्हती. त्याला कोणताही प्रश्न विचारला तरी आपल्या टायवरून ऐटबाजपणानं हात फिरवीत तो मला आश्वासन द्यायचा, 'आमच्या पातळीवर या प्रश्नाचा विचार चालू आहे.' त्याच्याशी चर्चा करण्यात काहीच अर्थ नव्हता. अखेर तेथील एका सर्वसाधारण कारकुनानं अभ्यासपूर्ण चर्चा केली. त्याचा अनुभव, विषयासंबंधीचं त्याचं सखोल ज्ञान, त्याची कर्तव्यतत्परता पाहून मला फार समाधान वाटलं. मी त्याला म्हणालो,

'खरं सांगायचं तर तुमची जागा ही नाही. तुम्ही मुख्याधिकारी होण्याच्या योग्यतेचे आहात.' तो कारकून विषण्णतेनं हसला. त्याच्या मुखावर निराशेचं सावट आलं. कदाचित त्याच्या अंत:करणातील जखमेला माझ्या बोलण्यामुळं धक्का बसला असावा. तो काहीसा उत्तेजित होऊन म्हणाला,

'सर, हे तुम्ही बोलून काय फायदा होणार आहे ? आम्ही कारकून होण्यासाठीच जन्माला आलो आणि कारकून म्हणूनच आम्ही मरणार आहोत. मुख्याधिकाऱ्याच्या जागेवर बसण्याची माझी योग्यता आहे यात मला कसलीही शंका नाही. माझं रेकॉर्ड स्वच्छ आहे. माझी सेवाज्येष्ठता, पदवी, अनुभव आणि पात्रता या सर्व दृष्टींनी मी मुख्याधिकारी होऊ शकतो. माझ्या योग्यतेप्रमाणं हे पद मला मिळणारच हे मी गृहीत धरलं होतं. पण आत्ता खुर्चीवर बसलेले अधिकारी कसलीही पात्रता नसताना केवळ सामान्य व्यावहारिक कसबांमुळं खुर्ची मिळवू शकले. ज्यांच्या हातात सत्ता होती त्यांना आणि त्यांच्या नातेवाईकांना पंचतारांकित हॉटेलात पुन्हा पुन्हा पार्टी देण्याचं चातुर्य मात्र माझ्यात नव्हतं. माणसं मिठाला जागत नाहीत. गुणवत्तेला स्मरत नाहीत. आदर्शाला जुमानीत नाहीत. पण मद्याच्या बाटलीला मात्र लोटांगण घालतात हा धडा मी गिरवला नाही हा

माझा मूर्खपणा. केव्हातरी तुमच्यासारखा एखादा माणूस माझ्या वास्तविक योग्यतेबद्दल बोलतो आणि मग मला क्षणभर बरं वाटतं. इतकी वर्षे नोकरी केली. अनेक अधिकारी पाहिले. लोचटपणा, निर्लज्जपणा, कारस्थानी वृत्ती हीच यांची शक्तिस्थाने होती. अधिकारातून येणारा मस्तवालपणा यांच्या पाचवीला पुजलेला असतो. अशा लोकांच्या वर्तुळात काम करताना माझा किती कोंडमारा होत असेल ते माझे मलाच माहीत. माझे सहकारी मला मूर्ख आणि व्यवहारशून्य म्हणतात. जाऊ द्या ! हे असंच चालणार.'

तो सत्प्रवृत्त कारकून अत्यंत अस्वस्थ झाला होता. गुणवत्ता असूनही एका कोपऱ्यात जन्मभर पडून होता. राजदरबाराप्रमाणेच समाजही लहरी असतो. गुणग्रहण करण्याची त्याची शक्ती फार मर्यादित असते. जे जे नकली आहे, नाटकी आहे, मुखवटा लावून आलं आहे ते ते त्याला आवडतं. त्याला देव चालत नाही. शेंदूर फासलेला दगड मात्र त्याच्या दृष्टीने पूजनीय असतो. केव्हातरी एक बोधकथा वाचली होती. कदाचित ती इसापची असावी. एक नकलाकार डुकराच्या केकाटण्याची नक्कल करीत होता. लोकसमुदायाला ती फार आवडली. नकलाकाराने आव्हान दिले, ' माझ्यासारखी नक्कल करणारा दुसरा कोणी आहे का ? हुबेहूब डुकराचा आवाज कोणीही काढून दाखवावा.' हे आव्हान एका गावंढळ शेतकऱ्याने स्वीकारले. त्याने आपल्या घोंगडीत खरोखरच डुकराचे पिलू लपवले होते. रंगमंचावर उभे राहून कोणाला दिसणार नाही अशा बेताने त्याने डुकराचे कान पिरगाळले. त्याबरोबर ते तारस्वरात केकाटू लागले पण लोक म्हणाले ही नक्कल काही चांगली झाली नाही. हा आवाज हुबेहूब काढता आला. नाही. शेतकऱ्याने घोंगडीतून डुकराचे पिलू बाहेर काढले आणि सर्वांना दाखवीत तो म्हणाला,

' लोकहो, तुमची अक्कल कळली. जे अस्सल आहे ते तुम्हाला खोटे वाटते आणि जे केवळ नक्कल आहे ते मात्र तुम्हाला खरे वाटते. प्रत्यक्ष डुकराचे ओरडणे तुम्हाला डुकराचे वाटत नाही. माणसाचे केकाटणे मात्र अस्सल वाटावे यापेक्षा अधिक शहाणपणा कोणता ?'

या गोष्टीसारखाच प्रकार जीवनाच्या नानाविध क्षेत्रांत अखंड चालू आहे. राजकारणात तर नकला करणारे आणि कोणते तरी मुखवटे धारण केलेले लोक जमा झालेले आहेत. आपापल्या ' निष्ठांची ' जाहिरातबाजी करीत राहिलेले

पुढारी सर्वत्र दिसत आहेत. या धूर्तांच्या मेळाव्यात खऱ्या निष्ठावंताला आणि आदर्श पूजकाला कुणीच ओळखणं शक्य नाही. सर्वच क्षेत्रे अशी बरबटलेली आहेत. उडदामाजी 'काळे गोरे' निवडण्यात काही अर्थ उरलेला नाही.

●

□ □ ४

# रामायणातील उर्मिला

आदिकवी वाल्मीकीने रामायणातल्या व्यक्तिरेखा अत्यंत कलात्मकतेने रेखाटल्या यात शंका नाही. राम आणि सीता ही व्यक्तिमत्त्वे तर आदर्श आणि पूज्य ठरावीत अशा उन्नत पातळीवर त्याने नेली. नायक, नायिका, खलनायक, अन्य स्त्री - पुरुष यांच्या स्वभावचित्रांत मनोज्ञ रंग भरल्यामुळं ही सारीच चित्रे अविस्मरणीय झाली आहेत. उत्कृष्ट कथावस्तू व जिवंत प्रत्ययकारी व्यक्तिचित्रे यांचा संगम वाल्मीकीने रामायणात घडवला. पण या श्रेष्ठ प्रतिभावंताने एका व्यक्तीवर मात्र अकारण अन्याय केला असं वाटतं. रामायण वाचल्यानंतर मनात अनेक विचार भावनांचे तरंग निर्माण होतात. सुख आणि दुःख या दोहोंचाही उत्कट अनुभव येतो. पण एक शल्य मात्र टोचत राहते. वाल्मीकीच्या हातून ही चूक घडली नसती तर बरे झाले असते. पण आता याला उपाय नाही. राम - लक्ष्मणांचा गगनभेदी पराक्रम रामायणानं दशदिशांतून गर्जवला. रावणाच्या अहंकाराची आणि हनुमानाच्या स्वामिभक्तीची या रामायणानं ध्वजा फडकावली. वाल्मीकीच्या लेखणीनं दशरथ - कौसल्येचं दुःख चित्रित केलं. शबरीची रामभक्तीही रेखाटली. पण या गुणसंपन्न लेखणीला लक्ष्मणाच्या पत्नीची उर्मिलेची फारशी आठवणही उरू नये याचं आश्चर्य वाटतं. लक्ष्मणाची ही पत्नी उपेक्षेच्या इतक्या दाट अंधारात पडून आहे की ती वाचकांपुढे येऊच शकत नाही. ती इतकी नगण्य, वैशिष्ट्यहीन आहे काय ? तिच्या नावाचा उल्लेख कवी वाल्मीकी करतो. लक्ष्मणाबरोबर तिचा विवाह झाला ही माहितीही तो देतो. पण उर्मिलेचा चेहरा रामायणात कुठेच दिसत नाही. ती बोलत नाही, हसत नाही, फार काय, आपल्यावर होणाऱ्या अन्यायाची ती कैफियतही देत नाही. जणू रामायणातील ती एक निर्जीव पुतळी आहे. साऱ्या सुखदुःखांच्या पलीकडे जणू ती उभी आहे. ती अवाक्षरही उच्चारीत नाही. लक्ष्मणाची पत्नी म्हणून तर राहोच पण एक भावनाशील स्त्री म्हणून सुद्धा तिची प्रतिमा कधी स्पष्ट होत नाही. वाल्मीकी ऋषीनं

या उर्मिलेच्या भोवती अंधाराच्या आणि उपेक्षेच्या भिंती कशासाठी उभ्या केल्या आहेत हेच कळत नाही. बिचारी उर्मिला !

रामायणातल्या बहुतेक सर्व स्त्रीव्यक्तिरेखा सजीव आणि सकस आहेत. सीता, कैकयी, मंथरा, शबरी, शूर्पणखा, मंदोदरी या सर्वच स्त्रियांच्या प्रतिमांवर लखलखीत प्रकाश आहे. साऱ्या रामायणभर सीतेच्या पातिव्रत्याचे आणि अतुल त्यागाचे डंके वाजत आहेत. कैकयीच्या मत्सरालाही उठावदारपणा आणून ती कैकयी ठसठशीत बनवली आहे. रावणाची मंदोदरी वाचकांची प्रशंसा मिळवते. मंथरेचा कारस्थानीपणादेखील आपल्या मनात स्थान मिळवतो. पण या गरीब बिचाऱ्या उर्मिलेचा चेहरामोहरा आठवणीच्या कक्षेत फारसा येतच नाही. प्रकाशाची एखादी क्षीण रेखा जरी तिच्या वाट्याला आली असती तर विरहाच्या दुःखानं व्याकुळ होऊन चौदा वर्षे आपल्या महालात तिने जे अगतिक अश्रू गाळले त्यांचा ओझरता तरी स्पर्श वाचकांच्या मनाला झाला असता. पण दुःखानं जळत राहिलेली ही ज्वाळा वाल्मीकीनं सुद्धा नीट पाहिली नाही. एका महाकवीच्या दिव्यदृष्टीला जी उर्मिला पाहता आली नाही ती आम्हा वाचकांना कशी दिसणार ? रामाची भक्ती करणारी शबरी वाल्मीकीनं अमर केली. पण लक्ष्मणाच्या विरहाग्नीत चौदा वर्षे होरपळत राहिलेली ही निष्पाप उर्मिला मात्र या कविश्रेष्ठानं अनुल्लेखानं मारली. असं का व्हावं ? सीतेचा त्याग महनीय तर खराच ! रावणाच्या पातकी वैभवाकडे तिनं ढुंकूनही पाहिलं नाही. आपल्या प्रिय पतीबरोबर ती वनवासातल्या काट्यांची प्रेमबळावर फुले करू शकते. पण हे प्रेमळ साहस उर्मिलेला करता आले नसते काय ? तिला लक्ष्मणाचा सहवास नको होता काय ? तिची संमतीही न घेता एखाद्या सावलीप्रमाणे तो लक्ष्मण रामाबरोबर निघून गेला. त्याची भावावर एवढी अलौकिक निष्ठा होती की, पत्नीला तो सहजपणे बाजूला सारू शकला. पत्नी की बंधू असा संघर्षही त्याच्या मनात उद्भवलेला दिसत नाही. लक्ष्मणाचं नाव जितकं दृढपणानं रामाशी जोडलं गेलं आहे त्याच्या शतांशानेही ते उर्मिलेशी जोडलं जात नाही हे जळतं दुःख उर्मिलेला जन्मभर पुरलं असेल. लक्ष्मणाच्या हृदयात केवळ राम आहे. आपल्याला या हृदयावर काडीइतकाही अधिकार सांगता येणार नाही. या निराशेनं जे असंख्य अश्रू उर्मिलेनं जन्मभर गाळले त्यांची गणती वाल्मीकींची प्रतिभा करू शकेल काय ? हे अश्रूही कुणाला दिसले नाहीत. वनवासात असली तरी सीता रामाच्या

सहवासात होती. राजमहालात असूनही उर्मिला चौदा वर्षे वनवासातच राहिली. वनवास संपल्यानंतर लक्ष्मण अयोध्येला परतला प्रण आपण उर्मिलेची उपेक्षा केली, तिच्यावर अन्याय केला याची खंत त्याला कधी वाटली असेल काय ? कवीनं तोही उल्लेख केला नाही. मला वाटतं उर्मिलेवर हा जबरदस्त अन्याय झाला आहे. रामायणात साऱ्यांची सुखदु:खं हृदयस्पर्शी झाली आहेत. जगाच्या कौतुकाचा व सहानुभूतीचा विषय व्हावा अशा पद्धतीनं ती रंगवली आहेत. पण उर्मिलेच्या दु:खाला मात्र प्रसिद्धीचा एखादाही कोपरा रामायणात मिळालेला नाही. उर्मिला असून नसल्यासारखी आहे. तिचं अस्तित्वसुद्धा कुणाच्या लक्षात येऊ नये हा तिच्यावरील फार मोठा अन्याय आहे.

राम आणि सीता यांच्या परस्पर प्रेमाचे पोवाडे रामायणानं भावोत्कट स्वरात गायिले आहेत. कालिदास आणि भवभूती, एकनाथ आणि तुळसीदास यांसारख्या कवींनीही सीतारामाच्या प्रेमाचे परोपरीने वर्णन केले आहे. भवभूतीने तर ' रात्र संपली पण त्यांच्या ( रामसीतेच्या ) प्रेमगोष्टी संपल्या नाहीत ' असे म्हणून वनवासातल्या सुखाचे चित्र काढले आहे. सीता नाहीशी झाल्याबरोबर शोकवश झालेला राम झाडाझुडपांना, पशुपक्ष्यांना, ' ती माझी जानकी कुठे गेली ? ' असे आर्तपणे विचारीत राहतो. उर्मिलेच्या आठवणीने लक्ष्मणाचे डोळे त्या चौदा वर्षांच्या काळात कधी पाणावले होते काय याची मात्र नोंद घेतली गेली नाही. वनवासाला निघताना लक्ष्मणाबरोबर आपणही वनात जावं असं तिला वाटलं नसेल काय ? सीतेप्रमाणंच तिनंही ' मी तुमच्यापाठीमागून येणार ' असा स्त्री - हट्ट धरला नाही काय ? जिच्याबरोबर आपण सप्तपदी केली तिला बाजूला सारून मोठ्या भावाबरोबर चौदा वर्षे भ्रमंती करणारा लक्ष्मण हा आदर्श पती ठरू शकतो काय ? या प्रश्नाचं उत्तर देताना मन गोंधळून जातं. एखादा पंडित असाही युक्तिवाद करील की,

' लक्ष्मण हा रामनिष्ठ होता. रामभक्तीपुढे त्याला कशाचीच पर्वा नव्हती. उर्मिलेला त्यानं दु:खात लोटलं नाही. उलट ती अयोध्येच्या राजमहालात सुखात होती. तिच्या दिमतीला अनेक दासी होत्या. वस्त्रालंकार आणि सुखसाधनं वगैरेंची कसलीही कमतरता नव्हती. लक्ष्मणानं तिच्या चरितार्थाची योग्य ती तरतूद केलेलीच होती. '

आता या पंडिताला काय सांगावे ? भावनाशून्य पांडित्य किती तापदायक

असते याचा हा एक सुंदर नमुना आहे. उर्मिला सुखात होती हा जावईशोध या पंडिताला कसा लागला कुणास ठाऊक ? पंडिती युक्तिवादाने उर्मिलेचे दु:ख जाणून घेता येत नाही. अंत:करणानेच ते कळेल. विवाहानंतर पहिली चौदा वर्षे केवळ विरहात कंठायची एवढेच उर्मिलेचे दु:ख मर्यादित नव्हते. माझ्या दृष्टीने तिचे दु:ख व्यापक आहे. खोल आहे. पतीच्या जीवनात आणि मनात आपले स्थान सर्वाधिक महत्त्वाचे आहे असे वाटणे हीच पत्नीच्या दृष्टीने आनंदाची व अभिमानाची घटना असते. पण लक्ष्मणाच्या दृष्टीने उर्मिला इतक्या महत्त्वाची मुळीच नव्हती असे दिसते. त्याचे बंधुप्रेम नि:संशय अथांग होते. पण पत्नीप्रेमाला त्याच्या मनात कितपत जागा होती कुणास ठाऊक ? धनुर्धारी लक्ष्मणाने हा उपेक्षेचा आणि अपमानाचा बाण उर्मिलेवर सोडून तिला जन्माची जायबंदी करून टाकले यात शंका नाही. तिच्या दु:खाला कधीही वाचा फुटली नाही. तिच्या डोळ्यांतून जन्मभर झरणारी आसवे कुणी सहानुभूतीने पाहिली नाहीत. तिच्या हृदयातून ज्या विलक्षण दु:खाचे सूर उमटत होते ते तिला निर्माण करणाऱ्या वाल्मीकीनेसुद्धा कधी ऐकले नाहीत. पित्यानेच कन्येची उपेक्षा केल्यावर जगाकडून न्यायाची अपेक्षा कशी करता येईल ?

एखाद्या दिवशी अन्याय असह्य होऊन ही लक्ष्मणपत्नी उर्मिला रामायणाच्या बंधनातून कधीतरी बाहेर येऊन जगाच्या वेशीवर आपलं विलक्षण गाऱ्हाणं मांडील असं मला राहून राहून वाटतं. ही उर्मिला एखाद्या विजेसारखी कडाडून म्हणेल, 'वाल्मीकी हा महाकवी आहे. त्यानं रामायण लिहिलं. सर्वांनी रामसीतेचा आणि लक्ष्मणाचा जयजयकार केला. मीही त्यांना वंदन करीन. पण माझ्या सुखदु:खाची कोणत्याही कवीनं दखल घेऊ नये हे न्यायबुद्धीचं द्योतक नव्हे. एखादा रवींद्रनाथ ठाकूर माझ्याबद्दल सहानुभूतीनं लिहितो. पण बाकी सारे प्रतिभावंत मूग गिळून गप्प बसले आहेत. रामायणावर नाटकं झाली, चित्रपट झाले. गीतरामायणासारख्या गीतमालिका झाल्या. दूरदर्शनसाठी चित्रमालिकाही झाल्या, माझी कुणीही आठवण केली नाही. इतकी मी क:पदार्थ आहे ? माझा सर्वांत अधिक राग माझ्या पतीवरच आहे. माझ्या अश्रूंकडे दुर्लक्ष करून माझ्याकडे पाठ फिरवून तो खुशाल बेदरकारपणे रामाच्या पाठीमागे निघून गेला. मी जिवंत आहे, की नाही याची त्यानं कधी चौकशीही केली नसेल. मनात येईल तेव्हा आपल्या पत्नीला वाऱ्यावर सोडून देणारा पती हा माझ्या आदराचा विषय

व्हावा अशी तुमची अपेक्षा आहे काय ? ज्या लक्ष्मणाच्या नावानं मी रोज माझ्या कपाळावर कुंकुमतिलक लावीत होते तो पतिदेव माझ्या भावभक्तीला लाथाडून केवळ स्वत:च्या इच्छेनं मला दूर लोटून चौदा वर्षे परागंदा होतो, त्याला मी देव समजलं पाहिजे असा तुमचा आग्रह आहे काय ? दगडाचा देव कधीकधी पावतो असं म्हणतात. पण या हाडामांसांच्या देवानं माझी पूजा उधळली. माझं भावजीवन त्यानं उद्ध्वस्त केलं. रामायणाच्या प्रत्येक पानात माझे अश्रू दडलेले आहेत, याची जाणीव तरी तुम्हाला आहे काय ? आज मला मुक्तपणानं बोलू द्या. रामायणात साऱ्यांची गाऱ्हाणी, साऱ्यांच्या व्यथावेदना मुखरित झाल्या आहेत. वर्षानुवर्षे आणि शतकानुशतकं हृदयाच्या खोल कपारीत धुमसत असलेली एक विलक्षण वेदना आज मला माझ्या शब्दांतून व्यक्त करू द्या. मी आहे उर्मिला. लक्ष्मणाची दुर्दैवी वनवासी पत्नी. सदैव अंधाराचा बुरखा घेऊन बसलेली. या शापित उर्मिलेला हे काळोखाचं अवगुंठन बाजूला सारून तुमच्याशी बोलून पोळलेलं मन हलकं करायचं आहे. स्त्रीवर शेकडो हजारो वर्षांपासून असेच अन्याय होत आहेत. ओठ घट्ट मिटून पोटातलं दु:ख पोटातच ठेवण्याचा आम्ही वेडेपणा केला. लक्ष्मणानं माझा त्याग केला. रामानंही सीतेचा त्याग केला. हे त्याग उदात्त आहेत म्हणून जगाला त्या वीरांची पूजा करू द्या, पण त्या त्यागाचे आम्ही बळी ठरलो. आम्ही त्या त्यागात कायमच्या गाडल्या गेलो. आमच्या दु:खावरच राम - लक्ष्मणांची महती अवलंबून आहे. त्यांच्या कर्तृत्वाच्या इमारतीचे आम्ही मात्र पायाचे दगड आहोत. पायाच्या दगडानं खोल जमिनीत स्वत:ला पुरून घ्यायचं असतं. त्यानं कधीही प्रकट व्हायचं नसतं. त्याच्यावर कधीही प्रकाशाचा झोत पडत नाही. पुरल्या गेलेल्या दगडाला आपल्या भावना बोलण्याचा अधिकार असत नाही. त्यानं केवळ एक भव्य इमारत आपल्या मस्तकावर पेलण्याची जीवघेणी कसरत केली पाहिजे. त्याच्या अश्रूंना विचारतो कोण ? लोक इमारतीची शोभा पाहतात. मंदिराच्या कळसाचं भक्तीनं दर्शन घेतात. लक्ष्मणाच्या कीर्तीचं मंदिर ज्या गाडलेल्या पाषाणावर उभं राहिलं आहे त्या दुर्दैवी हतभगिनी शिळेचं नाव आहे उर्मिला. निदान तुम्ही तरी माझी आठवण ठेवा. पण उगीच कशाला ही आशा ? आम्ही अंधाराच्या कुशीतच जन्मलो आणि आम्ही अंधाराच्या कुशीतच विलीन होणार !!

●

□ □ ५

# वनवासी फूल

'**वनवासी फूल' नावाची रे. टिळकांची एक दीर्घ कविता आहे.** टिळकांना 'फुलामुलांचे कवी' अशी उपाधी होती. कॉलेजच्या पहिल्या वर्षात विद्यार्थी असताना हे दीर्घकाव्य मी वाचलं आणि अत्यंत प्रभावित झालो. काव्य आणि तत्त्वदृष्टी यांच्या संगमातून हे 'वनवासी फूल.' फुललेलं आहे. त्याचा गंध मी आजही विसरू शकत नाही. कॉलेजात असताना मराठीतले बहुतेक कवी मी वाचून काढले होते. सुंदर कविता आपल्या हृदयाला असा दंश करते की ते मधुर दु:ख आपण जन्मभर मनातल्या मनात आत्मीयतेनं जतन करून ठेवतो. जो आपल्या प्रेयसीच्या गालावर फुललेलं मंद मधुरोत्कट स्मित विसरतो त्याला प्रियकर म्हणणं म्हणजे प्रियकर शब्दाची कुचेष्टा करण्यासारखं आहे. तसंच ज्याच्या मनाला एखाद्या रमणीय काव्यानं कधी चटका बसला नाही त्याला रसिक म्हणता येईल काय ? मुग्ध होणं, लुब्ध होणं आणि क्षुब्ध होणं ही जिवंत भावनेची रूपं आहेत. अंत:करणाचा जिवंतपणा त्यातून प्रत्ययाला येतो. कॉलेजच्या त्या दिवसांत अनेक कविता - संग्रह मी अधाशासारखे वाचत होतो. 'काव्य खावे, काव्य प्यावे, काव्य गावे सारखे' अशी माझी अवस्था झाली होती. रेंदाळकरांची ती सुप्रसिद्ध कविता माझ्या वाचनात आली. 'अजुनी चालतोचि वाट माळ हा सरेना, विश्रांतिस्थळ केव्हा यायचे कळेना.' पुढं आयुष्यात या ओळींनी खूप सोबत केली. माळ संपेल असं आपल्याला वाटतं आणि त्या आशेनं खाचखळग्यांतून माळरान तुडवीत आपण चाललेले असतो. आपण अखेर संपून जातो, पण माळरान मात्र कधीच संपत नाही. हा दु:खद प्रत्यय आपल्याला सोबत करीत राहतो. दु:ख, निराशेच्या कविता ज्याप्रमाणे जीवनातलं विदारक सत्य सांगतात, त्याप्रमाणे प्रणय, उन्माद, आनंद, पराक्रम, प्रेरणा इत्यादी भिन्न भिन्न गहिऱ्या रंगांच्या छटा घेऊन काही कविता माझ्या मनाभोवती आजही पिंगा घालीत आहेत. काय असेल ते असो, कविता आपल्या दु:ख, तप्त, वैराण

मनावर हरित तृणाच्या मखमलीचे हिरवे हिरवेगार गालिचे पसरीत असते. प्रणयभावनेचा उन्मत्तपणा गडकऱ्यांच्या कवितेनं मनात पेरला. प्रीतीच्या ज्वालेत होरपळलेल्या दग्धपक्ष पतंगाची जळती कहाणी माधव जूलियनांनी त्या काळात मला सांगितली. आज इतक्या वर्षांनंतर मराठी, संस्कृतातले आणि इंग्रजीतले काही रोमॅन्टिक कवी माझ्या मनात कुठेतरी घर करून बसले आहेत असं वाटतं. मनाच्या घरट्यातल्या कवितांची पाखरं आपल्याला अखंड सोबत करीत असतात. सुंदर कविता कधीच आटत नाही, विटत नाही. तिच्या तारुण्याचं पीस कधीच झडत नाही. आनंद देण्याची आणि भावधुंद करण्याची तिची शक्ती एखाद्या स्वर्गीय अप्सरेप्रमाणं तरुणच राहते. यौवनानं न्हालेली कविता रसिकानं आपल्या मनात आणि गात्रागात्रांत उतरून घ्यावी. तिचं नितळ सौंदर्य पिऊन घ्यावं. ' तुझ्या लाल ओठातली आग प्यावी, मिठीने तुझ्या तीव्र व्हाव्या कळा. '

मी ' वनवासी फूल ' या कवितेविषयी सांगणार होतो. ते तसंच राहून गेलं. कविता हा विषय असा आहे की या विषयाची अनावर आसक्ती जडल्याशिवाय राहत नाही. त्या काळात मी बऱ्याच कविता लिहिल्या. कॉलेजातल्या मनमोकळ्या वातावरणात ज्याला किंवा जिला कविता सुचत नाही त्याला / तिला तरुण म्हणण्यात काय अर्थ आहे ? मी लिहिलेली एकही कविता प्रसिद्धीसाठी कुठेही पाठवली नाही. मराठी साहित्याचं त्यामुळं भलं झालं. ' वनवासी फूल ' ही दीर्घ कविता खरं तर तात्त्विक स्वरूपाची आहे. रानावनात फुलून आलेल्या आणि आपल्या विलक्षण मत्त सुगंधानं आसमंत दरवळून टाकणाऱ्या एका लाजऱ्या फुलाशी कवीचा संवाद होतो. तो त्याला वनातून जनात येण्याचा, नगरात येण्याचा आग्रह करतो. कवी म्हणतो,

' या एकांतवासात राहून तुला कसला लाभ होणार आहे ? तुझ्या ठायी असलेल्या दिव्य सुगंधाचं रसग्रहण केवळ नगरातच होऊ शकेल. या निर्जन वनात आपलं तारुण्य उधळण्यात काहीच शहाणपणा नाही. तुझ्या सौंदर्याची आणि सुवासाची इथं कुणीही कदर करणार नाही. माझ्या बरोबर शहरात चल आणि मग पहा, सुगंधवेडे रसिक तुझ्यावर स्तुतीच्या शब्दांची उधळण करतील. '

ते ' वनवासी फूल ' उपहासानं हसलं आणि कवीला म्हणालं, ' नगरातल्या रसिकजनांची इतकी स्तुती करण्याचं काहीच कारण नाही. स्वार्थ, कपट आणि दांभिकता यांनी बरबटलेल्या जगात माझं कौतुक होण्याऐवजी शिकार मात्र होईल.

सौंदर्याची पूजा बांधणारे रसिक पुजारी आहेत कुठे ? तुमच्या शहरात तर सौंदर्याचे शिकारी राहतात. त्यापेक्षा या एकांतातच मी माझे आनंदगीत गात राहाणार आहे. माणसांपेक्षा निसर्गाचा सहवास कितीतरी पटीनं अधिक चांगला असतो. निसर्गात वंचना नाही. छळवाद नाही. द्वेषमत्सराचे चटके नाहीत. क्षुद्र वृत्तींचे विषारी वारे नाहीत. तुमच्या जगात मात्र हे सारं आहे. रानातला मोकळा वारा पिऊन मोकळ्या आकाशाच्या खाली मी मुक्तपणानं वेलीच्या हिंदोळ्यावर झोके घेत आहे. तुमच्या त्या दिखाऊ जगात हे स्वातंत्र्य मला मिळणार आहे का ? ओठात एक आणि पोटात दुसरंच ही तुमच्या जगाची नीती आहे. क्रूरपणानं सौंदर्य कुस्करायचं, त्याच्या पाकळ्या पायदळी तुडवायच्या आणि ते सौंदर्य निर्माल्य झालं की दुसऱ्या सुंदरतेच्या पाठीमागं अधाशीपणानं जिभल्या चाटीत धावत सुटायचं हा तुमचा धर्म आहे. असल्या स्वार्थी जगाची खोटी स्वप्नं मला दाखवू नका.'

कवीला फुलाचं म्हणणं पटणं शक्यच नव्हतं. तो म्हणाला, ' ज्या जगाविषयी तू बोलतोस ते जग तू कधीतरी पाहिलं आहेस का ? प्रत्यक्ष अनुभवाचा आधार नसताना जगाची निंदा करण्याचा तुझा वेडेपणा मला मान्य नाही. या वनवासात तुझ्या उमलत्या तारुण्याला कसलाही प्रतिसाद मिळणार नाही. तारुण्य आणि सौंदर्य, सुगंध आणि आनंद यांची देणगी निसर्गानं तुला रानात वाळून जाण्यासाठी दिलेली नाही. ज्याच्याजवळ गंध आहे त्यानं जगाला आपला परिमल देऊन सुगंधित करावं. सौंदर्यानं या जगात सौंदर्याची बीजं पेरावीत. तू असाच आणखी काही दिवस या एकांतात राहिलास तर एक दिवस वेलीवरून तू गळून पडशील. म्हणून म्हणतो माझं ऐक, एकांतापेक्षा लोकांत बरा.'

प्रवृत्ती आणि निवृत्ती या विषयावर ' कवी व वनवासी फूल ' यांचा संवाद या कवितेत विलक्षण रंगला आहे. टिळक हे तत्त्वचिंतक कवी होते. त्यांच्या जीवनचिंतनाची दाट छाया या काव्यावर पडूनही ते काव्य नीरस किंवा तत्त्वजड, दुर्बोध झालं नाही. गमतीची गोष्ट अशी की कवी जेव्हा प्रवृत्तीचा विचार सांगून फुलाचं मन वळवण्यासाठी युक्तिवाद करतो तेव्हा त्याचं म्हणणं आपल्याला जितकं तर्कशुद्ध वाटतं, तितकंच लोकविन्मुख निवृत्तिवादी फुलाचं, जगाकडं पाठ फिरवणंही सयुक्तिक वाटतं. दोन्ही प्रकारचे युक्तिवाद टिळकांनी सारख्याच सामर्थ्यानं केले आहेत. काहीवेळ प्रवृत्तिवाद समर्थनीय वाटतो. तर काही वेळ निवृत्तिवादही मनाला पटतो. कदाचित हे 'वनवासी फूल' म्हणजे

संन्यासवादाकडे झुकलेली एखादी सुंदर तरुणी असावी. कोवळ्या तारुण्यातच ती संन्यासिनी बनली असावी. विरक्ती सुंदर असू शकते पण यौवनाच्या देहलीवर असताना या भगव्या विरक्तीचा अंकुर एखाद्या सुंदरीच्या मनोभूमीत वाढणं रसिक कवीला सुसंगत वाटलं नसावं. तरुण अंत:करणात अनुरक्तीची तांबडी कमळं फुलून येतात. उन्मादी तारुण्यानं आपल्या विलोल नेत्रांनी आसमंतातला आनंद उत्कटतेनं टिपून घ्यावा. सौंदर्यभावनेनं मन काठोकाठ भरावं, कशासाठी तरी किंवा कुणासाठी तरी सैरभैर व्हावं, वेडं व्हावं, प्रणयाच्या पंचरंगांनी रंगपंचमी साजरी करावी. मदनाला प्रतिसाद द्यावा. प्रेमाच्या वादळात स्वत:ला बेदरकारपणे झोकून द्यावं. कुणाच्या तरी ओठावर मनातल्या सुंदर अतृप्तीची मुकी मोहोर उठवावी. संन्यासाच्या ज्वालेत निष्कारण जळून भस्म होऊ नये. निसर्गानं कशासाठी हे पुष्ट शरीर दिलं ? धुंद प्रणयाच्या वादळवाऱ्याबरोबर वाहत जाण्याचा बेगुमान आनंद अंधाऱ्या रात्री संकेतस्थळी प्रियकराला चोरून भेटणाऱ्या अभिसारिकेला विचारा. तिची अंगांगे पेटलेली असतात. मदनज्वाला भडकलेली असते. त्या संन्यासिनी तरुणीच्या मनात जीवनासक्तीचं अमृत शिंपडण्यासाठी कवीनं फुलाचं प्रतीक घेऊन युक्तिवाद केला असेल काय ? या प्रश्नाचं उत्तर देता येत नाही. त्या कवितेवर माझ्याच काही कल्पनांची छाया पाडीत आहे असं मला वाटतं. पण एखादी प्रभावी कविता आपल्या मनात भावार्थाची अनेक वर्तुळं उत्पन्न करते यात शंका नाही. मला स्वत:ला विरक्त बनलेल्या आणि जगाची घृणा करणाऱ्या लोकांपासून सुरक्षित अंतरावर राहणाऱ्या ' वनवासी फुलाची ' विचारसरणी मात्र कधीच पटत नाही. हे जर ब्रह्मचारिणी स्त्रीचं रूपक असेल तर त्या स्त्रीची संन्यस्त जीवनदृष्टीही मला रुचत नाही. पण या बाबतीत मी मतस्वातंत्र्य मान्य करतो. पण तरीही फुलानं स्वत:प्रमाणेच जगासाठीही फुलावं. फलभारांनी वाकलेला वृक्ष आपली फळं जगाला देत नसेल तर त्या वृक्षाचा तो कद्रूपणा पटण्यासारखा नाही.

निवृत्तिवादाचं, संन्यासवादाचं आपण आवश्यकतेपेक्षा अधिक कोडकौतुक करतो असं मला वाटतं. प्रवृत्तीत पुरुषार्थ असतो. त्यागातलं सौंदर्य आणि सामर्थ्य मी नाकारीत नाही. पण जीवन आनंदमय, रसमय करण्यासाठी भोगभावनेचीही आवश्यकता असते. श्रीकृष्णाच्या विलासी वृत्तीतलं निरामय सौंदर्य आपण कशासाठी नाकारायचं ? त्याला ' पूर्णावतारी ' मानतात. कारण त्यानं जीवनाचा

कोणताच रंग अव्हेरला नाही. साऱ्या रंगात रंगलेला हा श्रीरंग हे भोगाचं आणि त्यागाचं उज्ज्वल रूप आहे. ' रंगात रंगून जा ' हा त्याचा संदेश आहे. ' वनवासी फुलानं मात्र कुठल्यातरी दूर निर्जन कोपऱ्यात जगाच्या भीतीनं जगत राहण्याचं ठरवलं हे मला पटत नाही. केवळ स्वार्थ, केवळ कपट, केवळ प्रतारणा हे जगाचं चित्र मला तरी खोटं वाटतं. स्वार्थभावना आहेच पण आपल्या आयुष्याचं फूल समाजाच्या चरणावर समर्पित करणारी कितीतरी माणसं या जगात दिसू शकतात. समुद्राच्या तळाशी केवळ दलदल आणि गाळ साचलेला असतो काय ? रसदृष्टी असलेल्या पाणबुड्याला मोती सापडल्याशिवाय राहात नाहीत. तुम्ही काही म्हणा, जीवनाच्या उत्सवात अनेक सूर कोंदलेले आहेत. अनेक रस आणि गंध दाटलेले आहेत. दु:खांच्या काट्याचं शल्य बोचत असतानाच आपल्यावर नि:स्वार्थपणानं प्रेमाचा वर्षाव करणाऱ्या एखाद्या प्रेमदैवताची आठवण होते आणि जीवनाची आसक्ती पुन्हा दृढतर होत जाते. त्या वनवासी फुलाला एखादा भ्रमर भेटला असता तर त्यानं जगावर टीका केली असती काय ? पुष्प आणि भ्रमर यांचं जीवन परस्परांशिवाय परिपूर्ण होऊ शकत नाही.

जीवनाचा कटु अनुभव आलेला एक गृहस्थ सारे पाश तोडून वनवासात आला. एका लहानशा झोपडीत तो राहात होता. कंदमुळं खावीत, झऱ्याचं झुळझुळतं पाणी प्यावं आणि झाडाखाली बसून ईश्वराचं चिंतन करीत राहावं असा त्याचा क्रम सुरू झाला. या निर्जन अरण्यात झाडाझुडपांच्या सहवासात तो रमला होता. वर्ष सहा महिने असेच निघून गेले. त्याच्या झोपडीपासून मैल दीड मैल अंतरावर आणखी एक झोपडी होती. रात्रीच्या घनदाट अंधारात कधीतरी त्या झोपडीत तेवणारी मंद दिव्याची ज्योत त्याला इतक्या अंतरावरून दिसायची व का कुणास ठाऊक रोज रात्री त्या मिणमिणणाऱ्या ज्योतीच्या मंद उजेडासाठी त्याचं मन व्याकुळ होऊ लागलं. केव्हातरी त्या दूरवरच्या झोपडीत राहणारी एक तरुणी संन्याशाच्या झोपडीत आली. तो डोळे मिटून ईश्वराचं ध्यान करीत होता. तिनं त्याची मळलेली भगवी वस्त्रं उचलली आणि झऱ्यावर ती स्वच्छ धुतली. तो एकांत चिंतनासाठी झाडाखाली बसलेला असायचा आणि त्या वेळी ती त्याची झोपडी स्वच्छ करायची. कधी कधी ध्यानस्थ असलेल्या संन्याशासमोर ती ताजी खुडलेली फळं ठेवायची. कित्येक दिवसानंतर तिची ही मूकसेवा त्याच्या लक्षात आली. तो रागावला. एके दिवशी त्यानं चिडून तिला विचारलं,

' हे सारं तू कशासाठी करतेस ? तुझी काय अपेक्षा आहे ? मी तुझी सेवा स्वीकारणार नाही. मला मोहात पाडण्यासाठी तुझे हे उद्योग असावेत.' तिची दृष्टी जमिनीकडं होती. ती शांतपणानं म्हणाली, ' तुमच्या ध्यानात तुम्हाला परमेश्वर दिसतो. तुमच्या सेवेत मला त्याचा साक्षात्कार होतो. माझी कसलीच अपेक्षा नाही. सेवेतल्या आणि समर्पणातल्या आनंदालाच मी परमेश्वर मानते.' संन्याशानं तिच्या डोळ्यांत पाहिलं. समर्पणातली शांती आणि सेवेतली तृप्ती व भक्ती तिथं नांदत होती. संन्याशाला आपल्या चिडखोरपणाचा राग आला. त्यानं पुन्हा तिच्या दृष्टीत दृष्टी मिळवली. आता तिची दृष्टी बोलत होती. माणसाकडं आणि जगाकडं पाठ फिरवल्यावर परमेश्वर कसा मिळणार ? तो झऱ्यात आहे, झाडाझुडपांत आहे तसा माणसांतही आहे. माणसांना माणसांची होणारी भावभेट हाच परमेश्वरी साक्षात्कार नव्हे काय ?

संन्याशानं झाडांच्या पानांकडं पाहिलं. त्या हिरव्यागार पानांची सळसळ त्याच्या अंत:करणात खोलवर रुजली. जवळच्या झऱ्यातलं झुळझुळीत संगीत त्याच्या हृदयाला कंपित करू लागलं. आकाशाची निळाई, पाखरांची चिवचिव त्याला म्हणाली, ' वेड्या, डोळे बंद करून परमेश्वर दिसत नाही. डोळे उघडून पहा. नाना रूपांतला आणि रंगातला तो सर्वव्यापी, सर्वस्पर्शी ईश्वर बाहू उभारून तुला आवाहन करीत आहे.' संन्याशानं पुन्हा त्या स्त्रीच्या दृष्टीत आपल्या नव्या दृष्टीनं पाहिलं. जीवनाची एक जिवंत लाट तिच्या डोळ्यांत उचंबळत आहे असं त्याला वाटलं आणि त्या उचंबळत्या लाटेत तो विलीन होऊन गेला.

आता त्या ' वनवासी फुलाचा ' वनवास संपला होता. निवृत्तीचा रंग निवळून गेला. प्रवृत्तीची ज्योत प्रसन्नपणानं तेवू लागली.

'वनवासी फूल ' ही टिळकांची कविता प्रवृत्ती निवृत्तीचा युक्तिवाद करणारी कविता आहे. आजही ती मला आठवते. पण का कुणास ठाऊक वैराग्याचा भगवा रंग माझ्या मनातल्या आनंदाच्या डहाळीवर आलेल्या हिरव्या पानांशी विसंगत वाटतो. जगाची आसक्ती सोडायची आणि मुक्तीची आसक्ती ठेवून आयुष्याची वाट चालायची या कल्पनेतच काही अंगभूत विसंगती आहे काय ? ते काहीही असो ' वनवासी फूल ' मात्र मला कैक वर्षे विचारांचा सुगंध देत आले आहे.

□ □ ६

# साहेब

आपल्या आत्यंतिक करडेपणाबद्दल (कु) प्रसिद्ध असलेले एक बडे प्रशासकीय अधिकारी सेवानिवृत्त झाले. तेव्हा त्यांच्या कार्यालयातील सर्व सेवकांनी, सहकाऱ्यांनी सुटकेचा नि:श्वास टाकला. काही कारकून या आनंदाप्रीत्यर्थ कॅन्टीनमध्ये चहा आणि बटाटेवडा एकमेकांना आंनदानं देत होते. ' हुकूमशाहीचे युग ' संपले अशीच जणू त्यांनी ललकारी दिली होती. साहेबांना निरोप देण्याचा एक औपचारिक समारंभ प्रथेप्रमाणं पार पडला. या अधिकाऱ्याबद्दल कुणालाच आस्था नव्हती. तो निवृत्त होत आहे या घटनेवर सर्वजण मनापासून खूष होते. अशा समारंभात तोंडदेखली सांकेतिक भाषणे होत असतात तशीच झाली. एकाच्याही बोलण्यात प्रामाणिकपणा नव्हता. कसा असणार ? ' मोले घातले रडाया, नाही आसू, नाही माया ' हे साहेब सर्वांशी अत्यंत कोरडेपणाने आणि तुच्छतेने वागायचे. बोलण्यात आपुलकी तर राहोच पण सौजन्याचा लेशही नसायचा. हातातली फाईल कारकुनाच्या अंगावर फेकून देण्यात आणि त्याला ' गेट आऊट ' म्हणण्यात त्यांना विशेष रस होता. ते ऑफिसात असले की वातावरण भयकंपित असायचे. साहेब कुणाला कधी कोणते विशेषण देऊन अपमानित करतील याचा नेम नसायचा. त्यामुळे गेल्या वीस वर्षांत ऑफिसमध्ये खळखळून हसण्याचा किंवा थट्टामस्करीचा शब्दही कधी उमटला नाही. आपण आल्याबरोबर ऑफिसात कशी शांतता पसरते आणि आपला प्रत्येक शब्द कसा तत्परतेनं झेलला जातो, आपल्याशी बोलताना कारकून मंडळी आणि इतर अधिकारी कसे कमरेत वाकलेले असतात याचा साहेबांना अभिमान वाटायचा. आपला शब्द अंतिम आहे, आपण करू ती पूर्व या अहंगंडात त्यांनी बरीच वर्षे काढली होती. असा मनुष्य रिटायर्ड होताना कोणाला वाईट वाटणार ! निरोपाची जी भाषणे झाली ती अर्थातच नाटकी, अतिशयोक्तीपूर्ण होती. एक कनिष्ठ अधिकारी म्हणाला,

' आमचे साहेब निवृत्त होत आहेत याचा अर्थ आमच्या मस्तकावरचं प्रेमाचं छत्र नाहीसं होत आहे. आम्ही आता उघडे पडणार ! बोलता बोलता गळा भरून आल्याप्रमाणे अभिनय करीत तो कनिष्ठ अधिकारी थोडा वेळ थांबला. कदाचित मनातल्या मनात तो म्हणत असेल ' हा खवीस आमच्या मानगुटीवरून दूर जात आहे याचा आम्हाला आनंद वाटतो.'

निरोप समारंभाच्या वेळी देखील साहेबांच्या मुद्रेवरचा कोरडेपणा वितळला नव्हता. आपण सर्वोच्च अधिकारी आहोत, सर्वांचे ' साहेब ' आहोत या अहंकाराच्या वलयातून ते बाहेर पडलेले नव्हते. परमेश्वराने आपल्याला ' यावच्चंद्रदिवाकरौ ' साहेब राहण्याचा ताम्रपट दिलेला आहे अशीच जणू त्यांची श्रद्धा होती.

एकदा हाताखालचा एक अधिकारी साहेबांच्या दालनात परवानगी न विचारताच आत आला. कोणत्यातरी विचारांच्या भरात त्याच्या हातून ती किरकोळ चूक घडली असावी. पण साहेब कडक शिस्तीचे उपासक होते. त्यांना हा आपला अपमान वाटला ते खेकसले,

' मिस्टर, तुम्ही कुणाच्या चेंबरमध्ये येत आहात याची ज़ाणीव विसरलेले दिसता, प्रथम माझी संमती विचारा.'

तो निम्न स्तरातील अधिकारी गडबडला. ' सॉरी सर, सॉरी सर ' असं पुटपुटत तो बाहेर गेला आणि अतिनम्रतेनं ' मे आय कम इन सर ' असं त्यानं विचारलं. प्रथम साहेबांनी सिगरेट केसमधून एक सिगरेट घेऊन ती ओठात ठेवली. लायटरनं पेटवली आणि मग एक झुरका घेऊन काहीशा तुच्छतेनं त्यांनी त्या कनिष्ठ अधिकाऱ्याकडे पाहून होकारार्थी मान हलवली. पण आत आलेल्या सहकाऱ्याला खुर्चीवर बसायला मात्र साहेबांनी सांगितलं नाही. अपमान गिळून तो सहकारी कामापुरतं बोलला. बाहेर आल्यानंतर आपल्या कक्षात बसून त्यानं मनातल्या मनात साहेबाला एक गरगरीत शिवी हासडली.

या बड्या अधिकाऱ्याला कुणी जिवाभावाचा मित्र असणं शक्य आहे का ? हा ' महापुरुष ' घरात आपल्या बायका - मुलांबरोबर कसा वागत असेल ? तो कधी मनमोकळेपणानं हसला खिदळला असेल का ? मला याबद्दल शंका आहे. जबरदस्त कुतूहल आहे. ज्या ऑफिसात वीस - पंचवीस वर्षे त्याने सहकाऱ्यांबरोबर काढली, त्या सहकाऱ्यांशी हास्यविनोद करीत कधी त्यानं चहा

घेतला काय ? त्याच्या रक्ताच्या प्रत्येक थेंबात ' साहेबी नशा ' चढलेली होती. आता निवृत्त झाल्यानंतर मात्र कुणीही त्याच्यासमोर वाकून अदबीनं उभा राहत नव्हता. कुणीही त्याला ' साहेब साहेब ' म्हणून साद घालीत नव्हता. एकाएकी त्याचे साम्राज्य कोसळून पडले होते. अहंकाराला भगदाड पडले होते. आपल्या अधिकारयुगाचा अस्त झाला हे कबूल करायला त्याची तयारी नव्हती.

वस्तुत: आपल्या कौटुंबिक जीवनात त्याला आनंद मिळाला असता. पत्नी, मुलं यांच्याशी समरस होऊन त्याला सुखासमाधानानं जगता आलं असतं. पण पत्नीसुद्धा त्याच्या दृष्टीनं कनिष्ठ स्तरावरील एक नोकर होती. तीही त्याचा उल्लेख ' साहेब ' म्हणूनच करीत होती. बायकोनं नवऱ्याला ' साहेब ' म्हणणं ही शोकांतिकाच नव्हे काय ? कुटुंबकर्ता हा रिंग मास्टर आणि कुटुंबातले लोक त्याच्या करड्या नजरेखाली शिस्तीनं वागणारी ' मुकी जनावरं ' असाच अर्थ होता. जिनं आपल्याबरोबर वर्षानुवर्षे साथ केली, जी संकटांच्या आणि दु:खांच्या प्रसंगात सावलीसारखी निष्ठेनं आपल्याबरोबर राहिली त्या पत्नीच्या अंगावरही खेकसण्यापलीकडं त्यांना काहीच जमलं नव्हतं. करड्या शिस्तीच्या कठोर शब्दांवाचून बापाच्या तोंडून मुलांच्या वाट्याला फारसे शब्द कधी आले नव्हते. वरिष्ठ अधिकाऱ्याची एक ठरलेली स्नेहशून्य मुद्रा घेऊन बसलेल्या या माणसाच्या आयुष्यात आता निवृत्तीनंतर काहीच उरले नव्हते. आपल्याला कुणी विचारीत नाही, कुणी मानही देत नाही. आपुलकीनं बोलत नाही याची जाणीव आता ' साहेबांना ' टोचू लागली.

कित्येक माणसे स्वत:च्या भोवती आकुंचित कल्पनेचे एक बेट तयार करतात. त्या बेटातच दुराग्रहाने राहतात. कुंपणापलीकडे पसरलेल्या विराट जगाशी त्यांचा कधीच संबंध येत नाही. घराच्या साऱ्या खिडक्या बंद करून घ्याव्यात त्याप्रमाणं यांच्या मनाचे सारे झरोके आपल्या हातांनी त्यांनी बुजवलेले असतात. त्यातून बाहेरच्या मनमोकळ्या स्वैर वाऱ्याची झुळूक येत नाही. जिथून आकाशाची निळाई दिसत नाही, कानावर खुल्या संगीताचे स्वर येत नाहीत, असल्या कृत्रिम बेटावर वर्षानुवर्षे वस्ती करून राहण्यात या महाभागांना काय मिळत असावे ?

पण सत्ताप्रेम आणि अहंकार यांच्या वेटोळ्यातून त्यांना बाहेरच यावेसे वाटत नाही. हे वेटोळे मोहक असते हे खरे, पण अखेर ते गळफासासारखे होऊन बसते हे त्यांच्या लक्षातच येत नाही. अहंगंडाच्या सापळ्यात सापडलेला माणूस

स्वत:ला दु:खी करून घेतो. खरे तर आपण कुणीतरी विशेषच आहोत, चारचौघांपेक्षा आपण अधिक उंचीवर आहोत या भ्रमात सुख असले तरी अखेर हा भ्रम आहे हे समजायला नको का ? माझ्या माहितीचे एक प्राध्यापक स्वत:चा उल्लेख नेहमी ' डॉक्टर ' म्हणून स्वत:च करतात. ते विद्वान आहेत आणि विद्यापीठानं त्यांना डॉक्टरेट दिली हे ठीक आहे, पण सही करतानासुद्धा ' डॉ.' हे अक्षर लिहिणं हास्यास्पद नव्हे काय ? अहंकाराचं हे असं प्रदर्शन पाहिलं की करमणूक होते. रानटी माणसे आपल्या अंगावर चित्रविचित्र आकृती गोंदून घेतात, तोंडाला रंग लावतात आणि त्या उघड्या अंगाने वावरतात. त्यांच्यात आणि पदव्यांची शेपटे मिरवीत जाणाऱ्या विद्याविभूषितांत मग काय अंतर ?

**खुर्चीत बसलेला साहेब सत्तेचे प्रदर्शन करतो. पदवीधर पदव्यांची आरास मांडून बसतो. आपापल्या क्षुद्र वर्तुळात ही माणसे सुखी असतात. पण जेव्हा भ्रमनिरासाचा क्षण येतो तेव्हा मात्र त्या क्षणाला ती सामोरे जाऊ शकत नाहीत.**

निवृत्त झालेले साहेब साहेबपणाच्या अहंकाराला घट्ट धरून बसले होते. खुर्ची गेली पण अहंकाराचं, सत्ताप्रेमाचं वस्त्र मात्र अंगावर चिकटून बसलं होतं. सत्ता गळून गेल्यावर त्यांच्या आयुष्यात एक पोकळी निर्माण झाली. साहेबी वृत्ती त्यांना स्वस्थ बसू देत नव्हती. कुणीतरी यावं आणि आपल्याशी त्यानं अत्यंत अदबीनं बोलावं, आपल्यासमोर झुकावं, असं रात्रंदिवस वाटत राहिलं, हे घडत नाही याचा राग घरातल्या माणसांवर काढायचा हा क्रम सुरू झाला. मानसशास्त्रज्ञ असं सांगतात की, अहंगंड हा न्यूनगंडाचाच एक प्रकार असतो. आत्मकेंद्रिततेच्या अतिरेकाची कितीतरी उदाहरणे देता येतील. समाजात अशी माणसे सर्व क्षेत्रांत आढळतात.

ताक मागायला आलेल्या शेजारणीला सूनबाईने सांगितले, ' आज ताक शिल्लक नाही ' हे सासूबाईला आवडले नाही. परत निघालेल्या शेजारणीला तिने बोलावून विचारले, ' काय पाहिजे '? ' ताकासाठी आले होते ' असं उत्तर मिळाल्यावर सासूबाई म्हणाल्या, ' ताक शिल्लक नाही हे सांगण्याचा अधिकार माझा आहे. सुनेनं या बाबतीत नाक खुपसण्याचं काहीच कारण नाही. ' सत्तेला लहानसाही ओरखडा कुणी काढला तर ते मनुष्याला सहन होत नाही. सत्ता आणि स्वामित्व या दोन गोष्टींचा जबरदस्त प्रभाव ज्या लोकांवर पडतो ते खरे पाहता दुबळ्या प्रवृत्तीचे लोक असतात. साऱ्या जगाने आपला अहंकार पोसावा आणि

कुरवाळावा ही त्यांची अपेक्षा जेव्हा फोल ठरते, तेव्हा विदारक वैफल्य त्यांना घेरायला लागते.

निवृत्तीच्या उंबरठ्यावर उभे असलेले एक शासकीय इंजिनीअरसाहेब अस्वस्थ झाले होते, ते मला म्हणाले, ' इंजिनीअर म्हणून आता मला अधिकार उरणार नाही याची थोडीशी खंत वाटते. पण पुढं काय करायचं, वेळ कसा घालवायचा, निर्माण झालेली मानसिक पोकळी कशी भरून काढायची याची मला फार भीती वाटते. अधिकाराचं कवचकुंडल होतं तोपर्यंत पूर्ण सुरक्षितता होती. आता मला अगदी उघड्यावर पडल्यासारखं वाटेल. काय करावं ?

या साहेबांची शंका चुकीची नाही. एकाच ठरलेल्या आणि ठरवून घेतलेल्या सुरक्षित चाकोरीतून प्रवास करीत राहिलेल्या प्रवाशाला रस्ता बदलण्याची कल्पनासुद्धा भीतीदायक वाटते. मी त्यांना म्हणालो,

' साहेब, आपण केवळ साहेबच आहोत असं मानण्यात फार मोठी चूक आहे. तुमच्या भीतीचं मूळ या कल्पनेत आहे. माणूस हा मूलत: माणूस आहे हे लक्षात न घेता आपण काही उपऱ्या किंवा लादलेल्या भूमिका करण्यात फार रंगून जातो. इतके रंगतो की ती तात्पुरती घेतलेली भूमिका हीच आपली ' प्रकृती ' आहे असं वाटायला लागतं. एक माणूस म्हणून आपण जगतच नाही. जगणंसुद्धा किती विविध पातळ्यांवरचं असू शकतं. पती, पिता, भाऊ, मुलगा, मित्र, गुरू, शिष्य कितीतरी नात्यांनी आपण जगत असतो. ऑफिसातली नोकरी संपली याचा अर्थ एक भूमिका संपली. तोंडावरचा ऑफिशियल रंग पुसला. पण अनेक भूमिकांचा रंग लावता येतो. आयुष्याची वाट अनेक प्रकारच्या गंमतीदार वळणांनी चालता येते.

एकदा एका गायकाच्या मैफलीत मला राज्याचे एक ज्येष्ठ मंत्री भेटले. त्यांचा माझा स्नेहसंबंधही होता. एका कोपऱ्यात गर्दीत बसून ते संगीताचा मनापासून आस्वाद घेत होते. गायकाच्या एखाद्या आलापाला खुषीनं दाद देत होते. मैफलीत पूर्ण रंगलेला हा माणूस राज्याचा एक महत्त्वाचा बडा मंत्री आहे हे त्या क्षणी कुणाला सांगितलं असतं तर त्यावर त्याचा विश्वासही बसला नसता. मध्यंतरात चहा घेताना माझ्या पाठीवर एक थाप मारून ते म्हणाले, ' प्रोफेसरसाहेब, तुम्हाला या मैफलीत पाहून बरं वाटलं. अरे यार, गाण्याची मझा

और असते. आज त्याचा आवाजही काय बहारीचा लागलाय ! चांदण्या रात्री समुद्र किनाऱ्यावर बसल्यासारखं वाटतंय.

मधात बुचकळलेले ते सूर फार दिवस बैचेन करतील. तुम्हा प्रोफेसरात थोडी फार रसिकता आहे म्हणायची ! नाहीतर तुम्ही लोक कोयनेल प्याल्यासारखा चेहरा करून काव्यशास्त्र आणि अर्थशास्त्र असे शिकवता की त्यात काव्यही नसतं आणि अर्थही नसतो. वर्गाच्या चार भिंतीत काव्य नसतं. ते शोधायला असं रसिकांच्या मैफीलीत यावं लागतं. पण तुम्ही प्रोफेसर मंडळी पुस्तकांत डोकी खुपसून बसता.'

मंत्री महोदयांचं ते दिलखुलास बोलणं, त्यांचा खोडकर विनोद मला आवडला. मंत्री असूनही या माणसात सत्तेचा अहंकार नव्हता. 'साहेबी' वृत्तीची लागण याला झालेली नव्हती. सदैव हसतमुख असणारा हा खेळकर माणूस रसिक होता. अनेक अंगांनी आयुष्य जगत होता. आता गाण्याच्या मैफलीतही तो चार चौघांसारखा बसला होता. संयोजकांनी त्याला उच्च आसन देऊ केलं होतं, पण त्यानं ते कटाक्षानं नाकारलं. तो म्हणाला, 'इथं मी गाण्याचा चाहता म्हणून आलो आहे. या मैफलीचा बादशहा तो कलावंत आहे. त्याच्या दरबारात आम्ही सारे त्याचे चाहते रसिक आहोत.'

मनाचा हा निकोपपणा, उमदेपणा खरोखच दुर्मिळ आहे. मंत्री असलेला माणूस आपण माणूस असण्यापेक्षा केवळ मंत्रीच आहोत असे समजून मंत्र्यांच्या पोजमध्येच राहू लागतो आणि मग एक साधारण माणूस म्हणून वाट्याला येणारी सारी सुखदु:खे हरवून बसतो. या रसिक मंत्र्याला एकदा मी विचारलं होतं, 'आपली खुर्ची केव्हातरी जाईल अशी भीती तुम्हाला कधी वाटली नाही का ?' ते हसून म्हणाले होते,

'खुर्ची केव्हाही जाऊ शकते. गेली तर गेली. तिच्यासाठी मी नाही माझ्यासाठी ती आहे. खुर्चीच्या पलीकंडे विशाल जग आहे. आणि या जगात करण्यासारख्या, आनंद घेण्यासारख्या असंख्य गोष्टी आहेत. मी माझ्या आनंदात जगत राहीन.'

जीवनाचे ते तत्त्वज्ञान खरोखरच मननीय आहे. अनेक वाटावळणांनी आपल्याला आयुष्याचा प्रवास करता येईल. निवृत्त झालेल्या साहेबाच्या मनातली

पोकळी ही त्याच्या सत्तालोभाची, अहंभावनेची गळचेपी झाली म्हणून निर्माण झाली होती. त्या साहेबाचे प्रेम केवळ स्वत:वर होते. सत्तेवर होते. प्रेमाची सत्ता त्याला कळलीच नव्हती. त्यानं आपल्या मुलांमुलींवर कधी प्रेम केलंच नव्हतं. त्यानं कधी आकाशातल्या चांदण्या डोळे भरून पाहिल्या नव्हत्या. झाडांच्या सळसळत्या पानांचं हिरवं गाणं त्याला कधी ऐकता आलं नाही. एखाद्या भजनात तो कधी रंगला नाही की घरी परतताना प्रियकराच्या भूमिकेतून आपल्या बायकोसाठी त्याने वेणी आणली नाही. तो कधी खळाळत्या झऱ्यासारखा हसला नाही. कधी रस्त्यावर भीक मागत बसलेल्या महारोग्याच्या वेदनेनं त्याला अस्वस्थंही केलं नाही. तो केवळ खुर्चीवर बसलेला 'साहेब'च राहिला. कारकुनांच्या अंगावर फाईली भिरकावणारा आणि करड्या मुद्रेने 'गेट आऊट' म्हणून खेकसणारा तो 'साहेबच' राहिला.

●

□ □ ७

# आधुनिक रामायण

आपल्या सावत्र आईच्या इच्छेसाठी रामाने चौदा वर्षे वनवास पत्करल्याची कथा रामायणात आहे. राज्यावरचा आपला अधिकार लाथाडण्यात आला आणि आपल्याला जबरदस्तीनं रानावनात भणंगाप्रमाणे राहावं लागलं, या घटनेची चीड किंवा राग रामाच्या मनात किंचितही उद्भवला नाही. त्यानं कैकयीला क्रोधाच्या आवेशात शिव्या दिल्या असत्या, तिचा तिरस्कार केला असता आणि जन्मभर तिच्याविषयी द्वेषभावना जोपासली असती तर एका अर्थानं ते सुसंगतच ठरलं असतं. खरं तर आपल्या सामर्थ्यानं आणि लोकप्रियतेनं राम अजोड होता. अयोध्येच्या सिंहासनावरील त्याचा हक्क हिरावून घेणाऱ्या कुठल्याही शक्तीचा तो नि:पात करू शकत होता. पण कैकयी ही आपली आई आहे आणि तिची इच्छा प्रमाण मानणं हा आपला पुत्रधर्म आहे ही उच्च भूमिका त्यानं अत्यंत निष्ठेनं स्वीकारली होती. कैकयीला नम्रतेनं वंदन करून त्यानं वनाचा खडतर मार्ग स्वीकारला. रामायण ही एक जीवनातल्या आदर्शाची दिव्य कथा आहे. धर्म, नीती, संस्कृती, प्रेम इत्यादी मूल्यांचा या प्राचीन महाकाव्यात सुंदर प्रकर्ष झाला आहे. राम हे तर अनेक उत्तम गुणांचं उत्तुंग प्रतीक मानलं जातं. राम केवळ शूरवीर असता, केवळ आदर्श राज्यकर्ता असता तर त्याला आम्ही देवत्वाच्या चौकटीत विराजमान केलं नसतं. तो आदर्श बंधू आणि त्यापेक्षाही आदर्श पुत्र होता. आपल्या मातापित्यांविषयी त्याच्या मनात नितान्त प्रेमभाव होता. त्यांची कोणतीही अपेक्षा त्यानं सर्वभावे पूर्ण केली. इतकी अलौकिक मातृभक्ती आणि पितृभक्ती त्याच्याठायी नांदत होती म्हणूनच या उदात्त पुत्राच्या मंगल प्रवृत्तीचा सुगंध आजही दिगंत पसरलेला दिसतो.

आज आपण एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर आहोत. या विज्ञानयुगात आईसंबंधी प्रेम, बापासंबंधीचा आदर या जुनाट मध्ययुगीन कल्पना आहेत असं मानणारे अनेक लोक मी पाहिले आहेत. एक तर्कपंडित तर मला म्हणाले,

'रामाचं कसलं गुणगान करता ? तो बुद्धिमान होता यावर माझा विश्वास नाही. केवळ आईबापांनी सांगितलं म्हणून राज्य सोडून वनवासात जाणं याला मी कधीही शहाणपणा म्हणणार नाही. मी रामाच्या ठिकाणी असतो तर दशरथ आणि कैकयीला तुरुंगात घातलं असतं. आईबापांचे गोडवे गाण्याचे दिवस आता इतिहासात जमा झाले. उगीच काहीतरी भंपक कल्पनांच्या आहारी जाण्यात काही अर्थ नाही. प्रेम आणि भक्ती यासुद्धा माझ्या हिशेबी केवळ कल्पना आहेत. स्वतःच्या सुखासाठी जे जे आवश्यक असेल ते ते स्वीकारणं यासारखा दुसरा शहाणपणा नाही. तुमचे हे रामायण महाभारताचे जुने आदर्श त्या काळात सुद्धा अनुकरणीय नव्हते आणि आज तर ते पूर्णपणे निरुपयोगी झालेले आहेत. लहान मुलांना काऊचिऊच्या गोष्टी सांगून त्यांना झोपवतात त्याप्रमाणं रामायण महाभारतातल्या या मनोरंजनाच्या गोष्टी आहेत. यापलीकडं मी तरी त्यांना काही महत्त्व देत नाही.'

आता या तर्कपंडिताला काय उत्तर देणार ? त्याला आईचं प्रेम, बापाचं प्रेम, सारं 'जुनाट' वाटू लागलं. व्यवहाराच्या चौकटीत जे बसेल तेवढंच खरं, बाकीच्या साऱ्या भावभावना मोडीत काढाव्यात ही त्याची विचारसरणी होती. कुटुंबातल्या व्यक्तीविषयीचं प्रेमसुद्धा तो व्यवहाराच्या दृष्टिकोणातून मोजीत होता. त्याच्या दृष्टीनं राम हे व्यवहारशून्यतेचं प्रतीक होतं. असले विचार ऐकले की मी विलक्षण अस्वस्थ होतो. माणूस हा एक केवळ स्वार्थी प्राणी आहे असं वाटायला लागतं. आमच्या भारतीय संस्कृतीनं 'मातृदेवो भव, पितृदेवो भव आणि आचार्य देवो भव' असं म्हणून आई, बाप व गुरू यांना प्रथम वंदन केलं. आज हे तिघेही उपेक्षेचे धनी होऊन बसले आहेत. जन्म देणारी आई हीसुद्धा केवळ उपेक्षेचा विषय व्हावी ही घटना खरोखरच अत्यंत क्लेशदायक आहे. आई हा शब्द उच्चारल्यानंतर खरं तर हृदयात कृतज्ञ भावनांची लाट उचंबळून यावी. वडिलांच्या आठवणीनं मुलाचे डोळे ओले व्हावेत. पण ही भावना झपाट्यानं ओसरत चालली आहे. आईबापांना 'देव' समजू नका. पण निदान आपल्या घरातील माणसं समजून त्यांच्याशी माणुसकीनं वागा असं झडझडून सांगण्याची वेळ आली आहे. रामायण महाभारतातील आदर्श आत्यंतिक स्वरूपाचे होते हे मी मान्य करतो. पण आपल्या जीवनापेक्षाही अधिक मोलाचं महन्मंगल असं काही तरी असू शकतं याची शिकवण या ग्रंथांतून आपल्याला मिळते.

माझ्या ओळखीचे एक प्रतिष्ठित गृहस्थ आहेत. एक कुशल इंजिनीयर म्हणून त्यांची ख्याती आहे. महिन्याच्या काठी हजारो रुपयांची प्राप्ती त्यांना होत असते. दोन्ही हातांनी पैसा गोळा करताना नीती आणि अनीती यांचा क्षणभरही त्यांनी विचार केला नाही. आज हा माणूस आपल्या वैभवशाली बंगल्यात मजेत राहतो आहे. बंगल्याच्या आवारात यांच्या दोनचार अत्याधुनिक मोटारगाड्या डौलाने उभ्या राहिलेल्या असतात. बंगल्याच्या भोवती मोकळ्या जागेत अनेक फुलझाडं लावलेली आहेत. त्यांची निगा राखण्यासाठी माळी आहे. नोकरचाकर आहेत. सारी सुखसाधनं आहेत. एकदा त्यांनी मला चहासाठी आमंत्रित केलं होतं. खरं तर त्यांच्या हिशेबी मी फारसा प्रतिष्ठित मनुष्य नाही. मी एका चाळीत भाड्यानं राहणारा सर्वसाधारण अध्यापक आहे. पण आश्चर्य असं की इंजिनीयरसाहेब त्या दिवशी जातीनं माझ्याकडे आले आणि त्यांनी अगत्यानं आमंत्रण दिलं. त्यात त्यांचा काहीतरी स्वार्थ असणार याची मला खात्री होती. गप्पागोष्टी करीत अल्पोपाहार झाला आणि मी त्यांना सहज प्रश्न विचारला, 'आपले वडील नानासाहेब दिसले नाहीत. त्यांची प्रकृती बरी आहे ना ? मला प्राथमिक शाळेत ते शिकवायला होते. जितके शिस्तीचे भोक्ते तितकेच ते प्रेमळ होते. एकदा भूगोलाचं पुस्तक आणायला त्यांनी मला पैसे दिले होते. पुस्तक विकत घेण्याची त्या वेळी मला तरी शक्यता नव्हती. केव्हाही नानासाहेबांचं दर्शन झालं की पायावर डोकं ठेवावसं वाटतं.'

इंजिनीयर साहेबांच्या कपाळावर नापसंतीची लहानशी आठी उमटली. त्यांनी ओठातल्या सिगारेटचा दीर्घ झुरका घेतला आणि काहीशा नाराजीनं म्हटलं,

'नाना सध्या इथं राहात नाहीत. त्यांना पूर्ण विश्रांती मिळावी म्हणून मीच त्यांची सोय वृद्धाश्रमात केली आहे.' मी क्षणभर शहारलो. अस्वस्थ झालो. माझी चलबिचल त्या चतुर माणसाच्या लक्षात आली. आता काहीतरी खुलासा करणं भाग आहे हे जाणवून तो 'प्रतिष्ठित इंजिनीयर' बोलू लागला,

'तुम्हाला कदाचित चमत्कारिक वाटेल पण म्हातारी माणसं आपल्याला सुखानं जगू देत नाहीत. त्यांनीही सुखात राहावं म्हणून मी पुण्याच्या वृद्धाश्रमाच्या व्यवस्थापकांना दर महिन्याला तीनशे रुपये पाठवून देतो. दर दोनचार महिन्यांनी आमचा माळी त्यांची भेट घेऊन येतो. नानांना वाचण्यासाठी ज्ञानेश्वरी,

तुकारामाची गाथा मी पाठवून दिली आहे. सगळी व्यवस्था आश्रमातच आहे. त्यांचं बरं चाललं आहे.'

आपण आपल्या वडिलांची किती काळजी घेत आहोत हे इंजिनीयर साहेब समजावून सांगत होते. वस्तुत: मला बोलण्याचा अधिकार नव्हता. पण नानासाहेबांनी या मुलाला इंजिनीयरिंगचं शिक्षण देताना कधी अर्धपोटी राहून, कधी उपाशीपोटी राहून कसे पैसे पाठवले होते, आपल्या एकुलत्या एका कोटाला ठिगळं लावून कसे दिवस काढले होते, अनेक दानी गृहस्थांकडे जाऊन कशी याचना केली होती आणि आपल्या मुलाला पदवीधर करण्यासाठी कसं आकाशपाताळ एक केलं होतं, याची हकीकत मला माहीत होती. या इंजिनीयरच्या बंगल्यात कुत्र्यांनाही उंची बिस्किटं मिळत होती. मांजरांना दूध मिळत होतं. माळ्याच्या आणि नोकरांच्या राहण्यासाठी 'आऊटहाऊस' होतं. पण म्हाताऱ्या बापाला मात्र त्यानं मोठ्या 'प्रेमानं' एका वृद्धाश्रमात 'तुकडे मोडण्यासाठी' पाठवून दिलं होतं आणि त्यासाठी महिन्याला तीनशे रुपये तो तत्परतेनं खर्च करीत होता. केवढे हे औदार्य ! एका मुलानं आपल्या बापासाठी यापेक्षा अधिक काय करायला पाहिजे ? बोलून चालून म्हातारा अपंग झालेला बाप ! वय झाल्यामुळं निरुपयोगी, परावलंबी झालेला एक म्हातारा माणूस आपल्या घरात सांभाळीत बसणं हा खरोखरच मूर्खपणा नव्हता काय ? प्रत्येक गोष्ट उपयुक्ततेच्या आणि व्यवहारिक फायद्याच्या कसोटीवर घासून पाहण्याची वृत्ती असलेला हा व्यवहारपंडित बापाला पोसण्यात आपल्या आयुष्यातला अमोल वेळ व्यर्थ घालवणार नव्हता. इंजिनीयरसाहेब म्हणाले,

'माझं करणं कदाचित तुम्हाला आवडलेलं नसेल. पण खरं सांगू ? मला माझं आयुष्य आहे. आय हॅव माय ओन ॲम्बिशन्स. म्हातारी माणसं आपल्या प्रगतीच्या आणि सुखाच्या मार्गात धोंड होऊन बसतात. लक्षात घ्या. गाय भाकड झाली तर ती घरात ठेवण्यात फारसा अर्थ असत नाही. मी फार कठोर बोलतो असं तुम्हाला वाटेल. पण उगीच अशा गोष्टींचा भावनावश होऊन विचार करू नये. सेंटिमेंट्यालिझम् मला आवडत नाही. आईबाबांनी माझ्यासाठी त्याग केला हे खरं आहे. ते मी शंभर वेळा कबूल करतो. त्याबद्दल कृतज्ञताही आहे. पण म्हणून त्यांचं ओझं आम्ही जन्मभर पाठीवर घेण्यात काय अर्थ आहे ? आमच्या मिसेसलाही सासुरवास नको होता. म्हणून हा मार्ग मला काढावा लागला.

वृद्धाश्रमात नानांच्याच वयाचे बरेच लोक आहेत. त्यांच्या सहवासात त्यांचा वेळ निश्चित चांगला जात असेल.'

ही थंड व्यवहारवादी विचारसरणी ऐकून मला मळमळायला लागलं. दर महिन्याला ठरावीक मनीऑर्डर पाठवली की आपण आपल्या पुत्रधर्माचं पालन केलं असं समजणाऱ्या या 'महान' पुत्राला रामायणातली उदाहरणं देण्यात काहीच अर्थ नाही. म्हाताऱ्या आईबापांना जगण्यासाठी किंवा जगवण्यासाठी दोनवेळचं खाणं घातलं की आपलं कर्तव्य संपलं अशी समजूत बऱ्याच सुपुत्रांची झालेली आढळते. त्यांच्या कौटुंबिक सुखाची कसलीही चिंता मग हे सुपुत्र करीत नाहीत. माझ्या लिहिण्यात यत्किंचितही अतिशयोक्ती नाही. आपले आईवडील जिवंत आहेत की नाही याचीसुद्धा चौकशी न करणारे विद्वान पुत्र मी पाहिले आहेत. आपल्या आईला घरातल्या अडगळीच्या खोलीत दयाळूपणानं जागा देऊन तिला कसबसं एकवेळचं अन्न देणारा एक सरकारी अधिकारी माझ्या माहितीचा आहे. दररोजच्या दारूसाठी शंभर - दीडशे रुपये खर्च करताना त्याला काहीच वाटत नाही. पण ज्या आईनं वाढवलं, या आईविषयीचं त्याचं हे प्रेम पाहिलं, म्हणजे जीवनातल्या चांगल्या गोष्टीवरचा विश्वासच उडून जातो. मी सांगितलेली ही उदाहरणं काहीशी एका टोकाची आहेत असा आक्षेप येईल, पण या पद्धतीची समाजात शेकडो उदाहरणं मी दाखवून देईन. अलीकडं वृद्धाश्रम नावाची संस्था आपल्या जीवनात रुजत चालली आहे. तिची आवश्यकता वाढत चालली आहे. आईबापांनी फार म्हातारे होईपर्यंत जगत राहण्याचा हव्यास धरू नये आणि प्रत्येक म्हाताऱ्यानं आपल्या मुलामुलींकडून प्रेमाची जास्त अपेक्षा करू नये. मुलामुलींना त्यांचे स्वत:चे संसार असतात. त्यांची स्वत:ची सुखदु:खे असतात. ही मुलं जसजशी मोठी होतात तसतसं त्यांचं जग वेगळं होत जातं. त्यांच्या जगात आईबापांनी फारशी लुडबुड करू नये. ही पथ्यं मात्र पाळलीच पाहिजेत. पण एवढं तारतम्य आपल्या मुलाबाळांवर वात्सल्याचा वर्षाव करणाऱ्या म्हाताऱ्या आईबापांना राहात नाही.

भारतीय जीवनपद्धती आदर्श आहे की नाही याचा विचार मला करायचा नाही. पण या जीवनविचारात निश्चितच सुसंगती आहे. एका विशिष्ट कालमर्यादेनंतर मनुष्यानं प्रापंचिक व्यवहारातून आपलं लक्ष काढून घ्यावं आणि आत्मचिंतनाकडं त्यानं वळावं ही भूमिका खरोखरच तर्कशुद्ध आहे. आपल्या

मुलामुलींवर सांसारिक जबाबदारी टाकावी आणि त्यांना त्यांच्या मार्गाने जाऊ द्यावे. त्यांच्या कार्यात आपण फारसा रस घेऊ नये हे बरोबर आहे. नाहीतर नानाप्रकारचे मतभेद आणि भांडणं उत्पन्न होतात. मनुष्य काही झाले तरी स्वत:वर अधिक प्रेम करतो. तो आईबाप असोत की आणखी कोणी असाच जवळचा आप्तनातलग असो याचा विचार करीत नाही. उत्तरोत्तर आपुलकीचे आणि जिव्हाळ्याचे संबंध आटत आणि तुटत चालले आहेत. आजच्या परिस्थितीत रामायणाचा आणि महाभारताचा एक बऱ्यापैकी 'सिनेमा' म्हणून उपयोग होणार. यापेक्षा अधिक किंमत या ग्रंथांना दिली जात नाही.

पाश्चात्य जीवनपद्धती आमच्या भारतातसुद्धा आता दृढ होत आहे. अपत्यावर प्रेम करणं आणि त्यांच्यासाठी प्रसंगविशेषी जीवही देणं हा 'पाशवी' गुणधर्म आहे. एकेकाळी तो माणसात होता. पण माणूस पुढे 'सुधारत' गेला आणि मग या प्रेमाला व्यावहारिक व वैचारिक मर्यादा घालण्यात आल्या. कुठल्याच प्रेमात स्वत:ला फारसं गुंतवून न घेणं हा शहाणपणा माणूस शिकला. 'आई, तू मला जन्म दिलास आणि पंधरा वीस वर्षं माझं पालनपोषण केलंस त्याबद्दल या पत्रानं मी मन:पूर्वक आभार मानीत आहे. कृपया पत्राची पोच द्यावी' अशा औपचारिक शिष्टाचारी भाषेतून सध्या प्रेमाची देवाणघेवाण करणं हे आधुनिक संस्कृतीचं गमक होऊन बसलं आहे.

पाश्चात्य देशात तर मुलं मोठी झाली की ती सरळ वेगळी राहू लागतात. केव्हातरी 'हॅलो डॅडी ! आणि हॅलो मम्मी !' अशी फोनवरून विचारपूस करतात. आमच्या देशात हे चित्र दिसणं अशक्य नाही. मला ज्यांनी शिकवलं असे एक प्राध्यापक आपल्या तीन चार मुलांकडं तीन तीन महिने ठरलेल्या टाईमटेबलाप्रमाणे राहतात. तो तीन महिन्यांचा 'पिरीयड' संपला की त्यांचा 'प्रेमळ' मुलगा त्यांची ट्रंक आणि बेडिंग व्हरांड्यात आणून ठेवतो. आणि रिक्षात बसवून दुसऱ्या मुलाकडे राहण्यासाठी त्यांना 'तत्परतेने' पाठवून देतो. एका अर्थानं त्यांची ही 'माधुकरी' अजून संपलेली नाही. पंचाहत्तर वर्षांचा हा विद्वान म्हातारा चार मुलांनी चालवलेली फरफट निमूटपणानं सहन करतो. कधीतरी एखादा मुलगा पितृप्रेमाचा उमाळा येऊन त्यांना एखादा शर्ट शिवतो आणि विडीकाडीसाठी दोन रुपये हातावर टिकवतो. तेव्हा त्या प्राध्यापकाच्या मनात काय जळत आणि उचंबळत असेल याची कल्पना करावी.

हे सारं घडत आहे याला जबाबदार कोण ? या प्रश्नाचं उत्तर मात्र मी देऊ शकत नाही. उपयुक्तता संपली की माणसाचं घरात सुद्धा पोतेरं होऊन जातं. म्हणून मनुष्यानं नेहमीच सावध राहावं. जोपर्यंत स्वाभिमानानं जगण्यासारखं, आपल्या पायावर उभं राहून जगण्यासारखं काही आहे तोपर्यंतच त्यानं जगावं यात शहाणपणा आहे. कसं जगावं आणि किती जगावं याचा मंत्र ज्याला सापडला तोच सुखी झाला. यापेक्षा अधिक काय सांगायचं ? ' मातृदेवो पितृदेवो भव ' हा काळ तेव्हाच संपला. आता ' हॅलो डॅडी आणि हॅलो मम्मी ' चा आधुनिक जमाना आला आहे हे लक्षात घ्यावं. रामायणातला जुनापुराणा राम आता दिसणार नाही. नव्या युगातल्या ' रामाचा अवतार ' पाहायला मिळेल.

●

□ □ ८

# *सावळाच रंग तुझा !*

**आपल्या प्रेयसीचं रूपवर्णन करताना एक प्रेमवेडा प्रियकर म्हणाला,** ' तिच्या लावण्याचं गुणगान करण्यासाठी आपल्या भाषेच्या शब्दकोशात पुरेसे शब्दच नाहीत. शब्दांतून तिचं सौंदर्य मी सांगू शकणार नाही आणि तुम्हालाही ते समजणार नाही. तिचं मुख पौर्णिमेच्या चंद्रासारखं आहे असं मी म्हटलं असतं ! पण खरं सांगू ? तो चंद्र आता शिळा झाला. त्याच्यावर कलंक आहे आणि आता वैज्ञानिक प्रगतीमुळं चंद्रावर किती खड्डे आहेत, दगडधोंडे आहेत याची माहिती झाली आहे. त्यामुळं चंद्राची उपमा मी मुळीच देणार नाही. कमळ, गुलाबाचं फूल वगैरे उपमा फार जुन्या झाल्या. मी इतकंच म्हणेन की कोणतीही उपमा तिच्या बाबतीत अपुरीच पडेल.'

प्रत्येक प्रेमिकाला आपली प्रेयसी सुंदर दिसते यात आश्चर्य नाही. प्रेम हे एक प्रकारचं वेड असतं आणि वेडदेखील मनात मुरल्याशिवाय नीट प्रेम करता येत नाही. आता हा पागल प्रेमिक माझ्यासमोर आपल्या प्रेयसीच्या देहसौंदर्याचं अतिशयोक्तिपूर्ण भाषेतून भक्तिभावानं वर्णन करीत होता. तो म्हणाला, ' विधात्यानं आम्हाला एकमेकांसाठी जन्माला घातलं आहे. आम्ही एकत्र आल्याशिवाय या विश्वाला काहीच अर्थ उरणार नाही. दोघांचं मिळून एक विश्व आहे ' हा ' विश्वरूप अध्याय ' लवकर संपेल असं चिन्ह मला दिसेना. अखेर मी त्याला विचारलं,

' तिच्या सौंदर्याचे अनेक विशेष असतील पण तुला आवडलेला महत्त्वाचा सौंदर्यविशेष कोणता ? हे थोडक्यात सांग. मला पाल्हाळिक वर्णन नको. तुम्ही प्रेमात पडलेली मंडळी आपल्या प्रेमविषयावर दीर्घ व्याख्यानं देता. ही व्याख्यानं ऐकण्याची सहनशक्ती आमच्यात नाही. मला फक्त तुझ्या प्रेयसीचा एकच रूपविशेष सांग.

' एकच एक विशेष सांगणं कठीण आहे पण तुमच्या समाधानासाठी सांगतो. तिचा वर्ण चाफ्याचा फुलासारखा पिवळसर गोरा आहे. पौर्णिमेच्या चांदण्यात थोडा केशरी रंग मिसळला म्हणजे जो रंग निर्माण होईल तसा मोहक गोरेपणा हा तिच्या सौंदर्याचा एक प्रमुख घटक आहे.' मी त्याला सहज प्रश्न विचारला, ' समज तिचा रंग गोरा नसून काहीसा काळसर असता तर तुझी प्रतिक्रिया काय झाली असती ? श्यामल वर्ण तुला आकर्षक वाटला नसता काय ? विचार करून सांग.' हा तरुण माझ्या प्रश्नानं थोडासा गोंधळला. काहीसा अंतर्मुख झाला. गोरेपण आणि काळेपण यात सौंदर्याला पोषक गुणधर्म कशात अधिक आहेत याचा तो विचार करू लागला आणि त्यानं आपला स्पष्ट निर्णय सांगितला.

' माझ्या मते गौरवर्ण हाच अधिक लक्षवेधक आहे. गोऱ्या रंगाची माणसं मला आवडतात. काळीसावळी माणसं तितकीशी आकर्षक वाटत नाहीत. का कुणास ठाऊक पण काळेपणा आणि सौंदर्य यांचं काही नातं आहे असं मला वाटत नाही.'

त्या तरुणानं व्यक्त केलेले विचार कदाचित अनेकांना बरोबर वाटतील. पण मला मात्र हा विचार फारसा सयुक्तिक वाटत नाही. गोऱ्या रंगाचं कौडकौतुक आमच्या देशात नको तितकं झालं आहे. कवींनी तर स्त्रीपुरुषांच्या सुंदरतेचं वर्णन करताना गोरेपणाचा आवर्जून उल्लेख केलेला असतो. काय तर म्हणे ' तिची अंगकांती कांचनासारखी पीतगौर होती.' ' तिच्या चंपकगौर वर्णामुळे तिने परिधान केलेली पैठणी अधिकच खुलून दिसत होती. ' शुभ्र कमळाप्रमाणे तिचा गोरा रंग नेत्रांना आनंद देत होता.' आमच्या पंडित आणि शाहीर कवींनी स्त्रीलावण्याचं चित्र रेखाटताना गोरेपणाचं स्तोम पुष्कळच माजवून ठेवलं आहे आणि काळ्या रंगावर जणू काही त्यांनी बहिष्कार टाकला आहे. काळ्यासावळ्या रंगावर होणारा हा अन्याय निदान मला तरी सहन होणार नाही. नाहीतरी वर्णभेदाच्या प्रश्नावरून जगात अनेक अन्याय शतकानुशतके चालू आहेत. सुदृढ बांध्याचा काळा मनुष्य हा देखील सौंदर्याचा एक लक्षणीय नमुना असतो. गोऱ्या रंगासंबंधी काही सांकेतिक कल्पना रूढ झाल्या आहेत. अशी कित्येक गोरी माणसं दाखवता येतील की ती फारशी आकर्षक वाटत नाहीत. युरोप, अमेरिकेत माणसांच्या कातडीचा रंग बहुधा पिवळसर गोरा असतो. काही लालसर गोरे असतात. काहींच्या गौरवर्णात पांढुरक्या छटा असतात. पण ही सारी माणसं

त्यांच्या गौरवर्णामुळे सुंदर दिसतात असं म्हणण्याचं धाडस केवळा वेडा मनुष्यच करू शकेल. कातडीचा रंग हा सौंदर्याचं एक लक्षण असलं तरी काळेपणा आणि कुरुपपणा याचं समीकरण मांडणं निखालस चुकीचं ठरेल. ' मुलगी काळीसावळी आहे ' हे विधान मुलगी फारशी आकर्षक नाही अशा अर्थानं लोक करतात तेव्हा मला हसू येतं. गोरेपणा जेवढा सौंदर्याचा पूरक गुण असेल तितकाच काळेपणाही आहे. महाभारतात माद्रीच्या सौंदर्याचा उल्लेख आहे. नाकीडोळी ठसठशीत असलेली, कमनीय बांध्याची ही माद्री गोरी नसून श्यामल वर्णाचीच होती. ती सावळी असल्यामुळेच अधिक देखणी होती असेही वर्णन तिच्या बाबतीत काही कवींनी केले आहे. वस्तुत: आपण भारतीयांनी गोरेपणाचे एवढे अवडंबर माजवण्याचे कारण नाही. आपण भारतीय सारेच सावळ्या रंगाचे. खरे तर आपण काळे लोक आहोत. या रंगातही विविधता आहे. गहू रंगाचे सावळेपण असा उल्लेख साहित्यात पुष्कळ ठिकाणी आढळतो. कवी चंद्रशेखरांनी एका रानसुंदरीचा उल्लेख करताना ' गोधूम वर्ण तीचा, हरणाच्या पाडसापरी डोळे ' अशा शब्दात तिचे सौंदर्यदर्शन घडवले आहे. आपली सारी दैवते श्यामल वर्णाचीच आहेत. शिवशंकर, श्रीराम, श्रीकृष्ण यांची शरीरकांती श्यामल आहे. कृष्णाला तर कृष्ण हे अभिधान त्याच्या कृष्ण वर्णामुळेच मिळाले. गोकुळातल्या गोपीही ' कृष्णा ' च होत्या. पण त्यामुळे त्यांच्या सौंदर्यात, मोहकतेत कोणताही उणेपणा नव्हता. कृष्ण रंगाचीसुद्धा एक आगळी मोहिनी असते. काळे डोळे, काळेभोर केस यांचे आकर्षण त्या रंगामुळे निश्चितच वाढले आहे. पौर्णिमेची दुग्धधवल रात्र जशी मला आवडते. तशीच गर्द काळी रात्रही मोह घालते. दिवसाच्या फटफटीत प्रकाशापेक्षा रात्रीचा गूढगहन अंधार अनेक विचारतरंगांना जन्म देतो. मी ताजमहाल दिवसाही पाहिला आहे. त्या वेळी तो सोनेरी किरणात सुंदर दिसत होता यात शंका नाही. पण संध्याकाळच्या काळसर सावल्या आसमंतात पसरायला लागल्यावर ते संगमरवरी शिल्प अंधाराच्या पार्श्वभूमीवर मला अधिक मनोज्ञ वाटलं.

उजळलेल्या आकाशाइतकंच अंधारात बुडालेलं आकाश आपलं कुतूहल जागं करू शकतं. पणजीच्या मीरामार बीचवर एखाद्या अंधाऱ्या रात्री बसून समुद्राच्या उचंबळत्या लाटा पाहण्यात आगळा आनंद आहे. आजूबाजूच्या वातावरणात काळोख मिसळलेला असतो. दूरवरची झाडं त्या काळ्या रंगानं

माखलेली असतात आणि भोवताली वाढत चाललेल्या अंधाराच्या समुद्राला गिळण्यासाठी सागरलाटा मस्तवाल वेगानं किनाऱ्याकडं धावत असतात. हा सारा परिणाम आसमंतात पसरलेल्या काळ्या रंगामुळं होतो असं मला वाटतं. खरं तर प्रत्येक रंगाला त्याचं स्वत:चं काव्यात्म वैशिष्ट्य आहे. काळ्या रंगालाही एक विलक्षण आकर्षण आहे. पांढऱ्या संगमरवरी मूर्तीपेक्षा काळ्या पाषणाची मूर्ती अधिक उठावदार दिसते हे कुणीही मान्य करील. एखाद्या सुंदरीनं परिधान केलेलं कृष्णवसन रसिकांच्या अंत:करणात किती कालवाकालव उत्पन्न करू शकेल हे रसिकालाच विचारून पाहावे. कवी भा. रा. तांबे हे सौंदर्यवादी होते. स्त्रीच्या सौंदर्याची विविध चित्रणे त्यांनी आपल्या काव्यातून केली आहेत. 'जन म्हणति सावळी' या नावाची त्यांची एक कविता आहे. ते म्हणतात, 'या श्यामल वर्णातलं मोहन ज्यांना समजत नाही ते माझ्या दृष्टीनं करुणार्ह आहेत. तू सावळी आहेस आणि म्हणूनच मला अधिक प्रिय आहेस. नवमीची सावळी रात्र ज्याला मोहवीत नाही त्याला काय म्हणायचं ?

*अगाध सुंदर यमुना काळी*
*तटी गर्द झाडांच्या ओळी*
*वेडा झाला तो वनमाळी*
*उजळिते मनोमल शाम जळे*

तुझी श्यामलता निळ्या कमळासारखी आहे. मला या सावळ्या रंगाची एक विलक्षण ओढ आहे.'

तांब्यांची ही केवळ कविकल्पना नाही. श्यामलतेतलं सौंदर्य पाहण्यासाठी सांकेतिक कल्पनांच्या चौकटीतून बाहेर पडलं पाहिजे. आपल्या सौंदर्यविषयक जाणिवा केवळ पारंपरिक असतात. चार लोकांनी एखाद्या वस्तूवर सुंदरतेचा शिक्का मारला की मग बहुसंख्य लोक डोळे झाकून त्याला सुंदर समजू लागतात. सौंदर्य ही बहुमतानं ठरवण्याची गोष्ट नाही. आपल्या अंत:करण प्रवृत्तीला आणि स्वतंत्र दृष्टीला जे मान्य होते त्याचाच स्वीकार केला पाहिजे. ज्यूलियन हक्स्ले नावाच्या एका पाश्चात्य सौंदर्य समीक्षकाने 'ताजमहाल' ही सुंदर कलाकृती नाही असे प्रतिपादन केले आहे. आपला मुद्दा सिद्ध करताना त्यानं अनेक प्रकारचे युक्तिवाद केले आहेत. त्याला स्वत:ला ताजमहालाचा पांढरा पाषाण आवडलेला नाही. त्या ऐवजी ही वास्तू कृष्णपाषाणात उभी राहिली असती तर अधिक

लक्षणीय ठरली असती असं त्याचं मत आहे. हक्स्लेच्या मताशी कदाचित अन्य समीक्षक सहमत होणारही नाहीत पण आपला निष्कर्ष त्यानं विस्तारानं सप्रमाण नोंदला आहे.

सर्वसाधारण माणसे ताजमहाल ही एक अद्भुत सौंदर्यानं नटलेली दिव्य कलाकृती आहे असं म्हणतात. पण त्यांच्या या मान्यतेला चिकित्सेची सौंदर्यदृष्टीची शास्त्रशुद्ध बैठक नसते. रूढ झालेल्या संकेतांना चिकटून राहण्याची ही वृत्ती आहे. कृष्ण रंगातलं आगळं सौंदर्य पाहण्याची रसिकता या संकेतप्रिय लोकांत कशी असणार ?

मी एकदा मुंबईला फ्री - स्टाईल कुस्त्या पाहिल्या. देशोदेशीचे मल्ल या स्पर्धेत उतरले होते. त्यांच्यात एक काळा कुळकुळीत मल्ल होता. त्याचं धिप्पाड शरीर इतकं प्रमाणबद्ध आणि पुष्ट होतं व त्याच्या साऱ्या व्यक्तिमत्त्वाला त्याचा तो गडद काळा रंग इतका उठून दिसत होता की हजारो प्रेक्षकांची दृष्टी त्याच्यावर केंद्रित झाली. त्याच्या समोर उभा असलेला गोऱ्या रंगाचा मल्ल तितकासा आकर्षक वाटला नव्हता. कृष्णवर्णातली दर्शनीयता जणू काही त्या निग्रो मल्लाच्या रूपानं त्या मैदानात साकार झाली होती. सर्वांच्या आकर्षणाचा तो विषय बनला होता. सुंदरतेविषयीच्या साचेबंद कल्पना खरं तर आपण सोडून दिल्या पाहिजेत. ग. दि. माडगुळकरांच्या ' सावळाच रंग तुझा ' या सुंदर भावगीताची या वेळी मला आठवण होते. माणिक दादरकर या गायिकेनं मधुर आवाजात हे गीत गायिलं आहे. सावळ्या रंगाचं आकर्षण त्या गीतातील नायिकेच्या मनात कसं उत्कटपणानं आहे याचं चित्र त्यातून प्रकट होतं. ' तुझा सावळा वर्ण चंदनाच्या वनासारखा आहे. आषाढीच्या घनासारखा आहे. हा रंग मला मोहिनी घालतो. या रंगात आपल्या हृदयाचा रंग मिसळावा असं वाटतं ' अशा आशयाचं ते गीत आहे.

श्यामल वर्णाचं समर्थन करण्यासाठी मी लिहीत नाही पण आपल्या आजूबाजूची ही विविध रंगांची दुनिया आपण रसिकतेने पाहिलेली नसते. अनेक प्रकारच्या रंगांच्या संमीलनातून या जगाला एक आगळाच कधीच न विटणारा बहारदार रंग आला आहे. त्यात काळ्यासावळ्या छटाही पुष्कळ आहेत. कोणताही एखादा रंग आयुष्यातून वगळला तर जीवन परिपूर्ण होणार नाही. गोऱ्या गालावर सुद्धा काळा तीळ केवढी बहार आणतो आणि तो पाहिल्यावर

सौंदर्यरसिकाचं अंतःकरण तिळ तिळ तुटत राहतं. यात तिळमात्र शंका नाही. गोरेपणाला उठाव देण्यासाठी कृष्णरेषांची आवश्यकता असते. काळ्या रंगातले एक आगळे सौंदर्य टिपण्याचा कलात्मक प्रयत्न संतकवी एकनाथांनीही केला आहे. ' रात्र काळी, घागर काळी, यमुनेचं जलही काळं, राधेचं वस्त्रही काळं, तिच्या हातातली कंकणंही काळी आणि तिच्या मनात भरलेला कृष्णही काळा ' अशी काळ्या रंगाची दिवाळी एकनाथांच्या एका भावमधुर कवितेत आहे. हा रंग मी तरी कधीच नाकारणार नाही. अखेर इतकंच म्हणता येईल की, बाह्य रंगांना आपण आवश्यकतेपेक्षा अधिक महत्त्व देतो, अंतरंग मात्र काळं असू नये. गोऱ्या रंगाच्या लोकांनी भारतावर दीडशे वर्षे सत्ता गाजवली. ती टिकविण्यासाठी त्यांनी अनेक काळी कृत्ये केली. हा काळाकुट्ट इतिहास सर्वांनाच माहीत आहे.

सारे रंग सुंदर असतात आणि सुंदर दिसतात. पाहण्याचा दृष्टिकोण रंगतदार ( रोमॅन्टिक ) असावा लागतो. पण वैयक्तिक आवड म्हणून प्रत्येकाला एखादा रंग अधिक मोहक वाटला तरी अन्य रंगांना त्यानं नकार देऊ नये. काळ्या सावळ्या रंगातही रंगाची जादू असते. यापेक्षा हे रंगपुराण मी अधिक लांबवीत गेलो तर साराच बेरंग होईल म्हणून पांढऱ्यावर काळं करण्याचा हा छंद इथचं थांबवतो. पण या क्षणी ' सावळाच रंग तुझा ' या गीताचे शब्द आणि सूर माझ्या मनात श्यामल रंगाची उधळण करीत आहेत.

●

□ □ १

# बुद्धी आणि श्रद्धा

आजच वृत्तपत्रात एक चमत्कारिक वार्ता वाचली. मुंबईसारख्या आधुनिक महानगरात एका मांत्रिकाने अंगातले भूत काढतो म्हणून एका तरुणीला हातातल्या काठीने यथेच्छ बडवून काढले. ती बिचारी स्त्री वेदनेने किंचाळत होती. पळून जाण्याचा प्रयत्न करीत होती. पण आजूबाजूच्या लोकांनी - यात तिचे आप्त, नातलगही होते - त्यांनी तिला धरून ठेवले. मांत्रिक कुठले तरी मंत्र पुटपुटत तिच्या अंगावर सपासप प्रहार करीत होता. आणि ती तरुणी ओरडली की, 'भुताला मार बसतो आहे आणि भूत किंचाळत आहे, आपल्यासारख्या महान मांत्रिकासमोर त्याचे काही चालणार नाही' असे तो सांगत होता. अखेर बेशुद्ध होऊन पडलेल्या त्या मरणोन्मुख तरुणीला एका रुग्णालयात उपचारासाठी पोलिसांनी पोहोचवले आणि मांत्रिकाला आपल्या ताब्यात घेतले अशी ती वार्ता होती. भुतावर मंत्रप्रयोग करणाऱ्या मांत्रिकाची मात्रा पोलिसांवर चालली की नाही कुणास ठाऊक ? पण पोलिसीमंत्राला मात्र तो मांत्रिक निश्चित घाबरला असेल.

हे वृत्त वाचल्यानंतर मी क्षणभर अवाक झालो. आजच्या बुद्धिवादी जगात ही घटना मुंबईसारख्या पुढारलेल्या शहरात भर वस्तीत घडली होती. ज्या तरुणीवर हा मंत्रप्रयोग झाला तिचे आप्त नातलग सुशिक्षित आहेत. आम्ही एकविसाव्या शतकाकडे वेगाने वाटचाल करीत आहोत आणि उद्याचे जग अधिक सुसंस्कृत, शास्त्रसंपन्न व प्रगत असणार हे कंठरवाने आम्हाला सांगितले जाते. गेल्या पन्नास वर्षांत सर्व भौतिक शास्त्रांची विलक्षण प्रगती झाली यात संशय नाही. शास्त्रीय ज्ञानाची वाढ होताना जुनाट झालेले संकेत आणि अंधश्रद्धा वितळून जातात याचाही अनुभव आम्हाला आला आहे. पण आमच्या देशातला बहुसंख्य समाज खरोखरच शास्त्रनिष्ठ, बुद्धिवादी, विचारशील बनला आहे काय ? लोकहितवादी आगरकर, फुले आणि आंबेडकर, सावरकर यांच्यासारखे प्रखर बुद्धिवादी विचारवंत एक नवा विवेकनिष्ठ समाज निर्माण करण्यासाठी जन्मभर झुंजत राहिले.

तो समाज अद्यापी तरी निर्माण झाल्याचे दृश्य दिसत नाही. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी त्यांच्या पत्नीच्या अंत्यसंस्काराच्या वेळी काढलेले उद्‌गार मी जेव्हा त्यांच्या चरित्रात वाचले तेव्हा त्यांच्या अतूट बुद्धिनिष्ठेचा विलक्षण प्रत्यय आला. कुणीतरी स्मशानात पिण्डदानाची कल्पना काढली आणि हा विधी आपण केला पाहिजे असे त्यांना सुचवले. तशाही स्थितीत सावरकर हसले आणि म्हणाले,

'अरे, तिनं चाळीस वर्षे माझ्याबरोबर संसार केला आहे. तिची एखादी इच्छा अपुरी राहिली असती तर तिचा आत्मा मला सरळपणे सांगेल. त्यासाठी कावळ्यांची मध्यस्थी ती कशाला स्वीकारील ?' सावरकरांचे हे उद्‌गार त्यांच्या वैज्ञानिक विचारपद्धतीचे द्योतक आहेत. सावरकरांची ही ज्वलंत बुद्धिवादी भूमिका हिंदू समाजाने घेतली असती तर आजचे चित्र वेगळे दिसले असते. राजा राममोहन रॉयपासून आजपर्यंत शास्त्रीय विचार मांडून समाज सुधारण्याचा प्रयत्न करणाऱ्या क्रांतिकारकांचा शोचनीय पराभव झाला आहे असे मला खेदाने म्हणावेसे वाटते. आजही सुशिक्षित लोक जेव्हा शकुन अपशकुनावर विश्वास ठेवतात आणि वृत्तपत्रांतून प्रसिद्ध झालेल्या सवंग राशीभविष्याकडे गांभीर्याने पाहतात तेव्हा एक विचार मनात येतो की अज्ञान आणि अंधश्रद्धा यांच्याशी लढणे खरोखरच अवघड आहे. प्रयोगशाळेत नवनवीन शास्त्रीय प्रयोग करून संशोधन करणारे अभ्यासक कधीकधी एखाद्या बुवाने दिलेला ताईत ग्रहशांतीसाठी व साडेसातीच्या निवारणासाठी आपल्या दंडावर भक्तिभावाने बांधतात तेव्हा हसू आल्याशिवाय राहात नाही. अशा लोकांचा मी उपहास करावा या बुद्धीने हे लिहीत नाही. पण ही माणसे विचारांच्या दृष्टीने दुबळी बनलेली असतात. त्यांची श्रद्धा त्यांच्या भीतीतून आणि पराभूत मनोवृत्तीतून उत्पन्न झालेली असते. भित्रा मनुष्य कोणत्याही अशास्त्रीय मार्गाचा अवलंब करतो. एकदा एका तथाकथित विचारवंताला कुणीतरी असा सल्ला दिला की,

'तुझी अपत्ये जगत नाहीत याचे कारण तुझं पूर्वजन्मीचं पातक आड येत आहे. त्यासाठी देवतेला प्रसन्न करून घेतलं पाहिजे आणि अमुक पद्धतीचा होम केल्याशिवाय ती देवता संतुष्ट होणं शक्य नाही.' तो विचारवंत दुःखानं आणि भीतीनं धास्तावलेला होता. होम - हवन, यात्राजत्रा असल्या भाबड्या कल्पनांचा त्यानं यापूर्वी शेकडो वेळा उपहास केला होता. पण आता मात्र त्याची क्षीण झालेली विचारशक्ती भ्रांतिष्ट भावनेच्या विळख्यात पुरती सापडली होती. त्याने

तो विशिष्ट प्रकारचा होम आणि हवन वगैरे विधी केले, गंडेदोरे झाले, तीर्थयात्राही पार पडल्या. मांत्रिक आणि तांत्रिकही झाले. कोणताही साधुसंन्यासी आला की त्याच्या पायावर तो मस्तक वाकवू लागला आणि आपली कर्मकहाणी ऐकवू लागला. पण परिणाम मात्र शून्य. त्याच्या एका डॉक्टर मित्राने त्याला स्पष्टपणे सांगितले होते की, 'तुला काही आंतरिक व्याधीमुळे अपत्य होण्याची शक्यता नाही. 'संसारसुख' तू घेऊ शकलास तरी संतानप्राप्ती तुला होऊ शकत नाही.' वैद्यकीय शास्त्राने हात टेकल्यानंतर मग त्याने काही अशास्त्रीय उपायांकडे वळावे हे एका अर्थाने क्रमप्राप्त होते. काहीतरी चमत्कार घडेल, एखाद्या दैवताची कृपादृष्टी आपल्याकडे वळेल किंवा कुणातरी संत महंताचा आशीर्वाद लाभेल या भ्रांत आशेनं तो प्रयत्न करीत राहिला. त्याच्याबद्दल अवश्य ती सहानुभूती बाळगूनसुद्धा मी त्याच्या अंधश्रद्धेला क्षमा करू शकत नाही. भुतेखेते काढणाऱ्या मांत्रिकाकडे जाणारे अज्ञानी लोक आणि साधुसंताच्या आशीर्वादाने पुत्रप्राप्ती होईल असे मानणारा हा सुशिक्षित माणूस यांच्यात तत्त्वत: काहीच फरक नाही. दोघेही सारखेच भोळसर आणि भंपक आहेत. संत तुकारामाने 'देव कुठे आहे ?' या प्रश्नाला दिलेले उत्तर अत्यंत समर्पक आहे. तुकोबा म्हणतात,

*तीर्थी धोंडा आणि पाणी। देव रोकडा सज्जनी।।*

सतराव्या शतकातला देहू गावचा एक संतकवी परखड शब्दांतून आपली विचारशुद्ध भूमिका मांडताना दिसतो. या संतानेच भोळ्याभाबड्या समजुतींवर आपल्या शब्दांचे आसूड त्वेषाने ओढले आहेत. बुवाबाजीवर तुकोबा जेवढ्या आवेशाने तुटून पडले तेवढी तीव्रतेची वृत्ती आणि भाषा साऱ्या संतवाङ्मयात सापडणे कठीण आहे. पण आज एकविसाव्या शतकाच्या उंबरठ्यावर उभा असलेला 'मॉडर्न' समजला जाणारा 'अपटूडेट' माणूस मात्र नाना प्रकारच्या अंधश्रद्धांच्या दलदलीत फसलेला दिसत आहे. चित्रपटातले लोकप्रिय नटनटी वर्षांतून अनेक वेळा युरोप अमेरिकेला प्रदक्षिणा घालतात. ते सुशिक्षित आहेत. उत्तम इंग्रजी बोलतात. आपल्या भाषणात एखाद्या आधुनिक पाश्चात्य लेखक कवीचे अवतरण उद्धृत केल्याशिवाय राहात नाहीत. पण बहुतेक नटनटी ज्योतिषाचा सल्ला घेतल्याशिवाय नवा चित्रपट स्वीकारीत नाहीत. त्या चित्रपटाचे शीर्षक किती अक्षरांचे असावे, त्याच्या चित्रीकरणाला कोणत्या दिवशी सुरुवात व्हावी याचे बारीक सारीक तपशील एखादा ज्योतिषी ठरवून देतो. तरीही बहुसंख्य

चित्रपट पहिल्या आठवड्यात सपाटून मार खातात हा भाग वेगळा. एखाद्या तीर्थश्रेत्री जाऊन कुठल्याशा बाबाला वंदन करून आलेल्या अनेक नटनटींच्या लोकप्रियतेचे बुरुज पाहता पाहता ढासळून पडतात. कलेची उत्तम जाण असलेली ही कलावंत मंडळी तर्कशुद्ध विचार का करू शकत नाहीत ? हे एक कोडे आहे. पण मनुष्य इतर बाबतीत कणखर असला तरी विचारदृष्ट्या तो कधीकधी नको तितका दुबळा असतो आणि या दुबळेपणाचा गैरफायदा घेणारी काही धूर्त माणसे असू शकतात. मूर्खांच्या मूर्खपणाचा आपल्या स्वार्थासाठी उपयोग करून घेण्याचा शहाणपणा कित्येक बुद्धिमान माणसांकडे असतो. शहाणपणा आणि मूर्खपणा यांचे एक सनातन द्वंद्व जगात अखंड चालू आहे. फुले, आगरकरांनी भ्रांतिष्ट कल्पनांचे गाजरगवत कितीही निर्धाराने आणि आवेशाने कापून काढले तरी माणसाच्या मनाची भूमी इतकी सुपीक आहे की पुन्हा तिच्यावर हे अज्ञानाचे तण माजत राहाते. भ्रमिष्ट आचारविचारांची मुळे इतकी खोलवर गेली आहेत की ही हरळी मुळापासून उपटण्याच्या प्रयत्नात शेकडो बलिष्ठ हात पराभूत झाले आहेत. पण म्हणून या गाजरगवतासमोर आपण शरणागती पत्करावी काय ? समाजपरिवर्तन होणारच नाही म्हणून विचारवंतांनी आणि क्रांतिकारकांनी अज्ञानासमोर लोटांगण घ्यावे काय ? कित्येक पाश्चात्य बुद्धिवादी विचारवंतांना आणि शास्त्रज्ञांना आपल्या क्रांतिकारक संशोधनाबद्दल भयानक छळ सोसावे लागले. पण ते अज्ञानासमोर, अशास्त्रीय अंधश्रद्धेसमोर वाकले नाहीत. आजच्या जगात नव्या ज्ञानाचे जे थोडेफार प्रकाशकिरण दिसतात ते त्यांच्या बलिदानातून उदयाला आलेले आहेत.

तर्कनिष्ठ विचारपद्धती आणि आचारपद्धती यातूनच समाज सुखसंपन्न होऊ शकेल यासाठी शास्त्रीय ज्ञानाची उपासना हा आपला धर्म बनला पाहिजे. पण या विचारांची आजही इतकी प्रचंड उपेक्षा होते की अजून उजाडत नाही. अजून भोवतालचा अंधार ओसरत नाही. अजूनही प्रकाशाची वाट भेटत नाही अशी एक प्रकारची निराशा मात्र मनात दाटायला लागते. मनुष्य केवळ बुद्धिवादी विचारांवर जगू शकत नाही. त्याच्या जगण्याला श्रद्धेचा थोडासा ओलावा असला पाहिजे हे मी मान्य करतो. पण याचा अर्थ आपली श्रद्धा कुठल्यातरी अर्थशून्य, निराधार सांकेतिक कल्पनेतून निर्माण व्हावी असा मुळीच नाही.

उगवत्या सूर्याकडे पाहून त्याला वंदन करणारा एक मनुष्य म्हणाला, ' मी

शास्त्र विषयाचा अभ्यासक आहे, सूर्य ही एखादी देवता नाही हे मला समजते, सूर्याला नमस्कार केल्यामुळे मला यश आणि संपत्ती मिळेल आणि माझी दु:खं कमी होतील हा भ्रम माझ्या मनात नाही. सूर्य हा अंतराळातला एक विशाल ग्रह आहे. त्याच्या ठायी प्रचंड प्रमाणात ऊर्जा आहे आणि या ऊर्जेमुळेच पृथ्वीवरची जीवसृष्टी जगत आहे याची मला कल्पना आहे. पण पृथ्वीवरची सृष्टी जिवंत राहावी, माणसांना व पशुपक्ष्यांना प्रकाश आणि उष्णता मिळावी म्हणून हा सूर्य प्रकाशत नाही. त्याच्या ठिकाणी विशिष्ट इच्छाशक्ती नाही. तो केवळ सृष्टी नियमांनी बांधलेला एक ग्रह आहे. असं असूनही मी त्याला नमस्कार का करतो ? त्याचं उत्तर हे की सूर्य हे शक्तीचं, प्रकाशाचं आणि ऊर्जेचं भव्य उगमस्थान आहे. त्याच्या ठायी असलेल्या प्रकाशतत्त्वाला मी वंदन करतो. यात माझ्या भावनाशीलतेचा निश्चित भाग आहे. सूर्य नावाच्या एका ग्रहाला नमस्कार करणं हे शुद्ध बुद्धिवादाच्या दृष्टीनं कदाचित चुकीचं असेल. पण या सूर्यानं माझ्या आणि जगाच्या जीवनात सामर्थ्याचे व सौंदर्याचे असंख्य तरंग निर्माण केले आहेत. मनात कृतज्ञतेची एखादी छटा उचंबळून आली तर त्यात आश्चर्य नाही. इतक्या अर्थानं मी श्रद्धाशील आहे, पण उद्या माझ्या पोटात एखादा रोग निर्माण झाला आणि एखाद्या भाबड्या संन्याशाने 'सूर्योपासनेने तुझा रोग बरा होईल' असे सांगितले तर मी त्याच्या वेडेपणाला हसेन. आकाशातल्या ग्रहांची शांती करण्यापेक्षा, जपजाप्य करण्यापेक्षा, एखाद्या तज्ज्ञ डॉक्टराकडून मी शरीराची तपासणी करून घेईन आणि त्याचा उपचारच प्रमाण मानीन. सूर्याला नमस्कार केल्यामुळं माझा रोग बरा होणार नाही. पण म्हणून सूर्य नावाच्या प्रकाशतत्त्वासंबंधी माझ्या मनात असलेली आत्मीय भावना मला वेडेपणाची वाटणार नाही.'

हे विचार मला तरी तर्कशुद्ध वाटतात. यात काही बुद्धिविरोधी आहे असे दिसत नाही. सूर्य किंवा चंद्र अथवा अन्य ग्रह देवताच आहेत अशी दृढ श्रद्धा बाळगणाऱ्या आणि त्यांची पूजाअर्चा करणाऱ्या लोकांपेक्षा या माणसाची भूमिका अधिक वास्तव आणि काव्यमय आहे. चंद्रोदय झाला की वातावरणात आणि मनोवृत्तीत केवढा तरी आनंददायक बदल होतो. समुद्रकिनाऱ्यावरच्या वाळवंटात एक तरुण जोडपे बसले होते. एका बाजूला सूर्यास्त होत होता आणि दुसऱ्या बाजूनं चंद्र वर येत होता. त्या विलक्षण दृश्यानं प्रभावित झालेला तरुण आपल्या प्रेयसीचे हात हातात घेऊन म्हणाला, 'या मावळत्या सूर्यदेवाच्या साक्षीनं मी तुझा हात

हातात घेतला आहे. प्रेमिकांचा देव असलेला हा चंद्र आपल्यावर किरणांची बरसात करीत आहे. आकाशातल्या दोन देवांची शपथ घेऊन सांगतो की हे हात जन्मभर माझ्याच हातात राहतील. सूर्यचंद्राची शपथ घेऊन मी तुला हे वचन देतो.'

आता हा संवाद ऐकून एखाद्या बुद्धिवादी माणसाला हसू आल्याशिवाय राहणार नाही. आपल्या मनातल्या प्रणयभावनेची ग्वाही देण्यासाठी सूर्यचंद्राला साक्षीदाराच्या पिंजऱ्यात उभे करण्याची कृती हास्यापद नव्हे काय? अंतराळातल्या या दोन ग्रहांना दोन क्षुद्र प्रेमिकांच्या प्रेमाची जाणीव असते काय? पण भावमुग्ध अंत:करणातली भावना जेव्हा अशा श्रद्धेच्या वाटेने प्रकट होते तेव्हा एकांतिक कोरडा बुद्धिवाद आपण बाजूलाच ठेवला पाहिजे. हे राज्य व्हावे ही श्रींची इच्छा आहे असे मानणारा छत्रपती शिवाजी कधीच आंधळ्या, भ्रांतिष्ट श्रद्धेच्या आहारी गेलेला नव्हता. त्याचा विश्वास स्वत:च्या समशेरीवर होता. परमेश्वर आपल्या पाठीशी उभा आहे अशी श्रद्धा एखाद्याने मनात ठेवायला हरकत नाही. पण या श्रद्धेचा अतिरेक होऊन तिचे रूपांतर केवळ अविचारी भाबडेपणात झाले तर त्या माणसाच्या दुबळेपणाला अंत राहत नाही. गांधीजींच्या शब्दांवर श्रद्धा ठेऊन माणसे ब्रिटिश साम्राज्यशाहीशी लढली ही गोष्ट खरी आहे. पण गांधीजींचा प्रत्येक शब्द अन् प्रत्येक अक्षर कसलीही शंका न घेता भोळसट श्रद्धेने मान्य करणाऱ्या व्यक्तीला काय म्हणायचे? श्रद्धा मनुष्याला सामर्थ्य देते. सौंदर्य देते. श्रद्धेतून जीवन फुलू शकते. मनाला समाधान मिळते. पण ज्या क्षणी श्रद्धेचा डोळसपणा संपुष्टात येतो त्याच क्षणी बुद्धीला पांगळेपणा येतो. पराक्रम मावळून जातो आणि कुठल्यातरी अशास्त्रीय संकेताभोवती माणसे केविलवाणा पिंगा घालीत बसतात.

परवा संत साहित्यातला विचार आणि काव्य सौंदर्यावर एका शहरात सुशिक्षित जनतेसमोर माझं एक व्याख्यान झालं. संतांनी दिलेल्या विचाराकडे आज आपण कोणत्या दृष्टिकोणातून पाहिले पाहिजे याची शक्य तितकी तर्कनिष्ठ चिकित्सा मी केली. संतांनी काही अतर्क्य स्वरूपाचे अद्भुत आणि अशक्य चमत्कार केले हे मानणे तर्कदुष्ट आहे हे विवरून सांगितले आणि भाषण संपवले. भाषण संपल्यानंतर एका महाविद्यालयाचे प्राचार्य उठून उभे राहिले आणि ते म्हणाले, 'ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या तोंडून वेद वदवले आणि भिंत चालवली ही गोष्ट खोटी

कशावरून म्हणता ? तुकाराम महाराजांनी एका मेलेल्या बालकाला पुन्हा जिवंत केले आणि त्यांची अभंगांची वही इंद्रायणी नदीच्या पात्रातून तेराव्या दिवशी कुठेही न भिजता वर आली ही घटना तुम्ही खोटी का मानता ? आमची पूर्ण श्रद्धा आहे की हे सर्व शंभर टक्के खरे आहे.'

आता या श्रद्धेला बुद्धीची कोणती कसोटी लावायची ? मी त्यांना म्हणालो, 'तुमच्याकडे पाहिल्यानंतर ज्ञानेश्वरांनी रेड्याच्या तोंडून वेद म्हणवून घेतले या घटनेवर आता माझा विश्वास बसायला लागला आहे !'

●

□ □ १०

# एक तुरुंग दोन कैदी

तुरुंगाच्या अंधारकोठडीत डांबल्या गेलेल्या दोन कैद्यांनी कोठडीच्या भिंतीवर चढून खिडकीतून बाहेर पाहिले. एकाला पलीकडच्या रस्त्यावर पसरलेला केरकचरा आणि चिखल दिसला. त्याच्या कपाळावर आठ्या पसरल्या. तो म्हणाला,

'माझ्याच आयुष्याचं बिघडलेलं चित्र मला पाहायला मिळत आहे. चिखलानं बरबटलेला हा घाणेरडा रस्ता पाहण्यात कसलं स्वारस्य आहे ? त्यापेक्षा या कोठडीची ओल आलेली, शेवाळलेली निर्जीव दगडी भिंत काय वाईट आहे ? माझ्या पायातले हे थंडगार अवजड साखळदंडसुद्धा मला त्या बाहेरच्या चिखलापेक्षा थोडे बरे वाटतात. आयुष्य ही एक जीवघेण्या अंधारात निष्कारण लोंबकळत राहिलेली अवस्था आहे. असल्या भणंग जीवनाच्या चिखलात किती दिवस लोळत राहायचं ? मी असल्या आयुष्याचा तिरस्कार करतो.'

दुसरा कैदी भिंतीवरून खिडकीच्या गजापर्यंत कष्टाने पोहोचला. त्याने खिडकीतून दिसणाऱ्या आकाशाच्या लहानशा तुकड्याकडे पाहिले. चंद्र वर येत होता. वाऱ्याच्या झुळुकीनं समोरच्या खुरट्या झाडाची एक डहाळी मंद झोके घेत होती. तिची चिमुकली हिरवी पानं सळसळत होती. तो कैदी म्हणाला,

'अरे, आयुष्याला एक सुंदर बाजू आहे. चिखलानं बरबटलेला घाणेरडा रस्ता हे जीवनाचं एक रूप आहे. पण आकाशात वरवर येणारा चंद्र या खिडकीजवळ थोडावेळ थांबतो. त्याच्या शीतल किरणात या कोठडीचा एक लहानसा कोपरा उजळून निघतो. चंद्राच्या प्रकाशात या अंधारकोठडीलासुद्धा एक आगळं सौंदर्य आलेलं दिसतं. केव्हातरी एखाद्या सकाळी या खिडकीत एक पाखरू बसून आपल्या रंगीबेरंगी पंखाचा फडफडाट करतं. त्याची किलबिल केव्हातरी ऐकायला मिळते. या कोठडीची दगडी भिंतसुद्धा त्या वेळी हसत असल्याचा भास मला होतो.'

पहिला कैदी भेसूर हसला. त्याचे डोळे निराशेनं थिजले होते. आपल्या सहकाऱ्याकडे तुच्छतेचा दृष्टिक्षेप टाकून तो म्हणाला,

'मूर्ख आहेस, आपल्या दोघांनाही जन्मठेप भोगायची आहे. या तुरुंगामुळं सारं आयुष्यच आक्रसून गेलं आहे. आपलं सगळं सुख या थंडगार भिंतींनी शोषून घेतलंय. चंद्र अन् पाखरू त्याची किलबिल असल्या किरकोळ गोष्टीत माझं मन रमत नाही. ही कोठडी मला एक दिवस गिळून टाकणार. माझं प्रेत जेव्हा कोठडीच्या बाहेर आणलं जाईल तेव्हा मी मात्र असणार नाही. तो पलीकडचा, चिखलानं माखलेला रस्ता इतकंच काय ते सत्य आहे. पायातले साखळदंड, कोठडीच्या दाराचे भक्कम गज आणि इथला सुतकी अंधार या पलीकडं जगात कसलंही सत्य नाही.'

दुसरा कैदी पहिल्याच्या खांद्यावर हलकेच थोपटून म्हणाला,

'अगदीच वेडा आहेस ! अंधार हे सत्य असेल. पण आकाशात उगवणारा चंद्र हे सुंदर सत्य तू का स्वीकारीत नाहीस ? या तुरुंगाच्या तटबंदीतही आपण आपली स्वप्नं रंगवू शकतो. आपल्या स्वप्नांवर इथल्या जेलरचीच काय पण कोणत्याही सम्राटाची, प्रत्यक्ष परमेश्वराचीही सत्ता नाही. याच वर्तमानकाळातून उद्याचा अर्थपूर्ण भविष्यकाळ आकार घेणार आहे.'

पहिला कैदी खदखदा हसला. त्याच्या हसण्याला एक प्रकारचा चमत्कारिक कडवेपणा वेढून बसला होता. त्याचं कडू जहर हास्य लवकर ओसरलं नाही. कसबसं ते थांबलं. ओरडून तो म्हणाला,

'तुला येथून उचलून वेड्यांच्या दवाखान्यात ढकलून दिलं पाहिजे. त्या फिकट क्षयरोगी चंद्राचं कौतुक पुन्हा माझ्यासमोर करू नकोस. कोठडीतला हा बर्फासारखा थंडगार अंधार चहूबाजूंनी आपल्याला कुरतडून खात आहे. या दगडी भिंतीच्या रूपानं आपलं मरण आपला अखेरचा घास घेण्यासाठी टपून बसलं आहे आणि तू स्वप्नांच्या बेवकूफ गोष्टी सांगण्यात रंगलेला दिसतोस. तो चंद्र आणि तू मला तरी ठार वेड्याची प्रतीकं वाटता. कोणता भविष्यकाळ तुला दिसत आहे ? या कुठल्या भविष्यकाळाची बात बोलतोस हेच समजत नाही. हा तुझा पिवळा फटक पडलेला रोगट चंद्र एक दिवस असाच उगवेल आणि आपल्या प्रेतांवर त्याचे किरण पडलेले असतील. माझ्या मनात असतं तर डबाभर रॉकेल

ओतून तुझा हा सुंदर चंद्र मी पेटवून दिला असता. चंद्र, पाखरू, स्वप्न आणि परमेश्वर यांचं तुणतुणं वाजवीत बसलेल्या मूर्ख माणसा शुद्धीवर ये !'

आता हसण्याची पाळी त्या दुसऱ्या कैद्याची होती. तो पोट धरून हसला. पण त्याच्या हसण्यात विफलतेची काजळी नव्हती. पराजयाचा कडवटपणा नव्हता. दुःख वेदनेचे काटे नव्हते. तो मनमोकळेपणानं हसत होता. वाऱ्याची लहर आल्याबरोबर झाडाच्या फांद्यांनी गुदगुल्या झाल्याप्रमाणं मुक्तपणानं हिंदकळावं त्याप्रमाणे तो खळखळून हसत होता. त्याच्या हसण्यात नाचऱ्या झऱ्याचा खळबळाट होता. हास्याचं हे अद्भुत संगीत त्या अंधारकोठडीनं यापूर्वी कधीच ऐकलं नव्हतं. कोठडीतल्या ओलसर शेवाळलेल्या भिंतीसुद्धा क्षणभर रोमांचित झाल्या. एका भिंतीच्या गालावर स्मितरेषा उमटली. ती दुसरीला म्हणाली, 'माझ्या आयुष्यात मी पहिल्यांदा इतकं गोड गाणं ऐकत आहे. रडगाणी ऐकण्यातच सगळं आयुष्य गेलं. माझ्या अंगावर कितीतरी कैद्यांच्या डोळ्यांतले अश्रू सांडले आहेत. त्या खारट पाण्यानं मी अनेक वेळा चिंब भिजले. हुंदके आणि सुस्कारे, कण्हणे आणि किंकाळ्या, साखळदंडाची खळखळ, शिपायांच्या वहाणांची करकर, कुणाच्या तरी पाठीवर मारलेल्या फटक्यांचा तो आवाज एवढंच माझ्या कानावर आजपर्यंत आलं. पण आज हा हसण्याचा प्रसन्न नाद मला सर्वांगातून गुदगुल्या करीत आहे.' समोरची बर्फासारखी थंड भिंत खुदकन हसली आणि पहिल्या भिंतीला म्हणाली,

'सांभाळून रहा, त्या हसणाऱ्या पुरुषाच्या प्रेमात तू पडलेली दिसतेस. आपण तुरुंगाच्या भिंती आहोत हे विसरलीस काय ? अंधारकोठडीच्या काळ्या, करड्या भिंतींनी नेहमी गंभीर चेहेऱ्यानं उभं राहिलं पाहिजे. आपलं काळीज कसं दगडासारखं पाहिजे. असं लोण्यासारखं वितळून कसं चालेल ? भिंतींना हसायला बंदी आहे. प्रेम करायला तर त्याहून बंदी आहे. जन्मठेपेचे कैदी पंधरा - वीस वर्षांनंतर सुटतात. फाशीचे कैदी जगाचा लवकर निरोप घेतात. पण अंधारकोठडीच्या भिंतींना सुटकाच नाही. त्यांना सोबत केवळ अंधाराचीच पाहिजे. अंधारलेलं आयुष्य अंधारातच संपवायचं. जीवनही भेटत नाही आणि मरणही दिसत नाही.'

दोन्ही कैदी आपापल्या कठड्यावर निमूट पडून राहिले. रस्त्यावरचा चिखल पाहणारा कैदी डोळे उघडे ठेवून वरच्या भरभक्कम छताकडे पाहत होता. या

कुशीवरून त्या कुशीवर वळत होता पण त्याला झोप येत नव्हती. चंद्र पाहणारा कैदी मात्र क्षणार्धात घोरू लागला. निद्रेनं त्याला आलिंगन दिलं होतं. त्याच्या मिटल्या डोळ्यांत कितीतरी स्वप्नं होती. ती सारी स्वप्नं या क्षणी त्याच्याभोवती पिंगा घालीत होती, नाचत होती. प्रत्येक स्वप्नाचं बोट धरून तोही नाचत होता, गात होता. पण पहिल्या कैद्याजवळ मात्र कुठलंच स्वप्न नव्हतं. त्याच्या भकास दृष्टीत जणू विश्वाचा अंधार वस्तीला आला होता. काळोखाच्या काळ्याकुट्ट केसाळ मिठीत सापडलेला तो कैदी नीट श्वासोच्छ्वासही करीत नव्हता. त्याचा भविष्यकाळावर विश्वास नव्हता. चंद्राला जाळू इच्छिणारा तो कैदी स्वत:च वैफल्याच्या भट्टीत होरपळत होता. पण दुसरा कैदी मात्र अनेक रंगीबेरंगी स्वप्नांच्या पंखांवरून कल्पनांच्या अथांग आकाशात भराऱ्या घेत होता. तो जागा झाला तेव्हा पहाटेचा प्रसन्न सुगंधित वारा खिडकीतून आत शिरत होता. थोड्यावेळानं सूर्याचे कोवळे किरण आत डोकावतील यात शंका नव्हती. कोठडीत जमिनीवर पडलेला एक खिळा त्याला सापडला. काळ्या भिंतीवर तो खिळ्यानं काहीतरी खरडू लागला.

'उद्याचं जग आमचं आहे. रात्र संपली. क्रांतीच्या सूर्याचे किरण थोड्याच वेळात या कारागृहात आपला प्रकाशमान संदेश घेऊन येतील. झोपी गेलेल्या अभाग्यांनो जागे व्हा. दीर्घरात्रीच्या कुशीतूनच सूर्याचा जन्म होणार आहे. तुमच्या ओठावर विजयाची गीते येऊ द्या. तुरुंगाच्या तटबंदी आता कोसळून पडतील. स्वातंत्र्याला अटकाव करणाऱ्या दगडी आणि पोलादी भिंतींना आपल्या इच्छाशक्तीचे सुरुंग लावून त्यांना उडवून द्या. लक्षात ठेवा, उद्याचं जग केवळ आमचं आहे.'

**पहिल्या कैद्याचे डोळे उघडे होते. झोपेवाचून तो तळमळत होता. ज्या डोळ्यांत आशावाद नसतो, नव्या आकांक्षा नसतात, जीवनाची ओढ नसते, नवनिर्मितीची आस नसते, त्या डोळ्यांच्या वस्तीला झोपसुद्धा येत नाही. त्याचे डोळे कोरडे होते,** लालसर होते. त्या रित्या डोळ्यांत निराशेच्या लहरी होत्या. आपल्या निष्प्रेम, खरखरीत आवाजात तो ओरडला,

'**महामूर्खा, उद्याचं जग आमचं आहे असं मोठ्या दिमाखानं तू लिहिलस, भिंतीवर अक्षरं कोरलीस म्हणून ही भरभक्कम भिंत कोसळणार नाही. तुझा सूर्यसुद्धा या तुरुंगात प्रकाश पाडायला धजत नाही. तुझे सगळे चंद्र - सूर्य या**

तुरुंगाच्या जबड्यात विरघळून गेले. उगीच काव्यमय कल्पना केल्या आणि जयघोष केला म्हणून उद्याचं जग हातात येत नाही. उद्या नावाचा पदार्थ आहेच कुठे ? आज पेटलेल्या या धडधडत्या चितेत राखरांगोळी होऊन जाणे यापेक्षा आपल्याला दुसरं काहीही करता येण्यासारखं नाही. उद्याची कल्पना ही केवळ कविकल्पना आहे. या राक्षसी भिंती दररोज आपल्या काटेरी हातांनी आमचं आयुष्य ओरबाडून घेत आहेत. एक दिवस आपल्या हाडांचे सांगाडे तेवढे आपली साक्ष द्यायला उरतील. ती खिडकीत किलबिलणारी पाखरं तुला वाचवू शकणार नाहीत. उद्याच्या खोट्या कृत्रिम स्वप्नात केवळ तुझ्यासारखा शतमूर्खच गुरफटून जातो. माझ्यावरचं आकाश फाटलेलं आहे. पायाखालची जमीन दुभंगलेली आहे. अशा परिस्थितीत उद्याचं जग आमचं आहे म्हणून किंचाळणारा तुझ्यासारखा वेडा तूच आहेस.'

दुसरा कैदी पहिल्याच्या अंगावर त्वेषाने चालून गेला. त्याच्या गालावर त्याने वळलेल्या मुठीचा प्रहार केला. पहिल्या कैद्याच्या तोंडातून रक्त येऊ लागले. पण तरीही तो शांत होता. त्याच्या हिशेबी जीवन आणि मृत्यू दोन्ही समानच होते. आपल्या सहकाऱ्याच्या आक्रमक आवेशाकडे पाहून तो आणखी तुच्छतेने हसला आणि म्हणाला,

'घाम, अश्रू आणि रक्त यांचा पाऊस पडला तरी हा तुरुंग वाहून जाणार नाही आणि तुझा उद्याचा दिवस कधी जन्मालाच येणार नाही. तुमचा कुठलासा वेडा कवी रात्रीच्या गर्भात उद्याचा उष:काल असतो असं म्हणतो. पण रात्रीचा केव्हाच गर्भपात झाला आहे. या तुरुंगानं असले कैक गर्भपात पाहिले आहेत. उद्याचा जन्म तुरुंगाच्या तटबंदीत कधी होत नाही. क्षयरोगी चंद्र आणि रक्ताळलेला सूर्य या पोलादी भिंतीला स्पर्श करू शकत नाहीत.'

आता दुसरा कैदी जोषात हातवारे करीत बोलू लागला. तो गर्जना करीत म्हणाला,

'**अरे भेकडांनो ! अरे षंढांनो !! असे पौरुष हरवून बसलेल्या नामर्दांनो ! तुमच्यासारखे रातकिडे रात्रीच्या अंधारालाच सत्य मानतात. तुम्ही रातकिड्यांची अवलाद आहात. प्रकाशाचे दूत विजयाचे निशाण फडकावीत असताना तुम्ही निराशावादी, प्रतिगामी लोक अभद्र गळा काढून क्रांतीची वाट अडवू पाहता. तुरुंग निर्माण करणारी कितीही बुलंद मोठी शक्ती असो तिला नेस्तनाबूद करणारी**

समर्थ शक्ती जन्माला आल्याशिवाय राहत नाही हा सृष्टीचा नियम आहे. एके दिवशी मथुरेचा तुरुंग फोडून कंसाचं निर्दालन करणारी कृष्णशक्ती मध्यरात्रीच्या काळोखातूनच उदयाला आली. बॅस्टिलचा तुरुंग अशाच एका महाशक्तीने उडवून दिला. ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या जबरदस्त पोलादी भिंती अखेर उलथून पडल्या. माणसाच्याच हातांनी तुरुंग बांधलेले असतात आणि अखेर ते जागृत झालेल्या माणसाच्या बलदंड मुठीच्या घणाघाताने ढासळून पडतात. तुम्ही उगीचच या भिंतींची धास्ती घेतली आहे. माणसाला बंदिवान करणाऱ्या बंदीगृहांचा पाया एक दिवस आम्हीच नष्ट करणार आहोत. तो दिवस आता दूर राहिलेला नाही. या खिडकीतून तू खाली जमिनीवर पडलेली घाण पाहिलीस. रस्त्यावरचा चिखल पाहिलास. केरकचरा तुझ्या निराश डोळ्यांना दिसला. पण तू क्षितिजाकडे पाहिलं असतंस तर स्वातंत्र्यांची प्रकाशधारा घेऊन येणारा उद्याचा तेजस्वी सूर्य तू पाहू शकला असतास. अरे वेड्या, मी चंद्र - सूर्य पाहतो, चमचमणाऱ्या तारकांनी खच्चून भरलेलं आभाळ मला दिसतं. जमिनीवरून सरपटणाऱ्या कीटकांनी आणि उंदरांनी निराश व्हावं. माथ्यावरच्या अथांग गगनाकडं पाहण्याची त्याची हिंमत कधी होत नाही. मी तुरुंगाच्या भिंतीत राहिलो तरी माझ्या आकांक्षेला गरुडाचे पंख आहेत. जमिनीवरच्या चिखलात माझे पाय असले तरी माझं मस्तक मात्र आकाशाला टेकलेलं असतं. ऊठ ! असा मरगळल्यासारखा पडू नकोस. आशावाद आणि बंडखोरी यांच्या ज्योती तुझ्या दृष्टीत पेटून उठू दे. त्या ज्योतींची ज्वाला जुनाट कल्पनांची राखरांगोळी करील. उद्याचं जग आमचंच आहे.'

आता तो पहिला कैदी ताठ उठून बसला. त्याच्या नेत्रांत बंडखोरीची आग उसळली होती. त्याच्या कपाळावरचे स्नायू उठून दिसू लागले. मूठ वळवलेला आपला हात त्याने आवेशाने हवेत फेकला आणि होते नव्हते तेवढे बळ एकवटून तो ओरडला, ' क्रांतीचा जयजयकार असो ' आणि त्याच्या गर्जनेने तुरुंगाच्या त्या भक्कम भिंती हादरू लागल्या.

●

□ □ ११

# पुतळे

दोन ऑक्टोबरला गांधी जयंती आहे. लाल बहादुर शास्त्रींचाही हाच जन्मदिवस. महापुरुषांची जयंती आणि पुण्यतिथी साजरी करण्याची एक सांकेतिक पद्धती आता ठरून गेली आहे. पुतळ्याला हार घालणं, जयजयकार करणं आणि जमलंच तर एखाद्या वक्त्याचं भाषण ठरवणं असा त्या दिवसाचा कार्यक्रम आखलेला असतो. हा कार्यक्रम एकदाचा पार पाडला की संयोजकांचे घोडे गंगेत न्हातात. पुन्हा पुढच्या वर्षापर्यंत त्यांना मग विश्रांती घेता येते. बिचारे गांधीजी शांत स्वभावाचे होते. आज आपली जयंती एक 'पक्षीय' किंवा 'शासकीय' कर्तव्य म्हणून कशी साजरी केली जाते हे त्यांना कळलं तर ते सत्याग्रहाला बसल्याशिवाय राहणार नाहीत. आज खरोखरच गांधी, नेहरू, टिळक, सावरकर वगैरे नेते कुणाला मनापासून हवे आहेत काय ? या नेत्यांचे चौकाचौकांतून शोभिवंत पुतळे मात्र तत्परतेने अटीतटीने बसवले जातात. आता या पुतळ्यांमुळे शहराची शोभा काही प्रमाणात वाढते हे खरे आहे. पण महनीय व्यक्तींचे केवळ पुतळे उभे करण्याचे वेड कितपत सयुक्तिक आहे हा प्रश्न मनात उभा राहतो. गावोगाव अनेक महापुरुषांचे पुतळे उभारले गेले. एकदा एका शालेय विद्यार्थ्याला मी प्रश्न विचारला, 'हा पुतळा कुणाचा आहे ?' त्याने बेपर्वाईने उत्तर केले, 'असेल कुणाचा तरी ! आपल्याला काय करायचे ?' एका प्रसिद्ध देशभक्ताच्या प्रतिमेची ओळख त्याला नसावी याचे मला आश्चर्य वाटले आणि त्याच क्षणी लोकमानसात पुतळ्यांना कितपत स्थान असते तेही समजले. याचा अर्थ देशभक्तांचे, धर्मपुरुषांचे आणि कलावंतांचे पुतळे उभेच करू नयेत असं मला म्हणायचं नाही. पण गल्लोगल्ली पुतळे स्थापन करून आपण त्यांना अगदीच सवंग बनवले आहे यात शंका नाही. या पुतळ्यांपासून कितपत प्रेरणा मिळते हा एक संशोधनाचा विषय ठरेल.

एकदा अलेक्झांडरने आपल्या राजधानीच्या शहरात एक भव्य उद्यान तयार केले. त्या उद्यानात अनेक महान व्यक्तींचे पुतळे उभे केले. आपल्या एका सन्माननीय पाहुण्याला त्यानं ते उद्यान दाखवलं. ते पंधरा - वीस पुतळेही पाहुण्यांनी पाहिले. दोन - चार पुतळ्यांपाशी तो पाहुणा थबकला आणि त्याने अलेक्झांडरला प्रश्न केला,

' हा पुतळा कोणत्या व्यक्तीचा ? तो पलीकडचा नेमका कुणाचा आहे बरं ?'

अलेक्झांडरने पाहुण्यांना आवश्यक ती माहिती दिली. पाहुणा संतुष्ट झाला. सारे उद्यान फिरून पाहिल्यानंतर त्याने अलेक्झांडरला आणखी एक प्रश्न विचारला,

' महाराज, मी या उद्यानात अनेक श्रेष्ठ व्यक्तींचे पुतळे पाहिले. आपण ते उभे केले याबद्दल मी आपलं अभिनंदन करतो. पण आपल्यासारख्या महापराक्रमी सम्राटाचा पुतळा मात्र या उद्यानात मला कुठेच दिसला नाही. आपल्यापेक्षा कमी महत्त्वाच्या व्यक्तींचे पुतळे आहेत, आपला का नसावा ?'

अलेक्झांडर काहीसा गंभीर होऊन म्हणाला,

' उभा केलेला पुतळा कोणाचा आहे हा प्रश्न विचारण्यापेक्षा अमक्या एखाद्या व्यक्तीचा पुतळा का नाही हा प्रश्न माझ्या दृष्टीनं योग्य आहे. नाहीतर मी मोठ्या डौलानं आणि अहंकारानं इथं माझा पुतळा उभा करायचा आणि काही वर्षांनी लोकांनी ' हा कोणाचा बरं पुतळा आहे ?' असं एकमेकांना विचारायचं यात काय अर्थ आहे ?' अलेक्झांडरनं दिलेले उत्तर समर्पक होतं. आज दुर्दैवानं अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की, गेल्या पिढीतले स्वातंत्र्ययोद्धे, समाजसुधारक, प्रतिभावंत कवी आणि कलावंत यांची फारशी माहिती आजच्या पिढीला असत नाही. महात्मा फुल्यांच्या पुण्याईने स्त्री - शिक्षणाला जोरदार चालना मिळाली. आज स्त्री सुशिक्षित झालेली दिसते. त्यामागे ज्योतिबा फुल्यांचं प्रचंड कार्य आहे. लोकहितवादी आणि आगरकर यांनी केलेला स्त्री - शिक्षणाचा वैचारिक पुरस्कार व प्रचार हेही कारण आहे. पण आज पदवीधर झालेल्या स्त्रियांना लोकहितवादी, आगरकर आणि फुले यांच्याबद्दल कितीशी माहिती आहे ? या समाजसुधारकांनी महाराष्ट्राचं जीवन निःसंशय बदलून दाखवलं. ज्ञाननिष्ठा आणि ध्येयनिष्ठा त्यांनी या भूमीत पेरण्याचा प्रयत्न केला. पुराणमतवादी कर्मठांच्या संघटित विरोधाला न जुमानता त्यांनी समाज घडवला. आजचा समाज या सुधारकांना कितपत

ओळखतो ? त्यांची महती तो कितपत जाणतो ? मागच्या शतकात होऊन गेलेल्या श्रेष्ठ व्यक्ती आज विस्मरणाच्या अंधारात बुडून गेल्या आहेत. त्यांचे पुतळे उभारून ही विस्मृती झटकून टाकता येईल काय ?

समाज नेहमी वर्तमानकाळातच जगतो. काल परवा होऊन गेलेल्या किंवा शेकडो वर्षांपूर्वी झालेल्या महान व्यक्तींची आठवण त्याला जपून ठेवता येत नाही. त्याच्या दृष्टीने 'काल' महत्त्वाचा नसून 'आज' हाच उपयुक्त व महत्त्वपूर्ण असतो. एका दृष्टीने समाजाची ही प्रवृत्ती चुकीची नाही. इतिहासाचे ओझे मस्तकावर असले म्हणजे त्या भारामुळे मनमोकळी पाऊले जमिनीवर पडत नाहीत. मन मानेल तसं चालता येत नाही. आपल्याच नादात आणि तंद्रीत स्वतंत्रपणे चालायचे असेल तर परंपरा आणि इतिहास यांचे पाठीवरचे अवजड गोठोडे प्रथम भिरकावून दिले पाहिजे अशी एक विचारसरणी आहे. सारा इतिहास संपूर्णपणे विसरल्याशिवाय समाजाची मानसिक प्रकृती ठणठणीत राहणार नाही. म्हणून जे जे इतिहासातून उचलले असेल ते ते समुद्रार्पण करावे. आपल्याला भूतकाळ नाही असं मानूनच वर्तमानकाळात प्रवास करा असं काही विचारवंताचं सांगणं आहे, अशा स्थितीत पुतळे म्हणजे इतिहास आठवणीत ठेवण्याचा प्रयत्न हा अर्थ करावा लागेल. सारेच पुतळे दृष्टीआड केले तर काय होईल हा प्रश्न या संदर्भात मला एका जिज्ञासू माणसाने विचारला. तो म्हणाला,

'पुतळ्यांतून प्रेरणा मिळते हे काही खरं नाही. सारेच पुतळे आता शोभेच्या वस्तू झाल्या आहेत. मग ज्यांची उपयुक्तता संपली अशा वस्तू एखाद्या ठिकाणी सुरक्षितपणे ठेवून टाकाव्यात. वर्तमानकालीन वातावरणात या ऐतिहासिक गोष्टी आता नको आहेत. तुमचं काय मत आहे ?'

त्या माणसाला काहीतरी उत्तर देणे आवश्यक होते. महापुरुषांच्या प्रतिमा आणि पुतळे कोठेतरी पुराणवस्तुसंग्रहालयात नेऊन ठेवावेत ही कल्पना मात्र मला अनर्थकारक वाटते. महात्मा फुले, महात्मा गांधी, पंडित नेहरू, डॉ. आंबेडकर इत्यादी थोरांचे पुतळे आता आऊट ऑफ डेट झाले - कालबाह्य झाले असं मात्र मला मुळीच वाटत नाही. यांच्या प्रतिमा पाहिल्या की कालच्या उज्ज्वल अभिमानास्पद इतिहासाची पाने माझ्या दृष्टीसमोर येऊ लागतात. या व्यक्ती विशिष्ट काळाशी निगडित होत्या हे खरे असले तरी आणखी शेकडो वर्षे त्यांचे विचार स्वीकारूनच आपल्याला वर्तमानाची आणि भविष्याची वाट चालायची

आहे. त्यांनी इतिहास घडवला. पराक्रमाची व प्रगतीची अक्षरे लिहिली. त्यांनी स्फूर्ती दिली नसती तर मरगळून गेलेले लोक तसेच पिचत पडले असते. त्यांचा संबंध जितका 'काल' शी होता तितकाच 'आज' आणि 'उद्या' शी आहे. या प्रतिमा गत इतिहासाच्या साक्षीदार आहेत. छत्रपती शिवाजी, झाशीची राणी लक्ष्मीबाई, भगतसिंग, सावरकर अशांसारख्या पराक्रमी व्यक्तींचे पुतळे हलवून आपण काय साधणार आहोत ? हे पुतळे समाजाच्या आस्थेचे, आत्मीयतेचे आणि ओजस्वी प्रेरणेचे विषय कसे होतील याचा विचार केला पाहिजे. जी माणसे अतिसामान्य व अज्ञानी आहेत त्यांच्याही मनात आपल्या इतिहासप्रसिद्ध व्यक्ती आणि घटना यांच्याबद्दल आकर्षण उत्पन्न केलं पाहिजे. इतिहास विसरणे ही गोष्ट मला तरी लज्जास्पद वाटते. इतिहास लक्षात ठेवण्याचे कारण असे की वर्तमानकाळात आपली पाऊले चुकीची पडू नयेत. काश्मीरपासून कन्याकुमारीपर्यंत पसरलेला हा खंडतुल्य प्रचंड देश आमच्यात नानाप्रकारचे कृत्रिम भेद होते व राष्ट्रीयत्वाचा अभाव होता म्हणूनच इंग्रजांनी पाहता पाहता आपल्या घशाखाली घातला. आम्ही जात, धर्म, पंथ, वंश यांच्या भ्रमिष्ट वलयात गुरफटलो होतो. शूद्राची सावली अंगावर पडली तरी 'शांतं पापम्' म्हणून आंघोळ करीत होतो. असल्या परिस्थितीचा योग्य फायदा इंग्रजांनी घेतला. हा एक लाजिरवाणा इतिहास आहे. त्याची पुनरावृत्ती होऊ नये यासाठी तो आम्हाला लक्षात ठेवलाच पाहिजे. इतिहासाच्या पानात काही प्रकाशमान घटना सामावलेल्या आहेत. शिवाजीमहाराजांचे दिव्य जीवन, महात्मा फुल्यांची मानवमुक्तीची चळवळ, स्वातंत्र्यवीर सावरकरांची धगधगीत देशभक्ती, गांधीजींचे युगंधर नेतृत्व, डॉ. आंबेडकरांचे क्रांतिकारक कार्य ही सारी इतिहासातील सुगंधी वादळे आहेत. ती आम्ही विसरू म्हटले तरी कदापी विसरणे शक्य नाही. हा इतिहास अभ्यासाचा, प्रेरणेचा, चिंतनांचा व अनुकरणाचा विषय आहे. ज्यांनी इतिहासाला चैतन्य दिले आणि चैतन्याचा इतिहास घडवला त्यांचे पुतळे निदान काही लोकांना जरी स्फूर्ती देऊ शकले तरी तेवढे पुरेसे आहे.

पुतळ्यांना केवळ औपचारिक महत्त्व दिले जाते व इतर प्रसंगी ते दुर्लक्षित राहतात हा आमचा दोष आहे. पाश्यात्त्य देशांत अनेक प्रकारचे भव्य पुतळे रस्त्यांवर, चौकांत, उद्यानांत उभारलेले आहेत. अमेरिकेतल्या स्वातंत्र्यदेवीचा पुतळा, अब्राहम लिंकन यांचा पुतळा पाहताना ज्याच्या मनात स्वातंत्र्यप्रेमाचे तरंग

निर्माण होणार नाहीत त्याला कोणते विशेषण द्यावे हेच समजत नाही. आमच्या भारतातही आता गावोगावी अनेक पुतळे उभे केले जातात. प्रतिभावंतांचे, वीरांचे आणि देशभक्तांचे पुतळे आम्हाला सदैव वंदनीय आहेत. पण कुठल्याही साधारण माणसाची प्रतिमा तयार करायची आणि एखाद्या चौकात कुणीतरी नेत्याच्या हस्ते केवळ राजकीय हेतूने उभी करायची याला काय अर्थ आहे ? एका विद्यापीठाच्या माजी कुलगुरूने स्वत:च पुढाकार घेऊन आपल्या जिवंतपणी आपला पुतळा उभा राहिलेला आपण ' याचि देही, याचि डोळां ' पहावा म्हणून धडपड केली होती. त्यासाठी सक्तीच्या खुषीने पैसेही घेतले गेले. पण पुतळा समितीने ते पैसे गिळंकृत केल्याची दंतकथा आहे. अखेर तो पुतळा उभा राहिलाच नाही. परवा एका नगरपरिषदेतले एक सदस्य मला म्हणाले,

' मी गेली दहा वर्षे नगराध्यक्ष आहे. या गावात मी शाळा सुरू केली, धर्मशाळा बांधली. आता तुम्हीच सांगा गावकऱ्यांनी माझा पुतळा उभा करावा की नाही ? गावातल्या मुख्य चौकात म. गांधीच्या पुतळ्याशेजारी माझाही पुतळा असला तर काय बिघडणार आहे ?'

आता या ' महापुरुषाला ' उत्तर देणे मला शक्यच नव्हते. खरं बोललो असतो तर त्याला रुचलं नसतं. शिवाय मी त्याच्याच घरात बसून अल्पोपाहार करीत होतो. तेव्हा खरं बोलणं धोक्याचं होतं आणि खोटं बोलणं - सफाईनं खोटं बोलणं जमण्यासारखं नव्हतं. खरं वाटेल असं खोटं बोलण्याचं कौशल्य आत्मसात करण्यासाठी राजकारणाच्या क्षेत्रात मला थोडी तपश्चर्या केली पाहिजे. नगरपरिषदेच्या त्या अध्यक्षाचा पुतळा गांधीजींच्या पुतळ्याशेजारी उभा करायला गांधीजींचीही हरकत नाही आणि माझाही विरोध नाही. पण पुतळ्याचा विषय वैशिष्ट्यपूर्ण श्रेष्ठ व्यक्तित्व, हा असावा या चांगल्या संकेताचं पालन झालं पाहिजे. केवळ राज्यकर्त्यांचे पुतळे उभारण्याची निघालेली टूम चांगली नाही. असामान्य गायक, श्रेष्ठ कवी व नाटककार, ध्येयवादी समाजसुधारक, संतमहंत यांचे पुतळे जेव्हा उभे राहतात तेव्हा ती घटना सुसंगत असते. पण गल्लीबोळातले येन केन प्रकारेण प्रसिद्ध झालेले किंवा स्वत:ला प्रसिद्ध समजणारे कुप्रसिद्ध लोक आपलेही पुतळे उभे व्हावेत अशी महत्त्वाकांक्षा ठेवतात तेव्हा मात्र हसावे की रडावे तेच कळत नाही.

मग वैतागाने असे म्हणावेसे वाटते की, पुतळ्याचे हे वेड या अतिरेकी

टोकापर्यंत जाणार असेल तर कुणाचाच पुतळा उभा करू नका. स्फूर्तीसाठी पुतळे असावेत, आदर्शासाठी असावेत. उद्या एखाद्या तस्करी करणाऱ्या आंतरराष्ट्रीय स्मगलराचा पुतळा थाटामाटात एखाद्या शहरात उभा केला तर तो पुतळा त्या नगराचे भूषण ठरेल काय ? तो स्मगलर म्हणेल, ' मी माझ्या पैशांनी माझा प्रचंड पुतळा उभा करीत आहे. चौकातली जागा मला नगराच्या अधिकाऱ्यांनी विकत दिली आहे. पाच पन्नास लाख रुपये सहज खर्च करण्याची माझी हिंमत आहे. मीही आंतरराष्ट्रीय क्षेत्रांत इतिहास घडवणारी कामगिरी केली आहे. लंडनच्या तुरुंगात तीन वर्षे काढली आहेत. तिथल्या रक्षकांना लाखो पौंड लाच देऊन शिताफीनं निसटलो आहे. जगातल्या पहिल्या तीन - चार नामवंत स्मगलरांत माझा समावेश होतो. मग तुम्हीच सांगा माझा पुतळा एखाद्या पुढाऱ्याच्या हस्ते बसवायला काय हरकत आहे ?'

या प्रश्नाचं नेमकं काय उत्तर द्यावं याचा मी विचार करीत आहे. काही महनीय व्यक्ती मात्र स्वतःचं नावसुद्धा एखाद्या संस्थेला देण्याच्या कल्पनेला विरोध करतात. कीर्तीच्या मोहाने, अधिकाराच्या लालसेने, लौकिकाच्या लोभाने ही माणसं घडपडत नसतात. कोणत्यातरी उदात्त उद्दिष्टांसाठी आत्मार्पण वृत्तीने ती कार्य करतात. स्वामी विवेकानंद, कर्मवीर भाऊराव पाटील किंवा अशी काही उज्ज्वल नावे घेता येतील. ही माणसे काट्याकुट्यांत घुसली आणि तेथील वातावरणात त्यांनी संस्कृतीची फुले फुलवली. त्यांच्यापुढे त्यांचे पुतळे उभारण्याची कल्पना मांडली असती तर ते काय म्हणाले असते याची मी कल्पना करू शकतो. ते स्पष्टपणाने म्हणाले असते,

'अरे वेडे की काय तुम्ही ? आमचे पुतळे कसले उभारता ? परमेश्वराच्यासुद्धा मूर्ती घडवू नका. त्या मूर्तीची व पुतळ्यांची पूजाअर्चा करण्याचं कर्मकांड वाढवू नका. माणसातच तो परमेश्वर सामावलेला आहे. झोपडी - झोपडीतून पसरलेली गरीब मानवता ही तुमच्या सेवेचा आणि सुधारणेचा विषय व्हावी. हतबल होऊन पडलेला माणूस उभा करा. त्याला जिवंतपणाने, आत्मविश्वासाने जमिनीवर, स्वतःच्या पायावर उभा करा. मातीचे दगडाचे आणि धातूचे पुतळे कसले उभे करता ? माणूस उभा करा !'

●

□ □ १२

# राशीला लागलेले भविष्य

अनेक वर्तमानपत्रांतून राशिभविष्य प्रसिद्ध केलं जातं. मी ते केवळ करमणुकीसाठी वाचतो. वेळ घालवण्याचे ते एक साधन आहे. काही लोक मात्र असली भविष्ये भक्तिभावाने वाचतात आणि त्यावर गंभीरपणे चर्चा करतात याचे मला आश्चर्य वाटते. जगातली असंख्य माणसे बारा राशींमध्ये विभागून त्या प्रत्येक राशीचे काहीतरी भविष्य गुळगुळीत शब्दांतून खरडायचे याला काही अर्थ आहे का ? एकदा एका वृत्तपत्रातल्या उपसंपादकाने ज्योतिषाकडून वेळेवर भविष्य न आल्यामुळे जमेल तसे भविष्य लिहून टाकले. काही वाचकांची अनुकूल पत्रे आली. मुख्य संपादकांनी त्या उपसंपादकाला फर्मावले, ' आता दर आठवड्याला तुम्हीच भविष्य लिहित जा. थोडा शब्दांत बदल करायचा. ' ग्रहयोग अनुकूल आहे किंवा महत्त्वाचे ग्रह वक्री असल्यामुळे गणपतीची उपासना करावी. प्रवासाला चांगला काळ आहे. जुनी येणी वसूल होण्याचा संभव आहे. शांततेने व सावधगिरीने वागावे. काही शुभ तर काही अशुभ असे फल मिळणार आहे.' असली गोलमाल विधाने करीत चला. दोन चार राशींना अनुकूल लिहावे पण एकंदरीत वाईट असे लिहू नये. एवढी पथ्ये पाळत चला.' त्या उपसंपादकाला पुढे एक नामांकित भविष्यलेखक म्हणून कीर्ती मिळाली. याचा अर्थ इतकाच की उपसंपादकाच्या कुंडलीतले ग्रह त्याला अनुकूल होते. या प्रकारची भविष्ये वाचताना निदान माझी तरी उत्तम करमणूक होते. एकदा प्रवासात माझे पैसे चोरीला गेले. माझा मित्र म्हणाला,

' अरे तुझी माझी रास एकच आहे. या आठवड्यात प्रवास टाळावा. मनाविरुद्ध घटना घडतील असा इशारा ज्योतिषचूडामणी, शास्त्रभूषण होरातज्ज्ञ नीलकंठेश्वर महाराजांनी ' जनमत ' मधून दोन दिवसांपूर्वीच दिला होता. त्यांमुळे मी महत्त्वाचं काम असूनसुद्धा माझा प्रवास कॅन्सल केला. तू देखील प्रवासाला

जायला नको होतं. तू स्वत:ला बुद्धिवादी समजतोस. ज्योतिषांची थट्टा करतोस. पण झालं की नाही त्यांचं खरं ? अरे हे ज्योतिषी म्हणजे आपल्या कपाळावर नियतीने लिहिलेली अदृश्य अक्षरं वाचणारे दिव्यदृष्टीचे लोक असतात. आता यापुढे तरी त्यांचा सल्ला मानीत जा.'

माझ्या मित्राचा हा महान युक्तिवाद ऐकून मला मात्र हसू आले. हा मित्र तर्कशास्त्राचा प्राध्यापक आहे. इतकं सागितलं म्हणजे कॉलेजात हा काय शिकवीत असेल याचा तर्क आपणच केलेला बरा. ज्योतिष हे शास्त्र आहे की नाही या वादात मला पडायचे नाही. पण आयुष्यातले प्रत्येक पाऊल ज्योतिषाच्या मार्गदर्शनाखाली उचलणारे लोक दुबळे असतात. त्यांचा स्वत:च्या कर्तृत्वावर विश्वास नसतो. कुंडलीतले ग्रह काय म्हणतात याचा आग्रह धरणारा माणूस दुराग्रही असतो असं मला वाटतं. ज्याच्यापाशी आत्मविश्वास नसतो तो असल्या भलत्या गोष्टींवर विसंबून राहतो. दुसरा बाजीराव नेहमी पावलोपावली ज्योतिषांचा सल्ला घ्यायचा. भविष्य सांगणारे, शकुन अपशकुनांची माहिती देणारे, हात पाहून किंवा कपाळ पाहून भूतभविष्य वर्तवणारे असे अनेक ज्योतिषी त्याने जवळ बाळगले होते. वाड्यातून बाहेर पडतानासुद्धा मुहूर्त पाहण्याची दक्षता तो घेत होता असं म्हणतात. काही संस्थानिकांच्याही अशाच अतिरेकी गोष्टी मी ऐकल्या आहेत. एक संस्थानाधिपती तर लघुशंकेला जाताना गळ्यातले जानवे उजव्या कानाला गुंडाळावे की डाव्या कानाला या अतिमहत्त्वाच्या समस्येची सोडवणूक आपल्या राजज्योतिषाकडून करवून घेत असत. आता या प्रकाराला काय म्हणावे ? भोळेपणा मी समजू शकतो पण या भोळेपणात निर्बुद्धपणा नावाचा दुसरा गुण मिसळून गेला आहे. आपले सुखदु:ख, आपले प्रारब्ध ग्रहांच्या कृपादृष्टीवरच केवळ अवलबूंन आहे असे मानणे ही दुर्बलताच नव्हे काय ? पंचांग घेऊन मुहूर्त पाहणाऱ्या भोळसट दुबळ्या माणसापेक्षा आपल्या अंतर्मनाला कौल लावून कार्य करणारा मनुष्य हेच आत्मप्रत्ययाचे प्रतीक आहे. पण माणसे कितीही सुशिक्षित झाली तरी ती कुठेतरी दुबळीच असतात. मंत्रिमंडळाचा शपथविधी समारंभ कोणत्या मुहूर्तावर घ्यायचा याचा सल्ला ज्योतिष्यांना विचारणारे एक मुख्यमंत्री मला माहीत आहेत. चारपाच तज्ज्ञ ज्योतिर्विदांकडून त्यांनी सल्ला घेतला. त्यांच्या मार्गदर्शनाप्रमाणे मुहूर्त ठरवण्यात आला. ' सकाळी नऊ वाजून सात मिनिटांनी आणि अडतीस सेकंदांनी तुम्ही शपथ घ्या. यावेळी

मंगळ, गुरू आणि शनी तुम्हाला पूर्ण अनुकूल आहेत. ते तुमच्यावर प्रसन्न आहेत. हा मुहूर्त साधला की पाच वर्षे तुम्ही निर्वेधपणे राज्य करणार ' असे छातीवर हात ठेवून सांगण्यात आले होते. मुख्यमंत्र्यांनी नेमका मुहूर्त साधला. आता पाच वर्षे हलायचे नाही अशी प्रतिज्ञा करून ते आपल्या सिंहासनावर आरूढ झाले. पण गुरुमहाराजांची इच्छा असूनही शनीमंडळाचे सहकार्य लाभूनही दिल्लीश्वराची कृपा त्यांना संपादन करता आली नाही. त्यांच्या कुंडलीतला ' दिल्लीश्वर ' नावाचा ग्रह फारच वक्री झाला. दोन - तीन महिन्यांतच आपले सिंहासन सोडून त्यांना वनवासी व्हावे लागले. एवढा साधलेला चांगला मुहूर्त का फुकट गेला कुणास ठाऊक ? खरे तर राज्ये मिळतात प्रयत्नांच्या बळावर. सिंहासने उलथून पडतात दुबळेपणामुळे, गुरू आणि मंगळ यांचा लोभ किंवा क्षोभ सामान्य माणसाच्या उत्कर्षापकर्षाला कारणीभूत होतो हे बुद्धीला पटत नाही. हा जर श्रद्धेचा प्रश्न असेल तर त्यावर चर्चा तरी कशाला करायची ?

गेल्या आठवड्यातली एक गमतीदार घटना. साप्ताहिक ' जनमत ' च्या अंकात आलेलं राशिभविष्य वाचत होतो. माझ्या राशीचं फळ वर्तवताना म्हटलं होतं. ' शुक्र आणि चंद्र यांची तुमच्या राशीत युती होत असल्यामुळं या सप्ताहात तुम्हाला एखादे अनपेक्षित प्रेमपत्र येईल आणि त्या पाठोपाठ ती प्रिय व्यक्ती भेटून तुमच्याशी प्रेमसंवादही करील. प्रेमसंबंधाला हा काळ अत्यंत अनुकूल आहे. ' हे भविष्य वाचून कुणालाही गुदगुल्या होतील. मी त्या अनपेक्षित प्रेमपत्राची वाट पाहू लागलो. बुद्धिवादी माणसाला सुद्धा अशी प्रेमळ भविष्ये भुरळ घालतात. माझे तर्कवादी मन एका बाजूने मलाच हसत होते. पण काय आश्चर्य सांगावे ? तिसऱ्याच दिवशी एक पाकीट माझ्या हाती पडले. ते पाकीट घेऊन येणारा पोस्टमनसुद्धा मला प्रिय वाटू लागला. पाकीट उघडून पाहताना कुठलीतरी एखादी ज्ञात किंवा अज्ञात प्रिय व्यक्ती आता आपल्यावर प्रेमपुष्पे उधळणार असल्या मुलायम कल्पना मनात उचंबळू लागल्या. अखेर मला ज्योतिषाच्या सत्यतेची प्रतीती आली होती. त्या ' प्रेमपत्रात ' पुढील मजकूर होता.

' दोन वर्षांपूर्वी तुम्ही आमच्याकडून पाचशे रुपये उसने घेतले. चारपाच वेळा आठवण देऊनही तुम्ही अद्यापी परतफेड केलेली नाही याची तुम्हाला जाणीव आहे काय ? ' या वाक्यांनी सुरुवात झालेल्या त्या पत्रात अशाच आशयाचा न सांगण्यासारखा बराच मजकूर होता. माझी त्या पत्रलेखकाने बरीच निंदानालस्ती

केली होती. पत्राखाली मात्र सही नव्हती. व्यक्तिनिंदेच्या मजकुरानं भरलेलं हे पत्र कुणी लिहिले हे कळायला काहीच मार्ग नव्हता. कुणाचेही पैसे मी घेतले नव्हते. उलट ज्यांना दिले त्यांच्याकडून येण्याची काहीच शक्यता नव्हती. मला त्रास देण्यासाठी कुणीतरी हे ' प्रेमपत्र ' खरडले होते. कदाचित शुक्र आणि चंद्र यांच्या प्रसन्न युतीचा हा काव्यमय परिणाम झाला असावा. बाकीचे ग्रहसुद्धा अनुकूल असते तर आणखी कित्येक प्रेमपत्रांचा माझ्यावर वर्षाव झाला असता. वृत्तपत्रीय भविष्याची चेष्टा करणारा माझा सहकारी मला म्हणाला,

' हे प्रेमपत्राचं प्रकरण सोडूनच द्या. माझ्या भविष्याचा पडताळा चार महिन्यांपूर्वी मला कसा आला ती हकीकत फारच मनोरंजक आहे. माझ्या राशिभविष्यात त्या लेखकाने ठामपणे सांगितले होते की, ' या आठवड्यातला अमुक दिवस तुम्हाला अत्यंत अनुकूल आहे. स्त्रीसुखाची परमावधी या दिवशी तुम्ही अनुभवाल. तुमच्या वैवाहिक आयुष्यातला हा दिवस तुमच्यासाठी सर्वोच्च सुखाचे क्षण घेऊन येणार आहे. माझा स्वत:चा भविष्यावर थोडाबहुत विश्वास आहे. ऑफिसात हे भविष्य मी वाचलं. संध्याकाळी घरी परतताना मी हवेत तरंगत होतो. कधी नव्हे तो मोगरीचा गजरा विकत घेण्याची गुलाबी इच्छा माझ्या मनात उसळून आली. एका उंची साड्यांच्या दुकानातून बायकोला आवडेल अशी भारी साडी क्रेडिटवर खरेदी करण्याचा वेडेपणाही मी केला. घराकडे पावले टाकताना ' बहुत दिन नच भेटलो सुंदरीला ' हे सौभद्रातले पद मी गुणगुणत होतो. घरी आलो तर पाहुण्यांनी घर गजबजून गेलेले दिसले. बायकोच्या मावसबहिणीची कुठलीशी नणंद आणि तिची चारपाच मुले, तिचे पतिराज व त्यांचे दोनतीन मित्र यांनी माझ्या लहानशा घराचा ताब मिळवला होता. एकंदरीत घराचे हे स्वरूप पाहिल्यानंतर मोगरीचा गजरा खिशातून बाहेर काढणे मला शक्यच नव्हते. आलेल्या पाहुण्यांच्या सरबराईसाठी आणि भोजनव्यवस्थेसाठी पत्नीने माझ्या हाती एक लांबलचक यादी देऊन खेकसून सांगितले,

' आता वेळ न दवडता हे सगळे पदार्थ ताबडतोब घेऊन या. ' तिने माझ्या अंगावर दोन पिशव्या फेकल्या. त्या मी आज्ञाधारकपणे झेलल्या. खाली मान घालून घरगड्याची भूमिका वठवण्यासाठी घराबाहेर पडलो. माझ्या वैवाहिक जीवनातला तो सर्वोच्च सुखाचा दिवस कसा होता हे मला एकदा त्या भविष्यलेखकाला नीट समजावून सांगायचे आहे. '

वर्तविलेल्या भविष्यांचे बहुधा असेच होते. दहापैकी नऊ साफ चुकतात. एक अर्धवट बरोबर येते. कारण तो एक योगायोग असतो. कावळा बसल्यामुळे फांदी तुटत नसते. ती तुटणारच असते. कावळ्याचे केवळ निमित्त होते आणि त्याच्या वजनामुळे फांदी तुटल्याचा गवगवा मात्र होतो. परवा एक ज्योतिषी महाशय मला म्हणाले,

' महात्मा गांधींचा मृत्यू होणार हे ' भविष्य ' मी अचूक वर्तवले होते. ते खरे झाले ' मी हसून म्हणालो,

' महाशय तुम्ही देखील एक दिवस मरणार आहात हे तुमची कुंडली न पाहता आजच तुम्हाला सांगून ठेवतो. माझे भविष्य खरे ठरल्यावर मला येऊन कळवा. ' ज्योतिषी महाशय माझ्या या थट्टेमुळे बेचैन झाले. काहीसे रागावून त्यांनी म्हटले,

' तुम्ही एका परंपरागत शास्त्राची नाहक कुचेष्टा करीत आहात याची तुम्हाला जाणीव आहे काय ? आमचं ज्योतिषशास्त्र हे परिपूर्ण शास्त्र आहे. तुमच्या साऱ्या आयुष्याचं स्पष्ट चित्र या शास्त्राच्या सहाय्याने रेखाटता येईल. अंतराळातल्या ग्रहांचा मानवी जीवनावर निश्चित परिणाम होत असतो. पण तुमच्यासारखे लोक या शास्त्राकडे पूर्वग्रह मनात ठेवून पाहात असतात. शास्त्रीय दृष्टीने पाहिल्यावर तुमचे गैरसमज निश्चित दूर होतील. '

ज्योतिष हे शास्त्र असेलही. त्याची शास्त्रीय निकषांच्या आधाराने चिकित्सा केली पाहिजे. पोटभरू स्वार्थसाधू लोकांनी या विद्येचे अवमूल्यन केले आहे. त्यामुळे ही विद्या कितपत परिपूर्ण आणि विश्वसनीय आहे हे मात्र आज सांगता येत नाही. पण प्राचीन भारतीय संशोधकांनी ज्योतिष, खगोल या क्षेत्रात अत्यंत अभिमानास्पद कामगिरी केली यात शंका नाही. त्यात पुढे मात्र कसलीही भर पडली नाही. ज्ञानाची आराधना संपली. संशोधन संपले. शास्त्रीय दृष्टी नाहीशी झाली. कर्मकांडी दुराग्रह सुरू झाला. धंदेवाईक व्यवहाराच्या पाशात हे ज्योतिष सापडले. जनतेच्या अज्ञानात अंधश्रद्धा मिसळून गेली. रूढीचे साखळदंड त्यातून तयार झाले. साखळदंडांना अलंकार समजण्याचा लोकभ्रम यातूनच जोपासला गेला. काही वर्षांपूर्वी एम. ए. च्या वर्गातला एक तरुण विद्यार्थी माझ्याकडे एक चमत्कारिक प्रश्न घेऊन आला. त्याचे एका सुंदर तरुणीवर मन:पूर्वक प्रेम होते. त्या दोघांनाही विवाहबद्ध होण्याची इच्छा होती. पण दोघांच्याही घरातून या लग्नाला तीव्र विरोध होता. मी विरोधाचे कारण विचारल्यावर तो हसून म्हणाला,

'आमच्या पत्रिका जुळत नाहीत. छत्तीस गुणांपैकी पाचसहा गुणसुद्धा जुळत नसल्याने हे लग्न दोन्ही घराण्यांच्या दृष्टीने अत्यंत त्रासदायक होणार असा निर्णय देऊन ज्योतिषांनी हे लग्न होऊ नये असा सल्ला दिला आहे.' मी विचारले,

'पत्रिकांचं जुळणं आणि मनाचं जुळणं यात तू अधिक महत्त्व कोणत्या गोष्टीला देतोस ? दोन अंत:करणे एकत्र आल्यानंतर दोन पत्रिकांतले ग्रह जन्मभर भांडत राहिले तरी त्यामुळं काहीही बिघडत नाही. पत्रिकेतले ग्रह काय आणि कसे आहेत यापेक्षा पतिपत्नींचे परस्परांविषयीचे ग्रह काय आहेत हेच महत्त्वाचे असते. पत्रिकेत खडाष्टक योग असेल पण तुमच्या मनात प्रेमाष्टक योग असेल तर खुशाल लग्न करा आणि सुखी जीवन जगा.

उत्कट प्रेमाने जेव्हा दोन मने एकत्र येतात, एकरस होतात तेव्हा बिचारी पत्रिका काहीही करू शकत नाही. वधूवरांची मने तपासण्याऐवजी जाड भिंगाच्या चष्म्यातून पत्रिकांची चिकित्सा करीत बसलेल्या या लोकांचं मला आश्चर्य वाटतं. प्रेम की पत्रिका या संघर्षात तू प्रेमाच्या बाजूला ठामपणाने उभे राहावे असं मला वाटतं.' तो तरुण अत्यंत प्रसन्न झाला. त्याच्या मनातला तो चमत्कारिक संघर्ष आता संपला होता. मी त्याला कालिदासाच्या दुष्यंताचे उदाहरण दिले. साहित्यातली उदाहरणे देऊन जीवनातले प्रश्न सुटत नसतात असा कुणीतरी आक्षेप घेईल त्याला येथेच उत्तर देऊन ठेवतो की, साहित्य हा जीवनाचाच आविष्कार असतो. जीवनापेक्षाही साहित्य अधिक जिवंत असू शकते. शकुंतलेच्या सुंदर मुखकमलाभोवती गुंजारव करणाऱ्या भ्रमराकडे पाहात दुष्यंत उद्गारतो,

'भ्रमरा, तू खरा रसिक आहेस, तू कार्यभाग साधलास. मी मात्र इष्ट कोणते, उचित कोणते, शिष्टाचार कोणता याचा निरर्थक विचार करीत बसलो आहे. आपले अंत:करण आत्यंतिक आवेगाने जे सांगेल तेच प्रमाण मानले पाहिजे. कोणत्याही शास्त्रापेक्षा मनाचा धर्म तुझ्याप्रमाणे मीही प्रमाण मानायला हवा आहे.' त्या तरुणाने महान ज्योतिषतज्ज्ञांचा सल्ला झुगारून आपल्या प्रेयसीशी विवाह केला. गेली दहा वर्षे त्यांचा संसार अत्यंत सुखाने चालला आहे. कदाचित पत्रिकेतल्या ग्रहांनी या दोन प्रेमिकांशी युती केली असावी. वधूवरांच्या मनापेक्षा त्यांच्या जन्मकुंडल्यांनाच महत्त्व देणाऱ्या लोकांना काय सांगणार ?

मराठीतल्या एका प्रतिभासंपन्न चित्रपट दिग्दर्शकाची एक शोककथा मला माहीत आहे. हा दिग्दर्शक अत्यंत सुशिक्षित होता. कलांचा श्रेष्ठ रसिक होता.

पण ज्योतिषावर त्याची दृढ श्रद्धा होती. ती श्रद्धा इतकी विकोपाला गेली होती की तिचा तर्कबुद्धीशी काहीच संबंध उरला नव्हता. पोटाच्या भयंकर विकाराने ग्रासल्यानंतर मुंबईतल्या एका नामांकित हॉस्पिटलात त्याला दाखल केले. डॉक्टरांनी ताबडतोब शस्त्रक्रिया करण्याचा निर्णय घेतला. या दिग्दर्शकाने आपल्या नेहमीच्या ज्योतिषाला बोलावून सल्ला विचारला. खरे तर हे क्षेत्र तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांचे होते. प्रत्यक्ष रुग्णाला तपासून डॉक्टरांनीच कृती करायची होती पण ज्योतिषाने कुंडली पाहून शस्त्रक्रिया दोन दिवस पुढे ढकलावी असा ' बहुमोल ' सल्ला दिला. डॉक्टरांनी परोपरीने पटवून देण्याचा प्रयत्न केला. पण दिग्दर्शकाचा विश्वास ज्योतिषावरच अधिक होता. वेळीच शस्त्रक्रिया न झाल्यामुळे दुसऱ्याच दिवशी दिग्दर्शकाचा मृत्यू झाला. असल्या घटना माणसाच्या अज्ञानातून आणि अंधश्रद्धेतून घडतात. त्यापेक्षा स्वतःच्या कर्तृत्वावर दुर्दम्य विश्वास ठेवून प्रतिकूल परिस्थितीशी झगडत राहिलेली माणसे मला अधिक प्रिय वाटतात. स्वराज्याच्या स्थापनेला अनुकूल काळ आहे काय ? माझ्या पत्रिकेतले ग्रह या कार्यासाठी मला मदत करणार आहेत काय ? असला दुबळा प्रश्न शिवाजीने कधी एखाद्या ज्योतिषशास्त्रज्ञाला केला होता काय ? राज्यारोहण समारंभासाठी त्याने मुहूर्त पाहिला असेल पण राज्य मिळविण्यासाठी त्याला जो तीव्र चौफेर लढा द्यावा लागला तो त्याने आपल्या मनाला विचारूनच दिला होता. गांधीजींनी ब्रिटिश साम्राज्यशाहीविरुद्ध देशव्यापी चळवळी उभारताना जन्मकुंडलीची साक्ष घेतली होती काय ? प्रतिभावंतांनी, शूरवीरांनी, विचारवंतांनी दैववादी अज्ञानी विचारांची मरगळ झटकून टाकली पाहिजे. माझ्या आयुष्याचा मीच शिलेदार आहे, मीच प्रयत्नांचा नांगर धरून माझ्या जीवनाची भूमी नांगरणार आहे. मीच त्या भूमीत सुंदर विचारांची बीजे पेरणार आहे. पुरुषार्थी कल्पनांचे सिंचन करून माझ्या व्यक्तित्वाचा आणि आयुष्याचा मळा मीच फुलवणार आहे. असा आत्मप्रत्यय माणसात रसरसून फुलला पाहिजे. इतिहास घडवणारे व संस्कृतीला समर्थ बनवणारे महापुरुष स्वतःच्या अनिवार प्रयत्नातून आणि विचारातून नवनिर्मिती करीत असतात. आकाशातले ग्रह त्यांना अडवू शकत नाहीत. ' कोण मला वठणीला आणू शकतो ते मी पाहे ' असा बलदंड विश्वास माणसाने जोपासला पाहिजे. घटकाभर करमणुकीसाठी राशिभविष्य वाचायला माझी काहीच हरकत नाही. मी देखील ते वाचतो.

त्यातली कित्येक विधाने मला गुदगुल्या करतात. एखाद्या नियतकालिकात माझ्या राशीचं भविष्य असं लिहिलेलं असतं.

'या आठवड्यात तुम्हाला अचानक धनलाभाचा योग आहे. साऱ्या ग्रहांची मर्जी तुमच्यावर बहाल आहे. ग्रहांच्या कृपेने हाती पैसा खेळत राहील. घरात आनंदाचे, उत्साहाचे वातावरण निर्माण होईल. एखादा जुना मित्र किंवा मैत्रीण अनपेक्षितपणे भेटून तुम्हाला चकित करील. त्याच्या किंवा तिच्या सहवासात तुम्ही स्वर्गीय सुखाचा आस्वाद घ्याल.'

हे भविष्य वाचताना ते संपूर्ण खोटे आहे हे माहीत असूनही मी सुखावतो. थोडा वेळ त्या काल्पनिक सुखाशी स्वैरसंवाद करीत राहतो. इतकेच त्या भविष्याचे श्रेय असते.

●

## □ □ १३

## *भाषा : ओठातली आणि पोटातली*

**कॉलेजातले विद्यार्थी वात्रट आणि खोडकर असतात असा सार्वत्रिक** समज आहे. तरुण विद्यार्थी विद्यार्थिनींनी थोडाफार वात्रटपणा केला तर त्यात काय बिघडले ? साठी - सत्तरी उलटलेल्या म्हाताऱ्यांप्रमाणं त्यांनी गंभीर मुद्रा करून प्राध्यापकाचं रटाळ, रसहीन आणि अनेक वेळा अर्थशून्य असलेलं 'लेक्चर' निमुटपणानं ऐकून घ्यावं म्हणता काय ? याचा अर्थ त्यांनी बेलाशक शिस्तीचं उल्लंघन करून वाटेल तसा 'गोंधळ' करावा आणि बिचाऱ्या प्राध्यापकाला पळवून लावावं असा मात्र नाही. पण प्राध्यापक फारच कंटाळवाणे बोलायला लागले, विद्यार्थ्यांशी 'संवाद' न साधता केवळ वहीची किंवा पुस्तकाची पानं यांत्रिक निर्जीवपणे वाचून दाखवू लागले, किंवा प्रत्येक वाक्याला अडखळायला लागले, भाषेच्या चुका करायला लागले तर विद्यार्थ्यांनी आपली प्रतिक्रिया नोंदवू नये काय ? एकदा एका प्राध्यापक मजकुरांचं 'असंच' व्याख्यान वर्गात चालू होतं. शंभर दीडशे विद्यार्थ्यांनी ते पंधरा - वीस मिनिटे सहन केलं. पण सहनशक्तीलाही मर्यादा असते. अखेर आठ दहा विद्यार्थ्यांनी एकदम सामुदायिक पद्धतीने जांभया दिल्या. एक कारटे ओरडले, 'झोपा रे आता ! झोपायची वेळ झाली.' वर्गात हास्याची प्रचंड लाट उसळली. प्राध्यापक संतापले आणि वर्ग सोडून निघून गेले. स्टाफरूममध्ये ते म्हणाले, 'या कॉलेजात शिस्त औषधालाही नाही. प्रत्येक विद्यार्थ्याला पंचवीस रुपये दंड केलाच पाहिजे.'

विद्यार्थ्यांना दंड किंवा अन्य शिक्षा केली म्हणजे शिस्तीचं वातावरण निर्माण होईल हा एक शुद्ध गैरसमज आहे. ही वरवरची मलमपट्टी आहे. प्राध्यापक आणि विद्यार्थी यांच्यात संवाद निर्माण होण्यासाठी ज्या 'भाषेची' जरुरी आहे ती प्रथम दोघांनीही शिकायला पाहिजे. भाषा म्हणजे केवळ शाब्दिक भाषा नव्हे. शब्दांची भाषा सोपी असते. पण जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात 'मनाची भाषा' समजून

घेण्याची अत्यंत आवश्यकता आहे. ही मनाची भाषा बहुसंख्य लोकांना कळत नाही. विसंवाद आणि गोंधळ यांचं प्रमुख कारण हेच आहे. विद्यार्थी आणि प्राध्यापक यांच्यात एक ' जनरेशन गॅप ' असते. एका पिढीतले हे अंतर लक्षात ठेवून विद्यार्थ्यांच्या मनाशी कसं समरस व्हायचं, त्यांच्या वृत्ती कशा समजून घ्यायच्या हे ज्याला कळेल त्याला उत्तम शिक्षक सहज होता येईल. सॉक्रेटिस हा तत्त्वज्ञ तरुणांचा विश्वास संपादन करू शकला याचं कारण तो त्यांच्यात मिळून मिसळून बोलू शकत होता. आपल्या पांडित्याच्या उंच पायरीवरून तो बोलत राहिला असता तर त्याचा प्रभाव मुळीच पडला नसता. त्याच्या शब्दांत आत्मीयता होती, ज्ञान होतं. ज्यांच्याशी त्याला बोलायचं होतं त्यांना समजेल अशी भाषा त्याला अवगत होती. सॉक्रेटिस हा तरुणांचा विचारवंत नेता झाला. त्यांच्या मनांत त्याने क्रांतिकारक विचारांची वादळे निर्माण केली. महावीर, बुद्ध हे श्रेष्ठ दार्शनिक आणि धर्मपुरुष पण त्यांची भाषा व भावना सामान्यांतल्या सामान्य माणसालाही सहज समजत होती. आपल्या दोनचार शब्दांनीच ते श्रोत्यांच्या काळजाला सहज हात घालू शकत होते. ज्ञानोबापासून विनोबापर्यंत सारेच संत अगदी सोपी आणि म्हणूनच अगदी जिवंत भाषा बोलत व लिहीत होते. अध्यात्मासारखा कठीण विषयसुद्धा त्यांनी सर्वजनसुलभ केला.

परवा एका विद्वानाच्या भाषणाला अध्यक्ष म्हणून बसण्याची माझ्यावर आपत्ती आली. सदर विद्वान एका नामांकित विद्यापीठात प्रमुख प्राध्यापक होते. ' कला म्हणजे काय ? ' हा त्यांच्या भाषणाचा विषय होता. विद्वत्तेपेक्षा विद्वत्तेचा दबदबाच अधिक होता. अध्यक्षाच्या खुर्चीवर सध्या कोणीही बसतो अशी अवस्था असल्यामुळं मी ' आलिया भोगासी सादर ' झालो. सध्या खुर्चीची भाषा मात्र सर्वांनाच सहज कळते. वक्ते महाशय बोलू लागले,

' कलेच्या जैविक घटकावयवातून तिच्या अस्तित्वमात्राचं साक्षित्व प्रत्ययाला येत असतानाच जीविताच्या खोल तमिस्त्रेत चैतन्याचे अंतःस्फुरण होऊ लागून मस्तिष्कावर केंद्रीभूत अनुभूतीचे आघातप्रत्याघात होत राहतात. ' वक्ते महाशयांचं अगाध पांडित्य सभेत दुथडी भरून वाहू लागलं. एखाद्या उष्ण वावटळीत सापडल्याचा मला साक्षात्कार झाला. कला म्हणजे एवढं भयानक प्रकरण असेल तर आपण आता कुठल्याही कलेच्या वाटेला जायचं नाही अशी मी प्रतिज्ञाच केली. मी समोर श्रोतृवर्गाकडे पाहिले. काही श्रोते पहिल्या तीन

मिनिटातच उठून गेले. काही अधिक सहनशील लोक केविलवाणी मुद्रा करून सात - आठ मिनिटे थांबले. एका श्रोत्याने व्याख्यानाच्या सुरुवातीला कानात ऐकू येण्याचं यंत्र बसवलं होतं. चारपाच वाक्यांनंतर त्यानं ते काढून ठेवलं. मला त्याच्या सुखाचा हेवा वाटला. विमानातल्या प्रवाशांना कानात ठेवण्यासाठी कापसाचे बोळे देतात. या सभेत तशी व्यवस्था असती तर फार बरे झाले असते. अध्यक्षीय खुर्ची किती तापदायक असते याचा मला त्या दिवशी अनुभव आला. मी कुणीतरी विद्वान आहे असा वक्त्यांचा गैरसमज झाला असावा. प्रत्येक वाक्य माझ्याकडे पाहून ते बोलत होते. समोर पाहण्यासारखे काही नव्हतेच. आठ दहा श्रोते खाली मान घालून बसले होते. एक तर बसल्या जागीच चक्क झोपी गेला होता. भाग्यवान होता बेटा ! एक भगिनी गळपट्टा विणत होती. 'कला म्हणजे काय ?' या विषयावर वक्ते महाशय आवेशाने बोलतच होते. खरे तर आपण काय बोलतो ते त्यांना तरी कळत होते की नाही कुणास ठाऊक ?

सुमारे दीड तास बोलल्यानंतर विद्वान प्रवक्ते खाली बसले. समारोपाचे दोन शब्द आता बोलायलाच पाहिजेत म्हणून मी म्हणालो, 'मित्रहो ! इतकं पांडित्यानं अंतर्बाह्य ओथंबलेलं सुरेख भाषण ऐकल्यावर आता समारोपाचे शब्द काय करायचे ? आपल्या भाषणात या विद्वानानं काय काय सांगितलं आणि त्याचा काय अर्थ होता याचा विचार आपल्याला बरेच दिवस पुरेल इतकं मौलिक व्याख्यान त्यांनी दिलं आहे. ज्या विद्यार्थ्यांना ते शिकवतात ते धन्य आहेत. ज्या विद्यापीठात हे वक्ते आहेत ते विद्यापीठही धन्य आहे. आज आपण सारेजण धन्य झालो. असे धन्योद्गार काढून आजची सभा संपली ही आनंदाची घोषणा करतो.' कलेसंबंधी इतके अकलात्मक बोलतो त्याला वक्ता कसं म्हणायचं ? आपल्या अपत्याशी जिला बोलता येत नाही तिला आई कसं म्हणायचं ? विद्यार्थ्यांशी जो बोलू शकत नाही त्याला शिक्षक म्हणण्यात काय अर्थ आहे ? ज्याला जनतेशी बोलता येत नाही त्याला नेता ही पदवी निरर्थकच नव्हे काय ? गांधीजींचं भाषण ज्यांनी ऐकलं ते लोक सांगतील की, गांधीजी अत्यंत तळमळीने बोलत असत. आंतरिक उत्कटता आणि तळमळ असली की शब्दांना आपोआप सुबकपणा व सौंदर्य प्राप्त होतं. त्यासाठी धडपड करावी लागत नाही. तुकाराम, नामदेवाची कविता म्हणजे पढीक पांडित्याची कविता नव्हे. सामान्य माणसांच्या प्रगाढ माणुसकीचे बलाढ्य प्रतिनिधी म्हणूनच हे दोन संत उभे राहिले. माणसाच्या

सुखदु:खांचा अस्सल वास येणारी त्यांची कविता साहित्यातच नव्हे तर माणसांच्या मनात कायमची रुजून बसली कारण ' अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी ' ही त्यांची पद्धत होती. त्यांच्या शब्दांत व्याकरणापेक्षा अंत:करण अधिक कितीतरी अधिक होतं. आज व्याकरणही नाही आणि अंत:करणही नाही अशी स्थिती आहे. काही ठिकाणी कोठे डामडौलाची भाषा ऐकू येते. पण तिच्यात प्रामणिकपणाचा अंशही नसतो. स्वत:चा ढोंगीपणा आणि स्वार्थ लपवण्यासाठी भाषेचे झुळझुळीत पांघरूण घेणारे पुढारी सर्वच क्षेत्रांत सापडतात. राजकारणात त्यांची संख्या अधिक आहे यात आश्चर्य नाही. सत्तेच्या उबदार खुर्चीवर बसल्याशिवाय यांच्या कंठातून तलमरेशमी भाषा बाहेर पडत नाही. आमदार झाल्याबरोबर लक्षावधी रुपयांची इस्टेट थाटणाऱ्या एका चतुर पुढाऱ्यानं शिक्षकदिनाच्या निमित्तानं एका शाळेत भाषण ठोकलं होतं. माझ्या दुर्दैवानं त्या सभेला मी उपस्थित होतो. पुढारी महाशय म्हणाले,

' शिक्षक म्हणजे राष्ट्राचा शिल्पकार आहे. ( हे वाक्य इतक्या वेळा लिहिलं आणि उच्चारलं जातं की त्याला आता काही अर्थच उरला नाही. चालून चालून गुळगुळीत झालेल्या नाण्यासारखं निरर्थक विधान आहे हे. ) शिक्षकांनी स्वार्थत्याग करावा. उद्याची पिढी आम्ही तुमच्या हातात दिली आहे. मुलांवर चांगले संस्कार करा. तुम्ही शिक्षक सुद्धा बिडी - सिगारेट तंबाखू या व्यसनापासून चार हात दूर राहा. पैशाचा आणि सत्तेचा लोभ धरू नका.'

वाहवा ! काय महान विचार आहेत ! याच आमदाराचं एक दारूचं दुकान गावात आहे. बेकायदेशीर कामं करण्यासाठी रोज हजारो रुपयांची लाच खाणारा हा ' नेताजी ' आम्हा शिक्षकांना उदात्त भाषेत बोधामृत पाजत होता. या गृहस्थाला संध्याकाळ झाली की भेटायला जाणं अशक्य असायचं. कारण ही स्वारी दिवस उतरला की ' स्वर्गात ' चढलेली असायची आणि हे आम्हाला विडी - सिगरेटपासून अलिप्त राहण्याचा उपदेश गांधीजींच्या विनम्र भाषेत करीत होते. भाषा आणि भाव यांच्यातली जीवघेणी विसंगती खरोखरच आश्चर्यजनक असते. ' मुखमे राम और बगलमे छुरी ' किंवा ' मधुतिष्ठती जिव्हाग्रे, हृदये तु हलाहलम् ' या सुभाषिताची अशा वेळी आठवण होते. भाषेत प्रामाणिक भावनेचा गंध मिसळला की ती भाषा सुरंगी आणि सुगंधी होते. पण सध्या ' बोले तैसा चाले ' या जातीचा मनुष्य पहायला सुद्धा मिळणं दुर्मिळ झालं आहे. ज्या

वाणीला अंत:करणाचे अधिष्ठान आहे अशी तजेलदार वाणी आता ऐकायला मिळत नाही. शब्दकोशातली भाषा आणि भावकोशातली भाषा यात पुष्कळ फरक आहे. भाषा दुर्बोध होते याची कारणे अशी की, बोलणाऱ्याच्या डोक्यातच गोंधळ असतो किंवा तो काहीतरी लपवण्यासाठी अथवा दांभिकतेने बोलतो किंवा ज्या विषयावर बोलायचं त्या विषयाचं त्याला पुरेसं आकलन झालेलं नसतं. चांगली भाषा समाजाच्या अभ्यासातून आणि जीवनाच्या अनुभवातून शिकता येते. ती केवळ पुस्तकातून शिकता येत नाही. संत कबीरानं म्हटलं आहे, ग्रंथांचं पठण करून पंडित होता येत नाही. ' प्रेम ' ही अडीच अक्षरे ज्याला कळली तोच माझ्या मते पंडित आहे. त्यालाच चांगली भाषा बोलता येईल.

भाषेतून मनुष्य आपल्या भावना व्यक्त करतो. पण शब्दांची भाषा भावप्रकटीकरणाला फार अपुरी पडते. एखादा प्रियकर आपली अत्युत्कट प्रीती प्रेयसीजवळ शब्दांतून साकार करू शकेल काय ? 'माझं तुझ्यावर अत्यंत - अत्यंत प्रेम आहे. किती आहे ते मला शब्दांत तरी सांगता येणार नाही. पण जगातल्या सर्व भाषांतले प्रेमवाचक शब्द एकत्र आणले तरी माझ्या प्रेमाची त्यातून तुला यथार्थ कल्पना येणार नाही.' इतके बोलून त्याला मुक्याचे व्रत स्वीकारावे लागेल. तरल आणि तीव्र भाव जड शब्दांतून समूर्त करता येत नाहीत. हिमालयाच्या हिमवेष्टित उत्तुंग शिखरांचे सौंदर्य आपल्या भाषेच्या चिमटीत कोणाला पकडता येईल का ? आपल्या मांडीवर पहुडलेल्या लाडक्या बाळाचं मृदुल जावळ वात्सल्यभराने कुरवाळीत बसलेल्या आईच्या मुद्रेवरचा सात्त्विक संतोष एखाद्या कालिदासाला सुद्धा भाषेत चितारता येणार नाही. ' रघुवंश ' महाकाव्याच्या सुरुवातीला कालिदासाने जो पहिलाच श्लोक लिहिला आहे त्यात तो म्हणतो, ' सूर्यापासून निर्माण झालेला रघूचा महान वंश कुठे ? आणि त्याचे वर्णन करणारी माझी लघुबुद्धी - माझी सामान्य भाषा कुठे ! हा माझा प्रयत्न म्हणजे एक लहानशी होडी घेऊन महासागर तरून जाण्याची धडपड करण्यासारखे आहे.' कालिदासाचे म्हणणे विनयाचे आहे असे मला वाटत नाही. तो शब्दप्रभू होता यात शंका नाही. पण शब्दांच्या पलीकडचा कितीतरी प्रदेश असतो तो शब्दांच्या कक्षेत कसा आणायचा ?

भाषेला दैनंदिन व्यवहाराची मात्र अनेक पुटे चढलेली असतात. ती मळलेली आणि रुळलेली असते. ती अनेक वेळा खालच्या पातळीवरून बोलली जाते.

कारण केवळ एखादा गद्यप्राय व्यवहार साधणे इतकेच तिचे उद्दिष्ट असते. कुणीतरी भाषेच्या श्रीमंतीबद्दल विवेचन करताना म्हटले आहे. 'ज्या भाषेत अधिक शिव्या आहेत ती भाषा संपन्न समजावी.' मला काही खरे वाटत नाही. शिव्यांपेक्षा ओव्यांमुळे, काव्यामुळे, नाटकादी वाङ्मयामुळे आणि दैनंदिन विचारांच्या आदानप्रदानामुळे भाषा श्रीमंत होत असते. 'भाषा हे शस्त्र आहे ते जपून वापरा' असा संदेश काही रिक्षावाले देतात. स्वतः तो पाळत नाहीत. नाहीतरी संदेश दुसऱ्यासाठीच असतात. जाऊ द्या ! हा लेख इथंच पूर्ण करतो. शब्दाने शब्द वाढत जातो. नकोच ते !

●

□ □ १४

# *माणसानं किती वर्ष जगावं ?*

'जीवेत शरदः शतम्,' 'शतायुषी भव' असा आशीर्वाद देण्याची प्रथा आहे. माणसाच्या आयुष्याचं शंभर वर्षाचं माप कुणी ठरवलं ? शंभर वर्ष म्हणजे मानवी कर्तृत्वाला पुरेशी असं समजायचं का ? खरं तर मुळात जीवनाच्या क्षेत्रात शंभर धावा काढणारे वीर फारच थोडे असतात. साठी - सत्तरी ही बहुधा माणसांच्या आयुष्याची परिसीमा असते. त्यानंतर त्याचा केव्हा त्रिफळा उडेल हे सांगता येत नाही. आमचे एक प्राध्यापक तास संपवताना म्हणायचे, 'उद्यापर्यंत जगलो वाचलो तर उद्याचा तास घेईन. हसू नका. जीवनासारखं अनिश्चित दुसरं काहीच नाही. रात्री झोपलेला माणूस सकाळी जागा होतो ही केवळ परमेश्वराची कृपा असते. मी थोड्या फार विनोदानं हे बोलत असलो तरी उद्याचा दिवस ही आज तरी कल्पनेतली घटना आहे. त्यामुळं वस्तुस्थितीवर विश्वास ठेवणाऱ्या व्यक्तींनी वर्तमानकाळाबद्दलच निश्चितार्थी विधानं करावीत. भविष्यकाळाबद्दल आशा बाळगावी. भविष्यकाळ हा नियतीच्या हातात आहे.'

आमचे प्राध्यापक भलतेच तत्त्वज्ञानी वृत्तीचे होते. उद्याचा तास घेण्याबद्दल इतकं जडजंबाल जीवनभाष्य करणं हास्यापद होतं. पण यातली अतिरंजितता मान्य करूनसुद्धा त्यांच्या विचारसरणीत सुसंगती होती असं मला वाटतं. आपण सारेच भविष्यकाळाबद्दल नको तितक्या आशावादी वृत्तीनं बोलत राहतो. जणू आपण चिरंतनकाळापर्यंत जगणार आहोत अशा भूमिकेनं वागत असतो. निसर्गानं मात्र आपल्या पदरात फक्त पाच - पन्नास पावसाळे बांधलेले असतात. यातले पहिले वीस पावसाळे बालपण आणि शिक्षण यातच खर्च होतात. उरलेल्या पंचवीस तीस वर्षांत आयुष्याची घडी बसवावी लागते. त्यानंतर काहीतरी कर्तृत्व करावं लागतं. कर्तबगारीचा झेंडा हातात घेतानाच अनेकांचं आयुष्य संपून जातं. क्रिकेटच्या सामन्यात एखाद्या तडफदार फलंदाजाविषयी आपण काही अपेक्षा

बाळगाव्यात आणि त्यानं एकदोन सणसणीत चौकार मारल्यानंतर एखाद्या साध्या चेंडूवर बाद व्हावं, तशी अवस्था जीवनाच्या सामन्यात अनेक वेळा होत असते. अशा वेळी सहज मनात विचार येतो की, नियतीनं पराक्रमी व्यक्तींच्या पदरात आयुष्य टाकताना इतका कद्रूपणा का करावा ? वयाच्या सतराव्या वर्षी अलेक्झांडर सिंहासनावर आला आणि तेविसाव्या वर्षी त्याचा मृत्यू झाला. पण इतक्या कमी अवधीत जगज्जेता ही पदवी त्यानं आपल्या पराक्रमानं मिळवली. आणखी दहा वर्षे तो जगला असता तर सिकंदराच्या शौर्याला हे जग अपुरं पडलं असतं. छत्रपती शिवाजी महाराज ऐन पन्नाशीतच निजधामाला गेले. त्यांच्याही वाट्याला आणखी दहा वर्षे आली असती तर साऱ्या हिंदुस्थानाच्या इतिहासात एक 'शिवपर्व' त्यांनी रुजवलं असतं. माणसाच्या महत्त्वाकांक्षेला आणि कर्तृत्वाला पन्नास - साठ वर्षे अत्यंत अपुरी पडतात यात शंका नाही. जीवनाच्या भिन्न भिन्न क्षेत्रांत नवनिर्मिती करणाऱ्या वीरांची, प्रतिभावंतांची, संतांची आणि कलावंतांची चरित्रं पाहिली तर असं दिसतं की या महापुरुषांना जगण्याची पुरेशी संधीच मिळाली नाही. त्यांच्या कर्तृत्वाचा वृक्ष पुरता बहराला येण्यापूर्वीच त्यावर मरणाची वीज कोसळते. माझ्या मते ही हानी मानवी संस्कृतीची आहे. संस्कृतीच्या वेलीला लागलेली फुले म्हणजे हे स्वतंत्र कर्तृत्वाचे महापुरुष असतात.

जॉर्ज बर्नाड शॉने लिहिलेल्या 'बॅक टू मॅथ्यूसला' या नाटकाची मला आठवण होते. वरवर पाहता विक्षिप्त वाटणारी पण अंतर्यामी तर्कशुद्ध असलेली एक कल्पना त्याने गंभीरपणे मांडली आहे. त्याच्या मते काहीतरी कर्तृत्व करण्यासाठी माणसाला किमान चारपाचशे वर्षांचे आयुष्य मिळाले पाहिजे. सध्याच्या आयुर्मानात मनुष्याला काहीच करता येत नाही. किमान पाचशे वर्षे जगणारा मनुष्य भव्य योजना आखू शकतो. इतिहासाला आकार देऊ शकतो. जीवनाचा आनंद मन:पूर्वक घेऊ शकतो. आपल्या प्रतिभेतून आणि पराक्रमातून नवनिर्मिती करू शकतो. पुराणकाळात माणसे प्रदीर्घ काळ जगत होती असे म्हणतात. सध्या मनुष्याला मिळणारं आयुष्य इतकं तुटपुंजं आहे की आपल्या व्यक्तिगत आणि कौटुंबिक आयुष्यालासुद्धा तो स्थैर्य देऊ शकत नाही. राज्ये आणि साम्राज्ये यांची गोष्ट तर दूरच राहिली. एखाद्या लॉजिंग बोर्डिंग हाऊसमध्ये दोन दिवस भाड्याने राहावे आणि तिसऱ्या दिवशी आपले बेडिंग घेऊन स्टेशन

गाठावे तशी आमची आजची अवस्था आहे. जगाच्या या धर्मशाळेत आम्ही सगळे टेंपररी लोक आहोत. राहायला जागा शोधण्यात आणि सामानसुमानांची मांडणी करण्यातच आयुष्य संपून जातं. काही करायला अवसरच मिळत नाही. त्यामुळं शॉ च्या नाटकातील विचारसरणी सयुक्तिक वाटू लागते. पण माणसं जर प्रदीर्घ काळपर्यंत जगू लागली तर त्यामुळं जगाचं कल्याण होईल अशी ग्वाही देता येईल काय ? या प्रश्नाचा विचार केला पाहिजे. नाहीतर जगाच्या या धर्मशाळेत पाऊल ठेवायलासुद्धा उद्या जागा मिळणार नाही. आजच ती अवस्था थोडीफार आली आहे. परवा प्रवासात एकजण वैतागून म्हणाला,

' केवढी बेसुमार गर्दी आहे गाडीत. मी कितीतरी वेळ अक्षरक्ष: एका पायावर उभा आहे. दुसरा पाय ठेवायला जागाच नाही. मुंबईच्या लोकल्समध्ये तर गाडीत प्रवेश करता येत नाही आणि कसाबसा केला तर आपल्या स्टेशनवर गाडीतून उतरता येत नाही. वाढत्या लोकसंख्येचा हा परिणाम बरं ! लोकसंख्येला आळा घालण्यासाठी इतके प्रयत्न चाललेत पण संख्या मात्र फुगतच चालली आहे. पृथ्वीवरची जमीन अपुरी पडायला लागली. चंद्र - मंगळावर हाऊसिंग सोसायट्या काढल्या पाहिजेत. त्याशिवाय ही समस्या सुटणार नाही.'

त्या त्रासलेल्या प्रवाशाच्या विचारात तथ्य होतं. हजारो माणसे आज दररोज वेगवेगळ्या कारणांनी चाळिशी पन्नाशीच्या आतच मरत आहेत. विमान अपघात, आगगाड्यांचे अपघात, भूकंप, लढाया आणि दंगेधोपे हे सारे लोकसंख्या कमी करण्याचे प्रभावी उपाय असतानाही माणसांची जत्रा ओसंडून वाहात आहे आणि त्यातून जर शॉ च्या म्हणण्याप्रमाणं मनुष्य शतकानुशतकं जगू लागला तर या जगाची काय भयानक अवस्था होईल कुणास ठाऊक ?

जगण्याचा अधिकार प्रत्येकालाच आहे आणि असावा यात वाद नाही. पण जोपर्यंत आपल्या जगण्यात जीवनाचं सौंदर्य आणि सुवास आहे तोपर्यंत अट्टाहासानं जगावं. निर्गन्ध झालेल्या, शुष्क झालेल्या फुलानं जगण्याचा वेडा हट्ट का धरावा ? त्यानं आपल्या वाळून गेलेल्या पाकळ्यांचं खत घालून ही जमीन अधिक निर्मितिशील बनवावी म्हणजे उद्या या जमिनीतून अधिक टपोरी फुलं जन्म घेतील. पण हे तत्त्वज्ञान आहे. प्रत्यक्षात असं घडत नाही. जोपर्यंत जगण्यासारखं काही जवळ असतं तोपर्यंतच मरण्यात मौज असते असं गडकऱ्यांनी म्हटलं आहे. काही शतकं जगूनसुद्धा जगण्यासारखं मनुष्याला काही मिळवता येईल का ?

केवळ शरीराच्याच पातळीवरचं जगणं बहुसंख्य माणसांना माहीत असतं. त्यांच्या दृष्टीनं शरीर हे परमसत्य. शरीर हेच परब्रह्म. गडकऱ्यांना हा अर्थ अभिप्रेत नव्हता. वयाच्या चौतिसाव्या वर्षी जगाचा निरोप घेणाऱ्या या प्रतिभावंताने आपल्या आयुष्याच्या प्याल्यात साहित्यकलेचं धुंद रसायन काठोकाठ भरून ठेवलं होतं. त्यामुळं त्याचा मृत्यू झाला तरी हा कवी रसिकांच्या मानससरोवरात राजहंसाप्रमाणं विहार करीत आहे. दीर्घकाळापर्यंत धुरकट आयुष्य जगण्यापेक्षा अवघ्या पाच - दहा वर्षांत ज्याच्या पराक्रमाची ज्वाला गगनापर्यंत उफाळते त्याच्या जगण्यातलं ज्वलंत सौंदर्य जगाला अधिक आवडतं. नुसत्या जगण्याला खरोखरच कवडीइतकीही किंमत नाही. ‘ आम्ही इतकी वर्षे जगलो ’ या गर्वोक्तीला फारसे महत्त्व नसते. तुम्ही किती जगलात यापेक्षा तुम्ही कसे जगलात यावरच सारे काही अवलंबून असते. श्री. म. माटे यांनी ‘ सगाजीबुवा ’ नावाचे एक व्यक्तिचित्र रेखाटले आहे. हा माणूस पूर्ण शंभर वर्षे जगला. पण दोन वेळा नित्यनियमाने पोट भरण्यापलीकडे त्याने कशातच रस घेतला नाही. आजूबाजूच्या जगाशी त्याने कधी संवाद साधला नाही. चार भिंतीतच तो शंभर वर्षे जगला आणि एके दिवशी मरून गेला. असल्या निष्क्रिय शिळपट आयुष्यात कसले समाधान असते ? त्याच्या आयुष्यात कधी तीव्र हर्षामर्षाचे प्रसंगही आले नाहीत. त्याचा कधी क्षोभ झाला नाही आणि त्याला कधी लोभ वाटला नाही. कदाचित सगाजीबुवाचे चित्र माट्यांनी अधिक गडद रंगाने रंगवले असेल. पण मला वाटते बहुसंख्य लोक या पलीकडे पाहात नाहीत की विचारही करीत नाहीत. पंजाबातल्या दररोजच्या हत्याकांडाबद्दल एका अशाच सगाजीबुवानं आपली उदासीन प्रतिक्रिया व्यक्त केली तेव्हा मला फार आश्चर्य वाटलं. तो म्हणाला,

‘ दररोज माणसांचे मुडदे पडतात याबद्दल काळजी करण्याचं काय कारण आहे ? जे मरतात त्यांचे दिवस भरले असं समजावं आणि तिकडे दूरच्या पंजाबात काय घडतं याचा विचार करण्यात काय अर्थ आहे ? आपण आपली पायाखालची वाट चालावी. भलत्या गोष्टीत लक्ष घालू नये. ’ ही रसशून्य उदासीनता घेऊन माणसे जर दोनचारशे वर्षे जगणार असली तर ते मानवी संस्कृतीवरचे एक संकटच म्हणावे लागेल. एका ठरलेल्या आणि मळलेल्या चाकोरीतून यांत्रिकपणे चालत राहण्यात, मग ते चालणे शेकडो मैलांचे तरी या अर्थशून्य प्रवासाला काय म्हणावे ? प्रवास कसा अनेक रंगांनी रंगलेला असावा.

जमिनीवरून चालतानाही माथ्यावरच्या निळ्याभोर आकाशाचा विसर पडू नये. पायाला काटा बोचला तरी हृदयात दाटलेल्या कुणाच्या तरी धुंद आठवणीचा सुगंध लक्षात ठेवावा. आयुष्याच्या अवघड कालखंडातून जाताना ज्यानं आपल्याला हात दिला त्या हाताचा स्पर्श कधी विसरू नये. अनेक भावभावनांनी आणि विचारांनी उचंबळलेल्या मनालाच आयुष्यातला अर्थ आणि अनर्थ चांगला समजतो. अवघ्या बेचाळीस वर्षांत देहूचा तुकाराम आपल्या मनानं कल्पनेनं आणि प्रत्यक्ष व परोक्ष अनुभवानं केवढं तरी विलक्षण जीवन जगला. आम्हाला दोनचारशे वर्षांतदेखील असं जगणं शक्य होणार नाही. मराठी भाषेवर आणि साहित्यावर आपल्या अमृतवाणीचा कळस चढवणारा हा तुकोबा केवळ वीस वर्षेच एक निर्मितिशील, भावसमृद्ध असं अपूर्व आयुष्य जगला की जे भल्याभल्यांना जगूनही जगता आलं नाही. जगणं ही वस्तुतः एक नवनिर्मिती आहे. जगणं ही केवळ अवस्था नव्हे.

शॉ च्या विचारात तथ्य असूनसुद्धा थोडासा विचार केल्यानंतर मला असं वाटू लागलं आहे की दीर्घायुष्य आणि कर्तृत्व यांचा तसा काही निश्चित संबंध दाखवता येत नाही. शासकीय नोकरीत दीर्घकाळ राहिलेला एक सामान्य अधिकारी निवृत्त झाला. त्याला मिळणारे वेतन तसे जेमतेमच होते. पण तो अशा खुर्चीवर होता की दररोज संध्याकाळी घरी जाताना त्याच्या कोटाचे खिसे नोटांनी फुगलेले असायचे: आपल्या अक्कलहुशारीने वरिष्ठांना खुश करीत आणि कनिष्ठांना लाथा मारीत याने 'इमाने इतबारे' या जनतेची सेवा केली. भरपूर इस्टेट मिळवली. हुशारीबद्दल आपल्या मुलांना एके दिवशी तो म्हणाला,

'पोरांनो, सरकारी नियम आहे म्हणून मला निवृत्त व्हावं लागलं. पण नोकरीच्या काळात मी पुढच्या चार पिढ्यांची तरतूद केली आहे. ही कर्तबगारी तुमच्यातही आली पाहिजे. माझं जीवन यशस्वी झालं. तसंच तुम्हीही करून दाखवा.' या प्रकारचं कर्तृत्व असलेल्या जीवनाबद्दल काय बोलायचं ? हे कर्तृत्व शॉ ला मुळीच मान्य नव्हतं. त्याच्या जीविताविषयीच्या, कर्तबगारीसंबंधीच्या कल्पना भव्य होत्या. ज्यांच्या ठायी असीम ध्येयवाद नांदत असतो त्यांना निसर्गानं ठरवून दिलेलं सत्तर - पंचाहत्तर वर्षाचं आयुष्य कसं पुरणार ? वितीएवढ्या आकाशात गरुडाला झेप घेता येत नाही. त्याला अनंत गगनाचीच ओढ असणार.

मनुष्यानं किती काळ जगावं आणि केव्हा मरावं याविषयी अनेकांनी चर्चा चिकित्सा केली असली तरी या प्रश्नाची सूत्रे आपल्या हातात मात्र नाहीत. कुठल्यातरी अज्ञात शक्तीनं यासंबंधीचा निर्णय आपल्याकडं राखून ठेवला आहे. जीवनाची दीर्घता काय किंवा ऱ्हस्वता काय याला फार महत्त्व देण्याचं कारण नाही. जीविताचा उपयोग कसा करावा हे ज्याला कळतं त्याला ते अल्प आहे अशी तक्रार करण्याचे कारण नाही. कोणाचीही प्रेतयात्रा दिसली की लोक प्रश्न विचारतात, 'याला मृत्यू कसा आला ? मला या प्रश्नात फारसं स्वारस्य नाही. मी विचारतो, 'यानं आपलं जीवन कसं व्यतीत केलं ?' कार्लाइलने एका ठिकाणी म्हटले आहे, 'ज्याला प्रेम करायला कोणी आहे त्याला जीवन मधुर आणि आनंददायक वाटते.' हे प्रेम व्यक्तीवरचे असेल, कलेवरचे असेल, देशावरचे असेल आणि साऱ्या मानवतेचेही असेल. प्रेमाचे आयुष्य कितीही दीर्घ असले तरी ते अल्पच वाटते. जोपर्यंत प्रेम नावाची मधुर काव्यात्म भावना मनात आहे तोपर्यंत माणसाचा मृत्यू केव्हाही झाला तरी चालेल. माणसानं कसं मरावं आणि केव्हा मरावं यापेक्षा कसं जगावं हाच प्रश्न माझ्या दृष्टीनं अत्यंत महत्त्वाचा आहे. कारण मरणापेक्षाही जीवन जगायला अधिक धैर्य लागतं. मरण सोपं असतं पण जगणं मात्र कितीतरी अवघड असतं. जगण्यातला जिवंतपणा टिकवणं हे एक आव्हान आहे. जोपर्यंत ते आपल्याला पेलता येतं तोपर्यंत बिनदिक्कत बेदरकारपणं जगत राहावं.

●

□ □ १५

# पैसा आणि माणूस

सकाळी कॉलेजात जाण्याच्या गडबडीत असताना एक चाळिशीच्या सुमाराचा हाडकुळा, दाढी वाढलेला माणूस माझ्याकडे आला. मुद्रेवर केविलवाणेपणा होता. डोळे लालभडक. कपडे चुरगळलेले. काहीशा क्षीण स्वरात तो बोलू लागला, 'साहेब, थोड्याच वेळापूर्वी माझी मुलगी सरकारी दवाखान्यात वारली. आता तिचा अंत्यविधी करण्यासाठी सुद्धा माझ्याजवळ पैसे नाहीत. पैसे गोळा करण्यासाठी मी हिंडतोय. काहीतरी मदत करा. फार उपकार होतील.' मी अस्वस्थ झालो. पोटच्या मुलीच्या उत्तरक्रियेसाठी या माणसाला दारोदार याचना करीत हिंडावे लागते यापेक्षा आणखी कोणता भयानक प्रसंग असू शकेल ? मुलीचे प्रेत इस्पितळात तसेच ठेवून तिचा बाप पैसे जमवीत होता. दारिद्य्र आणि मरण यात मरणाचीच निवड शहाणा मनुष्य करील. कारण मृत्यू एकदाच मारू शकतो पण दारिद्र्याच्या पाशात सापडल्यावर पावलोपावली मरावे लागते. पॅन्टच्या खिशात हाताला लागतील तितक्या नोटा दहा - वीस रुपये असतील मी त्याच्या हातावर ठेवले. त्याच्या दृष्टीला दृष्टी देण्याचे धैर्य मला झाले नाही. ज्याच्या मस्तकावर आभाळ कोसळून पडले आहे त्याचे सांत्वन मी कोणत्या शब्दांनी करणार ? तो दुर्दैवी मनुष्य निघून गेला. मी कॉलेजात जाण्याच्या तयारीला लागलो. इतक्यात शेजारचे हरिभाऊ प्रवेश करून म्हणाले,

'काय प्रोफेसर साहेब, आत्ता गेलेल्या लफंग्याला काहीतरी पैसे दिलेत वाटतं ! तुम्हाला व्यवहारज्ञान कमीच आहे.'

मी म्हणालो, 'याठिकाणी व्यवहारज्ञानाचा काय संबंध ? बिचाऱ्याच्या मुलीचं प्रेत दवाखान्यात पडलेलं आहे. अंत्यविधीसाठी सुद्धा त्याच्याजवळ पैसा नाही. अशा परिस्थितीत सापडलेल्या माणसाला आपण थोडी मदत करायला नको का ? हा साध्या माणुसकीचा प्रश्न आहे.' हरिभाऊ मोठ्यानं हसले. मला त्यांचा रागच आला. त्यांचं हसणं मला निर्दयपणाचं वाटलं. कोणाच्या दुःखाचा

असा उपहास करणं असंस्कृतपणाचं आहे. मी काहीच बोललो नाही. हरिभाऊ म्हणाले,

'तुम्ही अजून जग पाहिलेलं नाही. या माणसानं सांगितलेली कहाणी तुम्हाला खरी वाटली काय ? त्यानं तुमची सहानुभूती आपल्या अभिनयानं मिळवली. एक नाटक, एकपात्री नाटक करून पैसे मिळवून तो निघून गेला. त्या माणसाचं नाव गाव वगैरे माहिती तुम्ही विचारलेली नसणार आणि विचारली असती तरी तुम्हाला बनवायला त्याला वेळ लागला नसता. आपला कोणीतरी आप्त दवाखान्यात मरण पावला असं सांगून लोकांकडून पैसे उकळण्याचा याचा धंदाच आहे. तुम्ही दिलेल्या पैशानं त्याची आज सकाळची सोय झाली. तो आता स्टेशनजवळच्या दारूच्या गुत्त्यात निश्चित गेला असेल. माझं म्हणणं खोटं असेल तर खात्री करून घ्या. या भागातल्या अनेक लोकांना हीच थाप मारून त्यानं दारूसाठी पैसे उकळले आहेत. माझेही पाच - दहा रुपये त्याच्या पिण्यासाठी खर्ची पडले आहेत. सहानुभूती आणि करुणा हे सद्‌गुण असले तरी त्यांचा तारतम्यानंच वापर केला पाहिजे. जो करुणेला पात्र नाही त्याला मदत कसली करता ?'

मी स्तिमितच झालो. मुलीचा मृत्यू झाल्याची खोटी सबब सांगून आपले भिकार व्यसन भागवण्यासाठी हा मनुष्य लोकांना अशा रीतीनं फसवतो ही घटना खरं तर घृणास्पद आहे. माणुसकीचा हा अवमान आहे. अंत्यविधीच्या नावाखाली जमलेल्या पैशांतून माणूस आपला नीचतम स्वार्थ साधतो हे कळल्यावर पुढे काही बोलणे शक्यच नव्हते. भर्तृहरीच्या नीतिशतकात एक श्लोक आहे, श्लोकाचा भावार्थ असा,

'शील आणि चारित्र्य सप्तपाताळात कोसळले तरी हरकत नाही. सज्जनपणाच्या नरडीला नख लागले तरी पर्वा नाही. सत्य आणि नीती यांना आग लागली तरी दिक्कत नाही. पैसा मिळवणे हे माझे परमध्येय आहे. तो मिळत असेल तर सारी नीतितत्त्वे कोसळून पडली तरी त्यांची चिंता करण्याचे कारण नाही.' ही 'अर्थनीती' आज अनेकांनी आत्मसात केली आहे. त्या दारूबाज माणसालाच दोष देण्यात काय अर्थ आहे ? सारे जगच पैशाच्या मागे बेभानपणे धावत सुटले आहे. धावताना आपल्या पायाखाली कोणती मंगलतत्त्वे चिरडली जातात याचीही त्याला जाणीव नाही. मी विचार करू लागलो. एका दारूबाजाने मला फसवले म्हणून मी अस्वस्थ झालो. पण पावलोपावली कुणीतरी स्वार्थसाधू मला

असेच फसवण्यासाठी टपून बसले आहेत. आजाऱ्याला देण्यात येणाऱ्या औषधात भेसळ नसेल असे सांगता येत नाही. तुपाच्या डब्यात चरबी मिसळणारे आणि मुलीच्या अंत्यविधीच्या निमित्ताने पैसे गोळा करणारे एकाच पातळीवर उभे नाहीत का ?

'मानापमान' नाटकात भामिनी प्रथम दरिद्री धैर्यधराला स्पष्ट नकार देते. त्याची भेट घेण्यालासुद्धा ती उत्सुक नसते. धैर्यधर शूर असेल पण शौर्याला आणि धैर्याला कसली किंमत आहे ? तिला लक्ष्मीधरच हवा असतो. सर्व प्रकारचे सुखविलास लक्ष्मीधराच्या पायाशी सहजपणे लोळत येतात. दरिद्री माणसाच्या झोपडीत जन्म काढण्याचा वेडा निर्णय भामिनी घेऊ शकत नाही. पुढे नाटकात ती धैर्यधराच्या गळ्यात माळ घालते असे दाखवले असले तरी नाटकात तसेच दाखवावे लागते. निदान नाटकात तरी संपत्तीपेक्षा शोर्य वगैरे गुण श्रेष्ठ ठरवले जातात. हेही नसे थोडके ! वास्तव जगातली भामिनी मात्र लक्ष्मीधराच्याच मागे गेल्याशिवाय राहणार नाही. प्रेमविवाह सुद्धा बँकेतली शिल्लक पाहून ठरतात. फार काय सांगावे, मंदिरातल्या देवाचे दर्शन घेताना सुद्धा दलालाच्या किंवा पुजाऱ्याच्या हातावर पाचदहा रुपये नम्रतेने ठेवावे लागतात तेव्हा कुठे देवाची भेट होते. पैसा हेच परममूल्य मानणारी तुम्ही आम्ही माणसे या परिस्थितीला जबाबदार आहोत. थोडा अधिक विचार केल्यानंतर मला फसवणाऱ्या त्या व्यसनी माणसाची मला दया आली. त्याची भूक फारच लहान होती. दिवसातून एखादी बाटली मिळाली की तो आपल्या कल्पनेच्या विश्वात रंगून जात असे. दररोज एखाद्या व्यवहारशून्य, भाबड्या माणसाला गाठून त्याच्याकडे आठदहा रुपये मिळवले की त्याची तहान भागत असे. पण ज्यांच्या भुकेला मर्यादा नाहीत अशा दरोडेखोरांनी आम्हाला लुटण्याचा जो उपक्रम चालवला आहे त्याबद्दल आम्ही काही बोलूच शकत नाही.

परवाच एक गोष्ट ऐकली. व्यक्तीचं आणि गावाचं नाव मुद्दामच सांगत नाही. नावाला फारसं महत्त्व नसतंच. ते काहीही असलं तरी कथावस्तू महत्त्वाची असते. एक पंचवीस वर्षाचा तरुण जिल्ह्याच्या मुख्य अधिकाऱ्याकडे गेला आणि त्याने मी अमूक मंत्र्यांचा मुलगा अशी आपली ओळख करून दिली. मंत्र्यांचा मुलगा म्हटल्यानंतर त्याचे स्वागत आणि आतिथ्य मोठ्याच इतमानाने करण्यात आले. 'खानपान' झाल्यावर तो तरुण म्हणाला, 'तुमच्या खाबुगिरीबद्दल

अनेक तक्रारी आल्या आहेत. काही पुरावेही आहेत. पण तुम्ही घाबरण्याचं कारण नाही. मी तुमचं संरक्षण करीन. आज मला चाळीस हजारांची ज़रुर आहे. पुढच्या आठवड्यात राजधानीला या. आमच्या पपांबरोबर आपण मनमोकळेपणानं बोलू.' त्या तरुणानं सिगरेटकेसमधून परदेशी बनावटीची उंची सिगरेट काढून आपल्या ओठात ठेवली. अधिकाऱ्याने तत्परतेने हातातल्या लायटरने ती पेटवली आणि पैसे आणण्यासाठी ते आतल्या दालनात गेले. पाच मिनिटात तरुणाच्या हाती नोटांनी भरलेली एक ब्रीफकेस देण्यात आली. दोनचार दिवसांनी आपल्याला कुणीतरी शिताफीने बनवले याची जाणीव त्यांना आली. अशाच प्रकारच्या प्रभावी अभिनयाचे आणखी काही प्रयोग करून वेगवेगळ्या अधिकाऱ्यांकडून त्या तरुणानं तीनचार लाख रुपये हस्तगत केले. कुठे कुणाचे नाव उच्चारावे, कोठे कोण असल्याबद्दल सांगावे, कुठे कशी कळ दाबावी याचे पुरेपूर ज्ञान त्या तरुणाने मिळवले होते. कोणत्याही साधारण माणसाला त्याने फसवले नाही. मोठमोठे अधिकारी हेच त्याचे लक्ष्य होते आणि आश्चर्याची गोष्ट अशी की त्या तरुणाचा संशयसुद्धा त्या उच्च अधिकाऱ्यांना आला नव्हता. एका पत्रकाराने मला ही सारी नवलकथा ऐकवली. तो म्हणाला,

'फार वर्षांपूर्वी मी लंडन येथील बड्या लोकांची गुप्त कृत्ये या नावाची कादंबरी वाचली होती. मोठ्या आसनावर आणि अधिकारावर बसलेल्या अनेक व्यक्तींच्या आश्चर्यकारक, धक्कादायक कृत्यांची त्यात माहिती दिली होती. त्या कपोलकल्पित कादंबरीवर माझा विश्वास नव्हता. हा पत्रकाराचा व्यवसाय स्वीकारल्यानंतर समाजाच्या तळाशी काय काय साचले आहे याचे मला दर्शन घडू लागले. नाना प्रकारचे गुन्हे मुख्यतः पैशासाठीच घडतात. तुला फसवणाऱ्या एखाद्या सामान्य खिसेकापूपासून सत्तेच्या आणि प्रतिष्ठेच्या उच्चासनावर बसलेल्या सन्माननीय व्यक्तीपर्यंत मिळेल तितका पैसा, जमेल त्या मार्गाने गोळा करायचा आणि त्याच्या बळावर आपल्या साऱ्या वासनांची दिवाळी साजरी करायची. ही दृश्ये मी पाहिली आहेत. प्रपंचाकडे पाठ फिरवलेला आणि समाजाला धर्मतत्त्वांची शिकवण देणारा एखादा 'धर्मगुरू' सुद्धा जेव्हा अध्यात्माचाच बाजार मांडतो आणि स्वत:ची इस्टेट थाटतो तेव्हा काय बोलायचे ? असले लफंगे साधुसंतही मी पाहिले आहेत.

मी चार पुस्तकं अधिक वाचली असतील. पण या माझ्या पत्रकार मित्राने माणसाचे रंग आणि ढंग अधिक न्याहाळले होते. झोपडीपासून राजभवनापर्यंत तो भटकला होता. एके दिवशी त्यानेच मला एका फाईव्हस्टार हॉटेलातल्या आलीशान एअरकंडिशन सूटमध्ये मऊमऊ कोचावर बसलेल्या एका महान आचार्यांचे दर्शन घडवले होते. 'आत्मरंगात' पूर्णपणे ते तल्लीन झाले होते. 'ब्रह्मानंदी लागली टाळी ! तेथे कोण देहाते सांभाळी ?' अशा अवस्थेतल्या त्यांच्या आध्यात्मिक दर्शनाने मी थक्क झालो होतो. दारूच्या घोटासाठी एक गरीब मनुष्य मला फसवून पैसे घेऊन गेला. कुठल्यातरी गुत्त्यात जाऊन बसणारा तो गरीब माणूस आणि त्या पंचतारांकित हॉटेलात आपल्या शिष्येला 'अध्यात्मज्ञानाचा प्याला' भरून देणारा तो आचार्य यांच्यात तत्त्वत: काय फरक आहे ? दोघांनीही लोकांना बनवून पैसाच उकळला. पण आम्हाला आचार्यांचा जितका राग यावा तितका येत नाही. याबाबतीत देखील आम्ही समान न्यायाची दृष्टी ठेवीत नाही. आचार्यांच्या पदरात झुकते माप टाकतो. न्याय अन्यायाचा विचार करताना आम्ही धारवाडी काटा वापरीत नाही. दीडदांडीचा तराजूच हाती घेतो.'

पैसा हे वस्तुत: एक साधन. पण आता ते साध्य होऊन बसले आहे. या पैशांनी काय विकत मिळत नाही ? माझ्या मते हा तर परमेश्वराचा अकरावा अवतार आहे. सारी भौतिक सुखे पैसा फेकला की पाळीव कुत्र्याप्रमाणे पायाशी लोळत राहतात. अहंकारी सत्ताधाऱ्यांनाही अवनम्र करण्याची क्षमता केवळ याच्यातच आहे. कारण सत्ता देखील पैशाच्या तालावरच नृत्य करीत असते. पैसा असेल तर पदवीधर पंडितांचा तांडा पदरी बाळगता येतो आणि मग विकत घेतलेल्या लाचारांच्या दरबारात द्रौपदीलाही खेचून आणता येते. कायद्याचा कीस काढणारे पंडित दु:शासनाला पैशांच्या प्रभावाने न्यायी ठरवू शकतात. शंभर गुन्हे करणाऱ्या गुन्हेगाराला मानपत्र मिळू शकते. त्याच्या सज्जनतेचा डिंडिम वाजवण्यात विकले गेलेले पंडित पुढाकार घेऊ शकतात. केव्हातरी मी वाचले होते, 'विद्येनेच मनुष्या आले श्रेष्ठत्व या जगांमाजी' या ओळीत आता एका शब्दाचा फरक करायला हरकत नाही. 'विद्येनेच' ऐवजी 'थैलीनेच' इतके म्हटले की ही ओळ निर्दोष होईल. इंदिरा गांधींचा राजरोस दिवसा ढवळ्या खून करणारा खुनी हा किती निरपराध आहे यावर न्यायमंदिरात तर्कशुद्ध व्याख्याने देणारे कायदेपंडित

थैलीचे तोंड मोकळे झाले म्हणजे आपसुक खरेदी करता येतात. उघड अन्यायाची बाजू घेऊन हा ख्यातमान वकील म्हणू शकतो, 'हा माझा धंदा आहे' जो कोणी पैसा देईल त्याच वकीलपत्र मी घेतो' हाच महान युक्तिवाद एखादी बाजारबसवीसुद्धा करू शकते. तिला दोष देण्यात काय अर्थ ?

संपत्तीचा अतिरेकी हव्यास हे अनर्थाचे मूळ आहे असे साऱ्या धर्मसंस्थापकांनी कंठरवाने सांगितले. आज त्यांचीच आम्ही मंदिरे बांधली आहेत आणि त्यांच्या अंगावर सोन्यामोत्याचे दागिने घालून देव्हाऱ्यात कोंडून ठेवले आहे. देवांचा आवाज माणसांच्या कानापर्यंत पोहोचू नये अशी पक्की व्यवस्था करून ठेवली आहे. पैसा हाच देवाचा देव. नाहीतरी देवाकडे पैसाच मागायचा असतो. कोणत्या बँकेत कोणी किती पैसे ठेवले आहेत हा आज चर्चेचा प्रमुख विषय आहे. पासबुकातला आकडा पाहिला की मनाला दिलासा मिळतो. बँकेचं पासबुक हे जगातलं सर्वोत्कृष्ट वाङ्मय आहे यात काय संशय ? माझं हे पैसापुराण ऐकून तुम्हाला कदाचित कंटाळा आला असेल. कुणीतरी मिस्किलपणाने म्हणेल, 'तुम्ही पैशाचे द्वेष्टे आहात काय ? येन केन प्रकारेण पैसा मिळवून गबर झालेल्या लोकांवर एवढी आगपाखड कशाला करता ? आपल्याला पैसा मिळवता आला नाही किंवा येत नाही या न्यूनगंडातून तुम्ही हे कडवट भाष्य करीत आहात काय ? माझं उत्तर इतकचं आहे की, 'तुम्ही माझ्यावर काहीही आरोप करा. संपत्तीकडे मी पाठ फिरवलेली नाही की तिच्या पाठीमागे उरी फुटेतो धावतही सुटलो नाही. जीवनातली काही सुखे जगाच्या बाजारात विकत मिळतात. पण विकत घेतलेली सुखे सुसंस्कृतपणे उपभोगण्यासाठी पैशापेक्षाही इतर अनेक घटक अधिक उपयोगी पडतात. आणि अधिक खरे बोलायचे तर जे केवळ पैशानेच मिळते त्यालाच अधिक किंमत देण्याच्या प्रवृत्तीमुळे माणसे काळवंडत चालली आहेत. पैसा वाढला. माणूस खालावला ही शोकांतिका भयानक आहे.

●

## □ □ १६

# एखाद्याचे नशीब

रस्त्याच्या कडेला एका फुलवाल्याने ताजी टवटवीत गुलाबाची फुलं विक्रीसाठी ठेवली होती. त्यात काही तांबडे गुलाब होते, काही पिवळे आणि पांढरे होते. ती ताजी फुलं पाहताच कुणाचंही मन प्रसन्नतेनं भरून जावं आणि त्या फुलांकडं त्यानं पुन्हा पुन्हा डोळे भरून पाहावं इतकी ती फुलं टपोरी होती. ही फुलं पाहिली म्हणजे जग सुंदर आहे याची साक्ष पटते. एक सुंदर तरुणी हसत हसत काही फुलं विकत घेते. त्यांची गुंफण करून तो गजरा तिला आपल्या केसात माळायचा असेल किंवा ती फुलं आपल्या प्रिय दैवताला - प्रियकराला सुगंधी भेट म्हणून द्यायची असेल. एखादा भक्त देवमूर्तीला वाहण्यासाठी काही फुलं घेऊन जातो. पण, 'एखादे फुटके नशीब म्हणुनी प्रेतास शृंगारिते.' एखाद्या फुलाला मात्र प्रेताचा शृंगार साजरा करावा लागतो. एखाद्याच्याच प्रारब्धात असे विपरीत का घडते या प्रश्नाला तर्कशुद्ध उत्तर मिळत नाही. काही दिवसांपूर्वी एका मुलींच्या प्रशालेला मी भेट दिली. तो खेळाचा तास होता. बहुतेक मुली क्रीडांगणावर तऱ्हेतऱ्हेचे खेळ उत्साहाने खेळत होत्या. कबड्डी, खो खो वगैरेसारखे खेळ जोरात चालू होते. खेळ पाहणाऱ्या मुलीदेखील नाचत होत्या, ओरडत होत्या. त्यांच्या उत्साहाला उधाण आलं होतं. शाळेच्या मुख्याध्यापकांबरोबर त्या क्रीडांगणावर मी फेरफटका मारला. एका झाडाखाली बारातेरा वर्षांची एक मुलगी खाली मान घालून एकटीच बसली होती. तिच्याकडं कुणाचंच लक्ष नव्हतं. मी त्या मुलीला विचारलं,

'तुला या खेळात सामील व्हावंसं वाटत नाही का ? माझा प्रश्न ऐकून त्या मुलीनं वर पाहिलं. तिच्या डोळ्यात विलक्षण खिन्नता होती. पाहता पाहता ते डोळे अश्रूंनी भरले. मला माझी चूक समजून आली. हा प्रश्न विचारून मी तिच्या वर्मावरच कठोर प्रहार केला होता. काय बोलावं तेच मला कळेना. त्या मुलीचा एक पाय अधू होता. खेळण्याची उत्कट इच्छा असूनसुद्धा तिला खेळणं शक्य

नव्हतं. कोणत्या नियमानं त्या मुलीचं फुलतं जीवन दैवानं कुस्करून टाकलं होतं ? या प्रश्नाचं देखील उत्तर मिळण्यासारखं नव्हतं. मनातल्या मनात मी त्या निरागस मुलीची क्षमा मागितली आणि त्या मुख्याध्यापकांशी इतर विषयांवर बोलू लागलो. पण त्या झाडाखाली बसलेल्या एकाकी मुलीच्या डोळ्यांतले करुण उदास भाव मला सारखे दिसत होते. अस्वस्थ करीत होते.

गडकऱ्यांनी ' एखाद्याचे नशीब ' नावाची अर्थपूर्ण कविता लिहिली आहे. त्यात ते म्हणतात, ' एखादा पर्वत आपल्या मस्तकावर शीतल चांदणं धारण करतो. चंद्रप्रकाशामुळं तो जणू न्हाऊन निघतो. एखाद्या पर्वताच्या उदरातून दुग्धधवल नद्या वाहत असतात. पण एखाद्या दुर्दैवी पर्वतातून मात्र जळती ज्वालानदी वाहताना आढळते. काही झाडांवर मेघांची वृष्टी होते. त्यांच्या हिरव्यागार पानांवर जलबिंदू नाचतात. फुलांनी आणि फळांनी ती झाडे बहरून जातात. पण एखाद्या झाडावर मात्र आकाशातून वीज पडते आणि ते फुलते झाड पूर्णपणे काळवंडून जाते. जळून जाते.' या कवितेतून गडकरी काहीच उत्तर देऊ शकले नाहीत. हे असे का घडते ? या प्रश्नाला त्यांचे उत्तर ' एखाद्याचे नशीब ' हेच आहे. ही कविता जीवनातल्या एका धगधगीत वास्तवावर प्रकाश टाकते. ती फक्त एका वस्तुस्थितीचे कथन करते. माझा प्रश्न असा आहे की नशीब म्हणजे नेमके काय ? नियतीची इच्छा किंवा प्रारब्ध हे शब्द आपल्या कानावर नेहमी पडतात. एखाद्या फुलाच्या नशिबीच प्रेताचा शृंगार किंवा एखाद्या झाडावर कडकडती वीज पडावी या घटना कोणत्या नियमानुसार घडतात ? हा प्रश्न अनुत्तरित राहतो. रामचंद्रासारख्या सज्जन राजपुत्राला वनवास का घडला ? सीतेला कांचनमृगाचा मोह का पडला ? या प्रश्नांना उत्तर देताना एका तत्त्वचिंतकाने म्हटले आहे,

' नियतीची इच्छा, प्रारब्ध किंवा प्राक्तन म्हणतात ते हेच. नियती नावाच्या एका विलक्षण शक्तीने मनुष्याच्या ललाटावर अदृश्य अक्षरांत एक लेख लिहिलेला असतो. प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धा तो पुसू शकत नाही. दैवाची इच्छा असेल तर सुईच्या नेढ्यातून उंटसुद्धा जाऊ शकतो. पण नियती विरोधी असेल तर दिंडीदरवाज्यातून मुंगीलासुद्धा आत जाता येत नाही. मनुष्य प्रारब्धासमोर एखाद्या गोगलगाईसारखा दुबळा आहे. तो पुष्कळ मनोरथ करील, पण नियतीच्या मनात नसेल तर तुच्छ माणसाच्या मनोराज्याला कवडीइतकीही किंमत

नाही. देवापेक्षा दैव अधिक बलवान असते. ते एका मात्रेने अधिक आहे. दैवासमोर देवाची मात्रा कमी पडते. एका प्रसिद्ध संस्कृत श्लोकाचा शेवटचा चरण तुम्हाला आठवतो का ? 'हा हन्त हन्त नलिनीम् गज उज्जहार !' संध्याकाळी एका कमलिनीचे रसपान करणारा भ्रमर ती कमलिनी मिटल्यामुळे तेथेच अडकून पडला. रात्र संपून सकाळ होईल आणि मग ही कमलिनी आपोआप पुन्हा उमलेल त्या वेळी आपण बाहेर पडू असे मनोरथ करीत तो भृंग तेथेच राहिला. पण प्रारब्ध असे की एका मत्त हत्तीने ती कमलिनी आपल्या सोंडेने उपटून फेकून दिली.'

नियतीची ही महती मी अनेक वेळा ऐकली आहे. दैव हेच जर सर्वसमर्थ असेल तर मग मानवी प्रयत्न निरर्थक समजावे काय ? जे ललाटी लिहिले असेल तेच घडणार असेल तर व्यर्थ धंडपड तरी कशाला करायची ? हा प्रश्न मी एका धर्मपंडिताला विचारला होता. त्यानेही उत्तर देताना माणसाची असमर्थता अनेक उदाहरणे देऊन सांगितली होती. पेटलेल्या महायुद्धाचे शेवट केव्हा आणि कसे होणार आहेत हे नियतीने आधीच ठरवून टाकलेले असते. जपानच्या दोन शहारांवर ॲटमबॉम्ब टाकले जातील ही योजना अमेरिकेची होती यापेक्षा ती नियती नावाच्या दुर्दम्य शक्तीची होती हेच बरोबर आहे. येशू ख्रिस्त, अब्राहम लिंकन, महात्मा गांधी यांची हत्या होणार हे नियतीच बोलून चुकली होती. हत्या करणारे लोक केवळ निमित्तमात्र होते. आपण त्याबद्दल काही व्यक्तींना अपराधी ठरवतो हे चुकीचेच आहे. त्या धर्मपंडितांने एक दृष्टान्त घेऊन आपले हे मत स्पष्ट केले. एखाद्या प्रचंड अजगराने क्षुद्र उंदीर तोंडात धरावा त्याप्रमाणे आपण सारी माणसे नियतीच्या विक्राळ जबड्यात सापडलेल्या केविलवाण्या उंदरासारखी आहोत. आपल्या हाती एवढेच आहे की 'ठेविले अनंते तैसेचि राहावे, चित्ती असो द्यावे समाधान.'

हा साराच युक्तिवाद मला तरी हास्यापद वाटतो. आजपर्यंतच्या मानवी प्रगतीच्या इतिहासाकडे दृष्टी टाकली तर मला असे दिसते की निसर्गातल्या प्रचंड शक्तीबरोबर अखंड झगडा करीत माणूस आज विकासाच्या अभिमानास्पद वाटेवर येऊन पोहोचला आहे. इतर सारे पशुपक्षी दहावीस हजार वर्षांपूर्वी जेथे होते तेथेच राहिले आहेत. दहा हजार वर्षांपूर्वीची चिमणी आजच्यासारखे घरटे बांधीत होती. पण दहा हजार वर्षांपूर्वीचा मनुष्य मात्र आता पार बदलून गेला आहे. तो एका रात्रीत कित्येक मजल्यांची इमारत उभी करू शकतो. अतिप्राचीन

काळी गुहेत नागडाउघडा राहणारा हा जंगली माणूस आज आपल्या वातानुकूलित, एअरकंडिशण्ड बंगल्यात तऱ्हेतऱ्हेची वस्त्रप्रावरणे परिधान करून सुखेनैव राहिला आहे. नाना प्रकारची शास्त्रे त्याने जोपासली. ज्ञान आणि संस्कृती यांची प्रचंड वाढ केली. या साऱ्या गोष्टीला तुम्ही केवळ प्रारब्ध, केवळ नियती असली ठरीव ठशाची उत्तरे देणार आहात काय ? रामायणाच्या कालखंडात समुद्र ओलांडून लंकेत आपले सैन्य कसे न्यायचे ? समुद्रावर सेतू कसा बांधायचा ? या प्रश्नाने रामचंद्रासारखा पराक्रमी पुरुष रात्रंदिवस बेचैन झाला असेल. आजच्या प्रगत मनुष्यापुढे हा क्षुल्लक प्रश्न उभा राहूच शकत नाही. वेगवान विमानांच्या साहाय्याने तो लंकेत सहजपणाने आकाशातून जमिनीवर उतरेल. हे सर्व नियतीच्या इच्छेने घडले आहे काय ? यात प्रारब्धाचा काय संबंध आहे ? मनुष्याच्या प्रयत्नवादाचा हा विजय आहे. दुर्दम्य प्रयत्नवाद्यांसमोर नियती दासीसारखी हात जोडून उभी असते. नियतीचे तुणतुणे फक्त दुबळे लोकच वाजवीत असतात. कारण त्यांना तेवढेच करण्यासारखे असते.

एका महाकाय बलाढ्य पुरुषाने वेगाने वाहणाऱ्या नदीचा प्रवाह आपल्या बाहुबलाने वळवल्याची एक पुराणकथा आहे. सुरुवातीला तो प्रचंड प्रवाह पाहून तो गांगरला. मागे वळून चालू लागला. पण त्याची इच्छाशक्ती त्याला खेचू लागली. नियती आणि त्याची मन:शक्ती असे एक द्वंद्व आता उभे राहिले. ओसंडून वाहणाऱ्या प्रबल प्रवाहात तो बेदरकारपणे उभा राहिला आणि आपली सारी सामर्थ्ये जिवाच्या आकांताने त्याने एकवटली. आता तो उसळता गरजता प्रमत्त प्रवाह त्याला एखाद्या चिमुकल्या झऱ्यासारखा क्षुद्र वाटू लागला. त्याच्या अंगाअंगातून चैतन्याची वीज खेळू लागली. त्याने अशक्य ते शक्य करून दाखवले. प्रवाहाची दिशाच बदलण्यात तो यशस्वी झाला. ग्रीक पुराणातली ही एक मार्मिक रूपककथा आहे. नियतीचा प्रवाह कितीही बलोद्धत असला तरी मनुष्य त्यावर स्वामित्व मिळवू शकतो हा आशय या प्रतीकात्मक कथेतून व्यक्त झाला आहे. इतिहासाचं प्रत्येक पान आपल्याला हीच कथा सांगेल. लोकमान्य टिळकांनी मंडालेच्या तुरुंगात अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत आणि हवामानात 'गीतारहस्यासारखा' एक महाग्रंथ कष्टपूर्वक लिहून काढावा हा टिळकांना कारागृहात कोंडणाऱ्या नियतीचा पराभव नव्हे काय ? स्वातंत्र्यवीर सावरकर विक्राळ अंधारकोठडीच्या काळवंडलेल्या दगडी भिंतीवर शृंगाराचे खंडकाव्य

लिहितात, हा प्रारब्धावर त्यांनी मिळवलेला विजय नाही काय ? डॉक्टर आंबेडकरांसारखा दलित समाजातला एक गरीब विद्यार्थी आपल्या जिद्दीवर इंग्लंड - अमेरिकेतल्या विद्यापीठांची डबल डॉक्टरेट मिळवतो आणि आपल्या भीमप्रयत्नांतून दलित समाजातला शतशतकांचा अंधार नाहीसा करतो ही घटना पुरुषार्थाची द्योतक नाही काय ? ज्यांच्यापाशी कर्तृत्व नाही, इच्छाशक्ती नाही अशा शेणामेणाच्या मुर्दाड माणसांनी नियतीचे आणि प्रारब्धाचे नगारे बडवावेत हे सयुक्तिकच आहे. टिळक तुरुंगात ग्रंथ लिहितात. वाचन - चिंतन करतात. पुरेशी साधने नसतानाही आणि मधुमेहाने तब्येत पोखरलेली असतानाही लिहिण्याची ऊर्मी त्यांना आवरत नाही. आम्हाला मात्र लिहिण्यासाठी ' मूड ' लागतो. गुळगुळीत कागद हवा असतो. डोक्यावर विजेचा पंखा फिरत असला पाहिजे. दोन ओळी लिहिण्याचे परिश्रम झाले की चहा - कॉफीसारखे उत्तेजक पेय आवश्यक असते आणि सारी सामग्री सिद्ध असूनही चार ओळींच्या पलीकडे काही सुचत नाही. झोप अनावर होते. वर्षे अशीच निघून जातात. क्षुद्र लेखकांची ही ठरीव कथा सर्वांनाच माहीत आहे. पण ज्याला आपल्या विचारांतून समाजजीवनात प्रचंड उलथापालथ घडवून आणायची असते असा क्रांतिकारक पोटात भुकेची आग पेटलेली असली तरी आपले विचार शक्य त्या सर्व माध्यमांतून प्रकट करीत राहतो. ती नियती त्याला अडवू शकत नाही.

माझ्या या विचारांना विरोध करणाऱ्यांचा युक्तिवाद मला माहीत आहे. मी एखादी पुराणकथा सांगितली तर तेही अशीच एखादी रूपकात्मक कथा माझ्यापुढे ठेवतील, ते म्हणतील,

' अहो, महारथी कर्णाचं चरित्र म्हणजे नियतीची एक लहरच आहे. त्यानं जन्मभर आपल्या प्रतिकूल नियतीशी प्रचंड संघर्ष केला. पण या संघर्षात कर्णासारख्या महान वीराचा सपशेल पराभव झालाच की नाही ? मला मात्र हा मुद्दा मुळीच मान्य नाही. कर्ण जाणूनबुजून प्रवाहाच्या विरुद्धदिशेने जन्मभर पोहत होता. तो संधिसाधू नव्हता. दुर्योधनाचा पक्ष सोडून पांडवांच्या गोटात सामील होण्याची संधी त्याने साधली असती तर हस्तिनापूरचा सम्राट महारथी कर्णच झाला असता. दुर्दैव, दुःख आणि नाना प्रकारची संकटे यांना स्वतः होऊन आमंत्रण देण्यासाठी माणसात एक प्रकारची विलक्षण जिद्द असावी लागते. माझ्या

दृष्टीनं कर्ण हे अदम्य पराक्रमाचं प्रचंड वादळ आहे. महत्त्वाकांक्षेचा तो एक जोमदार प्रवाह आहे. दिलेल्या शब्दाला प्राण गेला तरी जागणारा तो एक जोमदार सत्यवचनी आहे. तो एक पराकोटीचा प्रवाह आहे. आपल्या बाहूवर विश्वास ठेवणारा हा बलदंड पुरुष. दुसऱ्या कोणत्याही क्षुद्र साधनांचा आपल्या लौकिकासाठी तो वापर करीत नाही. वारा वाहील त्याप्रमाणे पाठ फिरविणारा तो मुत्सद्दी नव्हता. पण वाराच आपल्या दिशेने वाहावा म्हणून झंझावाताशी झगडणारा तो एक मनस्वी वीर होता. अशा माणसाचा लौकिक अर्थाने कदाचित नियतीने पराभव केला असेल. पण आपल्या पराभवाला नियतीपेक्षा स्वत: कर्णच अधिक कारणीभूत होता. ज्या वाटेने आपण चाललो आहोत ती वाट मूर्तिमंत पराभवाची आहे, काट्याकुट्यांनी भरलेली आहे हे त्याला चांगले माहीत होते. त्याला लव्हाळे होऊन जगायचे नव्हते. लव्हाळ्याच्या जगण्यापेक्षा महावृक्षाचे पतन अधिक लक्षणीय असते. क्षुद्र मेणबत्ती विझली तर तिची चर्चा होत नाही. पण आकाशातली तारका खाली कोसळू लागली की तो दु:खाचा आणि आश्चर्याचा विषय ठरतो.

कर्णाच्या बाणांनी कृष्णशिष्य अर्जुन हतबल झाला होता. कर्णाच्या पराक्रमासमोर निस्तेज झालेला अर्जुन चिंतित झाला. हे युद्ध केवळ शौर्यावरच आधारलेले असते तर ते कर्णाने निश्चित जिंकले असते. पण केव्हा तरी वीरपुरुषालाही नियती आपली लहर दाखवून चकित करते असे म्हणावे लागते. कर्णाच्या रथाचे चाक जमिनीत फसू लागले. रथावरून खाली उतरून ते चाक पुन्हा पुन्हा वर काढण्याचा प्रयत्न कर्ण आपल्या बलदंड हातांनी करीत होता तेथेच प्रारब्ध किंवा नियती आडवी उभी राहिली. अर्जुनाचे बाण वेगाने सुटत होते आणि कर्ण मात्र रथचक्र जमिनीतून बाहेर काढीत होता. ही देखील माझ्यामते एक प्रतीकात्मक कथाच आहे. येथे कदाचित काही जण म्हणतात त्याप्रमाणे प्राक्तनाचा भाग असेलही. कारण नेमक्याक्षणी, अटीतटीच्या वेळी रथचक्र गिळण्याची इच्छा जमिनीला का व्हावी ? या प्रश्नाचे उत्तर मिळू शकत नाही. ज्या प्रश्नांची उत्तरे देता येत नाहीत तेथे आपण कपाळावर हात ठेवून ' ललाटलेख ' असे उत्तर देतो. पण याचा अर्थ हा लेख आधीच कुणीतरी लिहून ठेवला आहे व आपण त्यात कानामात्रेचाही बदल करू शकत नाही असे म्हणण्यात फारसा

अर्थ नाही. गडकऱ्यांनी आपल्या ' एखाद्याचे नशीब ' या कवितेत असे म्हटले आहे,

*चाले खेळ असा जगात, बहुधा सौख्यात सारे जरी, ।*
*एखादा पडतो तसाच चुकुनी दुःखार्णवी यापरी ।।*
*पाही कोण अशा हताश हृदया ? जो तो असे आपला ।*
*देवा तू तरि टाकि अश्रू वरुनी, त्यासाठि तो तापला ।।*

●

## □ □ १७

# *हे पुत्र अमृताचे*

**प्रसिद्ध ग्रीक तत्त्ववेत्ता सॉक्रेटिस याला अथेन्सच्या न्यायालयाने** देहान्ताची शिक्षा सुनावली. सॉक्रेटिसच्या मुद्रेवर अपूर्व शांती होती. तो क्षणभर सुद्धा विचलित झाला नाही. मृत्यूचा स्वीकार आपण तटस्थतेनं केला पाहिजे, अशी त्याच्या मनाची तयारी झाली होती. पण अथेन्सच्या राजवटीनं या श्रेष्ठ तत्त्वज्ञाला इतकी भयानक शिक्षा कोणत्या अपराधासाठी ठोठावली होती ? सॉक्रेटिसनं कुणाचा खून केला होता काय ? दरोडा घालून कुणाच्या संपत्तीचा त्यानं अपहार केला होता कां ? खरं तर त्याला सत्तेची किंवा संपत्तीची तिळमात्रही लालसा नव्हती. तो ज्ञानाचा निष्ठावंत उपासक होता. जीवनाची मूल्ये काय आहेत नि काय असावीत याबद्दल तो लिहीत असे. बोलत असे. अथेन्स नगराच्या चौकात उभा राहून तो तरुणांच्या मनावर आपल्या विचारांचे संस्कार करण्याचा प्रयत्न करीत असे. नानाप्रकारचे प्रश्न तरुणांना विचारून त्यांना तो अंतर्मुख करीत असायचा. अंतर्मुख झाल्याशिवाय जीवनाचा शोध करण्याची प्रेरणा मिळत नाही. अस्वस्थता उत्पन्न झाली म्हणजे मनुष्य स्वत: आणि एकूणच जीविताचा शोध घेण्याचा प्रयत्न करू लागतो याची त्याला जाणीव होती. आपल्या टोकदार प्रश्नांनी तो शेकडो तरुणांना घायाळ करायचा आणि त्यांना नवनवीन विचारांच्या क्षेत्रात ओढून न्यायचा. हा त्याचा नित्यक्रम होता. अथेन्समधील हजारो तरुण या तत्त्ववेत्त्याच्या भजनी लागले. कारण सॉक्रेटिस त्यांना नव्या जाणिवा आणि नवी स्वप्ने देत होता. नगरात नव्या बंडखोर विचारांची वावटळ येऊ लागली. राज्यकर्ते हादरून गेले. नवे पेटते विचार वणव्याप्रमाणे पसरत चालले की सत्ताधीशांची सिंहासने भयकंपित होतात. तरुण पिढीच्या मनात विकृत विचार पेरून त्यांची मने विषारी बनवल्याचा आरोप सॉक्रेटिसवर ठेवण्यात आला आणि अखेर न्यायालयाने त्याला अपराधी ठरवले. त्याचा एक शिष्य मोठ्या युक्ती - प्रयुक्तीने आणि प्रयासाने सॉक्रेटिसाला बंदिस्त केलेल्या कोठडीत वेषांतर करून आला. तो म्हणाला,

' महाराज, वेळ फारच थोडा आहे. हे नराधम उद्या तुम्हाला देहान्ताची शिक्षा देतील. पण आपण त्यांच्या हाती सापडायचं नाही. तुम्ही ताबडतोब इथून बाहेर पडा. तुम्हाला निसटून जाता येईल अशी व्यवस्था झाली आहे. या संधीचा आपण फायदा घेतला पाहिजे. आपले प्राण मोलाचे आहेत. आपण जिवंत राहिलात तर हजारो तरुणांना प्रेरणा मिळेल. नीच सत्ताधारी आपला प्राण घेण्यासाठी टपलेले आहेत. पळून जायला ही वेळ खरोखरच चांगली आहे. इथून त्वरित निघालं पाहिजे.'

सॉक्रेटिसचा तो शिष्य अधीर झाला होता. आपल्या गुरूवर त्याची असीम श्रद्धा होती पण पळून जाण्याच्या आणि प्राण वाचवण्याच्या त्याच्या कल्पनेला सॉक्रेटिसने नकार दिला. त्यानं विचारलं,

' कातडी वाचवण्यासाठी मी इथून पळपुट्याप्रमाणं पलायन करावं असा सल्ला तू मला देतोस. तुझ्या विचाराप्रमाणं पळून जाऊन मी माझा प्राण वाचवला तर या भित्र्या, नादान सॉक्रेटिसाचं नावही कुणी उच्चारणार नाही. मरण दुःसह असेल, पण येणाऱ्या मरणाला धीरानं तोंड देणं यात खरी शान आहे. माझ्या पलायनामुळं तुझं खरोखरच समाधान होईल काय ? ज्या सत्याचं आणि मूल्याचं मी इतके दिवस प्रतिपादन केलं ते सत्य मृत्यूच्या भयानं पळणाऱ्या सॉक्रेटिसाला सांगण्याचा काय अधिकार आहे ? सत्य सांगण्याची आणि नवे बंडखोर विचार जन्माला घालण्याची जी काही किंमत असेल ती मला मोजलीच पाहिजे. शरीर वाचवण्यासाठी मी माझी अप्रतिष्ठा करून घेऊ म्हणतोस ?'

सॉक्रेटिस शिष्याला प्रश्नामागून प्रश्न विचारीत होता. आपल्याच शिष्यानं आपल्या सुटकेसाठी भेकडपणाचा रस्ता दाखवावा याचा त्याला खेद वाटला. त्यानं आजूबाजूला दृष्टी टाकली. त्या बंदिस्त कोठडीच्या भिंती जाडजूड काळ्याशार आणि स्नेहशून्य होत्या. एकुलत्या एका खिडकीचे गज मजबूत, बुलंद होते. या कोठडीतून आपल्याला एका अतिदूरच्या प्रवासासाठी - अंतिम प्रवासासाठी प्रस्थान ठेवायचे आहे याची त्याला जाणीव होती. न्यायाधीशाने दिलेला निर्णय त्याने मान्य केला होता. ज्या तत्त्वासाठी जगले पाहिजे त्या तत्त्वांची मोडतोड करून भ्याडाप्रमाणे केवळ शरीराने जगत राहण्याची त्याची इच्छा नव्हती. नाहीतरी माणसाचं हे शरीर - हाडामांसाचं आणि कातड्याचं. हे शरीर किती दिवस टिकणार ? ते टिकविण्यासाठी श्रेष्ठ मूल्यांशी लाजिरवाणी तडजोड

करण्यात काय अर्थ होता ? मला माझ्या विचारांच्या रक्षणासाठी तत्त्वांची प्रतिष्ठा ठेवण्यासाठी प्राणाचाही त्याग करावा लागला तर तो मी बिनदिक्कत करीन. माझ्या क्षुद्र जीवनापेक्षा सत्य कितीतरी पटींनी श्रेष्ठ आहे. मृत्यूचं मला भय नाही. कारण तो क्षुद्र मृत्यू माझ्या शरीरापलीकडं काहीच नेऊ शकणार नाही.

सॉक्रेटिसानं आपल्या शिष्याला परत पाठवलं. त्याची समजूत घालताना तो म्हणाला, ' मी पळून जाणं हा न्यायसंस्थेचाही अवमान ठरेल. जो विचार मी वर्षानुवर्षे आग्रहानं मांडला त्या सामर्थ्यपूर्ण विचारांची तुम्ही जोपासना करा. सॉक्रेटिस केव्हातरी मरणारच होता. तो एक सामान्य मर्त्य मनुष्य होता. त्याच्या मरणाचं दुःख करण्यात वेळेचा अपव्यय करू नका. पण सत्यविचार मात्र अमर राहिला पाहिजे.'

सॉक्रेटिसाच्या हातात जहाल विषाने भरलेला एक प्याला देण्यात आला. सैनिकांच्या उपस्थितीत त्यानं तो ओठाला लावावा अशी त्याला आज्ञा करण्यात आली. ज्या प्याल्यात आपले मूर्तिमंत मरण काठोकाठ भरले आहे तो प्याला हातात घेताना सॉक्रेटिसाचा हात किंचितसुद्धा कंपित झाला नाही. त्याच्या मुखावर एक प्रकारचं स्मित होतं. त्याच्या डोळ्यांत द्वेषाचा, क्रोधाचा किंवा अस्वस्थतेचा हलकासा तरंगही उमटलेला नव्हता. प्रसन्न तेज आणि अपार शांती यांनी ते डोळे विलसत होते. भोवताली उभ्या असलेल्या सैनिकांकडे त्यानं एकवार पाहिलं. आणि तो प्याला आपल्या ओठाला लावला. थोड्याच वेळात या महान तत्त्ववेत्याचा मृत्यू झाला. विषाच्या वेदना त्याच्या शरीराला विळखा घालीत असतानाही तो शांतच राहिला. मुद्रेवरची स्मितरेषा पुसण्याचं सामर्थ्य त्या विषात मुळीच नव्हतं. कित्येक शतकांपूर्वीची ही एक विलक्षण कहाणी आहे. तो सॉक्रेटिस विष घेताना ज्यांनी पाहिला त्यांच्या मनात त्या वेळी कोणते विचार उचंबळले असतील ? ज्या मूर्ख व दुष्ट सत्ताधाऱ्यांनी या महापुरुषाचा बळी घेतला ते सत्ताधारी मनातल्या मनात लज्जित झाले असतील. त्या वेळच्या कवींनी कवनंही लिहिली असतील. आज शेकडो वर्षांनंतर ही शोककथा मला एक विचित्र, उदास आनंद देऊन जाते. क्षुद्रांच्या जगण्यापेक्षा महात्म्यांची मरणं खरोखर कितीतरी सुंदर असतात ! जमिनीवरून सरपटणारे कीटक आणि अस्मानातून भरारी घेणारी गरुडझेप यांच्यात जे अंतर असतं तेच या जगण्यामरण्यात सामावलेलं आहे. सॉक्रेटिसचा मृत्यू हा खरं तर मानवतेच्या

अभिमानाचा विषय आहे. अशा मृत्यूतलं सौंदर्य विलक्षण असतं. पण या अद्भुत सौंदर्याचं दर्शन घ्यायला दृष्टिकोणही विशाल व्हावा लागतो. सॉक्रेटिसाप्रमाणेच आणखी काही मनस्वी माणसांचे महान व्यक्तींचे मृत्यू साऱ्या विश्वाला अंतर्मुख करणारे आहेत. अशा दिव्य आणि भव्य मृत्यूमुळे मरणाची प्रतिष्ठा वाढली आहे. महापुरुषाचं जीवन आणि मरण दोन्हीही आत्यंतिक उच्च सौंदर्याचेच आविष्कार असतात यात संशय नाही. मरणालाही इतकी गुणवत्ता, इतकी तेजस्विता आणि इतकी महानता असते हे या महनीय व्यक्तींनी जगाला दाखवून दिले.

सामान्य माणसांचे मरण ही एक साधारणतेची अतिसामान्य कथा असते. पण असामान्य माणसांचा मृत्यू हा महाकाव्याचा महत्त्वपूर्ण विषय ठरतो. मेणबत्ती विझली तर तो चर्चेचा विषय होत नाही. पण सूर्यास्त झाला तर विश्वाला अंधाराचा विळखा पडतो. सॉक्रेटिसच्या या उदात्त अंतात एक अंतहीन सौंदर्य आहे त्याचा मोह मला पडतो.

महात्मा येशू ख्रिस्ताचा मृत्यू साऱ्या मानवतेला व्याकुळ करणारा अंतर्मुख करणारा एक करुण पण दिव्य विषय आहे. कोणत्याही शब्दांतून या विषयाचं चित्र रेखाटता येत नाही. ख्रिस्ताच्या मृत्यूचं वर्णन जेव्हा वाचायला मिळतं, तेव्हा अंत:करण रक्तबंबाळ होतं. दया, क्षमा आणि शांती यांचा जणू महासागर असलेला हा महापुरुष आपल्या पवित्र आणि प्रेरक जीवनातून मंगलतेची चंद्रकिरणे जगावर उधळीत होता. पण या धर्मपुरुषाचे शब्द न रुचणारे काही दुरात्मे त्याचा द्वेष करीत होते. सज्जनता आणि दुर्जनता यांचं कधीच न संपणारं एक चमत्कारिक अनाकलनीय द्वंद्व या जगात का असावं याचं उत्तर मात्र देता येत नाही. स्वर्गाच्या शेजारीच नरक असावा, फुलांच्या भोवती काटे असावेत. सौंदर्याच्या सान्निध्यात कुरुपताही नांदावी ही विचित्र स्थिती कुणी निर्माण केली ? एक दिवस येशू ख्रिस्ताच्या मस्तकावर दुष्टांनी काट्यांचा मुकुट घातला. त्याच्या धिक्काराच्या घोषणा केल्या, उपहास केला आणि त्याला वधस्तंभाकडे त्यांनी नेले. त्याला सुळावर चढवून त्याच्या हातापायात खिळे ठोकण्यात आले, अंगातून रक्ताचे ओहोळ वाहात असलेल्या या दैवी पुरुषानं त्या असीम वेदना शांतपणे सहन केल्या. त्याच्या तोंडून कोणताही क्रोधाचा शब्द निघाला नाही ही दिव्यकथा मनाला रोमांचित करते. क्रूसावर खिळे ठोकून बंदिस्त केलेला येशू तशाही अवस्थेत अविचल राहिला. माणसांविषयी अपार करुणा आणि

सहानुभूती त्याच्या विशाल हृदयात दाटलेली होती. त्याचा कोणावरही राग नव्हता. चंदनाचा वृक्ष ज्याप्रमाणं अंतर्बाह्य सुगंधित असावा त्याप्रमाणं येशू ख्रिस्त अंतर्बाह्य एका व्यापक उदात्त कारुण्यानं भारलेला होता. खरं तर माणुसकीचा तो महामंत्र होता. प्रेमाचा तो महामेघ होता. जन्मभर हा मेघ दुःखितांवर आणि पीडितांवर मायेनं बरसत होता. उच्च धर्ममूल्यांची तो पेरणी करत होता. त्याचे वत्सल हात आर्तांच्या पाठीवरून फिरत होते आणि नेमकी हीच गोष्ट दुष्टांच्या चित्तात काटा होऊन सलत होती. त्या वेड्यांना असे वाटले की ख्रिस्ताला ठार केले म्हणजे आपला विजय होईल. माणुसकीच्या सुवासाने ओथंबलेले ख्रिस्त जीवनाचे कोवळे फूल चुरगाळून टाकले म्हणजे सुगंधाचाच मृत्यू होईल. अशी दुर्गंधी कल्पना दुरात्म्यांच्या मेंदूत वळवळत होती. अरे महामूर्खांनो ! तुम्ही एखादी तेवत असलेली पणती करंटेपणानं फोडून टाकलीत म्हणून प्रकाश तत्त्वाचा पराभव होणार आहे काय ? प्रकाश तर चिरंतन असतो. प्रकाशालाच गिळण्याचे अनेक केविलवाणे, हास्यापद प्रयत्न या जगात थोडेथोडके झाले नाहीत. अंधार कितीही माजला तरी उजेडाच्या पर्वताला गिळून टाकणं त्याला कसं शक्य आहे ?

रक्तात न्हालेला तो महापुरुष परमेश्वराची प्रार्थना करीत होता. तो दुःखी झाला होता हे खरे, पण स्वतःच्या दुःखानं नव्हे. अज्ञानी लोकांचा उद्धार कसा होणार याचं दुःख ख्रिस्ताच्या हृदयात खदखदत होतं. आपल्या अंगात ज्यांनी खिळे ठोकले त्यांना आपले फुलांसारखे शब्द तो आत्मीयतेने देऊ लागला. क्रूसावर विकल अवस्थेत असलेला हा महापुरुष त्या वेळी काय म्हणाला असेल ? तो हेच म्हणाला असेल की,

' हे परमेश्वरा, यांना क्षमा कर. कारण हे अज्ञानी आहेत. आपण काय करीत आहोत हेच यांना कळत नाही, म्हणून हे क्षमेला पात्र आहेत. द्वेषानं प्रेम जिंकता येत नाही. प्रेमानंच प्रेमाची वाढ होत राहते. परमेश्वरा तुझ्या पवित्र प्रेमाचा प्रकाश अंधारलेल्या अंतःकरणात पसरू दे. ईश्वरी प्रेमाची ज्योत प्रकाशित झाली की, सारे अन्याय आणि अत्याचार गळून पडतील. तू ज्या कामासाठी मला पृथ्वीवर पाठवलं होतंस ते शुभवर्तमान आता मी जगात सर्वत्र सांगितलं आहे. ज्यांच्यापाशी हा पवित्र संदेश आहे तो कधीच मृत होत नाहीत, नष्ट होत नाहीत आणि भ्रष्टही होत नाहीत. मला मारल्यानं मी मरू शकत नाही. परमेश्वरा, या अज्ञ बाळांना कृपा करून क्षमा कर.'

महात्मा येशूच्या बलिदानाला दिव्यत्वाची झळाळी आहे. क्रूसावर मृत्यू आलेला हा वंदनीय पुरुष मनुष्यजातीच्या उन्नतीचे एक नितांत सुंदर स्वप्न फुलवून गेला. काय असेल ते असो ! महापुरुषाचं मन आणि कार्य त्याच्या काळात ते जिवंत असताना जगाला कधी कळलंच नाही. शीतल सावली देणाऱ्या महावृक्षावर कुऱ्हाडीचे घाव घालून त्याला उद्ध्वस्त करण्याची प्रवृत्ती मात्र सनातन आहे. पण आश्चर्याची गोष्ट अशी की, प्रहार करणारी कुऱ्हाडही त्या वृक्षाच्या संगतीनं सुगंधित होते.

सॉक्रेटिस आणि येशू ख्रिस्त यांच्या आत्मार्पणाला अनेक शतके उलटून गेली. ज्या तत्त्वांच्या प्रतिष्ठापनेसाठी त्यांनी मृत्यू स्वीकारला ती तत्त्वे माणसांनी खरोखरच स्वीकारली काय ? पण जाऊ द्या ! शंभर बीजे पेरल्यानंतर त्यातली दोन चारच उगवून आली तरी ती सृष्टीचा चेहरा मोहरा बदलू शकतात. येशू आणि सॉक्रेटिस म्हणजे अमृताची बीजे आहेत. ही बीजे कधीच नष्ट होऊ शकत नाहीत. हे अमृताचे पुत्र मृत्यूतून जीवनाचा अक्षय सुवास देत राहिले आहेत. त्यांच्याच वाटेने पुढे अब्राहम लिंकन आणि महात्मा गांधी गेले. या असामान्य महामानवांना मारणारी क्षुद्र माणसे भूतकाळाच्या काळोखानं केव्हाच गिळून टाकली. त्यांचा मागमूसही उरला नाही. पण हे महात्मे मात्र जीवनाच्या अमृताचं सिंचन मानवजातीवर करीत जिवंत राहिले आहेत. हे अमृताचे पुत्र म्हणजे मानवत्वाची उत्तुंग शिखरे आहेत. दऱ्याखोऱ्यात राहणारी आम्ही सामान्य माणसे आकाशात उंच गेलेल्या या शिखराकडे पाहून म्हणतो की, 'आम्हालाही इतक्या उंचावर केव्हातरी जायचं आहे. जाण्याचा आम्ही प्रयत्न करू. अमृतपुत्र आम्हाला मार्ग दाखवतील.'

●

□ □ १८

# स्मशानाचे गाणे

'स्मशान' हा काय लेखनाचा विषय आहे? पण कवी गोविंदाग्रजांनी 'स्मशानातले गाणे' या नावाची एक दीर्घ कविता लिहिली आहे. जगातल्या स्वार्थी व्यवहाराचा कंटाळा येऊन, जगाचा त्रास चुकवावा म्हणून कवी स्मशानात गेला. त्याला ते 'शांतिस्थान' वाटले. रात्रीच्या वेळी स्मशानातली पिशाच्चे एकत्र आली. हसू लागली. त्या भुतांचे मग गाणे सुरू झाले.

*धन्य धन्य ती स्मशानभूमी*
*धन्य येथली भुतेही आम्ही!*
*सदाही देवा या सुखधामी*
*घडवी वसती; सजीव जगती,*
*नको नको आम्हास!*

आम्हाला ही स्मशानभूमी आणि इथला निवांत सुखाचा वाटतो. भुतांचे हे जग माणसांच्या जगापेक्षा कितीतरी स्वच्छ आणि पवित्र आहे. माणसे स्वार्थाने, दुष्टपणाने बरबटलेली आहेत. आम्ही पिशाच्चे मात्र निःस्वार्थी आहोत. या माणसांच्या जगातल्या एक एक लीला काय सांगाव्यात? सजीव असलेल्याला लाथा मारतात. मेल्यावर मात्र खांद्यावर घेतात. असला उरफाटा सन्मान या जगात वाट्याला येतो. शास्त्रांची वचने तोंडपाठ असलेला हा माणूस रूढीचा मात्र गुलाम बनलेला आहे. तो समानतेच्या बाता मारतो, वरिष्ठांच्या पायी लोळण घेतो आणि कनिष्ठांना मात्र लाथा मारीत सुटतो. आम्ही भुते असे कधीच वागत नाही. आमचं जीवन आणि आमचं जग या पातकी माणसांच्या जीवनाहून सर्वस्वी पवित्र आणि नीतिमान आहे.

स्मशानातलं हे भुतांचं गाणं कवी ऐकतो आणि हे अमोल गाणं सर्वांना ऐकवण्याचा विचार करतो. तो म्हणतो,

*वरूनि जग दिसते सुंदर*
*"राम' जाणतो 'क्या है अंदर'*
*स्मशानातले गाणे सत्वर*
*अमोल म्हणूनी टाकि उधळूनी चहूंकडे*
*जगतांत*

गडकऱ्यांची प्रतिभा आणि कल्पकता विलक्षण आहे यात शंका नाही. जिवंत जगापेक्षा स्मशानातलं मृतांचं जग कसं सोज्वळ आणि सुसंगत आहे हे त्यांनी या दीर्घ कवितेतून चित्रित केलं आहे. वास्तवतेचं हे चित्रण विचारप्रक्षोभक आहे. नाही तरी जिवंत माणसांच्या जगात जितकी भूतपिशाच्चं आहेत तितकी आणि तशी कोणत्याही स्मशानात नसतील. आज माणसांचीच भुते बनली आहेत. या भुतांना कोण काय सांगणार ?

गडकऱ्यांची ही कविता मी अनेक वेळा वाचली. भयानक, अद्‌भुत आणि करुणरसाचं हे काव्यमय मिश्रण आपल्या मनाला प्रखरतेनं होरपळून काढतं. 'स्मशानातले गाणे' हे शीर्षकच मुळी चमत्कारिक आहे. चमत्कृतीतलं आणि विसंगतीतलं विचित्र सत्य शोधून काढणं हा गडकऱ्यांच्या प्रतिभेचा धर्मच होता. जिवंतपणी माणसाच्या पदरात काटे आणि दगडधोंडे टाकणारं हे जग मृत्यूनंतर मात्र त्याच्या तिरडीवर फुलांचा वर्षाव करतं. उपासमारीनं मरणाऱ्या माणसाला अन्नाचा घास कोणी देत नाही. मेल्यावर मात्र त्याला अन्नपिंड मिळतो. असल्या अनेक विपरीत विदारक 'मानवी' वर्तनावर गडकऱ्यांनी या कवितेतून प्रहार केले आहेत. त्यांच्या ठायी सामाजिक जाणीव नव्हती अशी टीका करणाऱ्या निर्बुद्ध टीकाकारांनी ही कविता एकदा वाचून पाहावी. आपण माणसं समजतो की आपलं जग म्हणजे सौंदर्याचं, प्रेमाचं आणि शांतीचं माहेरघर आहे. माणूस म्हणजे ज्याच्या ठिकाणी 'माणुसकी' आहे तो. पण या जगात माणसानं जी प्रचंड उलथापालथ करून ठेवली आहे ती पाहिल्यावर जगाचा अभिमान वाटावा असे काही आहे काय ? बापाचा खून करून आईला देशोधडीला लावणारे सुपुत्र या जगात प्रतिष्ठेनं जगतात. सत्तेच्यां आसनावर बसून वाममार्गानं अब्जावधी रुपये गोळा करून परदेशी बँकांत सुरक्षितपणे ठेवणारे लोक मुत्सद्दी आणि हुशार मानले जातात. निष्पाप बायकांच्या अज्ञानाचा आणि असहायतेचा गैरफायदा घेऊन त्यांचं वस्त्रहरण करणारे दु:शासन या जगात नीतिविशारद म्हणून ओळखले जातात. दुष्काळी कामावर काम करणाऱ्या अर्धपोटी मजुराचं वेतन गिळंकृत

करणाऱ्या अधिकाऱ्यांना कार्यक्षमता दाखवल्याबद्दल या जगात बढती मिळते. अन्नात आणि औषधांत भेसळ करणारा व्यापारी देवाचं मंदिर बांधून त्याला पक्वान्नांचा नैवेद्य दाखवतो आणि धर्माची ' सेवा ' करीत राहतो. आश्चर्य असं की तो जगन्नियंता परमेश्वरसुद्धा नैवेद्याची लाच घेऊन संतुष्ट होतो आणि त्या धर्मात्म्याच्या पदरात धनराशी ओततो. हे सर्व आपण पाहात नाही काय ? हे सर्व आपण सहन करीत नाही काय ? आणि तरीही या जगाची स्तुतिस्तोत्रे गात नाही काय ? गडकऱ्यांची ही कविता मनाला धक्के देते. कुणीतरी म्हणेल, ' अहो, बोलून चालून ती एक कविता आहे. कविता कुणी मनावर घेत असतात का ? कल्पनेच्या भरात खरडलेल्या या कवितेला तुमच्या साहित्यात स्थान असेल पण म्हणून या असल्या कवितेला मनात स्थान देण्याचे काहीच कारण नाही. काहीतरी निरर्थक भरकटत राहाणं हा या कवींचा उद्योगच असतो. कशाला हा कवी मरायला त्या स्मशानात गेला ? आपल्या घरी स्तब्ध बसून राहिला असता तर असली मूर्खपणाची कविता त्याला सुचली नसती. '

पण या काव्यातल्या कल्पनेतून एक ज्वलंत सत्य आपल्याला सारखे अस्वस्थ करतं. गडकरी भित्रे होते, त्यांना स्मशानाची फार भीती वाटायची ही आख्यायिका मला माहीत आहे. ' मेलो तरी मी एकटा स्मशानात जाणार नाही. चारचौघांना घेऊन जाईन ' ही त्यांची कोटी सर्वप्रसिद्ध आहे. पण असल्या तपशीलांना काही महत्त्व नाही. माणसानं जगाला स्मशानाची अवकळा आणली हे काही खोटं नाही. हॅम्लेट नाटकातला हॅम्लेट अत्यंत अस्वस्थ होऊन म्हणतो, ' हे जग सडून गेलं आहे. मूर्तिमंत नरकानंही नाकाला पदर लावावा इतकी दुर्गंधी इथं सुटलीय. ' पण माणूस हा विचित्र प्राणी आहे. तो परिस्थितीशी जुळवून घेतो. माणसाइतका लवचिक आणि स्थितिस्थापक असा दुसरा प्राणी तरी आढळत नाही. दुर्गंधीची इतकी सवय झाली की आता दुर्गंधीचाच आम्हाला सुगंध येऊ लागला. ज्यांना हे सहन होत नाही त्यांना विश्रांती कुठं मिळणार ? एखाद्या तीर्थक्षेत्री जावं तर त्या तीर्थस्थानाचं बाजारी केंद्र झालेलं दिसतं. देव तिथं भेटतच नाही. दैत्यांनी त्याच्याभोवती गराडा घातलेला असतो. या धूर्त शोषकांपासून माझी मुक्तता करा, असं देवाचं आक्रंदन चालू असतं. ते ऐकायला येऊ नये म्हणून झांजा आणि नगारे वाजत असतात. देवाची प्रार्थना कुणाच्याच कानावर येत नाही. ' देवांच्या मदतीस चला तर ' ही कवी केशवसुतांची ' तुतारी ' मला आठवते. ज्यानं सारे

परिग्रह, सारी सत्ता आणि संपत्ती क:पदार्थ मानून फेकून दिली त्या देवाच्या अंगावर हिऱ्यामोत्याचे दागिने घालून त्याला आपल्या बाजूला वळवण्याचा प्रयत्न भक्तमंडळींनी चालवलेला असतो. देवळात देखील दुकानदारी कसब दाखवणाऱ्या माणसांपुढं देवही दुबळा ठरतो हेच खरं !

स्मशानाच्या वातावरणात माणसाचं अंतर्मन जागं होतं. तो वास्तवाच्या पातळीवर येऊन विचार करायला लागतो. कुणाचं तरी प्रेत चितेवर निमूटपणानं जळत असतं. जगाच्या आधी व्याधीतून आणि शरीराच्या उपाधीतून सुटलेला आत्मा स्वातंत्र्याचं गीत गात असेल. मृताला स्मशानापर्यंत पोचवायला आलेले आप्त नातलग अश्रू गाळीत असतात. हे अश्रू मात्र बहुधा सच्चे असतात. प्रामाणिकपणाचे असतात. अशाच एका प्रसंगी माझ्या एका परिचित तरुणानं भावनावेगानं हुंदके देत माझ्या खांद्यावर मान टाकली. तो धायमोकलून रडत होता. मी त्याच्या पाठीवर हात फिरवीत नि:शब्द सांत्वन करीत होतो. शोकाचा उमाळा ओसरल्यानंतर तो मला म्हणाला, ' काय सांगू तुम्हाला ! या मसणवटीत मी खोटं बोलणार नाही. त्या पेटलेल्या चितेत माझ्या वडिलभावाची राखरांगोळी होत आहे. खरोखर देवमाणूस होता हो तो ! पण मी त्याला फार छळलं. त्याला मीच भिकेला लावलं. त्याच्या वाट्याची संपत्ती - मालमत्ता मीच बळकावून बसलो. आपली बायका - पोरं घेऊन तो गावोगावी भटकत होता. मी त्याची विचारपूसही केली नाही. माझ्या शिक्षणासाठी त्यानं कैकवेळा आपल्या पोरांच्या तोंडचा घास काढून घेतला. मी मात्र त्याला उपाशी मारलं. माझ्या बड्या नोकरीच्या धुंदीत त्याचा वाटेल तसा अपमान केला. हे पाप कुठं फेडू ? माझा भाऊ आता कुठं मिळणार ?'

तीव्र पश्चात्तापानं तो ओक्साबोक्शी रडत होता. स्मशानातल्या त्या अश्रूंनी त्याचं पाप कदाचित धुऊन गेलं असेल. वडीलभाऊ बाहेरच्या जगात पावलोपावली ठेचा खात असताना याला कधी आपुलकी वाटली नाही. पण स्मशानात मात्र अनुतापाच्या चटक्यांनी तो सावध होत होता. मी त्याचं कसंबसं सांत्वन केलं. पण त्या वेळी एक शंका मनाला दंश करीत होती. हा पश्चात्ताप खरा असला तरी याचा परिणाम किती वेळ टिकणार आहे ? स्मशानातल्या वातावरणात आलेली जागृती बाहेरच्या जगात तशीच राहील का ? काही सांगता येत नाही. स्मशानातला हळवेपणा आणि दु:ख घरी परतल्यानंतर बहुधा नाहीसं

होतं. हे क्षणिक, स्मशानवैराग्य आहे. पण क्षणभर का होईना माणसाला माणसुकीच्या जवळ घेऊन जाणारं स्मशान जर एखाद्या कवीला ' शांतिस्थान ' वाटलं तर ते चुकीचं नाही. माणसाचा सारा गर्व, सारा पराक्रम, सारं पांडित्य या स्मशानाच्या परिसरात गळून पडतं. पेटलेल्या चितेत सारं जळून जातं. पाठीमागं काहीच शिल्लक उरत नाही. जगताना जे जिवाच्या मोलाचं वाटलं ते जीव गेल्यानंतर सर्वार्थानी निर्जीव ठरतं. मूठभर राख होते. मातीला माती मिळून जाते. कुसुमाग्रजांच्या शब्दात सांगायचं तर, ' मातीवर चढणे एक नवा थर अंती. '

स्मशान ही जशी शांतीची भूमी आहे तशीच ती समतेची भूमी आहे. सर्वांनाच इकडे यायचे आहे. स्मशानाची ही क्रांतिभूमी सर्वांना आश्रय द्यायला सिद्ध आहे. एखाद्या भणंग भिकाऱ्याप्रमाणे त्रिखंड जिंकणाऱ्या सम्राटालाही इथल्या मातीशी समरस व्हावे लागते. जन्मभर केलेल्या अन्यायालाही आणि अन्यायी माणसालाही इथेच चिरकाल विश्रांती मिळते. मारणारेही इथेच शेवटी वस्तीला येतात. सारी कृत्रिम लेबले, अधिकाराचे आणि सत्तेचे दर्प, विद्वानांची प्रशस्तिपत्रके, मिळालेल्या पदव्या आणि धर्माचे अहंकार, घराण्याचे पीळ सारे सारे येथे नष्ट होतात. पवित्रही जळून जाते आणि अपवित्रही भस्म होते. स्मशानाची ही महती केव्हातरी प्रत्येकालाच कळते. गावाच्या बाहेर दूरवर स्मशान असले तरी आणि त्या वाटेकडे जायची इच्छा नसली तरी जी वाट कधी चुकत नाही आणि चुकवता येत नाही अशी ही मसणवाट सर्वांना वाटेला लावते हा केवढा चमत्कार आहे ?

पण अलीकडे स्मशाने सुद्धा पूर्वीसारखी रुक्ष आणि भयाण राहिली नाहीत. पूर्वी स्मशानाचं वातावरण भीतीदायक असायचं. निर्मनुष्य, नीरस वातावरणात दूरवर माळरानात एखाद्या ओढ्याच्या काठावर हे स्मशान उभं असायचं. आता ती अवस्था संपलेली दिसते. काही दिवसांपूर्वी गुजरातमधल्या एका लहानशा शहरात काही कामासाठी गेलो होतो. सकाळच्या वेळी माझ्या मित्राबरोबर फिरत फिरत सुव्यवस्थित उद्यानात आलो. त्या बागेत तऱ्हेतऱ्हेचे वृक्ष होते. नानाप्रकारची फुलझाडं होती. शोभिवंत कारंजी होती. पानाफुलांच्या प्रसन्न गंधानं आणि पक्ष्यांच्या चिवचिवाटात निसर्गाच्या निकट सहवासात आल्याचा आनंद वाटत होता. शहरातल्या वर्दळीचा, गिरण्यांच्या भोग्यांचा आणि गाड्या मोटारींचा हलकासा सुद्धा आवाज येत नव्हता. त्या प्रसन्न गूढ वातावरणात वावरताना मन

शांत झालं. मी मित्राला म्हणालो, ' इथं आल्यानं मन कसं शांत सुस्थिर झालं आहे. निसर्गाच्या सहवासात माणूस साऱ्या दु:ख, वेदना विसरतो; असं वाटतं की इथून हालू नये.'

तो मित्र हसला आणि म्हणाला, ' तुझं म्हणणं खरं आहे. हे उद्यान म्हणजे स्मशानभूमी आहे. याला ' शांतीधाम ' असं नाव दिलं आहे. स्मशानाविषयी जी काही भीती मनात असते ती किती व्यर्थ असते हे लक्षात येतं. माणसानं जग घाणेरडं बनवलं तरी स्मशानाला सुंदर रूप द्यावं ही आनंदाची गोष्ट आहे.'

दोन दिवस विश्रांती घेण्यासाठी कुठंतरी गेलो तर एखाद्या सुंदर ठिकाणी राहावं असा आग्रह आपण धरतो. जिथं चिरविश्रांती घ्यायची आहे ते स्मशान, ' सौंदर्यधाम ' असावं असं वाटायला हरकत नाही. आपल्याला एकट्यानंच तिकडे यायचं आहे. बरोबर कुणी येत नाही. कुणाची साथसंगत मिळत नाही. पण सृष्टीच्या अंतरंगात आपल्या देहाचा प्रत्येक कण मिसळावा, आपण सृष्टीच्या प्रत्येक कणाशी एकरूप व्हावं ही इच्छा निकोप आहे. सुंदर आहे.

पाळण्यापासून स्मशानापर्यंत माणसाचा हा प्रवास असतो. स्मशान हा अंतिम किनारा. पूर्णविराम. अस्तित्वाची अखेर. सुखदु:खाचा लोप. जीवन नाटकाचं भरतवाक्य. ही आहे भैरवी. सूर संपतात. स्वर मौनावतात. स्मशान हे एक चिरंतन सत्य. कधीच कुणाला पुसता न येणारे हे सत्य स्वीकारलेच पाहिजे.

मला वाटते स्मशानाचे गाणे इथेच थांबवावे.

□ □ १९

# माणसाचे रंग

'अहो हा एक अत्यंत चमत्कारिक माणूस आहे बरं! त्याच्या मनाचा अंदाजच येत नाही. फसव्या पाण्यासारखा त्याचा स्वभाव आहे. विश्वासानं पाय टाकावा आणि तो खोलात जावा तसं आहे हे प्रकरण. कधी कधी इतका चांगला वागतो क़ी धर्मराजानं सुद्धा याच्या पायाचं तीर्थ घ्यावं आणि कधी दुर्योधनानंच याची ट्यूशन लावली होती काय अशी शंका यावी. तुम्हाला म्हणून सांगतो, सावध रहा. अगदीच अनप्रेडिक्टेबल माणूस आहे हा. अहो याच्या बायकोला तरी हा नीटसा कळलाय् की नाही कुणास ठाऊक ?'

एक गृहस्थ मला सांगत होते. मला हसू आलं. खरं तर हे वर्णन साऱ्याच माणसांना लागू पडेल. माणूस हे एक विलक्षण गुंतागुंतीचं रहस्य आहे. आजपर्यंत त्याच्या मनोवृत्तीवर व वर्तनावर अनेक प्रतिभावंतांनी प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न केला. व्यासांच्या महाभारतात नाना प्रवृत्तींची अनेक माणसं आपल्याला भेटतात. पण प्रत्येकाची तऱ्हा निराळीच आहे. एकजण दुसऱ्यासारखा नाही. प्रत्येक माणूस वेगळा व अनन्यसाधारण आहे. त्याचा चेहरामोहरा, त्याच्या स्वभावातल्या भिन्न भिन्न छटा, त्याचं बोलणं, चालणं, खास त्याचं स्वत:चं असं असतं. निसर्गानं किंवा परमेश्वरानं असंख्य माणसं निर्माण केली पण प्रत्येकाच्या ठायी काहीतरी निराळेपण ठेवले. अमुक एखादा मनुष्य आपल्याला समजला असा दावा करण्यात फारसा अर्थ नसतो. तर्कबुद्धीच्या चिमटीत माणूस कधी पकडता येत नाही हेच खरं! लेखक - कवींनी आपल्या साहित्यातून माणूस रंगवला असला तरी त्यांना तो सर्वार्थांनी समजला असेल असं म्हणता येत नाही. सर्व प्राण्यात अत्यंत विचित्र आणि रहस्यमय असा कोणता प्राणी आहे या प्रश्नाचं उत्तर माणूस! केवळ माणूस!! असंच द्यावं लागेल.

खरं तर मनुष्य हे निसर्गाचं सर्वांत सुंदर रूप आहे. त्याच्यामुळं हे जग सुंदर झालं. मनुष्यानंच संस्कृतीची प्रचंड इमारत हजारो वर्षे खपून उभी केली. निसर्गावर

मात करून तो आपल्या शक्तीची आणि बुद्धीची ध्वजा फडकावीत आहे. इतर सर्व प्राणी कोणतीच नवनिर्मिती करू शकत नाहीत. मनुष्याला मात्र कल्पनेचे पंख आहेत. तो स्वप्नं चितारू शकतो आणि प्रत्यक्ष व्यवहारात ती उतरविण्यासाठी झगडत राहतो. परमेश्वरानं माणूस कदाचित उत्पन्न केला असेल. पण आता मनुष्य परमेश्वराच्या सिंहासनावर बसण्याची धडपड करीत आहे. हजारो वर्षांपूर्वी हा माणूस डोंगरकपारीत नागडाउघडाच राहात होता. अंग झाकायलाही त्याच्यापाशी वस्त्र नव्हतं. पशुपक्ष्यांचं कच्चं मांस तो खात होता. पण आजचा 'अप - टु - डेट' मनुष्य मात्र 'फाईव्ह स्टार' हॉटेलमधल्या सुसज्ज, एअरकंडिशण्ड डायनिंग हॉलमध्ये संगीताचे सुस्वर ऐकत, डिशमधला मांसयुक्त पदार्थ हातातल्या काट्याचमच्याने अलगद आपल्या जिभेवर ठेवतो. त्याच्या अंगावर उंची कपडे आहेत आणि ओठांशी सुगंधी सिगरेट आहे. एखाद्या गुहेपासून ते आधुनिकतम बंगल्यापर्यंत त्याच्या निवासस्थानात जो बदल होत गेला तो त्याच्या हुषारीचे द्योतक आहे, हे निर्विवाद. माणसानं हजारो भाषा निर्माण केल्या, साहित्य लिहिलं, कला जोपासल्या. हा माणूस आपल्या प्रज्ञेचा आणि प्रतिभेचा झेंडा नाचवीत राहिला.

पण तरीही हा माणूस आपल्या आकलनाच्या सीमेत सहसा येत नाही. माणूस नावाचं हे रहस्य उलगडणं माणसाच्या बुद्धीला तरी शक्य दिसत नाही. शेक्सपियरनं आपल्या एका नाटकात म्हटलं आहे, 'माणसं जशी दिसतात तशी ती असत नाहीत आणि जशी असतात तशी ती दिसत नाहीत. एखादं फळ बाहेरून ताजं टवटवीत दिसतं पण आतून ते किडलेलं नसेल, असं खात्रीपूर्वक सांगता येणार नाही. एखाद्या सुंदर आणि पवित्र दिसणाऱ्या व्यक्तीच्या अंतःकरणात कितीतरी घाणेरडे विचार, विकार असू शकतात.' शेक्सपिअर हा जीवनावर भाष्य करणारा आणि माणसाचं माणूसपण रेखाटणारा श्रेष्ठ नाटककार होता. आपल्या छत्तीस नाटकांतून त्यानं शेकडो स्त्री - पुरुष चितारले आहेत. त्याच्या कुंचलीतून माणसांच्या इतक्या भिन्न भिन्न प्रतिमा साकार झाल्या आहेत की व्यासानंतर शेक्सपिअरलाच 'प्रतिभासम्राट' म्हणावं लागेल. विविध प्रवृत्तींची ही माणसं त्यानं कुठं पाहिली असावीत ? लंडनच्या ग्लोब थिएटरात नाटक पाहायला येणाऱ्या प्रेक्षकांच्या प्रवेशपत्रिका तपासणं आणि त्यांची घोडी सांभाळणं ही कामं त्याच्या वाट्याला आली होती. सर्व स्तरांतील बरीवाईट माणसं त्याला

थिएटरात भेटली असावीत. ' सारं जग ही एक रंगभूमी आहे ' हे त्याचे उद्‌गार प्रसिद्धच आहेत. माणसांचा अभ्यास या रंगमंदिरातच त्याला झाला असावा म्हणून तर नाना रंगातली, नाना मुखवटे धारण केलेली चित्रविचित्र माणसं तो साकार करू शकला. ' ऑथेल्लो ' नाटकात निष्पाप डेस्डिमोना, भाबडा दिलदार व शूर ऑथेल्लो आणि कुटिलबुद्धी, मत्सरी, कारस्थानी, नीच आयागो ही तीन वेगवेगळ्या प्रकृतीची माणसे एकत्र आणून त्यांच्यातून त्यानं एक विलक्षण नाट्य निर्माण केलं आहे. ऑथेल्लोसमोर नम्रतेचा आणि मैत्रीचा मुखवटा घेतलेला आयागो त्याला दंश करण्यासाठी टपून बसलेला आहे. काही टीकाकार आयागोसारखा नीचतम, दुष्टबुद्धी मनुष्य संभवनीय नाही अशी टीका करतात. पण कारण नसताना दंश करणारे मानवी सर्प पुष्कळ असू शकतात. सुगंधी फुलांवर आणि फळांवर गरळ ओकण्याचा आनंद त्यांना घ्यायचा असतो. ऑथेल्लो आणि डेस्डिमोना ही फुलं त्या विषारी वणव्यात कशी जळून जातात हेच शेक्सपिअरनं सांगितलं आहे. पण त्याच्याही प्रतिभेला दिसणार नाहीत अशा माणसांच्या अनेक तऱ्हा असू शकतात.

महाभारतातली कर्णाची व्यक्तिरेखा अत्यंत गुंतागुंतीची आहे. या ' सूतपुत्रा ' च्या हृदयाच्या एका कोपऱ्यात द्रौपदीविषयी उत्कट आसक्ती दडलेली आहे. कर्ण मनोमन द्रौपदीवर अनुरक्त आहे. आपल्यासारख्या वीरोत्तमाला ती तेजस्विनी द्रौपदी मिळाली नाही ही निराशा त्याला घायाळ करते. द्रौपदी हे त्याचं एक स्वप्न आहे. पण याच द्रौपदीचं भर दरबारात वस्त्रहरण होत असताना कर्ण या अश्लाघ्य प्रकारात रस घेत होता असं जेव्हा मी वाचलं तेव्हा मी गोंधळून गेलो. कर्णासारखा उदात्त प्रेमिक द्रौपदीच्या विटंबनेला पाठिंबा देतो, हे विपरीत चित्र व्यासांनी का रंगवलं असेल ? मला ते सुसंगत वाटेना. पण उदात्ताच्या पातळीवरून उन्नत माणसं घसरू शकतात. ज्या द्रौपदीनं आपल्याला नकार दिला ती दरबारात अपमानित, लज्जित होत आहे याचा आसुरी आनंद कर्णाला झालेला असणं शक्य आहे. माणूस जन्मभर एकाच सरळ रेषेत प्रवास करीत नाही. तो अनेक दिशांनी कळत न कळत चालत असतो. अमुकच मार्ग का स्वीकारला ? याचं उत्तर त्याचं त्यालाही देता येत नाही आणि प्रतिभावंत लेखकाच्या दृष्टीलाही हे कोडं सोडवता येत नाही.

एकदा एका कवीच्या काव्याविषयी एका सभेत मी रसग्रहणात्मक बोललो. त्याच्या कविता खरोखरच चांगल्या होत्या. सभा संपल्यानंतर एक गृहस्थ मला म्हणाले, ' अहो, त्या कवीची तुम्ही कशाला स्तुती करता, त्याची प्रत्येक कविता चोरलेली आहे. केवळ शब्दाला शब्द जुळवून हा स्वत:ला कवी म्हणवतो.' आश्चर्याची गोष्ट अशी की ही टीका करणाऱ्या माणसाने त्या कवीची एकही ओळ वाचली नव्हती आणि वाचली असती तरी कविता कळण्याची त्याच्याजवळ किमान अक्कल आहे असा कोणताही पुरावा उपलब्ध नव्हता. मग असली निर्बुद्ध, मत्सरी, शेरेबाजी या माणसानं का करावी ? मत्सराचे देखील अगणित प्रकार आहेत. सवती मत्सर प्रसिद्ध असला तरी त्याला काहीसं समर्थनीय कारण असू शकतं. पण एखादा मनुष्य आपल्या कर्तृत्वाच्या बळावर लोकप्रियतेच्या दोनचार पायऱ्या चढून गेला की त्याच्या पायजवळही उभं राहण्याची किमान योग्यता नसलेले लोक, यात त्याचे सहकारी असतात. ' मित्र ' ही असतात. त्याचे पाय ओढण्यासाठी कावेबाज कारस्थानं करू लागतात. तेव्हा माणसाच्या सज्जनतेवरचा विश्वासच उडून जातो. सुगंध ज्या नाकांना सहन होत नाही, त्या नाकांनी सुगंधाला नाक मुरडावं हे कदाचित सयुक्तिकही असेल. दुसऱ्याची आनंददायक कृतीसुद्धा सहन होऊ नये इतकी अस्वाभाविक मानण्याचं काही कारण नाही. माणूस कितीही समजून घेण्याचा प्रयत्न केला तरी तो फार थोडा कळतो. आपण स्वत:तरी आपल्याला कुठे नीट कळलेले असतो ? आपण आपल्याला अनोळखीच असतो.

जेम्स हिल्टनच्या एका कादंबरीत एक विलक्षण प्रसंग आहे. एका निरपराध डॉक्टरवर आपल्या पत्नीच्या खुनाचा आरोप येतो. हा डॉक्टर अत्यंत सत्प्रवृत्त आणि परोपरकारी आहे. त्यानं कधी कुणाचं मनही दुखावलं नाही. इतरांच्या सुखासाठी झिजत राहिलेला हा मनुष्य आपल्या पत्नीचा खून करील ही शक्यताच नव्हती. पण परिस्थितीजन्य पुरावा डॉक्टरच्या विरुद्ध असल्यामुळं त्याला फाशीची शिक्षा ठोठावण्यात येते. एके दिवशी पहाटेच्या वेळी त्याला फाशी द्यायला नेण्यासाठी तुरुंगातले शिपाई आणि अधिकारी येतात. फासाच्या फळीकडे जात असताना एक शिपाई सारखा खोकत असतो. त्याची खोकल्याची उबळ लवकर थांबत नाही. तेव्हा डॉक्टर त्याला अत्यंत कनवाळू स्वरात सांगतो,

'अरे, हे पावसाळ्याचे दिवस. तुला बरीच सर्दी झालेली दिसते. कदाचित तुझ्या अंगात तापही असेल. इतक्या भल्या पहाटे तू कामावर आलास ते चुकलं. प्रकृतीची काळजी घे. हा खोकला जर बळावला तर तुला अंथरुणच धरावं लागेल. दोन दिवस पूर्ण विश्रांती घे आणि मी सांगतो ते औषध निदान आठवडाभर तरी चालू ठेव. अरे, तुम्ही लोक प्रकृतीकडं दुर्लक्ष करता आणि आजारी पडता हे योग्य नाही. लक्षात ठेव. तुझं जीवन मोलाचं आहे. तुझी मुलंबाळं तुझ्यावर अवलंबून असतील.'

डॉक्टरच्या स्वरात आपुलकी होती. सहानुभूती होती. ज्याच्या गळ्याभोवती पाच मिनिटानंतर फास आवळला जाणार होता आणि ज्याला जीवनाच्या सरहद्दीवरून मरणाच्या हद्दीत निदर्यपणानं ढकलण्यात येणार होतं तो डॉक्टर एका अनोळखी शिपायाला त्या अंतिम क्षणी खोकल्यावर कोणतं औषध घ्यावं हे सांगत होता. त्या शिपायाचे डोळे अश्रूंनी डबडबतात. आपल्याला जीवनाचं मोल समजावून सांगणारा हा देवमाणूस थोड्याच वेळात मरणार आहे ही जाणीव त्याला असह्य होते. डॉक्टर मात्र शांत असतो. आपण निरपराध आहोत पण न्यायदेवतेने दिलेला कौल स्वीकारलाच पाहिजे या विचारानं त्यानं स्वत:चं समाधान करून घेतलं होतं आणि आपल्याला फाशीकडं नेणाऱ्या व्यक्तीकडे तो आपुलकीनं पाहात होता. त्याच्या मनात त्याक्षणी कसलाही कडवटपणा नव्हता. त्याचा कुणावरही राग नव्हता. आपल्या दृष्टीतल्या प्रेमामृताचं सिंचन तो जणू साऱ्या सृष्टीवर करत होता आणि एकेक पाऊल शांतपणे टाकीत होता. हा प्रसंग जेव्हा मी कादंबरीत वाचला तेव्हा मला त्यावर विश्वास ठेवणं कठीण वाटलं. माणसाच्या मनात मृत्यूच्या वेळीसुद्धा इतकी निर्विकार प्रसन्नता आणि शांती असू शकते काय ? हा डॉक्टर तर पूर्णपणे निर्दोष होता. त्याचं जीवन त्याच्यापासून अन्यायानं हिसकावून घेण्यात येत होतं पण तरीही त्याच्या चित्तात कोणतीही क्षोभजनक खळबळ होऊ नये हा एक चमत्कारच होता. कोणी म्हणेल जेम्स हिल्टननं आपल्या कल्पनेतून निर्माण केलेला हा एक धीरोदात्त माणूस आहे. तो केवल कल्पनेतच असू शकतो. वास्तव सृष्टीत असला मनुष्य अपवाद म्हणून सुद्धा आढळणार नाही.

आज मात्र मी अशा निष्कर्षाला आलो आहे की अशीही माणसं असू शकतात. अकारण द्वेष करणाऱ्या, दुसऱ्याचा उत्कर्ष सहन न होणाऱ्या, आपलं

नाक कापून जगाला अपशकुन करणाऱ्या माणसांप्रमाणेच साऱ्या जगावर आपल्या अंत:करणातल्या स्नेहधारांचा वर्षाव करणारी माणसेही अस्तित्वात असतात. काट्यांचा अणकुचीदारपणा जर स्वाभाविक असेल तर फुलांची मृदुलताही नैसर्गिकच मानावी लागेल. पण ती मानली तरी मनुष्यांच्या स्वभावात या रेषा आणि रंग कसे आले, का आले याचे उत्तर मिळत नाही. येशू ख्रिस्त किंवा बुद्ध महावीर या माणसांनी साऱ्या जगालाच आत्मीयतेनं, प्रेमानं आपल्या हृदयाशी कवटाळलेलं होतं. त्यांनी कोणाचाच द्वेष केला नाही. कोणालाही शत्रू मानलं नाही. त्यांची निंदा - नालस्ती करणाऱ्या आणि त्यांचा अमानुष छळ करणाऱ्या दुष्टांवरही त्यांनी प्रेमाचं छत्र धरलं. जेम्स हिल्टनचा तो डॉक्टर आता मला तरी अवास्तव वाटत नाही. पण तो अनाकलनीय मात्र वाटतो. कारण त्याच्या स्वभावाचे विश्लेषण मला करता येणार नाही. महाभारतात व्यासांनी इतकी निरनिराळ्या प्रकृतीची माणसे रंगवली आहेत की त्यांचे गुणधर्म तर्काच्या चौकटीत घेऊन त्यांची परीक्षा करता येईल असे दिसत नाही. माणसाचा स्वभावधर्म असा चित्रविचित्र का असतो या प्रश्नाला उत्तर मिळत नाही. एकाच मनुष्याच्या स्वभावात इतक्या बारीकबारीक रेषा असतात की त्यांचा सुसंगतपणे विचार करणेही अशक्य वाटावे. रामायणातला रावण हा परमावधीचा दुष्ट होता अशी त्याची प्रतिमा रेखाटली जाते. पण दुष्टपणाने सीतेचं अपहरण करूनसुद्धा सीतेशी त्याने कोणताही दुर्व्यवहार केला नाही. त्याला ते करणे अशक्य नव्हतं आणि त्याबद्दल त्याला कोणी जाबही विचारला नसता. पण त्याचंच मन कातर झालं होतं. देवांनाही सहज जिंकणाऱ्या आणि त्यांना बंदिवासात घालणाऱ्या रावणाला सीतेचा विनयभंग करणं अवघड होतं काय ? दुर्जन असणाऱ्या रावणात काही अंशी सज्जनपणाही होता आणि तोच सीतेच्या संदर्भात वरचढ व्हायचा असं दिसतं. रावण ही एक दुभंगलेली किंवा दोन पदर असलेली आणि मानसशास्त्राला आव्हान देणारी व्यक्तिरेखा आहे. रावणाच्या मनोव्यापाराचे परीक्षण करणाऱ्या अनेक अभ्यासकांना अखेर हातच टेकावे लागले आहेत.

मार्क ट्वेन या लेखकाने माणसाबद्दल काढलेले उद्‌गार जितके गंमतीदार तितकेच अर्थपूर्णही आहेत. तो म्हणतो, ' मनुष्य हे एवढेच असे जनावर आहे की जे भूक नसतानाही खाते आणि तहान नसतानाही पिते.' इतर सारे प्राणी भूक नसेल तर काही खात नाहीत पण माणूस नावाच्या बुद्धिमान प्राण्याचे असे नाही.

त्याची केव्हाही खाण्याची तयारी असते. पिण्याच्या बाबतीत काय बोलावे ? अशा मनुष्याचे कधीतरी यथार्थपणे आकलन होऊ शकेल असे दिसत नाही. आजपर्यंतचा इतिहास हेच सांगतो. महासागरातून तरंगणारे बर्फाचे डोंगर पाण्यावर फारसे दिसत नाहीत. त्यांचा नऊ दशांश भाग पाण्यातच लपलेला असतो. मनुष्याचं मन आणि त्याचा हेतू याचं तरी सुस्पष्ट दर्शन कुठं घडतं ? ज्याच्या सर्व बाजू स्पष्ट असतात त्याचे आकलन करणे कठीण नसते. रामचंद्रावर आपल्या वात्सल्याचा वर्षाव करणाऱ्या कैकयीनेच त्याला चौदा वर्षांचा वनवास का घडवावा याचे उत्तर मिळत नाही.

हजारो वर्षांपासून कथा, कांदबऱ्या आणि काव्ये लिहिली जात आहेत. या साऱ्या साहित्यात माणूस केंद्रस्थानी असतो. त्याचीच सुखदु:खे आणि त्याच्याच आशाआकांक्षा याचे चित्रण नाटककार, कवी करीत आलेले आहेत. लिहिली जाणारी प्रत्येक कादंबरी वाचावीशी वाटते. रंगभूमीवर येणारे प्रत्येक नाटक पाहण्याची आमची इच्छा असते. कारण माणसाचा अतिगूढ, चमत्कृतिपूर्ण व्यक्तिमत्त्वाची विविध दर्शने आम्हाला घ्यायची असतात. माणसांच्या तऱ्हा अनंत आहेत. त्या कधी कळण्यासारख्या नसतात. पण पुष्कळवेळा त्या कळलेल्याच नसतात. ज्याला आपण शहाणा समजतो, त्याच्यातच एक महामूर्खही वावरत असतो आणि ज्याला ठार वेडा मानलेले असते त्याच्यातही एका दिव्य शहाणपणाचा अंश आहे याचा शोध लागतो. जो महान वाटतो तो आत्यंतिक क्षुद्र पातळीवर का आणि कसा जातो कळत नाही. ज्याच्यात देवत्व आहे असे वाटलेले अतसे तो केवळ शेंदूर फासलेला एक अतिसामान्य दगड होता याचेही ज्ञान होऊन जाते. याचाच अर्थ माणसाभोवती एक गूढ वलय आहे आणि ते भेदून त्याच्यावर शोधक प्रकाशझोत टाकण्याचा प्रयत्न शास्त्रज्ञ, लेखक, कवी करीत असतात. शरदचंद्र चटर्जींच्या कादंबरीतील वेश्यासुद्धा अत्यंत निष्ठावान व चारित्र्यसंपन्न असते आणि राणी म्हणून राज्यसत्तेचा उपभोग घेणारी हॅम्लेटची आईसुद्धा भ्रष्ट असू शकते. माणसाचीच ही अनंत रूपे आणि विद्रुपे पाहिली म्हणजे वाटते की माणूस हा एक कधीच आकलनाच्या कक्षेत न येणारा असा विषय आहे. एका तत्त्ववेत्त्याने म्हटले आहे, 'मॅन इज ए बंडल ऑफ कॉन्ट्रॅडिक्शनस्' मानव म्हणजे चमत्कारिक विसंगतीचे एक गाठोडे आहे. त्याच्यात नांगी मारण्याची जशी वृत्ती आहे त्याप्रमाणेच फुंकर घालण्याची

साधताही आहे. माणूस हा थोडासा लांडगा, थोडासा कुत्रा, थोडासा क्षुद्र कीटक, थोडासा परमेश्वर आणि थोडेसे गिधाडही आहे. बऱ्याच गोष्टींचे एकत्रीकरण करून माणूस नावाचे एक अजब रसायन निसर्गाने मोठ्या परिश्रमाने तयार केले आहे आणि या सर्व गोष्टीला मिळून माणूस नावाचे गंमतीदार नाव देण्यात आले आहे. इतके मात्र खरे की हा प्राणी इतर कोणत्याही प्राण्यापेक्षा अधिक बुद्धिमान असल्यामुळे तो एकमेकांचा नाश मोठ्या चातुर्याने करू शकतो. दोन अनोळखी कुत्रे एकमेकांवर गुरगुरतात, प्रसंगविशेषी चावे घेतात पण त्यांची लढाई त्या दोघांपुरतीच मर्यादित असते. शहाण्या माणसांचे मात्र असे नसते. ही शहाणी माणसे आपल्या बसल्या ठिकाणावरून गुरगुरतात, भुंकतात आणि मग केवळ दोन राष्ट्रांतच नव्हे तर साऱ्या जगात युद्धाचा वणवा पेटतो. लक्षावधी लोक त्यात भस्मसात होऊ शकतात. पशूंपेक्षा मनुष्य किती प्रगत आहे याचे हे एक चांगले उदाहरण. युद्ध संपल्यानंतर मग माणसे जगवण्याची मोहीम सुरू होते. शस्त्रे निर्माण करण्याची आणि मग ती नष्ट कशी करावयाची यावर जागतिक परिषदा घ्यायच्या असतात. अशी असंख्य उदाहरणे देता येतील. कार्लाईल नावाच्या एका प्रसिद्ध तत्त्वचिंतकाचे अवतरण येथे देऊन हा लेख संपवतो. तो म्हणतो,

'मानवात आणि इतर जनावरांत काही फरक आहे काय? होय, फक्त ठेवणीत, इतर जनावरे वाकलेली असतात पण मनुष्य हे एकटेच जनावर ताठ चालते.'

मला वाटते आता या विधानावर भाष्य केलेच पाहिजे असे नाही.

●

□ □ २०

## तेथे चल राणी

कवी माधव ज्यूलियन यांच्या कित्येक कविता मला अजूनही मोहिनी घालतात. अजूनही म्हणण्याचं कारण असं की, काही कवितांचा सुगंध लवकर उडून जातो. पुढं त्याचं निर्माल्य होतं. काही कविता वाचकाला त्यांच्या विशिष्ट वयातच आकर्षक वाटतात. वय आणि वृत्ती उलटल्यावर एकेकाळच्या त्या आल्हादक कविता त्याला आवाहन करू शकत नाहीत. कारण रसिकता परिपक्व झाल्यावर त्या कवितांचं सौंदर्य त्याला ढोबळ वाटू लागतं. पण कित्येक कविता अशा असतात की वर्षे उलटली तरी त्यांचं तारुण्य टवटवीत राहतं. स्वर्गीय अप्सरा कधीही वृद्ध होत नाहीत असं म्हणतात. काव्याच्या सृष्टीतही अशा काही स्वर्गीय अप्सरा असू शकतात. त्यांच्या यौवनाला आणि लावण्याला तडा जात नाही. अशा कितीतरी कवितांची मी उदाहरणं देऊ शकेन. पण या क्षणी मला माधव ज्यूलियनांची ' तेथे चल राणी ' ही कविता आवर्जून उल्लेख करावी अशी वाटते. कॉलेजात विद्यार्थी असताना मी ती अनेक वेळा वाचली होती. काही ओळी तर माझ्या जिभेवर सतत नाचत होत्या. प्राध्यापक या नात्यानं त्या कवितेच्या भावनिक व वैचारिक सौंदर्याचं विश्लेषण करताना वर्गात मी देहभान हरपून गेलो होतो असं मला आठवतं. या काव्यावर आक्षेप घेणाऱ्या टीकाकारांची मी उपहासपूर्ण शब्दांत कित्येक वेळा रेवडी उडवल्याचंही स्मरतं. एके दिवशी माझं व्याख्यान संपल्यानंतर एक विद्यार्थी मला म्हणाला,

' सर, ' तेथे चल राणी ' ही कविता माधव ज्यूलियन यांची नसून जणू काही आपलीच आहे असं समजून तुम्ही तिच्याविषयी बोलत होता. तुमच्या व्याख्यानातील उत्कटता पाहून तुम्हीही कुणाला तरी ' तेथे चल राणी ' असं आमंत्रण देत आहात अशी आमची भावना झाली.'

वर्गात खोडकर हास्याची एक लाट उचंबळली. काही विद्यार्थिनींनी आपले

हातरुमाल ओठाला लावून हास्य लपवण्याचा प्रयत्न केला. मलाही थोडं हसू आलं. मी म्हणालो,

' माझ्या व्याख्यानाचं तुम्ही चांगलं रसग्रहण केलंत पण त्यात कल्पनेचा अंश जास्त आहे किंवा तुमच्या स्वत:च्या रोमँटिक अनुभवाची तुम्ही सरमिसळ केली असावी.' आता वर्गात दुप्पट हशा उसळला. एम. ए. च्या वर्गात असलेल्या त्या विद्यार्थी - विद्यार्थिनींना ही कल्पनारम्य कविता आवडली याचं मला समाधान वाटलं. कोणत्याही तरुण तरुणीला ओढून घेण्याची शक्ती या काव्यात निश्चित आहे. पण प्रौढ वयातही हे काव्य रसिकांना अंतर्मुख आणि अस्वस्थ करू शकते. या कवितेतल्या कित्येक ओळी एक प्रकारच्या नैराश्यानं माखलेल्या वाटतात. कुठल्या तरी अशक्य कोटीच्या स्वप्नात कवी रमलेला दिसतो. दांभिक वास्तव आणि सुंदर आदर्श यांच्यातला चमत्कारिक विरोध या कवितेत त्याने टिपला आहे. तो म्हणतो,

*कोठे तरी जाऊ बसुनी शीघ्र विमानी अज्ञात ठिकाणी*
*स्वातंत्र्य जिथे, शांति जिथे प्रेम इमानी तेथे चल राणी !*

कवी माधव ज्यूलियन यांच्या जीवनात नियतीनं काही नाट्यमय चमत्कार घडवून आणले. उर्दू आणि फारसी काव्यातली वारुणी आकंठ प्यालेला हा रोमँटिक मनाचा माणूस वास्तव आयुष्याच्या खडकाळ रस्त्यावर पावलोपावली ठेचा खात होता. कोणी त्याच्यावर मत्सरानं जळत होते. कारण या कवीच्या कवितांत झपाटून टाकणारं एक मदिर माधुर्य होतं. रसिक स्त्री - पुरुष या काव्यावर लुब्ध होते. माधव ज्यूलियन फर्ग्युसन कॉलेजात प्राध्यापक होते. प्रणयरंगानं रंगलेल्या इराणी चषकात मराठी कवितेची वारुणी भरणारा हा प्राध्यापक कवी तरुण विद्यार्थिनींना कदाचित विशेष आवडायचा. माधवरावांच्या कवितेतला बेहोश जोश पाहून काही टीकाकारांनी त्यांना ' प्रणयपंढरीचा वारकरी ' म्हटलं. इतर प्राध्यापकांच्या द्वेष - मत्सराचे माधवराव मानकरी ठरले. रसिकता, कवित्व, तारुण्य आणि अध्यापन कौशल्य हे गुणच त्यांचे शत्रू ठरले. एखाद्या गुणवान रसिक प्राध्यापकाभोवती सुंदर मुलींचा घोळका जमला की काही तथाकथित विद्वानांच्या पोटात मत्सराचा गोळा उठतो. बिघडलेल्या पोटामुळे निंदेच्या करपट ढेकरा देत हे महाभाग स्टाफरूममध्ये प्रिन्सिपॉलच्या ऑफिसात, रस्त्यावर ' बौद्धिक आणि नैतिक ' चर्चा करू लागतात.

' अहो, हा काय पोरखेळ चालला आहे ? चार पोरी - बाळी जमवायच्या आणि त्यांच्यात एखादी पाणचट कविता वाचून वाहवा मिळवायची, एखाद्या पोरीबरोबर बॅडमिंटन खेळायचं, उथळ प्रेमाचे दोन - चार उर्दू शब्द उसने घेऊन ' इश्क आणि दिल ' यांचा बाजार मांडायचा की झाले हे कविवर्य ! असल्या फडतूस कविता तर आम्ही बसल्या बैठकीला डझनावरी करू शकतो. पण हे आपल्या नीतीला आणि पवित्र भारतीय संस्कृतीला काळिमा फासणारं कृत्य आपल्या हातून घडणार नाही. असल्या ' चीप पॉप्युलॅरिटी ' च्या आहारी आम्ही जाणार नाही ' कुणीतरी विचारतो,

' पण कालिदासानंही मेघदूतात किती शृगांरिक तो - विप्रलंभ आणि संभोग शृंगार म्हणतात - ते लिहिलेलं कसं चालतं ?'

' अहो, कुठे तो कवी कुलगुरू कालिदास !' कुमारसंभवही त्यानंच लिहिलं. तो प्रतिभेचा सम्राट होता. त्याला शोभून दिसतं. पण यानं पोरींच्या केसांवर कविता खरडावी, याला काय अर्थ आहे ? ' तेथे चल राणी ' आणि तेथे बस राणी असल्या फाजील, पोरकट, बीभत्स कविता लिहिणारा हा कवडा फर्ग्युसन कॉलेजात टिळक, आगरकरांच्या कॉलेजात प्राध्यापक म्हणूनं मिरवतो याची आम्हाला शरम वाटते.

अशा धर्तीचे संवाद होऊ लागले. त्यातून वादविवाद आणि वितंडवादही झाले. एक दिवस माधव ज्यूलियन यांना फर्ग्युसन कॉलेजच्या बाहेर पडावे लागले. हितशत्रूंनी त्यांची सर्व प्रकारांनी नाचक्की केली. म्हणूनच आपल्या कवितेत ते म्हणतात,

*काहीही करा, ही जनता मारील नांगी*
*हासूंनि अपांगी*
*ध्येयास पुरा वाव न मिळे, होय हानी*
*तेथे चल राणी*

ही कविता माझ्या मनात अनेक वेळा विचारांची वर्तुळं उठवते. मन विषण्ण होतं. माधव ज्यूलियन यांच्या फाटलेल्या स्वप्नांचे काही पदर यात स्पष्ट दिसतात. आयुष्य असंच असतं. जग अत्यंत सुंदर आणि काव्यमय असेल अशी कल्पना करून जीवनाच्या वाटेवरून उमेदीनं चालू लागावं आणि दोनचार पाऊलातच काटा घुसून पाय रक्तबंबाळ व्हावा तसं आहे हे. दुर्दैवाची गोष्ट अशी की, वाटेतच

हे काटे दबा धरून बसलेले असतात. एखादं दुसरं सुगंधी फूल वाटेत दिसलं तरी ते ओंजळीत पडण्याची शक्यता फार क्षीण असते. काही वेळा अनुभव असा येतो की काट्यापेक्षाही फुलं अधिक धोकेबाज निघतात.

'काटा रुते कुणाला, मज फूलही रुतावे हा दैवयोग आहे' असले अनुभव संवेदनशील माणसांच्या वाट्याला जेव्हा येतात तेव्हा ती माणसे पार वाकून जातात. जगण्याचं केविलवाणं नाटक करीत ती मरत असतात. माधव ज्यूलियन हा कवी मला अशा रसिक कलंदर, काव्यात्मक वृत्तीच्या व्यक्तींचा प्रतिनिधी वाटतो. असं म्हणतात की दु:खाच्या ठेचा बसल्याशिवाय कविता जन्माला येत नाही. बहुतांशी हे खरे आहे. दु:ख आणि अश्रू यांचं खतपाणी मिळाल्याशिवाय कवितेचं पीक हाती येत नाही. मस्तकावर प्रहार झाल्याशिवाय अंत:करणाला जाग येत नाही. कित्येक कवींच्या आणि कलावंतांच्या जीवनाची अशीच कहाणी असते. प्रसंग वेगळे, वाटेवरची वळणे वेगळी, पण तेच काटे आणि तेच काट्यांचे शल्य. वाटेवर कधीतरी सुदैवानं आपल्या मनाचे सूर ओळखणारी आणि त्यात आपल्या हृदयीचे सूर ओतणारी एखादी व्यक्ती भेटते. पण त्या व्यक्तीबरोबर जीवनाचं संगीत रंगवायचं म्हटलं तर या रुक्ष स्नेहशून्य वास्तवात अवसरपण मिळत नाही. मला वाटतं माधव ज्यूलियनांची हीच नेमकी व्यथा होती. गडकऱ्यांनी एका ठिकाणी हेच दु:ख व्यक्त केलं आहे. 'भिकार या जगी इच्छित काही न मिळे' म्हणूनच एका आदर्श जगाच्या शोधात विहार करावा इतकेच त्यांच्या हाती राहाते. पण आपल्या हातात खरोखर काय आहे असा विचार केला तर गडकऱ्यांच्या पुढील ओळी आठवतात.

*हाती संसाराची माती*
*मनिच्या आशा मनास खाती*
*भूतकाळाची भूते रडती!*
*मिटल्या जाग्या डोळ्यांपुढती।*
*शून्याचे मैदान!*

'तेथे चल राणी' या कवितेत एका आदर्शाची कल्पना रंगवली आहे. काही वर्षांपूर्वी ही कविता वाचताना मी रोमांचित होत होतो. पण आता मात्र काहीशा पक्व झालेल्या वयात या कवितेतलं स्वप्नरंजन व्यर्थ वाटू लागते. सुंदर आणि उदात्त

कल्पना कितीही मोह घालीत असल्या तरी त्या सत्यसृष्टीत कधी येतात का ? कोणताही प्रेमिक आपल्या तारुण्यात प्रेयसीला म्हणतो,

अशा एका ठिकाणी आपण जाऊ की तिथं तू अन् मी असू. सोबतीला असेल फुलांचा सुगंध घेऊन आलेला वारा. माथ्यावरच्या निळ्या आभाळात पुनवेचा चंद्र आपल्या गुजगोष्टी ऐकण्यासाठी थबकला असेल. नदीचं पाणीही संथ वाहू लागेल. तुझ्या ओठातून बाहेर पडणारा प्रत्येक शब्द जणू अमृताच्या सुरईतून ओघळलेला असेल, वगैरे वगैरे. हे कधीतरी खरं असतं का ? ती अमृताची सुरई, आकाशात थबकणारा चंद्र ही केवळ आपल्या स्वैर कल्पनेची अपत्यं असतात. ' तेथे चल राणी ' या कवितेत माधव ज्यूलियन यांना असंच काहीसं म्हणायचं आहे काय ? जिथं स्वातंत्र्य आहे, जिथं शांती आहे आणि जिथं प्रेम - निखळ अंत:करणातून निर्मळपणानं उगवलेलं इमानी प्रेम आहे - जिथं दांभिकता नाही, असूया नाही, जिथल्या प्रीतीला धनसंपत्तीची ओढ नाही. जिथली भाकर - पाणी सुधेहूनही स्वादिष्ट आहे, अशा ठिकाणी आपण जाऊ. असं आवाहन करणारा हा कवी आजच्या जगतात मला तरी अगदीच भाबडा वाटतो. प्रेमाला सुद्धा आजच्या जगात पैशाची ऊब लागते. ' जोवरि पैसा तोवरि बैसा ' हाच कालच्याप्रमाणे आजही न्याय आहे. खरं प्रेम असलंच तर ते निर्वासित झालं आहे. बेपत्ता झालं आहे. ते कुठं मिळतं आम्हाला माहीत नाही. ' खरं प्रेम कळवा, लाख रुपये मिळवा. ' अशी जाहिरात केली तर त्याचा पत्ता लागेल असं वाटत नाही. स्वातंत्र्य आणि शांती हे शब्दही प्रेमाइतकेच फसवे बनले नाहीत का ? कोणते स्वातंत्र्य ? कुणाचे स्वातंत्र्य ? स्वातंत्र्याचे आणि शांतीचे दिवस कदाचित इतिहासाच्या पानांतच शोधावे लागतील. प्रेमाची तर दैनाच उडाली आहे. वापरून वापरून गुळगुळीत झालेला हा शब्द आता हास्यास्पद बनला आहे. कोर्टात खरं बोलण्याची शपथ केवळ उच्चारासाठी असते. खरं बोलण्याचा मूर्खपणा कोणताही शहाणा माणूस करीत नाही. सत्य आणि प्रेम यांचं व्यवस्थित वस्त्रहरण होत असलेल्या जगात खऱ्या प्रेमिकाला जागा आहे कुठं ? त्याला या व्यवहारी जगाशी जुळवून घेता येत नसेल तर त्यानं खुशाल वनवासी व्हावं. ज्याला व्यवहार कळला नाही त्याला त्या व्यवहारनिष्ठ जगात नीट जगताच येणार नाही.

माधव ज्यूलियन या रुक्ष व्यवहारी जगात पराभूत झाले. कवींचे, क्रांतिकारकांचे अनेक पराभव आपण पाहतो. पण म्हणून त्यांना वेडे म्हणण्याचा आपल्याला अधिकार आहे काय ? आम्ही सामान्य मळखाऊ माणसं स्वप्नांच्या वाटेलाच कधी जात नाही. आम्ही आमच्या ' राणीला ' स्वप्न प्रदेशात चलण्याचं आवाहन कधी करू शकत नाही. आम्ही परिस्थितीशी जुळवून घेतो. मिळतं घ्यावं, पडतं घ्यावं या प्रवृत्तीमुळं आमचं प्रेम खऱ्या अर्थानं कधीच रोमँटिक होत नाही. आपलं प्रेम म्हणजे केवळ शारीरिक पातळीवरचा एक साधारण अनुभव असतो. प्रेम करायला सुद्धा जिवंत, जोमदार, स्वातंत्र्यप्रिय, निष्ठावान, सौंदर्यपूजक मनाची आवश्यकता असते. प्रेमालाही भक्तीचं अधिष्ठान असावं लागतं. समर्पणाची ओढ आणि ध्येयाची जोड असावी लागते. पण बहुसंख्य माणसं मनानं आणि विचारानं म्हातारी झालेली आहेत, केवळ व्यवहारावर प्रेम करणारी माणसं म्हणतील,

' तेथे चल राणी ' हे एका वेड्या कवीचं भाबडं स्वप्न आहे. एखाद्या अज्ञात, आदर्श प्रदेशात, प्रेयसीला घेऊन जाण्याची इच्छा करण्यापेक्षा तिला एखाद्या पंचतारांकित हॉटेलात नेण्याची कल्पना अधिक चांगली आहे. ज्याच्या खिशाला आणि स्वभावाला हे परवडत नाही त्यांनी रिकामटेकड्या कविता कराव्यात. खुशाल आदर्श कल्पनांचे इमले बांधावेत. जग आहे तसंच आहे. कवितांनी काही ते बदलत नाही.'

मला मात्र स्वप्नपूजक आदर्शप्रेमी कविता आवडतात. ' तेथे चल राणी ' मधील कित्येक ओळी मला गुणगुणाव्याशा वाटतात. कवी म्हणतो,

*अंकावर खेळूनि शिकू सृष्टीसतीच्या आत्मप्रगतीच्या*
*त्या गूढ कथा, ज्या न कुराणी न पुराणी तेथे चल राणी*

●

□ □ २१

# सूत्र तुटलेला पतंग

कधी कधी तीव्रपणानं जाणवत राहतं की आपण आपल्या आयुष्यात काहीच साधलं नाही. निसर्गानं आपल्या पदरात पन्नास - साठ वर्षे उदारतेनं टाकली त्याचं आपण काय केलं ? जे हातात होतं ते सारं विचार न करता उधळून टाकलं. आपल्या आयुष्याचं आपण विचारपूर्वक नियोजन करायला हवं होतं. आयुष्याचा आणि त्यात करण्याच्या कामाचा एक आराखडा पूर्वीच करून ठेवला असता तर आज हा निराशेचा उदासवाणा सूर आपल्या मनात रेंगाळत राहिला नसता. पश्चात्तापाच्या क्षणाचादेखील फारसा उपयोग नसतो. अनेक वेळा हे विचार मनात गर्दी करतात. एका घनिष्ठ मित्राला माझी व्यथा मी सांगितली.

तो खूप हसला आणि म्हणाला, 'मी तुला शहाणा समजत होतो. पुष्कळ वर्ष हा गैरसमज मी करून घेतला होता. आज मात्र खात्री पटली की तू एक अतिविचारी पण वेड लागलेला मनुष्य आहेस. अरे, जीवनाचं नियोजन कधी करता येईल का ? जीवनासारखी लहरी, चंचल आणि बेभरवशाची दुसरी गोष्ट जगात नाही. आराखड्याच्या चौकटीत माणसाला आपलं आयुष्य बसवता आलं असतं तर या जीवनाची सगळीच गंमत संपून गेली असती. एक गोष्ट निश्चितपणानं सांगतो की, माणसाचं जीवन सदैव अनिश्चितपणाच्या लाटांवर हेलकावे घेत असतं. कुबेराच्या संपत्तीची अभिलाषा बाळगणारा एखादा महत्त्वाकांक्षी माणूस कुठल्यातरी सामान्य चाळीच्या खुराड्यात आयुष्य काढीत बसतो. लक्ष्मी त्याच्याकडे ढुंकूनही पाहात नाही. आता या माणसानं जीवनाचं नियोजन कसं करायचं ? आणि करून तरी त्याचा उपयोग काय ? मला वैमानिक व्हायचं होतं. त्या दिशेनं मी प्रयत्न केला. पण माझं सिलेक्शन झालं नाही. आज कॉन्ट्रॅक्टरचा धंदा करीत बसलो आहे. आपल्या नियोजनाला काही अर्थ असत नाही. नियोजनाची सगळी सूत्रं त्या वर बसलेल्या परमेश्वराच्या हातात आहेत. जाऊ दे, चहाच्या गरम घोटाबरोबर असली दु:खं गिळायची असतात.'

आणि असं म्हणून त्यानं दोन कप चहाची ऑर्डर दिली. माझ्या अति विचारीपणावर दोन - चार फुटकळ विनोद करून तो स्वत:च मनापासून हसला. निरोप देताना म्हणाला, ' प्रोफेसर लोक वेडे कसे असतात ते आज मला समजलं. घरं बांधण्याचं मी कंत्राट घेतो. त्याचं व्यवस्थित नियोजन करतो. पण ठरवल्याप्रमाणं सगळं कधीच घडत नाही, चालायचंच !

जीवनाचं काटेकोर नियोजन अशक्य आहे यात शंका नाही. आपण एक योजतो आणि आपलं दैव दुसरंच काही योजून ठेवते. याचं कारण जीवन ही एक गतिमान, परिवर्तनशील, जिवंत वस्तू असल्यामुळं तिच्यासंबंधी काही आखणी करता येत नाही. आमचा शिंपी शर्टाचं, पॅन्टचं मोजमाप घेतो. आठ पंधरा दिवसात कपडे देण्याचं आश्वासन देतो. एक वेळ मंत्र्याचं आश्वासन सफल होईल पण शिंप्याबद्दल असं म्हणता येणार नाही. सात - आठ महिन्यांनी, अनेक हेलपाटे घालत्यावर आपले कपडे मिळतात. पण ते अंगाला नीट येत नाहीत. तक्रार केल्यावर शिंपी हसत हसत म्हणतो, ' माप घेताना बरोबर घेतलं होतं. पण आता तुम्ही चांगलंच अंग धरलंय, मी तरी काय करू ? आमच्या नियोजनाची हीच शोककथा आहे. यात थोडं फार तथ्य असेलही. पण तरीही माणसानं जीवनाची भावी आयुष्याची स्थूल रूपरेषा आपल्या मनाच्या फलकावर रेखाटली असावी. होडीला वल्ही नसतील तर तिची काय अवस्था होईल हे अगदी उघड आहे. कोणत्या दिशेनं जायचं हे न ठरवता प्रवाह नेईल तिकडं निमूटपणानं वहात जाण्यात कसला पुरुषार्थ आहे ? पण आम्ही बहुसंख्य माणसं अशीच आहोत. वाट फुटेल तिकडे, वारा वाहील त्याप्रमाणं आम्ही प्रवास करीत आहोत.

जीवनाच्या निरनिराळ्या क्षेत्रांत कित्येक कर्तबगार माणसं आपल्याला भेटतात. त्यांच्या कर्तृत्वाला त्यांनी स्वत:च विशिष्ट दिशा दिली होती. आजची परिस्थिती काय आहे आणि आपल्याला नेमकं काय मिळवायचं आहे याचा व्यवस्थित विचार करणारी काही शिस्तबद्ध माणसं आहेत. एका नामांकित चित्रकाराला मी विचारलं होतं, ' तुम्ही चित्रकार झाला नसता तर काय होणं तुम्हाला आवडलं असतं ?' त्यानं उत्तर दिलं, ' मग मी कदाचित काहीच झालो नसतो.' चित्रकार होणं हेच माझ्या आयुष्याचं एकमेव उद्दिष्ट होतं. सृष्टीतले नाना प्रकारचे रंग मला ओढून घेतात. किती मनोहर रंगांची आणि रेषांची ही दुनिया आहे म्हणून सांगू ! वेगवेगळे आकार माझ्याशी बोलतात. रंगांच्या अनेक छटा

मला चमत्कारिक मोहिनी घालतात. अगदी लहानपणापासून हे मला जाणवतं. सृष्टीची आणि माणसांची भिन्न भिन्न रूपं कागदावर, कॅनव्हासवर रेखाटण्याचा मनस्वी छंद मला जडला. प्रत्येक माणसाच्या मनाला, हसण्याला आणि रडण्याला एक रंग असतो. हे रंग मी न्याहाळीत राहिलो. चित्रकलेचं शिक्षण पद्धतशीरपणे घेणं मला शक्यच नव्हतं. आर्थिक परिस्थिती बिकट होती. मी कुठेतरी एखादी कारकुनाची किंवा मिळेल ती नोकरी करावी असा उपदेश अनेकांनी केला. पण माझ्या हातातली कुंचली आयुष्याच्या अंतापर्यंत सोडायची नाही हे मी ठरवलं होतं. अनेक मोठ्या चित्रकारांची चित्रं पाहिली. तासन्‌तास डोळ्यांत ती साठवली. इच्छेला येईल ते रेखाटीत गेलो. आयुष्य सारं या गोष्टीलाच वाहिलं. चित्रातच मला माझ्या जीवनाचं चित्र साकार झालेलं दिसलं. कुंचलीशिवाय आणि रंगाशिवाय मला इतर गोष्टींचा मोह कधीच पडला नाही. तुम्ही ज्याला जीवनाचं नियोजन म्हणता ते इतकंच होतं.'

साठीच्या घरात आलेल्या एका वृद्ध स्त्रीला मी विचारलं. 'बाई, तुमची आयुष्याबद्दल काय कल्पना होती ? मनासारखं तुम्हाला जगता आलं का ?' माझ्या प्रश्नामुळं तिच्या मुद्रेवर काही उदासवाण्या रेषा निर्माण झाल्या. डोळ्यात पाणी तरारत आहे असं वाटलं. कुठल्या तरी जीर्ण झालेल्या कापडाला ती टाके घालीत होती. मला हे तिच्या आयुष्याचं प्रतीक वाटलं. कदाचित सर्वांच्याच आयुष्याचं हे दर्शन असू शकेल. नाहीतरी आपण काय करतो ? विरत चाललेल्या जीवनाच्या वस्त्राला पुन्हा पुन्हा चिकाटीनं टाके घालीत राहातो. केव्हातरी टाके घालायला ते वस्त्रच उरत नाही. ती बाई म्हणाली, 'माझ्या एकुलत्या एका मुलाला मी हाडाची काडं करून वाढवलं. त्याच्या शिक्षणासाठी मी काय केलं नाही ? थोडे चांगले दिवस यावे म्हणून खूप कष्ट केले. कष्टाचं काही वाटत नाही. पण सगळं व्यर्थ गेलं. मुलगा परदेशात निघून गेला. तिकडंच त्यानं लग्न केलं. आपल्याला एक आई आहे ही लहानशी किरकोळ गोष्ट त्याच्या लक्षातच राहिली नाही. काय ठरवलं होतं आणि काय झालं ? हे सांगण्यात अर्थ नाही. फाटलेला कपडा कसाबसा शिवता येतो. या फाटलेल्या आयुष्याचं काय करू ?'

मी काय उत्तर देणार ? काही प्रश्नांना उत्तरेच नसतात. या बाईनं आपल्या आणि मुलाच्या आयुष्याचा एक आराखडा तयार केला होता. पण तो आराखडा निरुपयोगी ठरला. माझ्या मनात विचार आला. 'आयुष्याचं नीट नियोजन केलं

नाही म्हणून आपण अस्वस्थ होतो. पण नियोजन करताना परिस्थिती आणि दैव हे घटक कित्येक वेळा लक्षातच घेत नाही.

**दुर्दैवाचा एक फटकारा आपली शेकडो नियोजनं भुईसपाट करून टाकतो. मग पुन्हा पुन्हा हे नियोजनाचं तुणतुणं कशासाठी वाजवायचं ? पण हा विचार फारसा तर्कशुद्ध वाटत नाही. दैव, परिस्थिती, नियती हे घटक सामान्य नाहीत हे मान्य. पण योजना करणारा माणूस आणि त्याचा निर्धार हाच सर्वाधिक महत्त्वाचा भाग** आहे. माणूस हा निर्माता आहे. त्याच्या इच्छेनं आणि पराक्रमानं नवनिर्मिती होत असते. कष्ट करणारे हात आणि विचार व कल्पना करणारा मेंदू या भांडवलातून सारं काही निर्माण होतं. आजची संस्कृती ही शतकानुशतके खपलेल्या, कष्टलेल्या, प्रयत्नवादी माणसांची निर्मिती आहे.

प्रत्येक व्यक्तीनं काहीतरी उद्दिष्ट समोर ठेवून अखंड धडपडत राहण्यात सुख सामावलेलं आहे. पंचाहत्तरी उलटलेला, म्हातारपणानं थकलेला एक शेतकरी आपल्या शेतात आंब्याची झाडं लावत होता. ही झाड मोठी झालेली पाहणं तरी त्याच्या नशिबात होतं काय ? वर्ष दोन वर्षांत त्याच्याच आयुष्याचं झाड कोसळणार होतं. पण पुढच्या पिढीची तरतूद करण्यात एक प्रकारचा आनंद होता. आपलं आयुष्य संपत आलं. आता कशासाठी दगदग करायची ? असला निष्क्रिय विचार त्यानं केला नाही.

जमेल तेवढं काम करायचं हेच त्याच्या आजपर्यंतच्या जीवनाचं ब्रीद होतं. काही माणसं खुशालचेंडू वृत्तीची असतात. कसलीही योजना आखायची नाही. भविष्यकाळाचा विचार करायचा नाही. ताटात पडेल ते स्वीकारायचं ही ' स्थितप्रज्ञ ' वृत्ती कित्येकांची असते. केवळ जगत राहायचं. कोणत्या आकांक्षा नाहीत, कोणताही ध्येयवाय नाही. मला वाटतं, असल्या आळशी जिण्याचा वीट आला पाहिजे. पण काही माणसांना, खरं तर बहुसंख्य लोकांना स्वप्नेसुद्धा रंगवता येत नाहीत. ज्याला काहीच मिळवायचं नाही, त्याला नियोजन करण्याचीही आवश्यकता नाही. शिवाजी शहाजी भोसले नावाच्या पंधरा - सोळा वर्षांच्या एका नवतरुणानं स्वातंत्र्याचं, नव्या वैभवशाली, स्वाभिमानी जीवनाचं, धर्म आणि संस्कृती यांच्या अभ्युदयाचं स्वप्न पाहिलं. आणि मग आपल्या समशेरीच्या टोकानं या भूमीवर त्यानं पौरुषाचा एक नवा अध्याय लिहिला. कोणत्याही योजनेचे तपशील त्यानं ठरवलेले असायचे. या तेजस्वी युवकाचं संपूर्ण

स्वप्न मूर्त होऊ शकलं नाही. एक दिवस सारा हिंदुस्थान हिंदवी स्वराज्यात समाविष्ट करण्याची प्रचंड कल्पना त्याच्या मस्तकात खदखदत होती. कुणी सांगावं, आणखी वीस वर्षे या ध्येयवाद्याच्या पदरात नियतीनं टाकली असती तर हा दैदिप्यमान चमत्कार सत्यसृष्टीत आलाही असता, इतिहास आपोआप घडत नाही. इतिहासाच्या घडणीला माणसाचं कर्तृत्व कारणीभूत होतं. प्रचंड सामर्थ्याची माणसं आपल्या कार्याचं सतत नियोजन करीत असतात. नाना प्रकारचे अपघात, प्रतिकूल परिस्थिती आणि दैवाची लहर या गोष्टी गृहीत धरूनच ती आपली निर्मितीशील पावलं पुढं टाकीत असतात. आपल्या बलाढ्य बाहूंनी काळाचाही प्रवाह बदलून टाकणाऱ्या या व्यक्तींच्या चरित्राकडे नजर टाकली म्हणजे आम्ही साधारण माणसं लहान लहान संकटांचं केवढं अवडंबर माजवीत बसतो हे लक्षात येतं.

छत्रपती शिवाजीमहाराजांचं उदाहरण म्हणजे एका असामान्य व्यक्तीचं अपवादात्मक उदाहरण आहे असं वाटेल. पण शिवाजीमहाराज आमच्यासारखेच हाडामांसाचे होते. आपल्या रक्तात, त्याच्या प्रत्येक बिंदूत सामर्थ्य निर्माण करणं खरं तर आपल्या हातात नाही काय ? ना. गोपाळ कृष्ण गोखले विद्यार्थी होते तेव्हा दररोज टाईम्स ऑफ इंडियाचा अग्रलेख पाठ करायचे. त्या दिवशीचा अग्रलेख पाठ झाल्याशिवाय जेवण करायचं नाही हा त्यांचा निर्धार असायचा. इंग्रजी भाषेवर प्रभुत्व मिळवण्यासाठी त्यांनी केलेलं हे नियोजन होतं. पुढे गोखल्यांचे इंग्रजी म्हणजे इंग्रजी भाषेचा सर्वोत्कृष्ट नमुना हे समीकरण ठरून गेलं. असली पुष्कळ उदाहरणं घेता येतील. पण ही यादी लांबवण्यात अर्थ नाही. कोणत्याही योजनेशिवाय स्वैरपणानं, बेशिस्तपणानं माणसं आणि समाज जेव्हा वागायला लागतात तेव्हा त्यांच्या दुर्दैवाला त्यांनीच आमंत्रण दिलेलं असतं. सूत्र तुटलेला पतंग कुठेही भरकटत जाईल. त्याला वाऱ्याची लहर कुठेही फरफटत नेईल. उंच उंच भरारी घेत राहाण्यातलं आणि गगनाला गवसणी घालण्यातलं सुख सूत्र हरवलेल्या पतंगाला काय समजणार ? आज आमच्या देशाची नेमकी हीच अवस्था झाली आहे. आम्ही धड धर्मवादी नाही, धड निधर्मवादी नाही. आमचा ठरलेला असा कोणताही स्वतंत्र बाणा नाही. शेजारच्या एखाद्या क्षुल्लक राष्ट्रानं पावलोपावली आम्हाला उर्मट आव्हानं द्यावीत आणि आम्ही ती लोचटपणानं पोटात घ्यावीत. हे वर्षानुवर्षे अखंडपणे घडत आहे. मत मिळवण्यासाठी

कुठल्याही टोकाला जाण्याची लाचारी दाखवणाऱ्या पुरुषार्थहीन वृत्तीला 'राजकारण' हे गोंडस नाव आम्ही देत आहोत. रोखे व्यवहारात अब्जावधी रुपयांचा भ्रष्टाचार करणाऱ्या आणि देशाच्या अर्थव्यवस्थेला सुरुंग लावणाऱ्या माणसाच्या गळ्यात या देशात हार घातले जातात. कुणी सांगावं उद्या त्यांची मंदिरंही स्थापन केली जातील. भ्रष्टाचाराला जेवढा इथे मानसन्मान मिळतो तेवढा सदाचाराला आणि सुसंस्कृतपणाला कधी मिळेल का ? असा वेडा प्रश्न मला विचारावासा वाटतो. कारण आमचं नियोजन केवळ सत्तेच्या खुर्चीसाठी चालवलेलं आहे. हे मात्र आपण अटीतटीनं करतो. आर्थिक नियोजन, शिक्षणाचं नियोजन, शेतीचं नियोजन वगैरे बाकीची किरकोळ नियोजनं हे कागदावरचे खेळ आहेत, असो.

सूत्र तुटलेल्या पतंगाची कहाणी - मग ती व्यक्तीची असो किंवा राष्ट्राची असो, सारखीच असते. वारुळातल्या मुंग्या आणि मोहोळातल्या मधमाश्या यांचं नियोजन कदाचित बुद्धिमान समजल्या गेलेल्या माणसांपेक्षा अधिक शिस्तबद्ध असतं असंच मी म्हणतो. परवा एका कॉलेजातल्या पाचशे विद्यार्थ्यांना शिस्तीनं सामुहिक पद्धतीनं राष्ट्रगीतसुद्धा सरळ म्हणता आलं नाही आणि मी वेड्यासारखा राष्ट्रीय नियोजनाबद्दल बोलायला लागलो आहे. जाऊ द्या ! आता थांबतो. नाही तर लेखाचं नियोजन चुकेल.

●

□ □ २२

# जे जे होईल ते ते पाहावे

कुणीतरी अत्यंत सौजन्यानं विचारणा केली,

'प्रोफेसरसाहेब, आत येऊ का ? मला पाच मिनिटं वेळ द्याल तर मी फार आभारी होईन.' मी प्रश्नकर्त्याकडं पाहिलं. पन्नाशीच्या सुमाराचा, सुटाबुटातला एक गृहस्थ दारात उभा होता. त्याच्या मुद्रेवर आर्जवी हास्य होतं. त्यानं पुन्हा खुलासा केला, 'पाच मिनिटांपेक्षा अधिक वेळ घेणार नाही. तुमच्या कामात व्यत्यय आणल्याबद्दल मी फार दिलगीर आहे.'

मी त्याला तत्परतेनं आत बोलावलं आणि खुर्चीकडं बोट करून म्हटलं, 'बसा आपण. कसलाही संकोच करू नका. मला वेळ आहे. आपला परिचय ?'

त्यानं आपला परिचय करून दिला आणि ज्या कामासाठी तो आला होता त्या कामाचं स्वरूपही सांगून टाकलं. त्याच्या बोलण्यात एक प्रकारची नाटकी नम्रता जाणवत होती. एका महानगरातला हा बडा शासकीय अधिकारी एक चमत्कारिक काम घेऊन आला होता. एका विद्यापीठाच्या उत्तरपत्रिका माझ्याकडे परीक्षणासाठी आलेल्या होत्या. याबद्दलची सर्व तपशीलवार माहिती त्या अधिकाऱ्याने विद्यापीठातून मिळवली होती. दाराच्या बाहेर उभ्या राहिलेल्या नोकराला त्यानं काही खूण केली आणि हापूस आंब्याची एक मोठी करंडी नोकरानं आमच्या ओसरीवर ठेवून दिली. मी काही बोलण्याच्या आतच तो अधिकारी गडबडीने म्हणाला,

'सर, कृपा करून माझी ही तुच्छ भेट स्वीकारा. आपण नकार दिलात तर मला फार दुःख होईल. हे खास देवगडचे आंबे आहेत. या जातीचा आंबा फॉरेनला एक्स्पोर्ट होतो. मी सद्भावनेने तुमच्यासाठी आणला आहे. ही किरकोळ सेवा अव्हेरू नये. बरं हा विषय संपला. आता मुख्य मुद्द्याबद्दल सांगतो. हा

परीक्षेचा नंबर. या नंबरच्या पेपरला साधारणपणे पंचाहत्तर ते ऐंशी गुण मिळावेत एवढीच नम्र विनंती आहे. सारं काही आपल्या हाती आहे. माझ्या बोलण्याचा गैरसमज करून घेऊ नका. पण या कामाबद्दल आपल्याला भरपूर मोबदला मिळू शकेल. हे सांगण्याचीही जरूर नाही. देवाणघेवाण होतच असते. आपल्याला पुन्हा उद्या याचवेळी भेटायला येईन.'

मी आणखी काही विचारणा करू नये म्हणून तो वरिष्ठ अधिकारी लगबगीने बाहेर पडला. रस्त्याच्या कडेला उभ्या केलेल्या एका डौलदार गाडीत बसून तो निघून गेला. मला माझाच राग आला. असेल तो वरिष्ठ अधिकारी ! शासनात त्याच्या शब्दाला मानही असेल. पण मी का म्हणून त्याचं ऐकून घ्यावं ? कोणी एक अधिकारी सत्तेच्या तोऱ्यात माझ्याकडे येऊन मला विकत घेण्याचा प्रयत्न करतो आणि मी त्याला शब्दानंसुद्धा विरोध करीत नाही. इतकी दुर्बलता माझ्या ठिकाणी का असावी ? त्यानं दिलेल्या हापूस आंब्याच्या करंडीमुळं मी ओशाळा झालो होतो काय ? का त्याची मला भीती वाटली ? त्यानं दिलेलं त्याचं परिचयाचं कार्ड मी वाचून पाहिलं. सोलापुरातल्या एका बड्या हॉटेलात तो सध्या थांबला असावा. कारण छापलेल्या पत्याबरोबरच कार्डाच्या खाली बॉलपेननं त्यानं इथला पत्ता लिहिला होता. त्या पत्त्यावर मी ताबडतोब एक्स्पोर्ट होऊ शकणाऱ्या त्या उंची आंब्याची करंडी परत पाठवून दिली आणि मग माझी अस्वस्थता थोडी कमी झाली. हा अनुभव दोनचार दिवसांनी माझ्या एका सहकाऱ्याला सांगितला, तेव्हा त्यानं मला 'व्यवहारशून्य' ही उपाधी देऊन म्हटलं,

'व्यवहाराची तोंडओळख असलेल्या कुठल्याही माणसानं तुम्ही केलं तसलं विचारशून्य वर्तन केलं नसतं. हा अधिकारी सामान्य नाही. त्याचा अधिकार बराच मोठा आहे. पण समजा तो एक सामान्य मनुष्य असला तरीही त्याच्याकडे ती आंब्याची करंडी परत पाठवायला नको होती. तुम्ही किमान पाचदहा हजार रुपये त्याच्याकडून काढू शकला असता आणि त्याच्या परिचयानं आयुष्यातले काही प्रश्न सोडवू शकला असता. त्या अधिकाऱ्यानंही तुम्हाला वेळोवेळी कृतज्ञतेनं मदत केली असती.'

माझा सहकारी चिडून बोलत होता. त्याच्या दृष्टीनं मी एक भोळसर, अव्यवहारी माणूस ठरलो होतो. काहीशा उद्वेगाने मी त्याला म्हटलं,

'अरे पण कोणत्यातरी अनैतिक लाभासाठी आपल्या निष्ठेशी दगलबाजी करणं मला कधीच आवडणार नाही.'

आता तो सहकारी हसला आणि म्हणाला, 'नैतिकतेची जपमाळ ओढीत बसलेले तुमच्यासारखे लोक एक प्रकारच्या चमत्कारिक अहंगंडानं पछाडलेले आहेत. कुणाचं तरी एखादं काम काहीशा वेगळ्या वाटेनं जाऊन करण्यात कसली अनैतिकता आहे ? जणू काही नीतिमत्तेचा मक्ता तुझ्याकडेच दिला आहे ! आपण सर्वसाधारण माणसं आहोत हे कृपा करून ओळखा. स्वत:ला तुकाराम किंवा रामशास्त्री समजण्याची घोडचूक करू नका. तू त्याचे पेपरातले गुण वाढवले नाहीस म्हणून काही होणार नाही. तो अधिकारी विद्यापीठ परीक्षा विभागात जाऊन आपलं काम सहज करू शकेल. विद्यापीठाचा सचीव किंवा कोणी वरिष्ठ अधिकारी हे किरकोळ काम हसत हसत करील. संधी दाराशी चालून आली होती. तिचा लाभ करून घेण्याचं साधं व्यावहारिक कौशल्य तुझ्याजवळ नाही. वर्गातली पोरंसुद्धा तुमचं नैतिकतेवरचं व्याख्यान ऐकायला तयार होत नाहीत. रामायणाचा काळ संपून काही हजार वर्षं उलटून गेली. नीतिमूल्यांचा आग्रह धरल्यामुळंच रामाला वनवासात जाणं भाग पडलं.'

माझ्या सहकाऱ्याच्या बोलण्यातलं विदारक सत्य मला जाणवत होतं. पण व्यावहारिक फायद्यासाठी अधिकारी आणि प्राध्यापक यांच्यासारख्या समाजघटकांनी नैतिक तत्त्वांचा बिनदिक्कत बळी द्यावा हे कितपत योग्य आहे ? सर्वसाधारण माणूस पोटार्थी असतो. त्याच्या दृष्टीनं पोट हेच जीवनातलं परम सत्य. सकाळपासून रात्री झोपेपर्यंत त्याला पोटाची चिंता पडलेली असते. नाना प्रकारच्या तडजोडी करताना नीती अनीतीचा काथ्याकूट तो करीत नाही. जे पदरात पाडून घ्यायचं तेच महत्त्वाचं मानून त्याच्यामागं तो जात असतो, आपण एका मूल्याचा बळी देत आहोत हे त्याच्या गावीही असत नाही. पण त्यामुळं एका अर्थानं तो निश्चिंत असतो. काही शासकीय कार्यालयात 'वरचे पैसे' घेणं यात काहीच अनुचित मानलं जात नाही. तो एक सर्वमान्य संकेत होऊन बसला आहे. कार्यालयातून एखादं प्रमाणपत्र मिळवायचं असेल तर संबंधित कारकुनापासून अधिकाऱ्यापर्यंत वरचे पैसे देणं हा अलिखित, अपरिहार्य नियम मानला जातो. या नियमाचं पालन न करणारा माणूस अज्ञानी, अव्यवहारी आहे हे गृहीत धरतात. 'इतकी साधी आणि सरळ गोष्ट ! ज्याला समजत नाही त्याला कोण

काय करणार ? ज्या जगात आपल्याला जगायचं आहे, त्याच्या संकेताशी मिळतंजुळतं घेतलंच पाहिजे नाहीतर जगणं कठीण आहे. आदर्श केवळ पुस्तकात असतात आणि ते तिथेच शोभून दिसतात. पुस्तकांच्या पानांतून ते बाहेर आले तर त्यांना रद्दीचा भावसुद्धा मिळणार नाही. माझ्या सहकाऱ्यानं हाच आशय आपल्या रोखठोक भाषणातून मला सांगितला होता. त्याच्या बोलण्यात 'वस्तुस्थिती' आहे. पण ही स्थिती आपण बदलली पाहिजे हा विचार मात्र नव्हता. प्रवाहाबरोबर आपणही वाहात राहावं, प्रवाहाला नवं वळण लावणं किंवा त्याला विरोध करणं आपलं काम नव्हे हा त्याचा विचार मला दुबळेपणाचा वाटला.

माझ्याकडे आलेल्या त्या बड्या अधिकाऱ्याचं काम मी करू शकलो असतो. व्यवहारी कौशल्यानं त्याच्याकडून माझ्या काही गरजाही मला व्यवस्थित भागवून घेता आल्या असत्या. पण ज्या वैयक्तिक आणि सामाजिक आदर्शांबद्दल मी नेहमी बोलतो, जे आदर्श मला रक्षणीय वाटतात त्यांना माझ्या हातानं मी बळी द्यायचं काय ? जगणं म्हणजे केवळ लाजिरवाणी तडजोड करीत पोट भरणं इतकाच अर्थ असेल तर मग माणसांत आणि पशुपक्ष्यांत कोणतं अंतर राहणार आहे ?

काही दिवसांपूर्वी एका शाळेत शिक्षकदिनाच्या निमित्तानं मला प्रमुख पाहुणा म्हणून आमंत्रित करण्यात आलं होतं. त्या शिक्षणसंस्थेचे अध्यक्ष एक प्रसिद्ध गांधीवादी कार्यकर्ते होते. शाळेच्या आवारात गांधीजींचा एक भव्य पुतळा बसवला होता. शाळेतली शिस्त वाखाणण्यासारखी होती. या शिक्षणसंस्थेत विद्यार्थ्यांवर चांगले संस्कार घडवण्यासाठी विशेष प्रयत्न केले जातात असं मी ऐकलं होतं. शाळेतल्या काही शिक्षकांचा माझ्या हस्ते सत्कार करण्यात आला. त्यांनी शैक्षणिक ध्येयवादासाठी काही स्वार्थत्याग करून शिक्षकांसमोर एक उच्च आदर्श निर्माण केला होता असं मला सांगण्यात आलं. गांधीवादी अध्यक्षांनी त्याग, संयम, सुसंस्कार, सामाजिक जाणीव, नैतिक आचार विचार यावर एक उत्कृष्ट प्रवचन दिलं. त्यांच्या विचारांनी मी प्रभावित झालो. माझ्या भाषणात त्या अध्यक्षांचा आणि स्वार्थत्यागी शिक्षकांचा मी यथोचित गौरव केला. दुसऱ्या दिवशी त्या शाळेतले दोन शिक्षक मला भेटण्यासाठी आले. प्रथम ते गुळमुळीत

बोलत होते. माझ्या ' विचारप्रवर्तक ' भाषणाची ठराविक शब्दांत स्तुती करीत होते. पण नंतर त्यापैकी एकानं मला म्हटलं,

' सर तुमच्यासारखे लोक शाळेत आमंत्रित केले जातात. त्यांचा सन्मान होतो. मोठ्या इमारती, ग्रंथालयँ, शिस्तीचं वातावरण, ज्ञान आणि संस्कार यांचा गौरव करणारी भिंतीवर लिहिलेली सुभाषितं हे सगळं पाहून तुम्हाला वाटतं की आदर्श तत्त्वांना धरून ही संस्था चालली आहे. मग तुम्ही तिला आपल्या अलंकारिक भाषेत ' नगराचं भूषण, ' ' ज्ञानाचं माहेरघर ' असं गौरवता आणि आमच्या अध्यक्षांचा उल्लेख ' चारित्र्याचा आधारस्तंभ ' अशा शब्दांतून करता. ही तुमचीच नव्हे तर समाजाचीही फसवणूक आहे. या शाळेत शिक्षक नेमताना त्यांच्याकडून पंचवीस - तीसहजार रुपयांची लाच घेण्यात येते. साधी चपराशाची नोकरीसुद्धा इथं दहा - पंधरा हजाराला विकली जाते. शिक्षकांच्या पगारातून दर महिन्याला दोनतीनशे रुपये संस्थेच्या मदतीसाठी म्हणून सक्तीने कापून घेण्यात येतात. हा या संस्थेचा उच्च आदर्श आहे. हा शैक्षणिक ध्येयवाद आहे. आम्ही पोटार्थी माणसं आहोत. या अन्यायाशी तडजोड करीत जगण्याशिवाय आम्हाला मार्ग नाही आणि आमचा पगार कापून घेणारा संस्थेचा अध्यक्ष मात्र आचार्य म्हणून मिरवतो. या गांधीवादी आदर्श थोरं शिक्षणतज्ज्ञानं बंगला बांधला, दोन गाड्या घेतल्या, गावाबाहेर शेतीसाठी जमीन घेतली, शिक्षणसंस्थेच्या नावावर शासनाकडून आणि जनतेकडून हा माणूस देणग्या उकळतो. दररोज गांधीजींच्या पुतळ्याला हार घालून ' वैष्णव जन तो तेणे कहिये, ' हे भजन म्हणतो आणि तुमच्यासारखे लोक त्याच्या अंगावर स्तुतिस्तोत्रांचा, फुलांचा वर्षाव करतात. या परिस्थितीला काय म्हणावं ? '

मी अवाक् झालो. शिक्षणाच्या क्षेत्रातही भयानक शोषण करणारे लोक आहेत याची मला कल्पना होती. पण हा गांधीवादी आचार्यसुद्धा लुटारूंच्या कळपात इतक्या उच्चासनावर जाऊन बसण्याच्या योग्यतेचा आहे हे ऐकून मला धक्काच बसला. ते शिक्षक खोटं बोलत नव्हते याची मला खात्री पटली. हा प्रसंग गेले कित्येक दिवस मला अस्वस्थ करीत राहिला होता. आमच्या गावातल्या एका नाजावलेल्या शिक्षण संस्थेच्या पायाखाली असं काही जळत असेल याची कल्पनाच नव्हती. पुस्तकांच्या पानांतले आदर्श विचार आणि प्रत्यक्ष व्यवहार यातली भयानक विसंगती जसजशी लक्षात येते तसतसं मन विलक्षण विषण्ण

होतं. आपल्या आयुष्याचा हिशेब चुकला आहे याची जाणीव होते. मनाशी जपून ठेवलेल्या निष्ठा कवडी किंमतीच्या निरर्थक आहेत असं वाटायला लागतं.

कवी कुसुमाग्रजांच्या काही काव्यपंक्ती मला नेहमी आठवतात.

*ध्येय, प्रेम, आशा यांची होतसे का कधी पूर्ती*
*वेड्यापरी पूजितो या आम्ही भंगणाऱ्या मूर्ती*

आजचं जग सत्ता आणि संपत्ती यांची अखंड पूजाअर्चा करीत बसलं आहे. कालही ही प्रवृत्ती होतीच, पण तिचा आजच्या इतका विस्फोट झालेला नव्हता. नैतिक मूल्यांना थोडा तरी अर्थ होता. दारू पिणारी, लाच खाणारी, गैरव्यवहार करणारी माणसं आपली कृत्यं लपून छपून करीत होती. आज या गोष्टींना सार्वजनिक प्रतिष्ठा प्राप्त झाली आहे. एकदा एका समारंभात पाहुण्यासाठी मद्य देण्यात येत होतं. सर्व प्रतिष्ठित आमंत्रितांनी यथेच्छ आस्वाद घेतला. काहींनी आस्वादाचा अतिरेक केला. त्यांच्या जिभा बेताल नृत्य करू लागल्या. सभ्यता आणि संयम याचं वस्त्रहरण होऊ लागलं. पण हे वस्त्रहरण करणारे दुःशासन, दुर्योधन नव्हते. ज्यांचा उल्लेख भीष्माचार्य, द्रोणाचार्य असा केला जात होता त्यांनीच वस्त्रहरणाच्या क्रियेत यथाशक्ती भाग घेतल्यानंतर इतर दरबारी मंडळींना संकोच करण्याचं काहीच कारण नव्हतं.

दोन - तीन तास ही धुंद मैफल रंगलेली होती. घरी परतताना प्रत्येकजण यजमानाचे आभार मानीत म्हणाला, 'आजचा प्रोग्रॅम मस्त झाला, फिर मिलेंगे, तुमच्या इम्पोर्टेड स्कॉचनं खरी रंगत आणली.' वातानुकूलीत भव्य बंगल्यात हा पेयपान समारंभ चालू असताना दोन - तीन फर्लांगाच्या अंतरावर असलेल्या झोपडपट्टीतही असाच समारंभ साजरा होत होता. फरक इतकाच की इथं उंची कोच, देखण्या ऐटबाज खुर्च्या, विद्युद्दीपांचा सौम्य निळसर प्रकाश, तऱ्हेतऱ्हेची सुंदर काचपात्रं, धुंदी वाढवणारं मंद पाश्चात्य संगीत आणि प्याल्यांत तत्परतेनं मदिरा ओतणारे गोरेपान नाजूक हात ही सामग्री नव्हती. पण गाडग्यामडक्यांतून साठवलेली, जवळच्या भट्टीतच तयार केलेली कडक दारू होती. शिव्यांच्या देवाणघेवाणीत असाच समारंभ चालू होता. त्यामुळे श्रीमंती बंगल्यात काय किंवा दरिद्री झोपड्यांत काय एक प्रकारचं समतावादी वातावरण सहज उत्पन्न झालं होतं. पण 'प्रतिष्ठित' आणि 'अशिक्षित, असंस्कृत' इतकाच दर्शनी फरक. वृत्ती एकच. या प्रकाराबद्दल एक विचारवंत मला म्हणाले,

' अहो हे असंच चालायचं ! याबद्दल फार विचार करू नका. तुम्ही भ्रष्टाचार, लाचलुचपत वगैरे प्रकारांविषयी फार प्रक्षुब्ध होऊन बोलता. अत्यंत मोठ्या पातळीवर सर्व क्षेत्रांत हा भ्रष्टाचार फोफावलेला आहे. तुम्ही आम्ही फार तर याविरुद्ध दोन - चार लेख लिहू, भाषणं करू, लोक टाळ्याही वाजवतील. पण हे सारं असंच चालू राहणार. '

मला हे निराशावादी, निष्क्रिय विचार आवडले नाहीत. पण या विचारात एक भीषण सत्य मात्र सामावलेलं आहे. शेक्सपिअरच्या हॅम्लेटनं म्हटल्याप्रमाणे जगाचा सांधा निखळून गेला आहे. सुखदु:खाच्या, श्रीमंतीच्या, यशाच्या कल्पना बदलून गेल्या आहेत. ज्यांना संत समजतो ते देखील आपापले मठ स्थापन करून सत्तेच्या आणि वैभवाच्या आसनावर बसलेले आहेत. कोणी सुटाबुटात असतील, तर कोणी भगव्या पायघोळ रेशमी वस्त्रात मिरवत असतील. या प्रवाहाबरोबर वाहून जाणं किंवा काठावर उभं राहून चिंता करीत राहणं इतकंच आपल्या हाती आहे जे जे होईल ते ते पाहावे यापेक्षा आपण काय करू शकतो ?

●

□ □ २३

# कांचनमृगाचा पाठलाग

लिओ टॉल्स्टॉय यांच्या एका सर्वप्रसिद्ध कथेची मला नेहमी आठवण होते. 'माणसाला केवढ्या जमिनीची जरूर आहे ?' हे त्या कथेचं शीर्षक. बहुतेकांना ही कथा माहीत असेल. एका दरिद्री शेतमजुराला त्याचा धनाढ्य जमीनदार मालक सांगतो की 'माझ्याजवळ हजारो एकर जमीन आहे. तू सूर्योदयापासून सूर्यास्तापर्यंत चालशील तेवढी जमीन तुला बक्षीस देईन.' तो शेतमजूर चालत राहतो. पळू लागतो. धावण्याचा वेग वाढवतो. क्षणभरही उसंत न घेता धावतच राहतो. अफाट जमिनीचा मालक होण्याच्या हावरट प्रवृत्तीनं, लोभानं झपाटलेला तो शेतमजूर तासन्तास धापा टाकीत पळत राहातो आणि अखेर सूर्यास्ताच्या वेळी अतिश्रमाने थकून जमिनीवर कोसळतो. रक्ताची गुळणी टाकून प्राण सोडतो. त्याला पुरताना एकजण म्हणतो, 'अरे, कशाला इतकी धावाधाव केलीस ? माणसाला पायापासून डोक्यापर्यंत फक्त साडेतीन हात जमिनीची जरूर असते.'

टॉलस्टॉयची ही कथा खरोखरच विलक्षण आहे. मनुष्याच्या आत्यंतिक, दुराराध्य मोहवशतेवर विदारक टीका करणारी ही कथा जितकी वास्तव तितकीच परिणामकारक आहे. जागतिक कथा साहित्यातून निवडक शंभर कथा निवडायच्या तर त्यांत या कथेचा अंतर्भाव करावा लागेल. ही उपदेशात्मक कथा नव्हे. काही लोकांना बोधवादाची ॲलर्जी असते. साहित्याला उद्‌बोधनाचं अंग असलं की त्यांना मळमळायला लागतं. साहित्यात केवळ कलेचं दर्शन घडावं ही त्यांची भूमिका असते. या कलावादी रसिकांनाही विलक्षण प्रत्यय देणारी आणि मानवी मनाचं चमत्कृतिपूर्ण पण अस्सल चित्र रेखाटणारी ही कथा जीवनावर सहजपणानं भाष्य करून जाते. टॉलस्टॉयनं माणूस अंतर्बाह्य पाहिला होता. त्यामुळं माणसाच्या सामर्थ्याबरोबरच त्याच्या अटळ दुबळेपणावर, अज्ञानावर त्यानं टीका करावी हे स्वाभाविक आहे. प्रतिभासंपन्न लेखकांचं साहित्य वाचताना

एक प्रकारचा दु:खी आनंद वाचकांच्या पदरात पडतो. गुदगुल्या करणाऱ्या उथळ लेखकांपेक्षा काळजाला जखम करणारे लेखक आपल्या आयुष्यावर खोल परिणाम करू शकतात. वाच्यार्थानं टॉलस्टॉय रशियाचा असेल पण परमार्थानं तो मानवतेचा लेखक आहे. ज्ञानेश्वर, तुकाराम मराठी मातीचे घटक असले तरी ते विश्वजीवनाची सुखदु:खे बोलू शकतात. प्रतिभावंतांना पायाखालची जमीन आणि माथ्यावरचं आकाश बांधू शकत नाही. टॉलस्टॉयनं या लहानशा कथेतून माणसाच्या रक्ताला वेढून बसलेल्या लोभाचं आणि मोहाचं नागडं उघडं विरूप दर्शन घडवलं आहे. ही कथा मी कित्येक वेळा वाचली. माझ्या व्याख्यानांतून तिचा अनेक स्थळी उच्चार केला. जमिनीच्या लोभानं जीव पणाला लावून पळत सुटलेला मूर्ख, अडाणी शेतमूजर आमच्याही रक्तात थोडाफार ठाण मांडून बसला आहे याची जाणीव होते.

खरोखरच माणसाला जगण्यासाठी केवढ्या जमिनीची, केवढ्या मालमत्तेची, केवढ्या साधनसामग्रीची जरूर असते ? काही दिवसांपूर्वी इंदोरला गेलो असताना एका कोट्यधीश व्यापाऱ्याच्या भव्य बंगल्यात दोन - तीन दिवस राहण्याची संधी मिळाली. त्याचा हा बंगला 'प्रचंड' या विशेषणालाही अपुरा पडेल. तो महाप्रचंड होता. बंगल्याला लागून एक विस्तृत सुंदर उद्यान त्यानं तयार केलं होतं. आपल्या अर्धा डझन मोटारी ठेवण्यासाठी सुसज्ज गॅरेजेस बांधली होती. पोहण्यासाठी तलाव होता. या लक्ष्मीपुत्राच्या महालात सारे काही होते. एक उत्तम शोभिवंत सभागृहही होते. खाद्य आणि पेय पदार्थांची केवळ दृश्यंसुद्धा तृप्त करणारी होती. त्या लक्ष्मीपुत्रानं आणखी दोन - तीन शहरांत आपण आलिशान बंगले कसे बांधीत आहोत याचं वर्णन केलं. साठीच्या आसपास असलेला आणि सदैव औषधांच्या गोळ्या घेऊन जगणारा हा माणूस उपभोगाची सामग्री मोठ्या असोशीनं दोन्ही हातांनी गोळा करीत होता. हिऱ्यांचा व्यापार करणारा हा धनंतर गृहस्थ आज मुंबई, उद्या न्यूयॉर्क, परवा हाँगकाँग असा उड्डाण करीत होता. प्रवासातसुद्धा आपल्याबरोबर दोन तज्ज्ञ डॉक्टर्स त्याला सोबतीला सहाय्याला घ्यावे लागत होते. पण संपत्ती मिळवण्याच्या महत्त्वाकांक्षेने तो झपाटला होता. त्याला आपला व्यापार वाढवायचा होता. आंतरराष्ट्रीय व्यापाऱ्यांच्या संघात आपलं स्थान केवळ महत्त्वाचं नव्हे तर प्रमुखाचं असावं ही त्याची इच्छा होती. रात्रंदिवस हाच ध्यास. आपल्या बायकामुलांशीही निवांतपणानं बोलायला त्याला

वेळ नव्हता. या ' बड्या ' माणसाशी माझी तासभर मुलाखत झाली तेव्हा तो म्हणाला,

' मी आयुष्यात फक्त पैसा मिळवला. पैसा हेच सगळ्या सुखांचं मूळ आहे. राज्याचा मुख्यमंत्री सुद्धा माझ्या श्रीमंतीमुळं माझ्यासमोर हात जोडून उभा राहतो. जीवनात मी केवळ लक्ष्मीचीच पूजा केली. कुबेराच्या ऐश्वर्याशी माझी आता स्पर्धा आहे. गडगंज वैभवात लोळत राहाणं हेच माझं परमसुख मी मानीत आलो. बाकीच्या गोष्टी महत्त्वाच्या असतीलही. पण संपत्ती हीच माझ्या दृष्टीनं सर्वांत महत्त्वाची शक्ती आहे. अधिकाधिक पैसा मिळवण्यासारखा दुसरा आनंद नाही. '

त्या लक्ष्मीपुत्राचं हे जीवनाचं तत्त्वज्ञान ऐकून मी हतबुद्ध झालो. संपत्तीच्या महापुराबरोबर वाहात असलेल्या या लक्ष्मीपूजकाला खऱ्या आनंदाचा किनारा अद्यापी सापडलाच नव्हता. पैशाच्या बळावर काही भौतिक सुखं विकत घेता येतात यात शंका नाही. पण रात्रंदिवस संपत्तीच्या पाठीमागे देहभान विसरून उरी फुटेपर्यंत धावण्यात कोणतं सुख आहे ? शरीराच्या पातळीवरची सुद्धा सारी सुखं पैशाने मिळत नाहीत. सुखाचं एक साधन म्हणूनच संपत्तीकडं पाहाणं शहाणपणाचं ठरतं. पण या धनवंताला धनाच्या पलीकडे काही मूल्य असू शकते याचा अद्यापी थांगपत्ताच नव्हता. त्याला काही समजावून सांगण्याचा मला अधिकार नव्हता. सांगण्यात अर्थही नसतो. ' एकच प्याला ' त बुडत चाललेल्या सुधाकराला शहाणपणाचे शब्द सुनावण्याचा प्रयत्न रामलाल करतो. सुधाकरला ते कळत होतं पण वळत नव्हतं. अखेर रामलाल म्हणतो,

' शब्दांचं शहाणपण शिकवायला म्हणून मी इथं आलो आणि शहाणपणाचे शब्द शिकून परत चाललो. ' सुधाकर अशा चक्रव्यूहात सापडला होता की त्यातून बाहेर पडण्याचे दार त्याला दिसू शकत नव्हते. टॉलस्टॉयच्या गोष्टीतला गरीब शेतमजूर थोडासा संयमी असता तर त्याचं सारं जीवन आनंदात गेलं असतं. पण असली जरतारी भाषा करण्यात काय अर्थ आहे ? पुराणकाळापासून ययातीचा वारसा मिळालेला माणूस मोहाच्या भोवऱ्यात सापडला म्हणजे त्याची सुटका होणे नाही.

आज शास्त्राच्या प्रगतीमुळं सुखसाधनांची बेसुमार वीण झालेली दिसते. मुंबईच्या फोर्ट आणि कुलाबा भागांतून एक फेरफटका मारला की, शेकडो रंगीबेरंगी मोहाच्या नागिणी माणसाच्या मनाला विळखा घालू लागतात. संयमाचा

विचार विरघळून जातो. तिरपा नेत्रकटाक्ष टाकणाऱ्या प्रत्येक मोहाला मिठी मारण्यासाठी वखवखलेल्या मनाची धडपड सुरू होते. बेलगाम सुटलेल्या वासना काबूत ठेवण्यासाठी केलेले सर्व उपाय निष्फळ ठरतात. लोभाची आणि क्षोभाची अतृप्तीची जोरदार लाट नाकातोंडावर आपटते आणि मग तोल सुटलेला माणूस खोल खोल समुद्रात ओढला जातो. किनारा दूर राहिलेला असतो. गटांगळ्या खात तळाला जाण्याशिवाय गत्यंतर उरलेले नसते. ज्ञानेश्वरांचे एक वचन असे आहे, ' विस्तवाच्या अंथरुणावर पडलेल्या माणसाला कधी सुखाची झोप येऊ शकेल का ?'

कुणतरी म्हणेल, हे जुनाट पारंपरिक विचारांचं तुणतुणं कशाला वाजवता ? आयुष्यातल्या सर्व सुखांना आम्हाला बिनदिक्कतपणानं भिडू द्या. तुमच्यासारख्या भेदरट, आंबलेल्या लोकांनी संयमाचा केविलवाणा विचार पुन्हा पुन्हा सांगितला आहे. आम्हाला नीती आणि संस्कार असल्या फसव्या शब्दांच्या पिंजऱ्यात अडकून पडायचं नाही. हे आयुष्य आम्ही प्रचंड धुंदीत जगणार आहोत. सोवळ्या, साजुक शब्दांतली तुमची आध्यात्मिक प्रवचनं ऐकून विटलेलं आमचं मन कलावंतिणीच्या पायांतल्या घुंगरात आम्ही गुंतवणार आहोत. आपल्या मखमली हातांनी हलकेच स्पर्श करून रंगेल बेहोषीच्या चांदण्यात घेऊन जाणारी ती लाल रंगाची वारुणी आम्हाला मनमुराद प्यायची आहे. तुमच्या साधुसंतांच्या भगव्या आणि भकास उपदेशाचा आम्हाला धाक वाटत नाही. बेहोषीत जगणं इतकंच आमचं ध्येय आहे. हा जडवादी विचार नवा नाही. तोही जुनापुराणाच आहे. पण संयमाच्या विचाराचा उपहास करून वासनेच्या केवळ कोडकौतुकात रमणाऱ्या आजच्या माणसाला कशाचंच भान उरलेलं नाही.

साध्या पंचायतीतल्या निवडणुकीतल्या पराभवाचं क्षुद्र दुःख सुद्धा पेलण्याची कुवत नसलेला हा गावचा पुढारी आपल्या अनुयायांना घेऊन वडिलार्जित चौसोपी वाड्यात बसला आहे. सर्वांच्या पुढ्यात ' दुःख विसरण्यासाठी आवश्यक असलेलं ' पेय ठेवलेलं आहे. भरलेले प्याले रिकामे झाले की, पुन्हा तत्परतेनं भरले जातात. पुढारी महाशय मिशीवर पीळ देऊन म्हणतात,

' हजारो रुपये ओतून सुद्धा या निवडणुकीत मी पडलो हे कसं विसरू ? तो भिकारडा माझ्या नाकावर टिच्चून सरपंच होतो म्हणजे काय ? अरे, काळजात आग पेटली आहे माझ्या. सरपंच व्हायची माझीच लायकी आहे. सगळी इस्टेट

घालवीन पण त्याला खुर्चीवर बसू देणार नाही. नाहीतर बापाचं नाव सांगणार नाही.'

जमलेले सगळे चमचे आपल्या वंदनीय पुढाऱ्याच्या 'मर्दुमकी' चा गौरव करतात. एकजण म्हणतो, 'सायेब, याला म्हन्त्यात जिद्द. या गावचं तुमीच राजं. उगीच राजाच्या जागी एखादं कोल्हं बसलेलं आमी नाही चालू देणार. तुमच्या पायी आभी मरायला बी तयार हाय.' निष्ठावंत अनुयायांचं राजकारण मग रंगायला लागतं. एका खेड्याच्या राजकारणात आणि देशाच्या राजकीय परिस्थितीत बारकाईनं पाहिलं तर पुष्कळच साम्य दिसतं. अमर्याद सत्तेची लालसा, संपत्तीचा वाढता हव्यास, वासनेच्या चिखलात बरबटून निघालेली मनं आणि तिच्या तृप्तीसाठी वाटेल त्या आडवळणाने जाण्याचा बेडरपणा यात साऱ्या आयुष्याचं सार्थक सामावलेलं आहे. हा अहंकारी भ्रम कुरवाळीत बसलेले भले भले लोक पाहिले म्हणजे दारुण निराशा पदरात पडते.

सुखोपभोगाला कुणाचाच विरोध नाही. निसर्गानं जितकं आयुष्य पदरात टाकलं आहे तितकं आनंदानं आणि रसिकतेनं आम्हाला जगायचं आहे. सारे रस नि सारे रंग मिळवून हे जीवन आम्हाला बहारदार बनवायचं आहे. पण म्हणून क्षुद्र वासना आणि कळकट मोह यांच्या आहारी जाऊन या सुंदर जीविताला रोगट करण्याचा मूर्खपणा कशाला करायचा ? आनंदाच्याही अनेक पातळ्या असतात. लहान मुलाला चॉकलेटची चव हाच आनंदाचा महान ठेवा वाटतो. माणसं वयानं वाढतात, पण आपल्या जिभेच्या गुलामगिरीतून बहुसंख्य माणसे मुक्त होत नाहीत. खाण्यापिण्याच्या पदार्थापलीकडे ज्यांची आनंदाची कल्पना जात नाही त्यांच्याबद्दल काय बोलायचं ? इंद्रियांच्या भोगाचे विषय उन्मादक सुख देतात यात शंका नाही पण त्या सुखाचा स्वाद आणि रंग हळूहळू उडून जातो हे लक्षात न घेता माणसे त्याबद्दल दुःख करू लागतात. माझ्या घनिष्ठ परिचयाचे एक डॉक्टर मला म्हणाले,

'महाभारतातील ययातीची गोष्ट तर मला मुळीच काल्पनिक वाटत नाही. साठी आणि सत्तरी उलटलेले अनेक लोक माझ्याकडे तारुण्यातल्या शक्तीसाठी इंजेक्शन वा औषध द्या असं काकुळतीनं सांगतात. शरीर निवृत्त झालं तरी यांचं मन मात्र विषयासक्तीच्या रिंगणातच फिरत असतं. निसर्गक्रम आणि न्याय मान्य करायला हे हट्टी लोक तयार नसतात. याचा अर्थ ययातीची परंपरा आजही अखंड

चालू आहे. डॉक्टरांचं म्हणणं खरं होतं. निसर्गाशी मिळतंजुळतं घेण्यापेक्षा त्याला विरोध केल्यामुळेच शरीराचे आणि मनाचे अनेक रोग उद्भवतात. निसर्गाविरुद्ध बंडखोरी करणारे हे वेडे लोक तसे सुशिक्षित असतात. त्यांना कळत असतं, पण निसर्गाचा कायदा पाळला पाहिजे ही समंजस जाणीव मात्र नसते. मग वैफल्यानं ग्रासलेले हे रुग्ण आपलं समाधान हरवून बसतात. अमर्याद जमिनीवर धावण्याची आत्मघातकी आकांक्षा कशासाठी ? कांचनमृगाचा पाठलाग करीत राहण्यात सारं जीवन संपवायचं का ?

सत्तेच्या राजकारणातून खरोखरच निवृत्त झालेल्या एका सद्‌गृहस्थाची परवा भेट झाली. एका खेड्यात लहानसं घर बांधून ते राहिले आहेत. सत्तेच्या अनेक जागांवर ते पूर्वी होते. एक विलासी प्रकृतीचा रजोगुणी राजकारणी नेता म्हणून त्यांची एकेकाळी प्रसिद्धी होती. पण आता या खेड्यात राहून ते साक्षरता प्रसाराचं आणि लोकसेवेचं जमेल तेवढं काम निरिच्छ बुद्धीनं करीत होते. आता अंगावर तलम उंची वस्त्रे नव्हती, ओठात ऐटबाज पाईप नव्हता. साध्या स्वच्छ कपड्यांतली त्यांची प्रतिमा पाहून मला आश्चर्य वाटलं. पण बोलता बोलता त्यांनीच खुलासा केला. ते म्हणाले,

'एकेकाळी जीवनातल्या भौतिक सुखांचा मी पाठलाग केला. काही हस्तगत केली. सत्तेच्या आणि संपत्तीच्या आणि माझ्या रंगेल मित्र - मैत्रिणींच्या उन्मादक सहवासात काही वर्षं निश्चितच रंगून गेलो होतो. पण या साऱ्या सुखांची आणि भोग्य वस्तूंची वास्तविक किंमत किती याची मला कल्पना होती. आपल्या भारतीय तत्त्वज्ञानाप्रमाणं हळूहळू या बाह्य गोष्टींतून मी बाहेर पडलो. खरं सांगू ? आता त्या भोगलेल्या आणि रंगवलेल्या उन्मादक सुखांची आठवण करीत, रवंथ करीत राहण्यात स्वारस्य वाटत नाही मला. आता मनाचं आणि आत्म्याचं सुख मला भरभरून घ्यावंसं वाटतं. आता जमिनीवरचं सरपटणं नको, आकाशाची ओढ लागलेली पाखरं भुईवर आली तरी तिथं ठरत नाहीत. या गावातल्या लोकांच्या सेवेत मी रमलो आहे. आनंदात आहे. प्रेमाच्या माणसांत आहे.'

त्या गृहस्थाच्या मुद्रेवर तृप्ती होती. शांती होती. मोह आणि लोभ वाढला की गरजा वाढत जातात. गरजा मर्यादित ठेवल्या तर मन शांत, संथ राहतं असंच ते सांगत होते.

• •

## डॉ. निर्मलकुमार फडकुले यांचे साहित्य

१. लोकहितवादी : काल आणि कर्तृत्व

२. साहित्यवेध

३. संतकवी तुकाराम : एक चिंतन

४. काही रंग काही रेषा

५. हिरव्या वाटा

६. आनंदाची डहाळी

७. जगायचं कशासाठी ?

८. रंग एकेकाचे

९. संत कवी चोखा मेळा आणि समकालीन संतांच्या रचना

### संपादित

१. ज्ञानेश्वरी : अध्याय सहावा

२. चिपळूणकरांचे तीन निबंध

३. प्रबोधनकाळातील पाऊलखुणा

४. निवडक लोकहितवादी ( सहकार्याने )

५. यांत्रिक ( सहकार्याने )

*आणखी काही*
*वाचनीय व संग्राह्य*
*पुस्तके*

---

मादाम बोवारी (कादंबरी) : फ्लोबेर
अनुवाद : जयंत धुपकर
अखेर पाय मातीचे (नाटक) : रा. शं. दातार
काफला (गझलसंग्रह) : संपादक - सुरेश भट, अविनाश कांबळे.
वळणावर (कथा) : छाया महाजन
पडद्याआड (आत्मकथन) : जयराज रजपूत
माझी वाकळ (आत्मकथन) : रत्नाजी आगवणे
इब्सेन (अभ्यासग्रंथ) : अनिरुद्ध कुलकर्णी
तौलनिक साहित्याभ्यास : संपादक - चंद्रशेखर जहागिरदार
भारतीय अभयारण्ये : अनिल दामले

*आगामी*

सर्ज्या (कांदबरी) : सुरेश शिंदे
अन् झालं भलतंच (आत्मकथा) : बाबुराव गोखले
गझलधारा : संपादक - अविनाश कांबळे
पाहुणा (नाटक) : अभिराम भडकमकर
महाराष्ट्रातील अभयारण्ये : सुरेशचंद्र वारघडे
कुंती... मी राजमाता! (कादंबरी) : अनंत अंबादास कुलकर्णी

---

**कॉन्टिनेन्टल प्रकाशन**
**विजयानगर पुणे ३०**